ISSN 0973 - 8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# अर्थसंवाद

भारतीय सौर मार्गशीर्ष - फाल्गुन 1929

जानेवारी - मार्च 2008, / खंड 31, अंक 4

- विशेष आर्थिक परिक्षेत्र (अध्यक्षीय भाषण)
- रोजगार (भाग - 2)
- सहकारी संस्थांचे विकास प्रक्रियेतील योगदान
- हॉवर्ड गार्डनर यांचा बहुविध बुध्दिमत्तेचा सिध्दांत
- अर्थसंकल्प 2008 मध्ये दडलंय काय?
- शेतकरी कर्जमुक्ती प्रश्न - वस्तुस्थिती आणि पर्याय
- शहरीकरण रोखा व शेती वाचवा
- कायदा आणि अर्थशास्त्र
- एकतिसावे / बत्तिसावे वार्षिक अधिवेशन

अर्थसंवाद ३१ वर्षे पूर्ण

ंग

र !

१९२
३.२४ कोटी
२.८६ लाख
४.६६%

आयसीआय
लाईफ इन्शुरन्स

न्स
लि.
ग !
१६.

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये ।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जानेवारी - मार्च 2008, / खंड 31, अंक 4

प्रमुख संपादक
विनायक श्रीधर देशपांडे

सहायक संपादक
रवीन्द्र शंकर जोशी

सल्लागार मंडळ
(2006-09)
अवधूत नाडकर्णी
अ.ब. देवगिरीकर
किशोर वाघमारे
जयश्री खांबेटे

संपादकीय पत्रव्यवहार
विनायक श्रीधर देशपांडे
'श्रीकमल' 48, विद्या विहार,
प्रताप नगर, नागपूर 440022
दूरध्वनी क्र. 95712-2237042

। अ नु क्र म णि का ।

● संपादकीय
विनायक श्रीधर देशपांडे......293
● विशेष आर्थिक परिक्षेत्र (सेझ)
प्रकाश कुलकर्णी......296
● रोजगार (भाग २)
शरद शंकर जोशी......311
● सहकारी संस्थांचे आर्थिक सामाजिक विकास प्रक्रियेतील योगदान
ल. मा. भोळे......328
● हॉवर्ड गार्डनर यांचा बहुविध बुध्दिमत्तेचा सिध्दांत
रमेश पानसे......337
● अर्थसंकल्प 2008 मधे दडलंय काय?
विनायक गोविलकर......347
● शेतकरी कर्जमुक्ती प्रश्न : वस्तुस्थिती आणि पर्याय
र. पु. कुरुलकर......359
● शहरीकरण रोखा व शेती वाचवा
दि. मा. मोरे......373
● कायदा आणि अर्थशास्त्र
अतुल देशपांडे......381
● टिपण / पीएच.डी.सारांश / ग्रंथ परीक्षण / अभिनंदन / आत्मचरित्र
आर. बी. भांडवलकर, देवदत्त दाभोलकर, शर्वरी कुलकर्णी
मृणालिनी फडणवीस, चारुदत्त गोखले, दिनकर बोरीकर......395
● एकतिसावे / बत्तिसावे वार्षिक अधिवेशन : अहवाल / संवाद
बबनराव खामकर, चारुदत्त गोखले, विनायक देशपांडे,
रमेश दांडगे, मधुकर शिंदे, सी. पं. खेर......411

• मराठी अर्थशास्त्र परिषद
कार्यकारी मंडळ (2007 - 08)

• अध्यक्ष
प्रकाश कुळकर्णी (सांगली)

• कार्याध्यक्ष
ज. फा. पाटील (कोल्हापूर)

• कार्यवाह - खजिनदार
चारुदत्त गोखले (जळगाव)

• प्रमुख संपादक 'अर्थसंवाद'
विनायक श्रीधर देशपांडे (नागपूर)

• सदस्य
1. हिरालाल चव्हाण (जळगाव)
2. वसंत पाटील (जळगांव)
3. राजेन्द्रकुमार गव्हाळे (बुलढाणा)
4. कृष्णराव पाटील (नागपूर)
5. सुभाष टकले (हिंगोली)
6. माधव गायकवाड (औरंगाबाद)
7. तानाजी गिते (पुणे)
8. बाळासो पाटील (सांगली)
9. बबनराव खामकर (सिंधुदुर्ग)
10. अर्जुन पाटील (कोल्हापूर)
11. मोहन चौधरी (पुणे)
12. लक्ष्मीकांत तायडे (सोलापूर)



• अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :
1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली
2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
(टिप : म.रा.सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)



• कार्यालयीन पत्रव्यवहार
(आजीव सदस्य, वर्गणी, जाहिरात पाठविणे, वगैरे)

चारुदत्त गोखले
कार्यवाह - खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'अक्षय' प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राचे मागे, जळगाव - 425001
(दूरध्वनी : 95257 - 2252375)

परिषदेचे प्रमुख कार्यालय
मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम. एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कॅम्पस, प्लॉट क्र. 6 'एफ' ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई 400051


## वर्गणी

| | |
|---|---|
| **अ) परिषदेचे सदस्य** | |
| आजीव सदस्य (एकरकमी) | : रु. **1500** |
| साधारण सदस्य | : रु. **300** (वार्षिक) |
| **आ) संस्था सदस्य** | |
| शैक्षणिक संस्था | : रु. **250** (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : रु. **250** (वार्षिक) |
| **इ) अर्थसंवाद वर्गणीदार** | |
| ग्रंथालये | : रु. **250** (वार्षिक) |
| **ई) वर्षगणना** | : **1** एप्रिल ते **31** मार्च |

• परिषदेच्या सदस्यांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.
• कृपया आजीव सदस्य वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी. संपादकांकडे पाठवू नये. रीतसर पावती कार्यवाहांमार्फतच प्राप्त होईल.
• ग्रंथालयांनी, साधारण सदस्यांनी अर्थसंवाद बाबतचा सर्व पत्रव्यवहार प्रमुख संपादकांशी करावा.

# संपादकीय...

मराठी अर्थशास्त्र परिषदेने, सहा वर्षांपूर्वी सोपविलेली अर्थसंवादच्या संपादनाची जबाबदारी पूर्ण करून, ती नव्या संपादकांकडे सुपूर्द करताना मला आनंद होत आहे. मराठीतून अर्थशास्त्रविषयक दर्जेदार शोधनिबंध प्रकाशित व्हावेत, या उद्देशाने सुरू झालेल्या व नामवंत अभ्यासकांनी, संशोधकांनी व संपादकांनी समर्थपणे चालविलेल्या या नियतकालिकाचे संपादन करण्याची संधी मला प्राप्त होणे हा माझ्यासाठी सुखद भाग्ययोग होता. अर्थशास्त्रातील विविध विषयांवर लेख मिळविणे, ते शास्त्रीय भाषेत संपादित करणे, माहितीच्या व संदर्भाच्या चुका टाळणे, ताज्या घडामोडींवर विशेषांक काढणे व हे सर्व करीत असतांना नवे लेखक,नवे संशोधक व नवे वाचकही मिळविणे हे एक मोठेच आव्हान होते. त्याचबरोबर अर्थसंवाद हे आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हावे यासाठी प्रयत्न करणेही गरजेचे होते. या सर्व बाजुंचा विचार करून सल्लागार मंडळ, व कार्यकारी मंडळातील सर्व सदस्यांच्या सहकार्याने विविध योजना राबविण्याचा आम्ही प्रयत्न केला. या कालावधीत अर्थशास्त्राशी संबंधीत विविध प्रश्नांवरील संशोधनपर साहित्य व विशेषांक आम्ही प्रकाशित करू शकलो, आणि हे करीत असताना गुणवत्तेशी तडजोड करावी लागली नाही ही आमच्यासाठी समाधानाची बाब आहे. सर्व देणगीदार वाचक, लेखक व माझे सहकारी यांच्या मुळेच हे शक्य झाले हे कृतज्ञतापूर्वक नमूद करतो.

अर्थसंवादच्या प्रमुख संपादकाची जबाबदारी, मी माझ्या क्षमतेनुसार 2001 ते 08 या कार्यकाळात 24 अंक प्रकाशित करून पूर्ण केली. प्रत्येक अंकात अद्ययावत माहिती, विचारप्रवर्तक, विद्यार्थ्यांना उपयुक्त होतील असे लेख, भावी संशोधकांना दिशादर्शक ठरेल असे साहित्य देण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केला. प्राप्त झालेले सर्वच लेख प्रकाशित करता आले नाहीत, याची खंत वाटते. परिषदेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी, सदस्यांनी आणि ज्येष्ठ मंडळींनी मला हे काम करतांना संपूर्ण स्वायत्तता बहाल केली होती. लेख प्रकाशित करण्याचे दृष्टिने कोणत्याही स्तरामधून दबाव येत नसे. संपादकाला संपूर्णपणे मिळणारे निर्णय स्वातंत्र्य, ही आपल्या परिषदेच्या कार्यपद्धतीची जमेची बाजू आहे असे मला वाटते. विविध ज्वलंत प्रश्नांवर अभ्यासपूर्ण लेख व महत्त्वाची माहिती देणारे विशेषांक यामुळेच संपादित करता आले. अशीच स्वायत्तता भावी काळातील संपादकांना लाभावी ही अपेक्षा !

गेल्या सुमारे दोन दशकात भारताच्या आणि जगाच्या अर्थव्यवस्थेत, अर्थव्यवहारांमध्ये व आर्थिक सिद्धांताच्या विकास प्रक्रियेत अभूतपूर्व असे बदल घडून आले आहेत व प्रत्यही येत आहेत. याबदलांचे परिणाम व गती स्तिमित करणारी आहे. जागतिकीकरणाच्या निमित्ताने, एका बाजूला देशादेशातील

कंपन्यांचे विलिनीकरण होऊन बाजारांचे मोठ्या प्रमाणावर पसरण व्हावयास सुरुवात झाली आहे. विविध वस्तू उपलब्ध असलेला बाजार विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगती दर्शवितात. मध्यमवर्गाची संख्या लक्षणीयरित्या वाढत चालली आहे. याचा परिणाम म्हणजे वस्तुंच्या मागणीत देखील भरमसाठ वाढ झाली आहे. याला विकासाचे नवे पर्व मानले जात आहे. दुसऱ्या बाजूला मात्र, आशिया व आफ्रिकेतील वंचितांची दुर्दशा तशीच कायम आहे. दारिद्य, कुपोषण, बेरोजगारी व सर्वांगिण मागासलेपण वाढत चालले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे एकच उदाहरण वंचितांच्या सर्वांगिण शोषणाचे दाहक वास्तव आपल्यासमोर मांडते. या सर्वात कहर म्हणजे औद्योगिकरणामुळे व नव्या 'वापरा आणि फेकून द्या' या जीवनशैलीमुळे खूप मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक संसाधनांचा, वेगाने विनाश होत आहे. ही परिस्थिती म्हणजे, नव्या संपन्न व्यवस्थेच्या 'जन्मापूर्वीच्या कळा' असून लवकरच हे सारे बदलेल व साऱ्या जगाचा अभूतपूर्व विकास होईल असा आशावादही मांडला जात आहे ! या दोन्ही भूमिकांची मांडणी नामवंत अर्थशास्त्रज्ञ करीत आहेत. त्यांच्या भूमिकांवर, सिद्धांतनावर, उदंड चर्चा होत आहे. या चर्चांची दखल घेणारी अर्थशास्त्रविषयक नवनवीन नियतकालिके प्रकाशित होत आहेत. व्यवस्थापन, विपणन,व्यापार,उद्योग क्षेत्रातील चढउतार, असे अर्थशास्त्राशी संबंधित विषय हे आता स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून विकसित होत आहेत व त्यामुळे त्याही विषयांवर खूप संशोधनपर लिखाण प्रकाशित होऊ लागले आहे. या परिस्थितीत, मराठीतून अर्थविषयक सर्व विषयांची चर्चा करणारे नियतकालिक म्हणून 'अर्थसंवादचे' महत्त्व दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. आर्थिक क्षेत्रात वेगाने घडणाऱ्या उपरोक्त घटनांची गंभीरपणे दखल घेणे, त्या घटनांची चिकित्सा करणे, होणाऱ्या परिणामांचा वेध घेणे व झालेल्या परिणामांची तटस्थपणे चिकित्सा करणे, या घडामोडीं विषयक जागरूक राहून उपलब्ध होत असलेल्या साहित्याचे वाचन करून ते मराठीत वाचकांसमोर मांडणे हे अर्थशास्त्राच्या सर्व अभ्यासकांसमोर आव्हान आहे. या आव्हानांचे स्वरूप हे अत्यंत व्यापक,व्यामिश्र व गुंतागुंतीचे आहे. या युगाच्या समस्या सोडवितांना अनेक बाबतीत नव्याने विचार करावा लागणार आहे, कारण समस्यांचे स्वरूप,कारणे व परिणामांतही प्रचंड बदल दिसू लागले आहेत व त्यामुळेच जुनी उत्तरे, जुने सिद्धांत,जुने उपाय,जुने विचार कदाचित बदलत्या परिस्थितीत समर्पक ठरणार नाहीत. या नव्या आर्थिक, राजकीय, सामाजिक,सांस्कृतिक,परिवेशात अर्थशास्त्राची फेर मांडणी करावी लागणार आहे. संशोधनाची दिशा,संशोधनाचे विषय व संशोधनाची साधने ही नव्याने विकसित करावी लागणार आहेत .

हे लक्षात घेऊन या सर्व बदलांचा वेध घेणारे लेख प्रकाशित करण्याचा आम्ही प्रयत्न केला. अर्थसंवादचा प्रत्येक अंक आकर्षक व वाचनिय व्हावा या साठी गेल्या सहा वर्षात आम्ही बरेच प्रयत्न केले. अजूनही यात वैविध्य आणण्यास बराच वाव आहे. आता अर्थविषयक मजकुराचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर जाणवत नाही. नव्या लेखकांबरोबरच ज्येष्ठ लेखक मंडळींनी यापुढेही आर्थिक क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा परामर्श घेतला तर अर्थसंवाद अधिकच समृद्ध होईल. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सुप्रसिद्ध असलेले बरेच अर्थशास्त्रज्ञ परिषदेचे सदस्य आहेत. त्यांच्या पैकी काही संशोधकांचे सहकार्य आम्हाला मिळाले हे कृतज्ञापूर्वक नोंदवितांनाच इतरांचे साहित्य आम्ही मिळवू शकलो नाही याची खंत वाटते. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठात कार्यरत असलेल्या अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांनी अर्थशास्त्राच्या विभिन्न क्षेत्रात नैपुण्य प्राप्त केले आहे. त्यांनी अर्थसंवादसाठी लिखाण करावे असे

मनापासून वाटते. मराठी भाषिक नसलेल्या सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांच्या इंग्रजीतील लेखांचे भाषांतर अर्थसंवाद मधून प्रकाशित केल्यास त्याचा दर्जा अधिक वाढविण्यास मदत होऊ शकेल.

अर्थसंवादचे संपादकपद मी स्वीकारले, तेव्हा दरवर्षी चारही अंकांच्या 4,600 एवढ्या प्रती प्रकाशित करण्यात येत असत. आता यात वाढ होऊन गतवर्षी ही संख्या 6,265 पर्यंत गेली आहे. आजीव सदस्य, वार्षिक सदस्य, व आवर्जून अंक मागविण्याऱ्या महाविद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे हे द्योतक आहे. नवनवीन महाविद्यालये अर्थसंवादचे वर्गणीदार होण्यास उत्सुक आहेत, ही जमेची बाजू आहे असे मानण्यास हरकत नाही.

अर्थसंवादला आर्थिक पाठबळ देण्याकरिता जाहिराती मिळविण्यासाठी सर्वच स्तरावर आटोकाट प्रयत्न झाले. त्यामुळेच अर्थसंवादची आर्थिक कोंडी फोडणे काही प्रमाणात शक्य झाले. 2005-06 या वर्षी जाहिरातीपासूनचे उत्पन्न रू. 46,200 झाले तर 2006-07 या वर्षात यात वाढ होऊन अर्थसंवादने या स्त्रोतापासूनचे उत्पन्न रू. 50,000 च्या वर पोहचविले. जाहिरातींची वाट बघण्यात अर्थसंवादचे वेळापत्रक सांभाळणे शक्य झाले नाही याची मला संपूर्ण जाणीव आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई , तसेच भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (पश्चिम विभागीय केन्द्र), मुंबई या संस्थांनी सातत्याने अर्थसंवादला अनुदान उपलब्ध करून दिल्याने अर्थसंवादची आर्थिक बाजू सावरणे शक्य झाले. अर्थसंवादचे काही अंक आता विदेशात देखील जाऊ लागले आहेत. एप्रिल-जून 2007 पासून अर्थसंवादला ISSN क्रमांक प्राप्त झाल्याने अर्थसंवाद जागतिक पातळीवरील नियतकालिकांच्या यादीमध्ये समाविष्ट झाला आहे !

आता यापुढे संपादकपदाची धुरा प्राचार्य जगन्नाथ पाटील हे सांभाळणार आहेत. आपल्या मनातील अर्थसंवाद प्रत्यक्षात साकारण्याची संधी त्यांना प्राप्त झाली आहे. डॉ. जगन्नाथ पाटील यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा !

अर्थसंवादचे संपादन करण्याचा पूर्वसुरींकडून आम्हाला मिळालेला वारसा, आम्ही शक्यतोवर उत्तमरित्या चालविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.अर्थसंवादची समृद्ध परंपरा जोपासण्यात खारीचा वाटा उचलण्याची संधी मला दिल्याबद्दल, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा मी ऋणी आहे. वाचकांच्या उदंड प्रतिसादामुळे, लेखकांच्या परिश्रमामुळे,जाहिरातदारांच्या आर्थिक सहकार्यामुळे, अर्थशास्त्र परिषदेचे सर्व पदाधिकारी, मुद्रक, टंकलेखक, मित्रपरिवार व कुटुंबिय या सर्वांची वेळोवळी उत्तम साथ लाभल्यामुळे हा जगन्नाथाचा रथ पुढे नेणे शक्य झाले. त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी परमेश्वराजवळ केलेली विनवणी येथे उद्धृत करुन अर्थसंवादचा संपादक म्हणून लेखणीला विराम देतो.

शेवटची विनवणी । संतजनी परिसावी ।।
विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हासी ।।
आतां फार बोलो कायी । अवघे पायीं विदित ।।
तुका म्हणे पडतो पायां । करा छाया कृपेची ।।

विनायक श्रीधर देशपांडे
प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

●●

# विशेष आर्थिक परिक्षेत्र (सेझ)

✦ प्रकाश कुलकर्णी, भिलवडी.
*प्राचार्य, बाळासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी.*

*(श्री. शिवाजी महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर येथे संपन्न झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 31 व्या वार्षिक अधिवेशनात दि. 2 नोव्हेंबर 2007 रोजी केलेले अध्यक्षीय भाषण.)*

### 1.1 प्रास्ताविक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 31 व्या राष्ट्रीय अधिवेशनास उपस्थित असणाऱ्या सर्व बंधु-भगिनींचे या परिषदेचा अध्यक्ष या नात्याने आपल्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करीत आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा अध्यक्ष म्हणून ज्या सन्माननीय व्यक्तिंनी माझी निवड केली त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानून ऋण व्यक्त करतो. 1977 साली मा. नी.वि.सोवनी, आणि अन्य महनीय अर्थशास्त्रज्ञांनी स्थापन केलेल्या परिषदेची अजूनही वाटचाल सुरू आहे ही अभिमानास्पद बाब आहे. वि.म.दांडेकर, श्री.आ.देशपांडे, व्ही.व्ही. बोरकर, आनंद नाडकर्णी, स.ह.देशपांडे या माजी अध्यक्षांचा नामोल्लेख केल्याशिवाय अध्यक्षीय भाषणाला प्रारंभ करणे समयोचित ठरणार नाही. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या बहरलेल्या डेरेदार वृक्षाच्या छायेत आपले सर्व कार्यकर्ते, अर्थसंवादचे संपादक, सर्व माजी अध्यक्ष व संशोधनपर लेख लिहिणारे लेखक यांचे मोलाचे योगदान आहे. राष्ट्रीय पातळीवरील अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदाच्या आसनाचा मान मोठा असताना सुद्धा माझ्यासारख्या अर्थशास्त्रातील ओनामा शिकलेल्या एका सर्वसामान्य अभ्यासकाला आपण ही बहुमोल संधी दिल्याबद्दल त्रिवार धन्यवाद! आपण सर्वजण, आपणापुढे सादर होणारे माझे अध्यक्षीय भाषण मन:पूर्वक ऐकणार आहात त्याबद्दल मी सुरूवातीलाच आपणा सर्वांना धन्यवाद देतो आणि अध्यक्षीय भाषणाकडे वळतो.

### 1.2 आर्थिक नियोजनाची पार्श्वभूमी

1951 पासून भारताने जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी

नियोजनाचा स्वीकार केला. अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांचा समतोल पद्धतीने विकास घडवून आणणे व समाजवादी समाज रचनेच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी रशियाच्या धर्तीवर नियोजन यशस्वी करण्याचा नियोजनकारांचा दृष्टिकोन पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून साकार केला जात आहे. नियोजन प्रक्रियेत भारतीय अर्थव्यवस्थेचे विकसनशील स्वरूप विचारात घेऊन शेती, उद्योग, व्यापार व सेवाक्षेत्राच्या विकासातून, देशापुढील दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक विषमता, निरक्षरता इ. समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न गेल्या 50 वर्षात केला गेला आहे. 1951 ते 1990 पर्यंत आपण 7 पंचवार्षिक योजना पूर्ण केल्या. या कालावधीत नियोजनाच्या माध्यमातून शेती, उद्योग व सेवाक्षेत्राच्या विकासातून रोजगारवृद्धी व पर्यायाने उत्पन्नपातळीत वाढ घडवून आणण्याचा यशस्वी प्रयत्न नियोजनकारांनी केला आहे. तथापि या काळात राष्ट्रीय उत्पन्नाचे समन्यायी वाटप, दारिद्र्यनिर्मूलन, आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ, लोकसंख्यानियंत्रण इ. बाबतीत 100% उद्दिष्ट्ये गाठण्यात नियोजनकारांना यश मिळाले नसल्याने अर्थव्यवस्थेच्या बदललेल्या गरजा विचारात घेऊन, देशातील साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करून घेण्याच्या दृष्टिने नियोजनयंत्रणेच्या व्यवस्थापनात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न 1991 पासून करण्यात आला. नव्या आर्थिक धोरणाच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेच्या नियोजन यंत्रणेत सुधारणा घडवून आणल्या गेल्या.

### 1.3 नवीन आर्थिक धोरण

मार्च/एप्रिल 1991 मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेसमोर निर्माण झालेला पेचप्रसंग सोडविण्यासाठी तत्कालिन वित्तमंत्री व भारताचे विद्यमान पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सूचनेनुसार खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या त्रिसूत्रीवर आधारित नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. सुरुवातीस नवीन आर्थिक धोरणास समाजातील सर्वच घटकांकडून तीव्र विरोध करण्यात आला. विशेषत: जागतिकीकरण व खाजगीकरण हे भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती व सार्वजनिक क्षेत्रातील व्यवसाय नष्ट करण्यासाठी राबविले जात आहेत अशी डाव्या विचारसरणीच्या नेत्यांची भूमिका बनली. परिणामी 1991 ते 1996 या काळात या धोरणाला पुरेसा प्रतिसाद मिळण्याऐवजी वादच वाढत गेला. मात्र 1997 नंतर या धोरणाशिवाय भारतास तरणोपाय नाही, याची जाणीव झाल्यामुळे प्रचलित नियोजन व्यवस्थेत या धोरणास प्राधान्य देण्यात आले. परिणामी नव्या आर्थिक धोरणातून भारतातील शेतीव्यवसाय, व्यापार, उद्योगधंदे यांच्यामध्ये कार्यक्षमता वाढून उत्पादनवाढीस चालना मिळाली त्याचे दृष्य परिणाम, म्हणजे भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील हिस्सा 0.5 वरून 0.8 पर्यंत वाढला व 2006 अखेर देशाच्या परकीय गंगाजळीत सुमारे 190 बिलीयन डॉलर पर्यंत वाढ झाली. याचाच अर्थ 1991 नंतर भारताने स्वीकारलेले नवीन आर्थिक धोरण प्रत्यक्षात रूजण्यास सुमारे 15 वर्षाचा कालखंड लागला. आज हे धोरण भारतीय नियोजनाचा एक अविभाज्य घटक बनले आहे. अत्यंत तर्कशुद्ध विचारांती असे म्हटले पाहिजे की, नवीन आर्थिक धोरणातुनच निर्माण झालेला एक भाग म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र होय.

### 1.4 विशेष आर्थिक परिक्षेत्राची संकल्पना

भारताने स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर विशेष आर्थिक क्षेत्राची संकल्पना महत्त्वपूर्ण मानली जाते. सेझचा उदय देशात 1978 मध्ये झाला. शेझेन (Shenzhen) ही चीनमध्ये स्थापन झालेली जगातील पहिली 49,500

हेक्टर जमिनीवर विकसित झालेली सेझ वसाहत म्हणून ओळखली जाते. त्यानंतर भारत, इराण, जॉर्डन, पोलंड, कजाकिस्तान, फिलीपीन्स, रशिया, उत्तर कोरिया, ब्राझील, पाकिस्तान इत्यादी देशात सेझ उभारण्यात आले. अलिकडच्या काळात अमेरिकेतसुद्धा सेझ स्थापन झाले आहेत. जागतिक बँकेने दिलेल्या आकडेवारीनुसार आजमितिस जगातील 120 देशात सेझचे 3000 प्रकल्प आकारास येत आहेत.

भारतात केंद्र सरकारने एप्रिल 2000 मध्ये सेझच्या धोरणाची घोषणा केली. त्यावेळी तत्कालिन व्यापार मंत्री मुरासोली मारन हे चीन भेटीवर जाऊन आले आणि तेथील प्रगती बघून ते प्रभावित झाले. 1997 ते 2002 च्या व्यापार धोरणाची फेररचना करताना सेझची घोषणा करण्यात आली. चीनमधील सेझचे यश लक्षात घेऊन भारतात सेझचा स्वीकार करण्यात आला. त्यानुसार केंद्र सरकारने 23 जून 2005 मध्ये सेझसंबंधीचे विधेयक पारित केले. फेब्रुवारी 2006 मध्ये सेझसंबंधीच्या कायद्याची अंमलबजावणी वेगाने सुरू झाली त्यानुसार सप्टेंबर 2006 पर्यंत 150 सेझना सरकारने औपचारिक स्वरूपात मान्यता देऊन 117 सेझ प्रकल्पासंबंधी कार्यवाही सुरू केली. ऑक्टोबर 2007 अखेर 244 सेझना मान्यता देण्यात आली आहे. या ठिकाणी प्रथम आपण सेझ म्हणजे काय, सेझची उद्दिष्ट्ये, आकारमान, आणि सेझसाठी मिळणाऱ्या सवलती, यांचा थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे.

विशेष आर्थिक क्षेत्र हा एक भौगोलिक प्रदेश असून त्या प्रदेशात लागू होणारे आर्थिक कायदे हे देशाच्या अन्य वैशिष्ट्यपूर्ण आर्थिक कायद्यापेक्षा शिथिल असतात.[1] (A Special Economic Zone is a geographical region that has economic laws that are more liberal than a countries typical economic laws) केंद्रसरकारच्या पुरस्कृत विशेष आर्थिक क्षेत्रांना विशेष आर्थिक धोरणांचा लाभ देण्यासाठी उद्योगासंबंधीचे कायदे/नियम यात लवचिकता असते. धोरणे व कायदे या बाबी अशा क्षेत्रासाठी इतर क्षेत्रांपेक्षा वेगळ्या असतात म्हणून त्यांना 'विशेष आर्थिक क्षेत्र' (Special Economic Zone) म्हणतात.

### 1.5 सेझची उद्दिष्ट्ये व रचना

अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून उद्योग धंद्यांचा विस्तार करून रोजगारवृद्धी व आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणणे हा सेझचा मुख्य हेतू आहे. याशिवाय भारतात सेझ निर्मितीचे इतर उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.[2]

1. देशात पायाभूत सुविधांचा विकास करणे.

2. सेझच्या माध्यमातून देशात परकीय गुंतवणुकीला आकर्षित करणे.

3. सेझ प्रकल्पाद्वारे रोजगार निर्मिती घडवून आणणे.

4. अर्थव्यवस्थेत औद्योगिक विकासाला चालना देणे.

5. देशाच्या आर्थिक विकासातील क्षेत्रिय असमतोल कमी करणे.

6. देशात आंतरराष्ट्रीय व्यापार वाढवून परकीय चलन मिळविणे.

7. निर्यात वाढविण्यासाठी अडचणी विरहित वातावरण निर्माण करणे.

#### अ) सेझचे आकारमान :

सेझचे आकारमान प्रामुख्याने दोन प्रकारावर ठरविले जाते. विविध वस्तुंचे उत्पादन करणारे सेझ व एकाच वस्तुंचे उत्पादन करणारे सेझ प्रकल्पांबाबत आकारमान भिन्न भिन्न स्वरूपाचे ठरविण्यात आले आहे. विविध वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या सेझचे

आकारमान 1000 हेक्टर तसेच किमान 1 हेक्टर ठरविण्यात आले आहे. एकाच वस्तुचे उत्पादन करणारे सेझ 100 हेक्टरचे असावेत असे ठरविण्यात आले आहे. भारतात 5 एप्रिल 2007 रोजी झालेल्या केंद्रिय मंत्री परिषदेच्या निर्णयानुसार सेझचे कमाल क्षेत्र 5000 हेक्टर ठरविण्यात आले आहे. यासाठी किमान क्षेत्रफळाची मर्यादा ठरविण्याचा अधिकार राज्य सरकारांना देण्यात आला आहे. महाराष्ट्र व हरियाणामध्ये अशा तत्त्वावर रिलायन्स उद्योग समुहाने सेझची उभारणी केली आहे.

**ब) सेझ आणि उद्योजकाना मिळणाऱ्या सवलती :**

सेझची उभारणी करताना उद्योजकाना अनेक सुविधा देण्यात येणार आहेत. किंबहुना सेझद्वारे प्रकल्पांची उभारणी करताना आवश्यक असणाऱ्या निवासी सुविधा, शैक्षणिक सुविधा, पुरविण्यात येणार आहेत. या सुविधांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.[3]

**1) आयकर**

पहिल्या पाच वर्षासाठी आयकरातून 100% सूट व पुढच्या दोन वर्षात 50% सूट प्रत्यक्ष निर्यातीवर सवलत प्राप्त होईल.

**2) जकातकर व सीमाशुल्क**

भांडवली सामग्री, कच्चामाल, उपभोग्य वस्तू, सुटे भाग, वेष्टणाची सामग्री या गोष्टी कोणताही कर न लावता उद्योजक मिळवू शकतो अथवा आयात करू शकतो.

**3) विदेशी गुंतवणूक**

सेझ मधील उद्योगामध्ये परदेशी गुंतवणुकीला 100% मुभा राहील. अर्थात यात काही उत्पादने वगळण्यात आलेली आहेत. (शस्त्र व दारूगोळा, आण्विक पदार्थ, नशाकारक व घातक रसायने, मद्यार्कयुक्त पेये व सिगरेट, सिगार, तंबाखूची पर्यायी उत्पादने इ.) तसेच लघुउद्योगांसाठी राखीव वस्तुंच्या उत्पादनामध्ये थेट विदेशी गुंतवणुकीवर मर्यादा नाही.

**4) पर्यावरण**

कुठल्याही प्रकल्पाची पर्यावरणीय परिणाम समीक्षा, सेझ मधील बहुसंख्य उद्योगाना लागू नाही. येथील कोणत्याही प्रकल्पांची पर्यावरणीय जनसुनावणी होणार नाही. किनारा नियंत्रण क्षेत्रातल्या विशेष आर्थिक क्षेत्रात प्रदुषण न करणारे माहिती तंत्रज्ञान उद्योग, गोल्फकोर्स, पाणी शुद्धीकरण प्रकल्प हॉटेल्स व विनाप्रदुषणकारी उद्योगासंबंधीचे कायदे/नियम यात लवचिकता असते. धोरणे व कायदे या बाबी अशा क्षेत्रासाठी इतर क्षेत्रांपेक्षा वेगळ्या असतात. म्हणून त्यांना विशेष आर्थिक क्षेत्र (Special economic Zone) म्हणतात.

**5) कंपनी कायदे**

सेझमध्ये कंपनीच्या निबंधकाचे क्षेत्रीय कार्यालय सुरू करण्यास मान्यता दिली जाईल. व्यवस्थापकीय वेतनाच्या रकमेसाठी दरवर्षी रू. 2 ते 4 कोटीची मर्यादा राहील तसेच कोणत्याही कंपनीच्या संचालकपदी नियुक्ती होण्यासाठी 12 वर्षे भारतात राहण्याच्या तरतुदीतून मुक्तता देण्यात येईल.

**6) वीज**

सेझचे अधिकारी अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा सुनिश्चित करतील. ऊर्जा विभागाद्वारे नव्याने स्थापन झालेल्या उद्योगाना राज्य सरकारच्या प्रोत्साहनपर धोरणानुसार (2001) पुढील 15 वर्षासाठी विजेचा भार द्यावा लागणार नाही. याखेरीज इतर क्षेत्रात स्थापन झालेल्या सेझला 10 वर्षे वीजभार द्यावा लागणार नाही. ही सूट या उद्योगाना त्यांचे उत्पादन व सेवा सुरू झालेल्या दिवसांपासून मिळेल.

**7) कामगारांसंबंधी नियंत्रण**

राज्य शासनाच्या कामगार आयुक्ताचे

अधिकार त्या त्या सेझ मध्ये तेथील विकास आयुक्त वा अन्य अधिकाऱ्याना दिले जातील. सर्व सेझला व त्यातील उद्योगाना औद्योगिक तंटा कायद्यांतर्गत सार्वजनिक उपयोगाच्या सेवा म्हणून जाहीर करण्यात येईल. अर्थात त्यामुळे तेथे बंद, संप, मोर्चे यांना बंदी राहील.

8) इतर

याशिवाय केंद्रिय विक्रीकर, सेवाकर, परदेशी व्यापारी कर्जे, पाणीपुरवठा, पुनर्गुंतवणूक आणि औद्योगिक नगर अशा अनेक प्रकारच्या सेझ अंतर्गत उद्योजकांना मिळणाऱ्या सवलती आहेत.

**क) सेझची कार्यप्रणाली व व्यवस्थापन**

केंद्र सरकारच्या सेझ कायद्यानुसार सेझची उभारणी करण्यासाठी बोर्ड ऑफ अॅप्रव्हलची निर्मिती करण्यात आली असून यात 19 सदस्यांचा समावेश असून त्याची रचना खालीलप्रमाणे आहे.[4]

सचिव, वाणिज्य खाते (अध्यक्ष), सदस्य सी.बी.ई.सी.,आय.टी.सी.बी.डी.टी., चे प्रतिनिधी आणि वित्तमंत्रालय, अर्थविभाग, सेझ वाणिज्य खाते, डी.आय.पी.पी.,विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, लघुउद्योग, कृषि व ग्रामोद्योग खाते, गृहमंत्रालय, संरक्षणखाते,पर्यावरण व वनविकास मंत्रालय, कायदा व न्यायमंत्रालय, नागरी विकास मंत्रालय, सागरी मंत्रालय या सर्व मंत्रालयांतील सहसचिव व राज्य सरकार नियुक्त प्रतिनिधी,आंतरराष्ट्रीय व्यापारसहसंचालक किंवा त्यांचा प्रतिनिधी, संबंधित विकास आयुक्त, भारतीय व्यवस्थापन समिती संचालक किंवा भारतीय परराष्ट्र संस्थेतील प्राध्यापक, संचालक अथवा सहसचिव वाणिज्य मंत्रालय व उद्योग मंत्रालय, हे सदस्य आहेत.

ही समिती सेझला मान्यता देणारी सर्वोच्च संस्था असून ती समिती विभागीय पातळीवर नियोजित सेझ प्रकल्पास भेट देऊन निर्णय घेते. शिवाय प्रत्येक विभागातील विकास आयुक्त हा सेझ मंडळाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.

**1.6 सेझ: सद्यस्थिती**

या अंतर्गत प्रामुख्याने जागतिक पार्श्वभूमीचा, भारतातील प्रगतीचा आणि महाराष्ट्रातील वस्तु स्थितीचा थोडक्यात आढावा घेणे उचित ठरेल.

अ) विशेष आर्थिक क्षेत्राची संकल्पना सर्वप्रथम चीनमध्ये व नंतर जगातील 120 देशामध्ये राबविली जात आहे. जागतिक स्तरावर अशाप्रकारे उद्योग व्यापारात परिवर्तने घडून येत असताना भारतातील सेझची वर्तमान स्थिती व भवितव्य यांचे मोजमाप व्हायला हवे. चीनच्या एकूण निर्यातीत सेझ उद्योगाचा वाटा 40% इतका आहे. अर्थात साम्यवादी विचारसरणीमुळे तेथे सेझला असे यश मिळाले आहे , असे दिसत असले तरी 1980 ते 2006 या काळात चीनमध्ये सेझच्या विकासाबरोबर काही दोषही निर्माण झालेले आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे चीनमधील सेझच्या प्रभावामुळे भारतात जरी सेझचा विकास होत असला तरी चीनमध्ये 1980 नंतर सेझच्या विकासात अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. तेथे राज्य सरकारांना सेझसाठीच्या जमिनीसंबंधीचे हस्तांतरण करण्याचा अधिकार देण्यात आला असून फक्त नागरी भागातील जमिनीचेच सेझमध्ये रूपांतर करण्यात आले आहे.

जागतिक पातळीवरील सेझच्या संख्येचा विचार केल्यास त्याची विभागवार संख्या उत्तर अमेरिका 320, आशिया 225, युरोप 80, आफ्रिका 47, द. अमेरिका 41, मध्य अमेरिका 41 एवढी आहे. प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर सेझची सुरूवात झालेली दिसते.

ब) 1951 ला समाजवादी समाजरचना

निर्माण करण्याच्या हेतूने भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून विदेशी व्यापाराला चालना देण्यासाठी 1965 मध्ये कांडला (गुजरात) येथे पहिले मुक्त व्यापार केंद्र सुरू केले होते. 1997 ते 2002 या कालखंडातील आयात निर्यात धोरणामध्ये भारत सरकारने सुधारणा करून मार्च 2000 मध्ये खऱ्या अर्थाने सेझची संकल्पना स्वीकारली. 2005 मध्ये संसदेने हा कायदा पारित करून 10 फेब्रुवारी 2006 पासून तो संपूर्ण भारतात लागू केला. भारतात कांडला सुरत (गुजरात), कोचीन(केरळ), सांताक्रुझ (मुंबई,महाराष्ट्र), फास्टा (प.बंगाल), चेन्नई (तामिळनाडू), विशाखापट्टण (आंध्रप्रदेश), नोएडा (उत्तरप्रदेश) अशा ठिकाणी सेझची सुरूवात झालेली दिसते. सरकारनेही गेल्या काही दशकात अनेक उपाय योजून निर्यात वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यात अल्प व्याजदराने निर्यातीसाठी कर्जे, निर्यात उत्पन्नावर आयकरातुन सवलती, माल वाहतुकीसाठी व साठवणुकीसाठी सवलती अशांचा समावेश करता येईल. निर्यातवाढीच्या या योजनांपैकी अगदी अलिकडच्या काळात प्रकर्षाने पुढे आलेली व बहुचर्चित योजना म्हणजे सेझ होय. तक्ता क्र. 1 वरून भारतातील प्रमुख घटक राज्यांतील सेझ प्रगतीचा आढावा घेता येईल.

वरील पैकी देशात कार्यान्वित होत असलेल्या 234 प्रकल्पांसाठी मार्च 2007 अखेर 33,808 हेक्टर जमीन संपादन करण्यात आली आहे. सेझसाठी 5000 हेक्टर जमिनीची कमाल मर्यादा घालण्यात आली असून ही जमीन पुरविणाऱ्या शेतकरी कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे प्रकल्प पूर्ण होताच, देशात 40 ते 50 लाख लोकांना प्रत्यक्ष रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. भारतात विशेष आर्थिक क्षेत्राची स्थापना खाजगी व संयुक्त अशा स्वरूपात करण्यात आली आहे. ही विशेष आर्थिक क्षेत्रे महाराष्ट्र, पंजाब, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, प. बंगाल

**तक्ता क्र. 1**
**सेझची भारतातील संख्या**

| अ.क्र. | राज्य | संख्या |
|---|---|---|
| 1. | आंध्रप्रदेश | 54 |
| 2. | गुजरात | 30 |
| 3. | हरियाणा | 46 |
| 4. | कर्नाटक | 46 |
| 5. | महाराष्ट्र | 75 |
| 6. | तामिळनाडू | 27 |
| 7. | उत्तरप्रदेश | 18 |
| 8. | प. बंगाल | 21 |
| 9. | केरळ | 12 |
| 10 | इतर राज्य | 64 |
| | संपूर्ण भारत | 393 |

**संदर्भ** – भामरे दीपक - विशेष आर्थिक क्षेत्र समस्या व उपाय पान नं. 40, अर्थसंवाद एप्रिल/जून 2007

व मध्यप्रदेश येथे उभारली जाणार आहेत. या घटक राज्यातील विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकासामुळे अन्नधान्य उत्पादन व निर्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ घडून येणार आहे. 2005-2006 मध्ये भारताच्या एकूण निर्यातीत सेझ प्रधान उद्योगांच्या निर्यातीचा वाटा 22,510 कोटी रूपये इतका राहिला आहे. याशिवाय भारतातील विविध राज्यातील निवडक विशेष आर्थिक क्षेत्रात डिसेंबर 2006 अखेर निर्माण झालेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार तक्ता क्रमांक 2 मध्ये दर्शविला आहे.

भारतातील नियोजित सेझच्या प्रकल्पांचे स्वरूप विचारात घेताना सद्यस्थितीत पुढील 19 ठिकाणचे सेझ सध्या उत्तमरितीने कार्य करीत आहेत असे दिसून येते. 2005 अखेर देशात 8 सेझ कार्यरत होते. एप्रिल 2007 अखेर ही संख्या 19 पर्यंत वाढली आहे. सध्या भारतातील कार्यान्वित झालेले सेझ पुढील ठिकाणी अस्तित्वात आहेत.[7]

अंधेरी (पूर्व) मुंबई (महाराष्ट्र),कांडला गांधीधाम, गुजरात,कोचीन कावकी नंद, कोचीन केरळ,मद्रास सेझ, चेन्नई, तामिळनाडू,विशाखा पट्टणम् दुवडा विशाखापट्टणम्, फेल्टा प. बंगाल,नोएडा नोएडा, उत्तरप्रदेश,सुरत, डायमंड पार्क,सुरत गुजरात, इंदोर, इंदोर मध्यप्रदेश, मणिकंचन, सॉल्ट लेक, कोलकत्ता प. बंगाल,महिंद्रा सिटी सेझ (आय. टी) चेन्नई,जयपूर सेझ (रिको) जयपूर, राजस्थान,महिंद्रा सिटी (ॲपरेल) चेन्नई, लेक इलेक्ट्रानिक्तस सिटी कोलकत्ता, पश्चिम बंगाल, मुरादाबाद , मुरादाबाद उत्तरप्रदेश, जोधपूर राजस्थान,महिंद्रा सिटी (ॲटो ॲन्सीलरी) चेन्नई, तामिळनाडू, सुरत ॲपरेल,सुरत,गुजरात,नोकिया इंडिया प्रायव्हेट लि., चेन्नई, तामिळनाडू.

वरील ठिकाणी कार्यरत असलेल्या सेझमधील उत्पादनाचा देशाच्या निर्यातीवर अनुकूल परिणाम झालेला असून सेझ मुळे भारताची निर्यात 2001-2002 पासून सातत्याने वाढली आहे. ही बाब आपणास पुढील तक्ता क्रमांक 3 वरून स्पष्ट होईल.

क) महाराष्ट्रातील[8] पहिले सेझ नवी मुंबई येथे 2001 मध्ये 3800 हेक्टर आकारमानाचे सिडको मार्फत उभारण्यात आले. या प्रकल्प क्षेत्रात द्रोणागिरी, कळंबोली, उणदे व रिजनल पार्क झोन अशा चार विभागांचा समावेश करण्यात आला. या प्रकल्पासाठी भूसंपादनाची व विकासाची प्रक्रिया पूर्ण झाली असून, रस्ते, पाणीपुरवठा व जलनिस्सारणाची कामे पूर्ण झाली आहेत. मुंबई व नवी मुंबई येथील दोन सेझ प्रकल्प महाराष्ट्रात क्रांती घडवून आणू पहात आहेत. त्यापैकी नवी मुंबई सेझ सिडकोमार्फत विकसित होणार असून मुंबई सेझ (महामुंबई) पनवेल, उरण व पेण या तालुक्यातील 10,000 हेक्टर जमिनीवर उभारला जाणार आहे. केंद्राने या प्रकल्पाला नुकतीच मंजुरी दिलेली आहे. तथापि स्थानिक रहिवासी व शेतकऱ्यांचा या प्रकल्पास प्रखर

**तक्ता क्र. 2**

**सेझमधील रोजगार निर्मिती[6]**

| अ.क्रं. | राज्य | संख्या |
|---|---|---|
| 1. | तामिळनाडू | 30500 |
| 2. | आंध्रप्रदेश | 123000 |
| 3. | पंजाब | 35000 |
| 4. | चंदीगढ | 5000 |

**संदर्भ** - कुरूक्षेत्र जाने. 2007 पृष्ठ क्र. 54

विरोध होत आहे. त्यासाठी नंदीग्रामच्या धर्तीवर आंदोलन उभारले जात आहे. या प्रकल्पाबाबतची वस्तुस्थिती तपासून पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील सेझची वास्तवता विचारात घेताना सन 2006-07 सालात घडून आलेल्या घडामोडी महत्त्वपूर्ण ठरतात. येत्या 1 ते 2 वर्षात महाराष्ट्रातील प्रस्तावित 75 सेझ प्रकल्पांमध्ये पुणे परिसरात-11, रायगड जिल्ह्यात 11 मराठवाड्यात 10 प्रकल्प प्रस्तावित आहेत. शिवाय नागपूर 1 व कोल्हापूर जिल्ह्यात, कागल जवळ 1 सेझ प्रकल्प आकारास येत आहेत. यापैकी रायगड, पुणे, औरंगाबाद जिल्ह्यात भू-संपादनाच्या प्रश्नांवरून आंदोलने सुरू आहेत. त्याचा वास्तववादी भूमिकेतून विचार व्हावयास हवा. कारण सेझ प्रकल्प उभारणीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेताना शेतकऱ्यांना जमिनीची दिली जाणारी भरपाई, रोजगारसंधी संभाव्य उत्पादनांची दिशा निश्चित केल्या शिवाय या सेझ प्रकल्पाचे भवितव्य काळ्या आईच्या कपाळावरील भळभळणारी सोनेरी जखम ठरेल यात शंका नाही.

### 1.7 विशेष आर्थिक क्षेत्राचे समर्थन

भारतात 2005 मध्ये सेझचा कायदा झाल्यानंतर सेझ उभारणीबाबत केंद्र सरकारने गेल्या 2 ते 3 वर्षात पावले उचलल्यामुळे भारताच्या विकासात तो एक अत्यावश्यक व बहुचर्चित विषय बनला आहे. वास्तविक पाहता भारतासारख्या विकसनशील देशात आर्थिक नियोजन अधिकाधिक यशस्वी करण्यासाठी सेझमध्ये अभिप्रेत असलेला क्षेत्रिय विकास व आनुषंगिक फायदे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. यादृष्टीने सेझच्या समर्थनार्थ मांडण्यात येणारे मुद्दे व शासनाची भूमिका यांचा येथे विचार करणे आवश्यक ठरते.

#### अ) शासनसंस्थेची भूमिका

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने देशाच्या विकास प्रक्रियेत, शेती व उद्योगधंद्याच्या विकासावर भर दिला आहे. 1991 नंतरच्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या शर्यतीत यशस्वी होण्यासाठी सेझची संकल्पना केंद्रशासनाने स्वीकारली. चीनच्या धर्तीवर भारतामध्ये विशेष आर्थिक क्षेत्रे निर्यातवाढीसाठी अधिक उपयुक्त ठरतील म्हणून शासन भारतात ती उभारण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा सेझच्या उभारणीमुळे देशातील ओसाड व नापीक जमिनीचे क्षेत्र उत्पादक स्वरूपाचे बनविता येईल. कोट्यवधी लोकांना येत्या 4 ते 5 वर्षात रोजगार उपलब्ध करून

**तक्ता क्र. 3**

**भारतातील सेझ प्रकल्पांतून झालेली निर्यात**[8]

| वर्ष | निर्यात (दशलक्ष अमेरिकन डॉलर) |
|---|---|
| 2001-02 | 1957 |
| 2002-03 | 2095 |
| 2003-04 | 2996 |
| 2004-05 | 4140 |
| 2005-06 | 5288 |
| 2006-07 | 8536 |

**संदर्भ –** मुंढे शशिकांत, विशेष आर्थिक क्षेत्राचे परिणाम राज्यस्तरीय चर्चासत्र, हिंदुजा कॉलेज ऑफकॉमर्स, मुंबई. दि. 25/8/07

देता येईल. माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) क्षेत्रातील 'बुद्धी निस्सारणाला' (Brain Drain) आळा घालता येईल. सेझच्या रूपाने भारतात सर्वच क्षेत्रात विशेषीकरण करण्यास संधी मिळेल असे शासनाचे मत आहे. सेझच्या निर्मितीमुळे भारताची निर्यात वाढून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सेझची उपयोगिता सिद्ध करता येईल म्हणजेच प्राप्त परिस्थितीत सेझच्या माध्यमातून नव्या आर्थिक आव्हानांना तोंड देता येईल असे भारतातील केंद्र व राज्य सरकारांना वाटते. वास्तविक अपुऱ्या पायाभूत सुविधा, अपुरे भांडवल, क्लिष्ट व एकीकडे झुकलेले कामगार कायदे तसेच दीर्घसुत्री व कटकटीच्या प्रशासकीय प्रक्रिया आणि निर्यात वृद्धीची गरज ही भारतीय उद्योगाची आजची सद्यस्थिती आहे. यात बदल घडवून आणावयाचा असेल तर वरील पार्श्वभूमि वर करसवलती देऊन औद्योगिक बेटांचा विकास करणारे सेझचे धोरण हा उपाय चांगला असू शकतो. अन्य देशातील अनुभव पाहता या सिद्ध उपायाचा स्वीकार करावयास हरकत असू नये. निर्यातीच्या जागतिक स्तरावरील संधी वाढत असताना तर निर्यातक्षम उद्योग, सेवा व शेतीसाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यकच आहे. त्याचा एक महत्वाचा भाग म्हणून सेझचा प्रयोग केला पाहिजे, तो अंमलात आणला पाहिजे, टिकला पाहिजे आणि रुजला पाहिजे पण त्याचबरोबर ज्या कायद्याने हे धोरण अंमलात आणावयाचे त्यात कमीतकमी दोष असायला हवेत.

**ब) अर्थतज्ज्ञांची मते** [10]

प्रचलित परिस्थितीत भारताच्या औद्योगिक प्रगतीस चालना देण्यासाठी व 2020 साली आर्थिक महासत्ता बनण्यासाठी, आपणास विशेष आर्थिक क्षेत्राची योजना राबविण्याशिवाय दुसरा पर्याय नाही कारण नव्या आर्थिक धोरणाच्या काळात भारतातील सार्वजनिक क्षेत्राची पिछेहाट झाल्याने खाजगी क्षेत्राचा विकास प्रक्रियेत सहभाग वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. देशाची निर्यात वाढविण्यासाठी व परकीय गुंतवणुकीस चालना देण्यासाठी सेझची निर्मिती आवश्यक आहे. विशेषत: देशातील नापीक जमिनीचे सेझच्या माध्यमातून उत्पादक जमिनीत रूपांतर करून शेतकरी मजूर व संपूर्ण अर्थव्यवस्थेला हे धोरण फलदायी ठरणार आहे. अर्थात जागतिक दर्जाचे सेझ निर्माण करण्यासाठी किमान 5000 हेक्टर जमीन उद्योजकाना देणे आवश्यक आहे. तरच या क्षेत्रावर आधारित उद्योगधंदे व आनुषंगिक सेवा त्यांना निर्माण करता येतील. भारतात इंजिनिअरिंग व कापड उद्योगात सेझ प्रकल्पांना विकास करावयाला चांगली संधी आहे. थोडक्यात विशेष आर्थिक क्षेत्राच्या माध्यमातून भारतात आर्थिक विकासाचे नवे पर्व सुरू होणार आहे. मात्र त्यासाठी कामगार कायद्यात काही सुधारणा करून सेझ प्रकल्पाना मान्यता देण्याबाबत कम्युनिस्ट नेतृत्वाशी विचार विनिमय करणे आवश्यक आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक वातावरणात गुणवत्ता व उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी औद्योगिक विकास आवश्यक आहे. खुल्या अर्थव्यवस्थेत आंतरराष्ट्रीय व्यापाराला प्राधान्य देऊन औद्योगिक उत्पादन व रोजगार वाढीसाठी सेझची निर्मिती आवश्यक आहे. विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकासाचा लाभ बहुसंख्य जनतेला प्राप्त करून देऊन दारिद्र्य निर्मूलनाचे नियोजनातील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सेझ आवश्यक आहे. शिवाय गेल्या 25 ते 30 वर्षात चीन, व्हिएतनाम, रशिया इत्यादी साम्यवादी राष्ट्रांमध्ये घडून येणाऱ्या सेझच्या हालचालींचा परामर्श घेता भारताने या प्रवाहात सहभागी होणे आवश्यक आहे. भारतातील मनुष्यबळ, जमीन व उपलब्ध तंत्रज्ञान विचारात घेता विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी सेझ ची निर्मिती उपकारकच ठरेल. अर्थात त्यासाठी केंद्रसरकार, राज्यसरकार व

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या विधायक धोरणांची आवश्यकता आहे असे मत प्र.चि. शेजवलकर व नरेंद्र जाधव यांनी मांडले आहे.

### क) सेझचा सुधारणांसहित स्वीकार

विशेष आर्थिक क्षेत्राचा भारतात स्वीकार करताना सेझच्या मूळ कायद्यात सुधारणा करून त्याची अंमलबजावणी केली जावी अशी मते देशातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील विविध तज्ज्ञांनी व्यक्त केली आहेत. यामध्ये बाबा आढाव, दि.बा. पाटील, एन्.डी.पाटील, जे.एफ् पाटील, कुलगुरू माणिकराव साळुंखे, आचार्य शांताराम गरूड, पर्यावरण तज्ज्ञ वंदना शिवा इत्यादिंचा समावेश होतो. सेझची भारतात अंमलबजावणी करताना भूसंपादनाच्या बाबतीत निर्माण झालेले प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर सेझमुळे विस्थापित होणाऱ्यांचे विकसनशील पुनर्वसन व्हावे मागणी पुढे येत आहे तिचा विचार होणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे सेझ कायद्यातील तरतुदींमध्ये सुधारणा करून तो अधिकाधिक समाजाभिमुख बनविण्याची आवश्यकता आहे. सेझचे आकारमान 1000 हेक्टर पर्यंत कमी करण्याची आवश्यकता आहे. सेझला होणारा विरोध लक्षात घेऊन महाराष्ट्र, पंजाब, पश्चिम बंगालसह मंजूरी मिळालेल्या विविध घटक राज्यांमध्ये सहमतीने सेझच्या अंमलबजावणीबाबत चर्चा व्हावी. विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये श्रमप्रधान उद्योगधंद्याचा विकास घडवून आणला जावा. त्याचप्रमाणे विशेष आर्थिक क्षेत्राला मिळणाऱ्या विशेष सवलती बाबत पूर्वविचार व्हावा, आणि सेझवर नियंत्रण ठेवणाऱ्या विशेष प्रभावी यंत्रणेबाबत पावले उचलली जावीत असे विचार विविध तज्ज्ञांनी व्यक्त करून सेझच्या पुनर्रचनेची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. म्हणजेच सुधारणा सहीत सेझ स्वीकारार्ह आहे हे मान्य केले आहे. एवढेच नव्हे तर विशेष आर्थिक विभागाच्या धोरणाला होणाऱ्या विरोधाची तीव्रता वाढत असली तरी या धोरणाची अंमलबजावणी होणारच आहे. हे धोरण पूर्णपणे रद्द करण्याचा केंद्रसरकारचा कसलाही इरादा नाही. म्हणूनच या धोरणाकडे नेहमीपेक्षा वेगळ्या दृष्टिकोनातून बघण्याची गरज आहे. आपल्याकडे जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली तेव्हा पासून त्याबाबत जशी प्रत्येक वेळी दोन टोकाची मते व्यक्त केली जात असतात. तसेच या धोरणाबाबतही होऊ लागले आहे. वास्तविक पाहता जागतिकीकरणाच्या संदर्भात औद्योगिक विकासाच्या दृष्टिकोनातून सेझचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच मुखर्जी गटाने सुचविलेले रचनात्मक व कल्याणकारी निर्णय 5 एप्रिल 2007 रोजी, सरकारने घेतले असले तरी सुद्धा अशी धोरणे स्वीकारताना आपली स्वायत्तता व स्वावलंबन अबाधित ठेवून विकास करणे अपेक्षित आहे.

### 1.8 सेझ : विरोधी मतप्रणाली

विशेष आर्थिक क्षेत्राचा औद्योगिक क्षेत्रात स्वीकार करताना या योजनेच्या विरोधी मते विचारात घेणे आवश्यक ठरते. सेझला विरोध करण्यामध्ये विरोधी मतप्रवाह विविध बाबींवर आढळून येतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सेझचा प्रत्यक्ष परिणाम शेतकरी वर्गावर प्रतिकूल स्वरूपाचा होणार आहे. याबाबत विशेष आर्थिक क्षेत्रासाठी केल्या जाणाऱ्या भूसंपादनावर विरोधी मते व्यक्त केली जात आहेत. त्यासाठी सेझमध्ये विस्थापित होणाऱ्या शेतकरी वर्गाचे आर्थिक पुनर्वसन योग्य प्रकारे करून त्यांच्या भविष्यकालीन उदर निर्वाहासाठी कायमस्वरूपी रोजगाराची तरतूद सेझ अंतर्गत उद्योगात केली तरच त्यांचा सक्रिय सहभाग वाढेल. सेझसाठी पडिक जमिनी वापरण्यास कुणाची हरकत नाही मात्र उत्पादक किवा पिकाऊ जमिनीवर सेझची उभारणी करणे अन्यायकारक आहे. ही आंदोलकांची तक्रार रास्त वाटते. दुसरी बाब म्हणजे विशेष आर्थिक

क्षेत्राच्या उभारणीसाठी उद्योजकांना दिल्या जाणाऱ्या सवलतींबाबत तक्रार करण्यात येत आहे. त्यातून भारतीय कर रचनेत अराजक माजून, शासन 175487 कोटी रू. कर उत्पन्न गमविण्याचा धोका आहे हे वास्तव आहे."नुकतेच सेझ प्रकल्पाची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झालेल्या पश्चिम बंगालमधील नंदिग्राम व महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील आंदोलकांच्या व्यथा जाणून घेणे आवश्यक ठरते. आंदोलकांच्या मते सेझमुळे देशातील शेतकरी वर्ग व कामगार वर्ग यांच्यावर प्रतिकूल परिणाम होणार आहे. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाला हद्दपार करण्याचा हा एक प्रयोग आहे. सेझच्या माध्यमातून उद्योजकांना सवलती देताना सर्वसामान्य जनतेला लुबाडण्याचे सत्र सुरू होत आहे. स्वतंत्र भारताच्या लोकशाही शासन व्यवस्थेत हे कदापी मान्य होणार नाही. त्यामुळे केंद्रसरकारने विशेष आर्थिक क्षेत्राचा लाभ सर्व सामान्य भारतियांना मिळवून देऊन वास्तववादी दृष्टिकोनातून विचार व्हावयास हवा. अन्यथा विशेष आर्थिक क्षेत्रामुळे देशात आर्थिक आतंकवाद पसरू शकतो ही बाब आपणास दुर्लक्षित करता येणार नाही. सेझ प्रकल्पांत शेतकऱ्यांकडून राज्य सरकारच्या दबावातून घेतल्या जाणाऱ्या जमिनीचे दर ठरविण्याची महत्त्वाची समस्या विचारात घेणे आवश्यक आहे. शेतजमिनीचा शासकीय दर, प्रचलित दर व सेझ उद्योजक देऊ शकत असलेला अतिरिक्त दर यामध्ये मोठी तफावत आढळून येत असल्याने लाभधारक शेतकऱ्यांच्या पदरी काय पडणार? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. प्रस्तावित सेझ प्रकल्पामुळे भारतातील आजारपणाच्या समस्येत असलेल्या लघुउद्योगांची संख्या 70ते 80 हजारापर्यंत जाईल. त्यामुळे भारतातील रोजगारीवर प्रतिकूल परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. सेझच्या कायद्यातील तरतुदी या नोकरशाहीने, उद्योजकांच्या दृष्टिने अधिक हिताच्या बनविल्या आहेत असे सेझविरोधकांना वाटते. त्यामुळे हा भांडवलशाही विरूद्ध सामान्य माणूस असा लढा असून या तरतूदी शेतकऱ्यांच्या अजिबात हिताच्या नाहीत असे दिसून येते. कारण सेझच्या कायद्यात शेतजमिनींच्या संपादनानंतर शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केलेला नाही. सेझच्या जमिनी संपादनाच्या मार्गातून बघता बघता शेतीची प्रमंडलीकरणाची (Corporate Farming) प्रक्रिया केंव्हा सुरू झाली हे लक्षात देखील येणार नाही.

### 1.9 सेझचे सामाजिक परिणाम

भारतातील सेझचे विद्यमान स्वरूप लक्षात घेता या योजनेमुळे देशातील समाजवादी समाज रचनेच्या चौकटीला कितपत तडा जाईल याविषयी विचारमंथन होत आहे. सेझमध्ये आर्थिक बाजू जशी महत्वाची आहे तशी या धोरणाला सामाजिक बाजू आहे. सेझमुळे मूठभर भांडवलदारांची उद्योग धंद्यावर मालकी प्रस्थापित होऊन सर्वसामान्य शेतकरी व कामगार वर्गावर त्याचा विपरित परिणाम होईल असे सकृतदर्शनी दिसून येत आहे. म्हणूनच सेझ प्रकल्पांना विरोध करणाऱ्या डाव्या विचारसरणीचा सामाजिक आशय विचारात घेणे आवश्यक ठरते. सेझच्या माध्यमातून भारतात उद्योगधंद्याचा विस्तार घडवून आणताना किमान वेतन कायद्याच्या अंमलबजावणीचा अभाव, उद्योगाबरोबर इतर व्यवसायांच्या वाढीचा सर्व सामान्यावर होणारा परिणाम व त्यांचे सामाजिक संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे. भारतातील वाढते दारिद्र्य, वाढती बेरोजगारी, प्रादेशिक असमतोल, व संधीतील विषमता या बाबी विचारात घेता, सेझ गरीब व्यक्ती व बेरोजगार लोकांच्या बाबतीत अन्यायकारक ठरेल. याशिवाय सेझची उभारणी करताना उद्योजक व कंत्राटदार यांच्यामार्फत होणारा भ्रष्टाचार आपणास नाकारता येणार नाही परिणामी सेझमुळे आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण न होता केंद्रीकरण झाल्यामुळे

देशातील सामाजिक वातावरण प्रदूषित होण्याचा धोका आपणास नाकारता येणार नाही.

### 1.10 सेझ व शासन संस्था

भारतातील सेझ प्रकल्पांचा विकास करताना सन 2000 ते 2005 पर्यंत ज्या ज्या घडामोडी घडून विचारमंथन होणे आवश्यक होते, तेवढे झालेले दिसून येत नाही. देशातील कोणत्याही राजकीय पक्षाने या धोरणाचा तपशीलवार अभ्यास केलेला आढळून येत नाही. पश्चिम बंगाल, हरियाणा, गुजराथ या घटक राज्यात सेझ प्रकल्पांचे समर्थन केले जात असून भूसंपादनाच्या बाबतीत तेथे फारसे प्रश्न शासनासमोर उभे राहिलेले दिसून येत नाहीत. नंदीग्राम व सिंगुरची वास्तव स्थिती विचारात घेतली तर आंदोलनाची राजकीय नीति ही विकास प्रक्रियेत खीळ घालणारी कशी आहे याचा प्रत्यय येतो. तथापि महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आंदोलन हे अधिक वास्तववादी असल्याचे दिसून येते. याबाबत शासन संस्थेची भूमिका समन्वयाची असणे हिताचे आहे. केंद्राने नुकतिच 10 सेझ प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे . ही बाब सेझच्या भवितव्याच्या दृष्टीने जरी उपयुक्त असली तरी येथे आंदोलकांची भूमिका, जमीन संपादनातून निर्माण होणारे प्रश्न जमिनीचे दर ठरविण्याची समस्या, इ. बाबतीत शासनाने सुयोग्य निर्णय वेळीच घेणे आवश्यक वाटते. अन्यथा सेझचा शासन संस्थेचा निर्णय ही भारतीय अर्थव्यवस्थेला लाभलेली संधी नसून संकट आहे अशी स्थिती निर्माण होईल.

### 1.11 सेझ विकासाची पर्यायी नीति

2005 पासून भारतात कायद्यान्वये सेझची निर्मिती करण्यात येत आहे. नव्या आर्थिक धोरणाप्रमाणे सेझच्या अंमलबजावणीबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करून या धोरणाला विरोध केला जात आहे. ही बाब सद्यस्थितीत चिंतनीय आहे. मात्र शासन कोणत्याही परिस्थितीत या धोरणाच्या अंमलबजावणीपासून दूर जाऊ इच्छित नाही. भारताच्या निर्यात वृद्धिसाठी व सर्वांगिण विकासासाठी सेझ प्रकल्पाची उभारणी आवश्यक मानली जात आहे. सेझ विरोधी मतांचा पूर्णपणे आदर राखून या धोरणात काही मूलभूत बदल करण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टिने भारतात सेझ आर्थिक विकासाची पर्यायी नीति ठरू शकेल. सेझचे धोरण अधिक उपयुक्त ठरण्यासाठी पुढील बदल करणे अपरिहार्य ठरते.

1) सेझच्या उभारणीसाठी पिकाऊ जमीन न घेता, पडिक अगर नापीक जमीन घेण्यास आंदोलकांची व अर्थतज्ज्ञांची हरकत नाही. मात्र त्यासाठी उद्योजकांना प्रेरणा देण्यासाठी या क्षेत्रावर पायाभूत सुविधा निर्माण करून देण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

2) सेझ प्रकल्पांच्या उभारणीकरिता शेतकऱ्यांकडून घेतली जाणारी जमीन, शेतकऱ्यांचे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी व त्यायोगे शेतकऱ्यांना उपजिविकेचे साधन प्राप्त होण्यासाठी अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील किमान एका व्यक्तीस कायम स्वरूपी नोकरी देण्याची हमी कायदेशीररित्या दिली जावी.

3) सेझ प्रकल्पांसाठी संपादन केल्या जाणाऱ्या जमिनींच्या किंमतीचा महत्त्वाचा प्रश्न सोडविण्याची आवश्यकता आहे. सध्या अशा जमिनीच्या तीन प्रकारच्या किंमती अस्तित्वात आहेत. यामध्ये शासकीय बाजारभावानुसार जमिनीची ठरणारी किंमत, प्रत्यक्ष व्यवहारातील किंमत व सेझ उद्योजक अशा प्रकारच्या जमिनीला देऊ इच्छित असलेली महत्तम किंमत या तीनपैकी कोणती किंमत अधिक व्यवहार्य आहे याचा सेझ, उत्पादक व शासन यांनी एकत्र येऊन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, अन्यथा जमिनीच्या

किंमतीबाबत स्पर्धा निर्माण होऊन तिचा नेमका लाभ कोणास होईल हे निश्चित करणे अवघड होईल.

4) सेझच्या आकारमानाबाबत असे मत व्यक्त केले जाते की, 100 ते 1000 हेक्टर ही मर्यादा कमी केली जावी. त्याप्रमाणे सेझच्या एकूण आकारमानाच्या 35% इतके क्षेत्र उत्पादन कार्यासाठी वितरित करून उर्वरित क्षेत्र उद्योजकाने त्याच्या इच्छेनुसार विकसित केल्याने सेझ प्रकल्पापेक्षा उर्वरित जमिनीतून, सेझ प्रकल्पाच्या उद्योजकांना अधिक फायदा कमविता येईल ही एक बाब भांडवलशाही नीतीची निदर्शक आहे. म्हणून सेझचे आकारमान व प्रत्यक्ष उत्पादन यात समन्वय प्रस्थापित होणे आवश्यक आहे. अर्थात यादृष्टिने शासनाने सेझचे किमान कार्यक्षेत्र एक हेक्टर इतके ठरविले आहे.

5) सेझची उपयुक्तता भारतीय अर्थव्यवस्थेत वाढविण्यासाठी सेझच्या कायद्यात आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. सर्वात मूलभूत बदल करून, सेझच्या व्यवस्थापन मंडळात केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश न करता लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांचे प्रतिनिधी व व्यापार क्षेत्राचे प्रतिनिधी इ. चा त्यात समावेश केला जाणे उचित ठरते. सेझच्या कायद्यातील तरतूदी या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या दृष्टीने अन्यायकारक आहेत. कारण या प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांना संप, टाळेबंदी अगर मोर्चे काढण्यास बंदी आहे ही बाब लोकशाही प्रधान भारतात कामगार कायद्यांतील तरतुदींशी विसंगत वाटते. त्याच प्रमाणे या कायद्याने सेझ उत्पादकांना अधिकार, देण्यात येणाऱ्या सवलती, विकास आयुक्तांचे शेतकऱ्यांना दिले जाणारे अर्थसहाय्य इ. बाबत कायदेशीर सुधारणा होणे आवश्यक आहे.

6) सेझ उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या सवलतीबाबत भारताच्या वित्तमंत्र्यांनी व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. सेझच्या कायद्यात सेझ उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या प्राप्तीकर, नोंदणी शुल्क, अधिभार, उत्पादन शुल्क, सीमाशुल्क इ. बाबत भरघोस सवलती या भारतीय अर्थव्यवस्थेच्या नियोजनात बसत नाहीत. त्यामुळे 187487 कोटी रूपयांचा करमहसूल बुडणार आहे. यांची भरपाई आपण कशी करणार आहोत ? त्यामुळे देशांतर्गत वित्तिय असमतोल कसा दुरूस्त करता येईल ? याबाबत तपशीलवार विचार होणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सवलती कमी करूनही सेझ प्रकल्पांचा विकास होवू शकेल.

7) सेझ प्रकल्पाची उभारणी करताना या क्षेत्रात निर्माण होणारी बहुतांश उत्पादने भारतातील लघुउद्योग क्षेत्राशी निगडित अशी आहेत. त्यामुळे सेझ प्रकल्पाच्या उभारणीमुळे अगोदरच संकटात असलेले भारतातील लघुउद्योग आणखी अडचणीत येण्याची भीति व्यक्त करण्यात येत आहे. नजिकच्या काळात देशात 70 ते 80 हजार लघुउद्योग बंद पडले तर देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील तो महत्त्वाचा अडथळा ठरेल असे वाटले. म्हणून सेझ उत्पादनात 50% हिस्सा शेती व कृषीपूरक उत्पादनाचा असावा अशी सूचना केली जाते, ती स्वीकारणे योग्य ठरेल.

8) सेझवरील नियंत्रण ही काळाची गरज आहे. प्रस्तुत सेझ कायद्यात शासनाचे या प्रकल्पावर कोणतेही नियंत्रण नाही. हे प्रकल्प खाजगी उद्योजक प्रामुख्याने विकसित करणार आहेत. भारतातील सध्याची सेझची कार्यप्रणाली व व्यवस्थापकीय रचना विचारात घेता सेझचा लाभ सामान्य व्यक्तीस मिळवून देण्याच्या कामी शासनाचे या प्रकल्पावर नियंत्रण हवे.

9) सेझ आणि अन्य प्रकल्पांसाठी जमीन ताब्यात घेण्यावरून ओरड सुरू असतानाच केंद्र

सरकारने शेतकऱ्यांसाठी जमिनीच्या बदल्यात जमीन हे नवे राष्ट्रीय पुनर्वसन धोरण आणले आहे. सेझ किंवा औद्योगिक प्रकल्पांमध्ये शेतकऱ्यांची भागीदारी निश्चित करणारे हे धोरण असेल. आता कंपन्यांना व्यावसायिक वापरासाठी जमिनी ताब्यात घेणे अधिक सुलभ ठरणार आहे. औद्योगिक वापरासाठी ताब्यात घेतल्या जाणाऱ्या शेत जमिनीबाबत राज्य सरकारची भूमिकाही या धोरणानुसार निश्चित होणार आहे. अग्रणी उद्योगसमुहांनी या धोरणाचे स्वागत केले आहे.सेझ किंवा औद्योगिक प्रकल्पांना मंजुरी देण्यासाठी राज्यसरकारांना 30% जमीन संपादित करण्याची मुभा राहिल. पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सुधारित धोरण जाहीर करण्यात आले. संपादित जमीन अन्य कोणत्याही कारणासाठी वापरता येणार नाही. भरपाईची 50% रक्कम प्रकल्पातील समभागात परावर्तित करण्याचा महत्त्वपूर्ण अधिकार शेतकऱ्यांना देण्यात आला आहे. तक्रारी ऐकून घेण्यासाठी लोकपालांच्या नियंत्रणाखाली जिल्हा व प्रकल्पनिहाय तक्रारनिवारण यंत्रणा स्थापन करण्यात येईल.[12]

### 1.12 समारोप

सेझचे धोरण प्राप्त परिस्थितीत स्वीकारणे अपरिहार्य आहे. तथापि त्यात वरील प्रमाणे सुधारणा घडवून आणल्यास सेझची उपयुक्तता वाढून समाज हित साधणे शक्य होईल असा विश्वास वाटतो. आता पर्यंत आपण सेझचे समर्थन, सेझविरोधी मतप्रणाली आणि सुधारणांसह सेझचा स्वीकार यांचा उहापोह केला. सेझ ही विकासाची पर्यायी नीति म्हणून विचारात घेताना आणखी एका बाबीकडे खास लक्ष दिले पाहिजे आणि ती म्हणजे सेझमुळे निर्माण होणारी असमान स्पर्धा होय. ही बाब आर्थिक विषमता वाढविणारी तसेच प्रादेशिक असमतोल वाढविणारी आहे. सेझ मधील काही जाचक अटीही शिथिल झाल्या पाहिजेत. सेझ म्हणजे अभिमत परकीय भूमी असे स्वरूप आहे. हे योग्य आहे काय? ओळखपत्राची सेझ मधील सक्ती आणि विभागीय आयुक्तांकडून त्या साठीची परवानगी जाचक वाटते. त्याऐवजी या जाचक अटी रद्द करून शासनाची मागास प्रदेशात सरकारच्या मालकीची जी जमीन उपलब्ध आहे तिचा वापर करावा. सुदैवाने आज रस्ते बांधणी चांगली झाली आहे. त्यामुळे वाहतुक सुलभ होईल. प्रादेशिक मागासलेपण सेझ द्वारे पण शासकीय उपायाने नक्की दूर होईल एकूण शासनाने ठरविले तर प्रादेशिक असमतोल दूर करण्याचे एक माध्यम म्हणजे सेझ होय. जेव्हा शासनाने सेझला परवानगी दिली, तेंव्हाच जी जमीन दिली जाणार आहे त्या जमिनीच्या मोबदल्यात शेतकऱ्याला सेझमध्ये काही प्रमाणात जमीन उपलब्ध करून देणे, त्याचबरोबर पुनर्वसन पूर्ण झाल्यानंतरच सेझची कार्यवाही सुरू करणे हितावह ठरेल.

आपण आपले सेझचे धोरण ठरविताना चीनचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला[13] परंतु चीन आणि भारतातील सेझ धोरणात मुख्य फरक जमिनीसंबंधीचा आहे. चीनमध्ये सरकारची जमिनीवर मालकी असल्याने स्वत: जमिन विकसित केली व नंतर खाजगी उद्योजकांना आमंत्रित करून आपले उद्योग सुरू करण्यास सांगितले. भारतात मात्र खाजगी उद्योजकांना जमीन संपादित करून ती सरकारकडून विकासासाठी खाजगी उद्योजकांना देण्यात येत असे. त्यात परिवर्तन करून नवीन आदेशामुळे विकासकांनाच जमीन स्वस्त: खरेदी करावी लागणार आहे. त्यामुळे भारतात सेझसाठी जमीन संपादनासाठीचा प्रश्न हा कळीचा मुद्दा आहे. शासनाच्या अलिकडच्या धोरणामुळे 14 सेझमध्ये प्रकल्पग्रस्तांना भागधारक करण्यात येणार आहेत. 20% शेअर्स ते विकत घेऊ शकतात. याशिवाय कुटुंबातील किमान एका पात्र व्यक्तिला नोकरी

देण्याची कल्पना आहे. सेझमध्ये नोकऱ्या आहेत ही बाब खरी असली तरी शेतकऱ्यांच्या मुलांच्याकडे पारंपरिक शिक्षणामुळे अशी पात्रता नसल्यामुळे व नव्या तंत्रज्ञानापासून ते दूर असल्याने सेझ मधील नोकऱ्यांवर ते हक्क सांगू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एखाद्या भागात सुरू होणारा ''सेझ'' किती वर्षे चालू राहणार, सर्व गोष्टींची पूर्तता होऊनही तो अल्पावधित बंद पडल्यास काय करावयाचे याचा विचारही आत्ताच करायला हवा. करसुट्टी संपत आली की, गाशा गुंडाळून नवे प्रदेश शोधणारे उद्योजक काही कमी नाहीत. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन नव्या धोरणाची अंमल बजावणी करताना स्वाभाविकच अधिक दक्ष रहावे लागणार आहे. या पार्श्वभूमीवर [15] विशेष आर्थिक क्षेत्रासाठी जमीन संपादित करण्याच्याविरोधात देशभरात आंदोलने सुरू असताना आता केंद्र सरकार या प्रकरणी ठोस राष्ट्रीय धोरण आखण्याचा विचार करत आहे. राष्ट्रीय पातळीवर भू-धोरण ठरविण्यात येईल. तसेच राष्ट्रीय भू-आयोग स्थापन करण्यात येईल. उपजीविकेसाठी जमिनीवरच अवलंबून असणाऱ्यांचा हक्क शाबूत ठेवण्यासाठी राष्ट्रीय भू-आयोग स्थापन करावा असे ठरले आहे.

### संदर्भसूची


1) सुकाळे विकास -विशेष आर्थिक क्षेत्र-विकासाची संधी व समस्या पृ. 65 अर्थसंवाद एप्रिल-जून 2007

2) सेझ ॲक्ट 10 फेब्रुवारी 2006 पृ. 2

3) निंबाळकर कैलास, निंबाळकर रत्ना-विशेष आर्थिक क्षेत्र-स्वरूप व आव्हाने-पृ. 58,59, अर्थसंवाद एप्रिल-जून 2007

4) सेझ ॲक्ट, पान 3

5) भामरे दीपक-विशेष आर्थिक क्षेत्र-समस्या व उपाय पृ. 40,अर्थसंवाद एप्रिल, जून 2007

6) कुरूक्षेत्र जानेवारी 2007 पान 54

7) दि टाईम्स् ऑफ इंडिया-पुणे 1-9-2007

8) मुंढे शशिकांत-विशेष आर्थिक क्षेत्राचे परिणाम-राज्यस्तरीय चर्चा सत्र-हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्स मुंबई 25-8-2007

9) दैनिक सकाळ, सातारा, 31 ऑगस्ट 2007

10) दैनिक तरूण भारत 14 वा विशेषांक 25-12-2006

11) तत्रैव - भामरे दीपक पृ. 49.

12) दैनिक लोकमत - 12-10-2007

13) तत्रैव-भामरे दीपक पृ. 47

14) दैनिक सकाळ, सातारा आवृत्ती-अग्रलेख दि. 13-10-2007

15) दैनिक पुढारी-सांगली आवृत्ती-दि. 17-10-2007. पान 1


◆◆◆

# रोजगार (भाग 2)

✦ शरद शंकर जोशी, पुणे
*भूतपूर्व प्रपाठक व प्रमुख अर्थशास्त्र विभाग,*
*सरपरशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे.*

**रोजगार निर्मिती**

सन 1990-98 या कालावधीत बिगर शेती क्षेत्रातील रोजगार वृद्धिदर 1.71% होता. हे प्रमाण नंतरच्या काळात म्हणजे 1998-2005 या जनगणना काळात 2.5% पर्यंत वाढले. या वाढीमुळे वस्तुस्थितीचा नीट विचार न करता अति उत्साहित होण्याकडे किंवा फाजील उत्सुकता दर्शविण्याकडे कल असल्याचे काही भागात आढळते. इतकेच नव्हे तर त्या आधीच्या रोजगाररहित वृद्धीच्या उलट प्रवृत्ती दिसू लागली, असे प्रतिपादन केले जाऊ लागले. पण भोवतालच्या घटक, घडामोडी नीट अभ्यासता वेगळाच निष्कर्ष निघतो. देशातील कामगारदलाचा बराचसा भाग दारिद्र्याच्या दुष्ट चक्रात सापडला आहे. बेरोजगारात लक्षणीय वाढ झालेली आहे. आर्थिक वृद्धिप्रक्रियेची गती वाढत आहे. सद्या 9.4% असलेला वृद्धिदर लवकरच दोन आकडी होईल. तथापि, बेरोजगाराचा अनुशेष भरून काढून विशेषत: ग्रामीण भागातील बेरोजगाराचा दर कमी करण्याच्या दृष्टीने हा रोजगारवृद्धिदर पुरेसा मानता येत नाही. बिगर शेती क्षेत्रातील वृद्धिदर अलिकडील काळात सापेक्षतेने उंचावला असला तरी प्राथमिक क्षेत्रात काम करणारा कामगार दल कमी झालेला नाही. वस्तुत: शेतीक्षेत्रातील रोजगारवृद्धी उंचावलेली नाही. ती अद्याप सपाटीवरच आहे.

शास्त्रीय आणि तंत्रविज्ञान क्षेत्रातील जलदप्रगती, जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या अत्यावश्यकता आणि उर्वरित जगाशी स्पर्धा करण्याची गरज इत्यादी कारणांमुळे आपल्याला कार्यक्षमतेची उच्चतर पातळी गाठणे भाग पडते. मग त्यासाठी श्रमांचा कमी वापर करणाऱ्या उत्पादन पद्धतींचा अवलंब करण्याची तयारी ठेवावी लागते. तथापि, अशा वृद्धीमुळे जनतेला रोजगार पुरविता येणे शक्य झालेले नाही, आणि सर्व प्रदेशांचा सारखा विकास घडवून आणता आलेला नाही.

अशा रीतीने देशातील व्यापक बेरोजगाराचा प्रश्न परिणामकारक रीतीने

हाताळण्यासाठी यंत्रणा निर्माण करणे, योजनेचे संकल्पन करणे किती निकडीचे आहे, हे स्पष्ट होते. रोजगाररहित लोकांना मुख्य प्रवाहात आणून काम करणाऱ्या गरिबाना दारिद्र्यरेषा ओलांडण्यास मदत करण्यासाठी तसे प्रयत्न जरूरीचे आहेत. कामगारदलाला ज्यामुळे पुरेशा उत्पन्नाची ग्वाही मिळेल असा आणि इतका रोजगार निर्माण केला गेला पाहिजे. बेरोजगारात खितपत पडलेल्या लोकांना स्थलकालाला साजेसे किंवा चांगले काम उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट असले पाहिजे. आंतरराष्ट्रीय कामगारसंघटनेने अशा चांगल्या कामाची व्याख्या दिली आहे, त्यांच्या मते 'स्वातंत्र्य,समन्याय, सुरक्षा आणि मानवी प्रतिष्ठा सुनिश्चित करणाऱ्या वातावरणात पुरूषाना आणि स्त्रियांना उत्पादक काम मिळण्याची संधी'[10] उपलब्ध करून दिल्या तर चांगले काम मिळवून दिल्यासारखे होईल. कामगाराला उत्पन्न मिळवून देण्याखेरीज, चांगल्या प्रकारच्या कामामुळे कामगाराला सामाजिक जीवनात पूर्णपणे सहभागी होता येईल आणि स्वयंनिर्णित जीवन जगता येईल; आणि त्यामागे सामाजिक संलग्नता आणि ऐक्य साधणे सुकर होईल.

**१. पर्यायी उपाय**

सैद्धान्तिक दृष्ट्या विचार करता बेरोजगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी एक पर्याय म्हणून सामुदायिक दृष्टिकोण सुचविणे शक्य आहे. रोजगार निर्मितीच्या हेतूने तयार केलेल्या योजनेनुसार कामगारांना काम करण्यास भाग पाडणे, प्रस्तुत दृष्टिकोणात अभिप्रेत आहे. लोकांना त्यांच्या किमान गरजा भागविण्यासाठी आवश्यक त्या वस्तू व सेवा मिळण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तिला प्राप्त होतो. सर्व लोक सामूहिक समाजाचे सदस्य म्हणून जीवन जगतात. प्रत्येक व्यक्तिने आपल्या क्षमतेनुसार काम करावे आणि प्रत्येक व्यक्तिला तिच्या गरजेनुसार वस्तू व सेवा दिल्या जाव्यात, या तत्त्वावर प्रस्तुत प्रतिमान आधारित आहे. प्रत्यक्षात मात्र चीनसारख्या देशाने देखील या विचारापासून फारकत घेतलेली दिसते.

पर्यायाने 'उत्पन्न(प्राप्ती)अधिकार' प्रतिमान किंवा त्याऐवजी प्रतिमान म्हणून 'बेरोजगार भत्ता' पद्धतीचा विचार करता येईल. यानुसार बेकार व्यक्तींना उत्पन्न (प्राप्तीचा) अधिकार दिला जावा; तसे केले गेल्यास बेकार व्यक्तींना दिलासा मिळू शकेल. त्याच्या मोबदल्यात, त्या लोकांना जेव्हा काम दिले जाईल तेव्हा ते काम त्यानी करावे, असे बंधन राहाते. 'उत्पन्न(प्राप्ती)अधिकार दृष्टिकोण स्वीकारणे, त्यानुसार कार्यवाही करणे, अमेरिकेसारख्या देशाला शक्य असले तरी भारतासारख्या देशाला या मार्गाचा अवलंब करणे आणि तदनुरूप अशा बेकारी भत्ता योजना कार्यवाहीत आणणे कठीण आहे.'

यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची हमी न देता गरजू बेकाराना या ना त्या स्वरूपात वेतनी रोजगार उपलब्ध करून देण्याचा मार्ग अवलंबिता येणे शक्य असते. जवाहर रोजगार योजना, संपूर्ण ग्राम विकास योजना इत्यादी रोजगार प्रकल्प वेतनी रोजगार प्रतिमानाच्या धर्तीवर आखण्यात आले.

भारतात सर्वप्रथम रोजगार हमी योजना (रोहयो)सुरू करणारे महाराष्ट्र राज्य हे आद्यप्रवर्तक राज्य ठरले. या राज्यात प्रस्तुत योजना सन 1973 मध्ये कार्यान्वित करण्यात आली. उपरोक्त वेतनी रोजगार प्रतिमानातील त्रुटी कमी करून ते सुधारित स्वरूपात सादर करण्याचा हा एक प्रयत्न म्हणून स्वागतार्ह ठरतो.

तीन दशकांपेक्षा अधिक काळ कार्यवाहीत

असलेल्या या अग्रगण्य योजनेमुळे अन्य राज्यातील आणि राष्ट्रीय पातळीवरील रोजगार विषयक धोरण निश्चिती प्रभावित होत असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्यातील या योजनेमुळे गरीब गरजू व्यक्तिंना रोजगार मिळणे शक्य झाले आहे. आर्थिक वृद्धिप्रक्रियेत आणि स्पर्धेत जे प्रदेश मागे पडतात अशा प्रदेशाना रोहयो अंतर्गत प्रकल्पांची गरज भासते. बद्धमूल सामाजिक दुर्बलतेने जर्जर झालेल्या नैमित्तिक कामगाराना प्रस्तुत योजना रोजगार मिळवून देऊ शकते. या दृष्टीने अविकसित प्रदेशात रोहयो मोलाचे कार्य करू शकते.

अशा रीतीने तीन दशकांपूर्वीच सुरू करण्यात आलेल्या रोहयोने लक्षणीय प्रगती केलेली आहे. पण बेरोजगाराचा प्रश्न हा फक्त महाराष्ट्रापुरताच आहे की काय ? तसे नसेल तर मग अशी योजना केंद्र सरकारने आधीच कार्यवाहीत का आणली नाही? बेरोजगाराचा, न्यून रोजगाराचा प्रश्न देशात लक्षावधी लोकाना भेडसावत असताना केंद्र सरकारने रोहयोसारखी योजना मांडून ती कार्यवाहीत आणणे अत्यंत निकडीचे असूनही असे प्रयत्न केंद्राने आजपावेतो का केले नाहीत ? या प्रश्नाचे एक उत्तर असे असू शकते की जेव्हा परिस्थिती चिघळते आणि हाताबाहेर जाते, तेव्हाच साधारणपणे विधायक, व्यापक दृष्टिकोणातून धोरणात आणि रोजगार विषयक योजनात देखील निश्चित स्वरूपाचे बदल केले जातात.

## 2. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी

महाराष्ट्रातील रोहयोच्या तरतुदींचा प्रतिमाबंध लक्षात घेऊन त्याधर्तीवर केंद्राने सन 2005 मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा केला. त्यानुसार रोजगाराची कायदेशीर हमी देण्यात येते. देशातील गोरगरिबांचे हितसंबंध जपण्याच्या हेतूने हा कायदा करण्यात आला. देशातील बेरोजगाराचा व्यापक प्रश्न हाताळण्यासाठी तातडीने उपायोजना करणे गरजेचे आहे हे ओळखून केंद्राने रोजगार हमी योजनेची कार्यवाही सुरू केली. केंद्राच्या त्या योजनेची व्याप्ती पुरेशी असून त्यासाठी आवश्यक तेवढ्या वित्तपुरवठ्याची जबाबदारी केंद्र सरकारने स्वीकारली आहे. त्या योजनेमुळे ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वित्तीय वर्षात किमान 100 दिवसांचा रोजगार मिळण्याची सोय झाली. अशा रीतीने, देशातील कुपोषणाचा उच्च दर कमी करण्याच्या दृष्टीने आणि वंचिताना मदत करण्याच्या दृष्टीने केंद्राची रोजगार हमी योजना म्हणजे अत्यंत निकडीची गरज भागविण्यासाठी शासनाने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल होय. ग्रामीण विकासाच्या मार्गातील एक मोठा अडसर दूर करणारा उपरोक्त कायदा आणि त्याअन्वये राबवले जाणारे महत्त्वाकांक्षी प्रकल्प विशेष उल्लेखनिय ठरतात.

''संबंधित क्षेत्राचा अध:संरचनात्मक पाया भक्कम होण्याच्या दृष्टीने त्या प्रकारच्या सेवा-सुविधा विकसित करणारे प्रकल्प हाती घेऊन त्याद्वारे वेतनी रोजगार निर्माण करून आणि ग्रामीण भागातील लोकांची निर्वाह साधने वाढवून त्या लोकांची उपजीविका सुरक्षा उंचावणे हे त्या कायद्याचे उद्दिष्ट होय. दुष्काळ, वननिर्मूलन आणि जमिनीची धूप यासारखी बद्धमूल दारिद्र्याची कारणे दूर करण्याचे कार्य ज्यामुळे सुरू होऊ शकेल अशा प्रकारच्या प्रकल्पाची निवड (कामाची निवड) केली जाते. संबंधित क्षेत्रातील नैसर्गिक संसाधनांचा कायाकल्प घडवून आणणे हा काही पायाभूत स्वरूपाचे उद्योग सुचविण्यामागील हेतू होय. जे लोक वेतनी रोजगाराचे काम करतात त्याना भत्ता निर्माण करण्याच्या कामात मदत करण्याच्या स्थानिक (भागाच्या) अर्थव्यवस्थेला त्या योगे चालना मिळावी, ही

त्यामागील भूमिका होय. तशा मत्ता निर्माण झाल्यास स्थानिक भागातील लोकांना स्वयंरोजगारासारख्या उत्पादक कार्यात झोकून देता येईल आणि त्याना त्यांचे उत्पन्न उंचावता येईल''[11]

अशा रीतीने उपरोक्त कायद्यान्तर्गत प्रकल्पांमुळे रोजगार निर्मितीतील तूट बऱ्याच प्रमाणात कमी केली जाण्यास मदत होते. न्यून रोजगार, बेरोजगार आणि दारिद्र्य इत्यादींचा सर्वाधिक भार ज्यांच्यावर पडतो अशा लोकांना त्या कायद्याच्या कक्षेत आणता येणे शक्य होईल. त्याकायद्यामुळे सर्व लोकाना रोजगार हमीस पात्र होता येत नसले तरी त्या कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीस बरेच महत्त्व प्राप्त होते. अर्थसंकल्पीय अडचणीतून येणाऱ्या मर्यादा जसजशा दूर होतील तसतशी उपरोक्त कायद्याची व्याप्ती वाढविली जाणे शक्य आहे.

राजकोषीय तूट आणि रोजगार कार्यक्रमांकरिता उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या निधीतील भक्कम वाढीमुळे तसेच राष्ट्रीय सामायीक किमान कार्यक्रमाकरिता आवश्यक असणाऱ्या तरतुदींमुळे संसाधनांवरील ताण वाढेल. हे बरोबर. पण त्यातूनही मार्ग काढता येणे शक्य आहे. उदाहरणार्थ, कर आकारणीचा पाया रुंदावणे, करसंकलनाची कार्यक्षमता वाढविणे, बिगर-विकास खर्च कमी करणे तसेच अर्थसाहाय्यात कपात करणे इत्यादी उपाय योजता येतील. अशा रीतिने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना योग्य रीतीने कार्यवाहीत आणली गेली आणि उपरोक्त कायद्यान्वये हाती घेतले जाणारे प्रकल्प यशस्वी रीतीने पूर्ण केले गेले तर त्या प्रकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांमुळे कराव्या लागणाऱ्या जादा सार्वजनिक खर्चासाठी आवश्यक तेवढा वित्तपुरवठा उपलब्ध करून देणे अडचणीचे ठरणार नाही. प्रस्तावित प्रकल्पांमध्ये समाविष्ट करण्यात आलेली कामे आणि त्या प्रकल्पांची कार्यवाही यावर लक्ष केंद्रित केल्यास त्या प्रकल्पांचे लक्ष्ये गाठली जाणे सुकर होईल.

केंद्राच्या रोहयोमध्ये राज्यांना महत्त्वाची कामगिरी पार पाडावयाची आहे. रोजगार हमीसंबंधीच्या राष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी आणि प्रकल्पांची कार्यवाही राज्यांकडून केली जावयाची आहे. तथापि, प्रत्यक्षात असे दिसते की नोकरशाहीला शासनातील लोकनियुक्त अधिकाऱ्यांचे, कंत्राटदारांचे किंवा अन्य स्वार्थी लोकांचे पाठबळ लाभलेले असते. गरजूंकरिता रोजगार निर्मिती आणि ग्रामीण विकास योजनांकरिता वापरावयाच्या वित्तीय साधनसामग्रीतील बराचसा भाग खाजगी व्यक्तिगत लाभासाठी वळविला जाणे सहजशक्य असते. नोकरशाहीच्या या प्रवृत्तीमुळे राष्ट्रीय रोहयोचा पैसा सधन लोकांच्या हाती जाणे संभवते. अशा गळतीमुळे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याचा मूळ हेतू असफल होण्याची भीती राहते. उदाहरणार्थ, राजस्थानमध्ये असा अनुभव आहे की तेथे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रमान्तर्गत कामावर असणाऱ्या कामगारांना त्या राज्यात किमान वेतन रू.73/- ठरवून देण्यात आले असूनही प्रत्यक्षात तया प्रकल्पांवर काम करणाऱ्या खेडुतांना मजूरी म्हणून 55 ते 60 रूपये एवढाच मोबदला दिला जातो. बहुतेक गावकरी लोक पूर्णपणे सरपंचांच्या तावडीत असतात. ते सरपंच राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे कार्यपत्रिकाधारक (Job card holders) असले तरी ते पर्यवेक्षक म्हणून काम करीत असतात. कामावर देखरेख ठेवण्याचे अधिकार त्याना मिळालेले असतात. पण ते त्यांच्या पर्यवेक्षी भूमिकेचा गैरफायदा घेऊन ग्रामस्थ-मजुरांची पिळवणूक करतात. (संदर्भ : Business Standard, 10th August 2006) अनेक ठिकाणी असे आढळून

येते की रोहयो प्रकल्पांवर काम करणाऱ्या मजुरांना दिला जाणारा मोबदला अन्यायकारक असून अनेक भागात मजुरांचे फार मोठ्या प्रमाणावर शोषण केले जाते.

तरी सुद्धा येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की उपरोक्त योजना ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळवून देण्यासाठी आणि स्थानिक भागाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या ग्रामीण प्रकल्पांकरिता आहेत. स्थानिक भागातील लोकांच्या गरजा नेमक्या काय आहेत हे ग्रामपंचायतीना कळते. राष्ट्रीय पातळीवर कार्य करणारे राजकारणी लोक आणि राज्यशासनाचे अधिकारी यांच्यापेक्षा सरपंचांना आणि ग्रामसेवकाना स्थानिक परिस्थितीचे अधिकांशाने आकलन झालेले असते. ग्रामीण विकास प्रकल्प कार्यवाहीत आणण्याचे काम पंचायती अधिक जबाबदारीने करू शकतात. वस्तुत: ग्रामपंचायती म्हणजे योजनांची कार्यवाही करणारे राज्य सरकारचे आणि केंद्र सरकारचे, राज्यकारभारात कोणतेही अधिकार व स्वायत्तता नसलेले मध्यस्थ असे मानले जाऊ नये. स्थानिक भागातील साधनसामग्री (संसाधने) रोहयोसाठी गतिक्षम करता येणे त्याना शक्य असते. अशा रीतीने पंचायतीना जादा अधिकार दिले तर सत्तेच्या विकेंद्रीकरणाला मदत होईल आणि ग्रामस्थांच्या हितासाठी पंचायत राज्य पद्धती वाढीस लागून ती अधिक बळकट होईल. स्थानिक, राज्य आणि केंद्र पातळ्यांवर काम करणाऱ्या निरनिराळ्या सरकारी खात्यांकडून जी धोरणात्मक चाल केली जाते त्याचे मूल्यमापन करताना परिणामस्वरूप रोजगार संधी कितपत आहेत याचाही विचार केला पाहिजे.

### 3. भ्रष्टाचार

समाजाच्या सर्व स्तरांवर भ्रष्टाचाराचे अस्तित्व जाणवते. कावेबाज भ्रष्टाचार संघटित क्षेत्रात आणि असंघटित क्षेत्रातही चालू आहे. भ्रष्टाचारासंबंधीचा एकीकृत किंवा एकसंध असा सिद्धान्त अस्तित्वात नसला तरी या संदर्भात काही प्रश्न उपस्थित करणे वेधक ठरते. उदाहरणार्थ, भ्रष्टाचाराचे प्रयोजन कोणते? भ्रष्टाचार महत्त्वाचा असतो काय ? गेल्या पंधरा वर्षांच्या काळात देशातील रोजगारावर त्याचा कोणता परिणाम घडून आलेला आहे?

भ्रष्टाचाराकडे निरनिराळ्या दृष्टिकोणातून पाहाता येते. उदाहरणार्थ, लाचलुचपत बाजार निरसन-कार्ययंत्रणेला मदत करते. लाच देण्यासाठी केला जाणारा खर्च प्रोत्साहन म्हणून दिला जाणाऱ्या पैशासारखा असतो. आणखी असे की करदात्याचा खर्च भ्रष्टाचारामुळे कमी होऊ शकतो. लाच देण्यासाठी जो पैसा खर्च होतो त्यामुळे लाच देणाऱ्या व्यक्तिचा प्रभाव वाढण्यास एका अर्थाने मदत होते. इतकेच नव्हे तर राजकीय पक्षाला मते मिळविण्यासाठी मते विकत घेण्यासाठी, लाचलुचपत साहाय्यभूत ठरू शकते. लाच देऊन न्यायालयाचे निर्णय देखील आपल्या बाजूने करता येणे शक्य आहे; आपल्याला अनुकूल असे निर्णय दिले जाणे शक्य आहे.

भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार दिसतात. बहुरूपी अभिव्यक्तीचा हा भ्रष्टाचार म्हणजे एक अत्यंत गुंतागुंतीची घटना असून त्यात अडकून पडलेली एकूण रक्कम किंवा भ्रष्टाचाराची व्याप्ती नेमकेपणाने सांगणे कठीण आहे. भ्रष्टाचार हा फक्त आपल्या देशापुरता मर्यादित नाही; अन्य देशातही भ्रष्टाचाराने पाय रोवले आहेत. तथापि, या संदर्भात देशोदेशींची काटेकोर तुलना करता येत नाही. लाच पैशाच्या स्वरूपात किंवा वित्तीय मत्तेच्या स्वरूपात असेल तर ती ओळखता येते. तथापि कित्येकदा भ्रष्टाचाराचे

व्यवहार कोणाला न कळत केले जातात. चोरून केले जाणारे असे व्यवहार शोधून काढणे सिद्ध करणे कठीण असते. उद्योग व्यवसाय क्षेत्रातील कंपन्या निगम संस्था स्पर्धेची तीव्रता कमी करण्यासाठी किंवा मुळात स्पर्धाच किमान पातळीवर ठेवण्याच्या हेतूने कधी कधी सभाकक्षात प्रचार करण्याचा मार्ग अवलंबितात; तो रिवाज होऊन राहतो. मग कित्येकदा तीच 'प्रथा' पाळली जाते. कोणकोणत्या देशात किती भ्रष्टाचार आढळतो हे पाहून त्यानुसार देशांचे उतरत्या क्रमाने वर्गीकरण करता येते. अर्थात असा प्रयत्न म्हणजे केवळ ढोबळमानाने केलेला अंदाज होय.

'ट्रान्स्परेन्सी इंटरनॅशनल' ने केलेल्या अभ्यासानुसार भ्रष्टाचाराच्या बाबतीत जगातील 159 देशांमध्ये भारत 88व्या स्थानावर आहे.[12] भारताच्या बाबतीत भ्रष्टाचार निर्देशांक माली, टांझानिया यासारख्या (अनर्थ) आफ्रिकी देशांच्या बाबतीत आढळतो तितकाच आहे. अर्थात धुतलेल्या तांदळासारखा स्वच्छ समाज या भूतलावर नाहीच.

खाउजा धोरणाचा अनुनय करणाऱ्या या देशात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या उमद्या स्वभावाच्या आणि महत्त्वाकांक्षी अनिवासी भारतीयाच्या दृष्टीने भ्रष्टाचाराचा मुद्दा महत्त्वाचा नाही. जोपर्यंत त्याला आपले काम विनाविलंब करून घेता येते तो पर्यंत तो भ्रष्टाचाराच्या विरोधात फारसे बोलणार नाही. उद्योगव्यवसाय क्षेत्रातील लोकांना जर अप्रामाणिक व्यवहार अपेक्षेप्रमाणे पूर्ण करून दिले जात असतील तर लाच देण्याची त्यांची तयारी असते. सापेक्षतेने विचार करता पूर्वीची परवाना पद्धती हीच पद्धतशीर भ्रष्टाचाराचे अधिक दगलबाज उदाहरण होय. परवानापद्धती रद्द करण्यात आल्यानंतर खाउजा धोरण अवलंबिण्यात आले तेव्हापासून भ्रष्टाचाराची व्याप्ती काहीशी कमी झाली. तरीही भ्रष्टाचाराची ही विषवल्ली या समाजात खोलवर रूजलेली आहे, हे नाकारता येत नाही. भ्रष्टाचार बोकाळलेला असूनही गेल्या तीन चार वर्षांच्या काळात भारताच्या स्थूलदेशान्तर्गत उत्पादनाचा वार्षिक वृद्धिदर 8% पेक्षा अधिक असल्याचे आढळून येते. पण लोकशाही पद्धतीत भ्रष्टाचारावर कमाल मर्यादा राहात असावी. सरकारी नोकरशहा भ्रष्ट असले तरी त्यांची कार्यक्षमता उच्च दर्जाची असेल तर राजकारणी लोक त्यांच्याशी हातमिळवणी करतात. तसे केल्याने त्याना पैसाही मिळतो आणि मतेही मिळतात. अर्थात येथे एक गोष्टीचा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे की दूरसंचरण (टेलिकॉम), मोटारगाड्या आणि माहिती उद्योग (आयटी) या उद्योगानी असे दाखवून दिले आहे की भ्रष्टाचारावर इलाज करावयाचा तर स्पर्धेपेक्षा अधिक चांगला असा अन्य कोणताही उपाय नाही.

सर्वप्रथम महाराष्ट्रात आणि नंतर अन्य काही राज्यात राबविण्यात येत असलेल्या रोजगार हमी योजनेला उल्लेखनीय यश प्राप्त झाले. या योजनेमुळे गरजूना रोजगाराची हमी मिळाली. प्रस्तुत योजने अंतर्गत रस्ते, लहान धरणे, मृद संधारण, बांधबंदिस्ती, ग्रामीण विकास इत्यादी प्रकल्पांची पूर्तता करण्याच्या बाबतीत बरीच मदत झाली. तथापि, अलिकडील काळात मात्र रोहयो मध्ये भ्रष्टाचाराचा विकार पसरलेला दिसतो. महाराष्ट्र राज्याच्या काही भागात, उदाहरणार्थ, औरंगाबाद, सोलापूर इत्यादी जिल्ह्यात भ्रष्टाचाराचे अनेकविध व्यवहार पुढे आले आहेत.

रोहयोमुळे गरजू गरिबाना काही ना काही रोजगार मिळणे शक्य झाले; काही अंशी अध:संरचना विकास आणि मत्ता-निर्मिती शक्य झाली. दीन दुबळ्याना एकप्रकारे सामाजिक सुरक्षा मिळणे शक्य झाले. तथापि, रोहयोच्या

अंमलबजावणीच्या संदर्भातील आव्हाने साधी नाहीत. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कार्यवाही विचारात घेता असेच प्रश्न उठतात. राष्ट्रीय रोहयो कार्यक्रमाचे फलित प्रामुख्याने भ्रष्टाचार आणि प्रशासकीय यंत्रणेची गुणात्मक क्षमता या दोन घटकांवर अवलंबून राहील. विशेषत: बिहार, उत्तरप्रदेश या सारख्या राज्यातील परिस्थिती वैशिष्ट्यपूर्ण (पुष्कळदा विषण्ण?) असते. वस्तुत: अशा राज्यांना रोहयो कार्यक्रम सर्वाधिक निकडीचे असले तरी तेथे सदरहू कार्यक्रमाची कार्यवाही समाधानकारक राहील अशी अपेक्षा करणे भाबडेपणाचे ठरेल.

भ्रष्टाचार बराच फैलावलेला असल्याने वित्तीय साधनसामग्रीचा अपव्यय होण्याची भीती राहाते. भ्रष्टाचाराच्या व्याप्तीचा नेमका बिनचूक अंदाज करता येत नसला तरी भूतपूर्व पंतप्रधान राजीव गांधी यानी एकदा असा अंदाज व्यक्त केला होता की कामकरी गरीब लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी हाती घेण्यात येणाऱ्या योजनांवरील सार्वजनिक खर्चाच्या रकमेतील अत्यल्प रक्कम म्हणजे रूपयातले फक्त 15 पैसे गरिबांपर्यंत पोहोचतात. तथापि, एक गोष्ट येथे लक्षात ठेवली पाहिजे की सधन समाजातील लोकांचे खिसे आणखी भरणारी गळती फार मोठ्या प्रमाणावर आढळत असली तरी दुष्काळ-निवारण प्रकल्प आणि अशा अनेक दारिद्र्य-निर्मूलन कार्यक्रमांच्या बाबतीत लक्षणीय यश प्राप्त झालेले आहे. उदाहरणार्थ, सन 1991 नंतरच्या काळात अशा योजना भूक-प्रतिबंध कार्यात यशस्वी ठरल्या असून त्या योजनांमुळे दुष्काळ टाळणे शक्य झाले.

भ्रष्टाचाराचे आणि काळ्या पैशाचे अर्थव्यवस्थेवरील आणि विशेषत: बेरोजगाराच्या व्याप्तीवरील परिणाम अद्याप फारसे प्रकाशात आले नसले तरी, संक्षेपाने का होईना, त्या परिणामांची चिकित्सा करणे जरूरीचे ठरते.

काळ्या पैशाचे रोजगार अंदाजण्यावर कोणते परिणाम घडून येतात याविषयीचे विश्लेषण अलिकडील काळात प्रकाशित झालेल्या एका लेखात[13] करण्यात आले आहे.

(काळ्या पैशावर आधारित) समान्तर अर्थव्यवस्थेची व्याप्ती वर्षानुवर्षे वाढत आलेली आहे. यापुढील काळात ती आणखी वाढत राहणार, हे निश्चित. कॅल्डॉरच्या [14] मते सन 1955-56 मध्ये काळ्या पैशाचे प्रमाण स्थूल देशान्तर्गत उत्पादनाच्या 4% होते. कुमार ए [15] यानी केलेल्या अंदाजानुसार हे प्रमाण सन 1995-96 मध्ये 40% पर्यंत वाढले.

काळया पैशाची आणि समान्तर अर्थव्यवस्थेची ही अपूर्व वाढ प्रामुख्याने दोन कारणांमुळे घडून आलेली आहे. एकतर सेवाक्षेत्राचा हिस्सा वाढत आहे. दुसरे कारण म्हणजे वित्तीय क्षेत्राची वृद्धी. कुमार यांच्या लेखात मांडण्यात आलेला युक्तिवाद थोडक्यात असा-प्राप्तीच्या बाबतीत न्यून बीजके (Under invoiced revenue) आणि परिव्ययाच्या (खर्चाच्या)बाबतीत अत्युक्तीकरणे(खर्च फुगवून सांगणे) या दोन कारणांमुळे काळ्या पैशाची निर्मिती होते. हे दोन्ही कारक/घटक सारखेच महत्त्वाचे ठरतात. कुमार यानी केलेल्या हिशेबानुसार कायदेशीर क्षेत्रांकडून केली जाणारी रोजगार-अत्युक्ती एकूण श्रमदलाच्या सुमारे 4% आहे. बेकायदेशीर क्षेत्रातील एकूण रोजगार श्रमदलाच्या 1% आहे. अशा रीतीने एकूण रोजगार अत्युक्ती 5% भरते. याचा ध्वन्यर्थ असा की प्रत्यक्षात बेरोजगार व न्यूनरोजगार 5% जादा आहे. यात बालकामगारांचा विचार केलेला नाही. बालकामगार पद्धती बेकायदेशीर आहे. या घटकाचा विचार केल्यास बेरोजगारी आणि न्यून रोजगार

आणखी 5% अधिक राहील.

आनुषंगीक (फ्रिंज) लाभ कर आकारणी निगम क्षेत्रातील काळ्यापैशाची वाढ नियंत्रित करू शकते. वैयक्तिक खर्च हे कंपनीचे खर्च म्हणून खोटा जाहिरनामा देण्याचे प्रमाण त्या कर आकारणीमुळे कमी होऊ शकते. तसेच व्यवस्थापन खर्चाविषयीचे खोटे निवेदन (विवरणपत्र) त्या कर आकारणीमुळे नियंत्रित होऊ शकते. अशा रीतिने निगम क्षेत्रातील काळ्या पैशाच्या निर्मितीवर मर्यादा येऊ शकते. स्थूल नफा करासारख्या अन्य करआकारणीने काळ्या पैशाची निर्मिती आणखी परिणामकारक रीतीने कमी केली जाणे शक्य असते.

बँक व्यवसाय व्यवहारकर, वर्धितमूल्यकर, सेवाकर इत्यादी कर आकारणीचा समान्तर अर्थव्यवस्थेची वाढ रोखण्याशी संबंध जोडता येणार नाही. वाढत्या समान्तर अर्थव्यवस्थेला अटकाव करण्यासाठी अन्य काही उपाययोजना करता येणे शक्य आहे.

भ्रष्टाचार ही एक सांस्कृतिक घटना मानली जात असली तरी त्याचे कोणत्याही प्रकारे समर्थन होऊ शकत नाही. देशात उदारीकरणाचे पर्व सुरू झाल्यामुळे भ्रष्टाचाराची व्याप्ती काहीशी कमी झालेली असली तरी या रोगाची पाळेमुळे सर्वत्र पसरलेली आहेत. एकंदरीत भ्रष्टाचाराचा प्रश्न हे एक मोठे आव्हान ठरते. देशातील भ्रष्टाचाराच्या व्याप्तीबद्दल मतभेद असू शकतील, पण भ्रष्टाचारामुळे अनेक दृष्टींनी अनिष्ट परिणाम घडून येत असतात, यात शंकाच नाही. भ्रष्टाचाराचे हानीकारक सामाजिक परिणाम कार्यक्षमतेतील तथाकथित वाढीच्या मानाने कितीतरी पटीनी अधिक आहेत.

भ्रष्टाचाराचे उच्चाटन करण्यासाठी केवळ केंद्र आणि राज्य पातळ्यांवरच नव्हे तर खाली पंचायत पातळीवर देखील सर्व व्यवहारांच्या बाबतीत पारदर्शिकता हवी. या संदर्भात सर्व पातळ्यांवरील माहिती-अधिकारामुळे' आर्थिक आणि राजकीय जीवनात बऱ्याच प्रमाणात स्पष्टीकरण योग्यतेला (जबाबदारीला) वाव मिळणे शक्य होईल. राष्ट्रीय ग्रामीण रोहयो-अंतर्गत प्रकल्प मोठ्या संख्येने पंचायत पातळीवर देखील कार्यवाहीत आणले जात असतात. योजना राबविल्या जात असतात. म्हणून पारदर्शिकता आणि जबाबदारी ही तत्त्वे केंद्राला, राज्यांना तसेच पंचायतीना लागू केली पाहिजेत. रोहयोच्या विविध अंगांविषयीची माहिती लोकांना अवलोकनार्थ , निरीक्षणार्थ, उपलब्ध करून दिली पाहिजे. तसे झाल्यास त्या संबंधीच्या मुद्यांबाबत स्पष्टीकरण योग्यता सातत्याने राखली जाणे शक्य होईल. अशी स्पष्टीकरण योग्यता (जबाबदारी) म्हणजे नंतरच्या कालावधीतील प्रकल्पांकरिता रकमा मान्य केल्या जाण्यासाठी/मंजूर केल्या जाण्यासाठी पूर्वावश्यक अट म्हणून निश्चित करता येईल.

भ्रष्टाचार संपवावयाचा असेल तर त्याच्या मुळावर घाव घालावयास हवा. लोकशाही देशात निवडणुकीतील गैरव्यवहारातून भ्रष्टाचार निर्माण होतो आणि तो सर्वत्र बोकाळतो. भ्रष्टाचाराचे मूळ अप्रामाणिक व अप्रकट व्यवहारात सापडते. अशा व्यवहारांमुळेच तो फैलावतो. निरनिराळे राजकीय पक्ष निवडणुकीसाठी मोहीम निधि उभा करतात. पण त्यासाठी मागील दाराने व्यवहार केले जातात, तडजोड स्वीकारली जाते. अशा प्रकारे अनिष्ट व्यवहार रोखण्यासाठी निवडणूक-मोहिमेकरिता वित्तपुरवठा करणारी यंत्रणा निर्माण करावयास हवी. या सुधारणा अत्यंत निकडीच्या ठरतात. अर्थात लोकशाही पद्धतीत सत्ता-समतोल(ताबा आणि प्रतितोल) शक्ती कार्यरत असतात. तरीही असे आढळून येते की, आदर्श व भक्कम राज्यघटनेच्या

पायावर आधारित लोकशाही काही वेळा आपले कार्य अपेक्षेप्रमाणे नीट करू शकत नाही. याचे कारण असे की खुद्द ताबा आणि प्रतितोल किंवा सत्ता समतोलाच्या शक्तीच भ्रष्टाचाराने पोखरलेल्या असतात. अशा शक्यता किंवा संभाव्य घटना बाजूला ठेवल्या तर सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की पूरक स्वरूपाच्या 'राजकीय मोहीम (निवडणूक-मोहीम) वित्तपुरवठा' पद्धतीचा, अवलंब निदान प्रायोगिक तत्त्वावर शासनाला करता येणे शक्य आहे. अशा अभिनव पद्धतीच्या बाबतीत काही प्रश्न उरणे संभवते. पण त्या समस्यांची सोडवणूक करता येईल. अशा योजनांकरिता शासनाला जो काही खर्च करावा लागेल तो सर्व खर्च चैनीच्या वस्तुंवर अतिरिक्त करआकारणी करून भरून काढता येतो.

सामान्य माणसाला असे वाटणे शक्य आहे की भ्रष्टाचाराची विषवल्ली नष्ट करण्यासाठी एखादी साधी उपाययोजना पुरेशी ठरू शकते. कित्येक लोक असा युक्तिवाद करतात की, भ्रष्टाचाराला मूठमाती देण्यासाठी प्रचलीत कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी केली जावी. यातून असे ध्वनित होते की कायद्याची अंमलबजावणी नीटपणे केली जात नसल्यानेच लोक भ्रष्टाचाराला उद्युक्त होतात. तथापि रेमॉंड फिसमन आणि एडवर्ड मायगेल यानी केलेले निरिक्षण खरे असले तरी धक्कादायक आहे, असे श्रीनिवास-राघवन[18] यांचे प्रतिपादन आहे. त्यांच्या मते "कायद्याच्या अंमलबजावणी व्यतिरिक्त घटक, एकत्रित रीतीने भ्रष्टाचारास कारणीभूत ठरतात भ्रष्टाचाराचे सर्वमान्य प्रमाण समाजात भिनलेले असते." यातून त्याना असे सुचवावयाचे आहे की भ्रष्टाचार हा समाजाच्या विकासाशी (संस्कृतीशी) निगडित असणारा एक घटक होय. समाजाचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण गुण (आशय) ठरतो. भारत हा देश त्याला अपवाद नाही.

जगातील सर्व देशात भ्रष्टाचार आढळतो. पण भारतासारख्या विकसनशील देशात त्याचे प्रमाण बरेच अधिक आहे. अर्थव्यवस्थेच्या मुळाशी असणाऱ्या अनेक समस्यांचे ते लक्ष्य होय. थोडक्यात, भ्रष्टाचाराचे निर्मूलन करू इच्छिणाऱ्या देशाने कर आणि जकाती संबंधीच्या संरचनात्मक सुधारणा हाती घ्याव्यात. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांची कार्ययंत्रणा पारदर्शी राहील, अशी व्यवस्था केली जावी; त्यांच्या व्यवहारांची स्पष्टीकरण योग्यता उंचावणे जरूरीचे ठरते. तितकाच महत्त्वाचा उपाय म्हणजे कायद्यांची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे आणि परिणामकारक रीतीने करण्याबरोबरच नागरी सेवा-सुधारणा कार्यक्रम हाती घेतला जावा.

### VI भारतातील श्रमबाजार

आर्थिक सुधारणांच्या पंधरा वर्षांच्या काळात विनियमित बाजारपेठा यशस्वी ठरल्या आहेत. वस्तुबाजार आणि उत्पादक घटक बाजारांमुळे ग्राहकाना उल्लेखनीय लाभ मिळालेले आहेत. उदारीकरणाच्या धोरणामुळे निदान अशा बाजारातील तेढ कमी झाली. स्पर्धात्मक बाजार यंत्रणेकडे संक्रमित होण्याच्या प्रक्रियेमुळे निरनिराळ्या प्रकारच्या व्यवहारांना उत्तेजन मिळाल्याने स्थूल देशान्तर्गत उत्पादनवाढीचा लक्षणीय दर गाठणे देशाला शक्य झाले, तथापि देशातील श्रमबाजार मात्र याला अपवाद ठरला. संक्रमण-प्रक्रियेत श्रमबाजाराचे अभिवर्धन होऊ शकले नाही. त्या बाजाराचे स्वरूप योग्य रीतीने बदलावे म्हणून आवश्यक तेवढा रेटा संक्रमण प्रक्रिया देऊ शकली नाही. वस्तु बाजार आणि उत्पादनघटक बाजार यांच्या बाबतीत जे (तर्कशास्त्र) लागू पडते ते श्रमबाजाराच्या बाबतीत लागू पडू शकले नाही. मोठी अडचणीची परिस्थिती ! त्यामुळे प्रत्यक्षात

मागणीकार आणि पुरवठाकार दोन्ही प्रकारच्या गटांतील अभिकर्ते असंतुष्ट.

उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रस्तुत पर्वात वस्तुबाजार आणि वित्तीय बाजार अनेक प्रकारे बदलले; पण श्रमबाजार विशेष बदलला नाही. या बाजाराचे दोन भागात विभाजन झालेले आहे. विनियमन कक्षेबाहेरील आस्थापना (उद्योग व्यवसाय संस्था) असंघटित क्षेत्रात मोडतात; अशा आस्थापनाची संख्या बरीच मोठी आहे. याउलट, ज्या आस्थापनांचे कडकपणे विनियमन केले जाते अशा आस्थापना संघटित क्षेत्रात समाविष्ट असतात. परिणामत: संघटित क्षेत्रातील ज्या कामगारांच्या 'संघटना' स्थापन झालेल्या आहेत अशा कामगारसंघ सदस्याना बेकारीची सुरक्षितता बऱ्याच प्रमाणात लाभते; बराच काळपर्यंत उपभोगता येते. याउलट असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्याना ती मिळत नाही.

देशातील श्रमबाजाराच्या बाबतीत स्पर्धाक्षमता अभावाने आढळते. या बाजारात मुक्त प्रवेश आणि मुक्त निर्गमन नाही. अधिक नेमकेपणाने सांगावयाचे तर श्रमबाजाराच्या बाबतीत एक प्रकारची असममिति जाणवते ती या अर्थाने की निर्गमन करण्याची, बाहेर पडण्याची मुभा कामगाराला मिळते. कामगाराला निर्गमन-स्वातंत्र्य आहे. पण मालकाला मात्र ते मिळालेले नाही. अशा वैशिष्ट्यांमुळे बाजारयंत्रणेत बिघाड होतो. खाजगी क्षेत्रावर आणखी निर्बंध घातल्यास त्या क्षेत्रातील आस्थापना (कंपन्या/उत्पादनसंस्था) बंद पडण्याची भीती राहाते. खाजगी क्षेत्रातील नोकर भरतीच्याबाबतीत निर्बंध लादण्याच्या धोरणामुळे भलताच परिणाम घडून येणे संभवते; असा अनिष्ट परिणाम देशाला परवडणारा नाही.

### 1. निकटवर्ती बेरोजगार-प्रस्फोट

देशातील बेरोजगाराचा प्रश्न आणखी चिघळण्याची लक्षणे दिसत असून असा संभाव्य बेरोजगार-विस्फोट निश्चितप्राय गंभीर परिस्थितीबद्दल विचार करावयास लावणारा ठरतो. त्या बिकट परिस्थितीतुन बाहेर पडण्यासाठी तातडीने कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील याचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

भारताचा स्थूल देशान्तर्गत उत्पादनवाढीचा वेग समाधानकारक आहे. तथापि, रोजगार-लवचिकता अत्यल्प म्हणजे 0.15 इतकी आहे. वाढीव (सीमान्त) भांडवल प्रदान गुणोत्तर 3.75 इतके असताना प्रतिवर्षी 80 लक्ष नोकऱ्या (रोजगार संधी) निर्माण करण्यासाठी स्थूल देशान्तर्गत उत्पादन वृद्धिदर सुमारे 14% असावयास हवा; हा वृद्धिदर आत्ताच गाठणे तसे अशक्य प्राय दिसते.

ग्रामीण भागाचे चित्र गंभीर स्वरूपाचे आहे. शेती व्यवसायाची रोजगार-लवचिकता उणे (-) असून या व्यवसायातील श्रमसंख्या कमी केली तरच उत्पादन वाढविता येणे शक्य आहे. या क्षेत्रातील व्यापक न्यून रोजगारामुळे देशातील तरूणाना हवी असलेली रोजगाराची संधी उपलब्ध होणे कठिण आहे. सन 1991 पूर्वीच्या काळात बेकार लोकाना सार्वजनिक क्षेत्र- त्या क्षेत्रातील रोजगारनिर्मितीमुळे- नवचैतन्य देणारी गोष्ट ठरली. तथापि आताच्या काळात सार्वजनिक क्षेत्राकडून जादा रोजगारनिर्मितीची अपेक्षा करता येत नाही. याची कारणे उघड आहेत. खाजगी क्षेत्रातील कारखानदारी व्यवसाय तर कार्यक्षमता अधिकाधिक उंचावण्यासाठी भांडवल सघनता वाढविण्याच्या मागे लागला असून त्या क्षेत्राचा कामगार कपातीवर भर आहे.

वस्तुत: व्यावसायिकांच्या आणि उद्योजकांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्यामुळे श्रम-खर्च (परिव्यय) वाढण्याकडे कल राहातो.

व्यवसायाची पीछेहाट तात्पुरत्या स्वरूपाची असली तरी तशा प्रकारच्या अडचणींच्या परिस्थितीत तग धरून राहाणे मालकाना कठीण जाते. अशा परिस्थितीत तर मालक वर्गावरील बंधने अधिकच चिंताजनक ठरतात.

कर्मचाऱ्यांच्या लाभासाठी नोकरीच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने संघटित क्षेत्रावर काही निर्बंध लादले जातात. आर्थिक सुधारणा सुरू झाल्यानंतरचा अनुभव असे दर्शवितो की, पहिल्या सुमारे आठ वर्षांच्या काळात खाजगी क्षेत्राची वाटचाल लक्षणीय होती. सन 1998 मध्ये त्या क्षेत्रातील श्रमसंख्या विक्रमी राहिली. पण नंतर मात्र वाढत्या रोजगाराची प्रवृत्ती पालटली. प्रत्यक्षात रोजगार निर्मिती घसरली. आणखी असे की सुधारणोत्तर काळात रोजगारात जी काही वाढ घडून आली ती प्रामुख्याने सेवाक्षेत्राच्या विस्तारामुळे घडून आली. त्या क्षेत्रात नोकरी-सुरक्षितता कमी. सरकारी नोकऱ्यांबद्दल किंवा सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार-संधीबद्दल काय म्हणता येईल ? तेथे नोकरकपातीच्या धोरणामुळे रोजगारसंधी घटल्या.

**2. अपेक्षाभंग**

स्थूल देशान्तर्गत उत्पादनातील वाढत्या वृद्धिदरात प्रतिबिंबित होणारे सुधारणांचे आर्थिक परिणाम प्रशंसनीय खरे; पण रोजगार निर्मितीच्या स्वरूपातील सामाजिक परिणाम मात्र असमाधानकारक आणि उबग आणणारे ठरले. पूर्ण रोजगार आणि सुयोग्य स्वरूपाचे काम या गोष्टी बाजारयंत्रणेमुळे निश्चितपणे लाभतील, असे काहीच म्हणता येत नाही; उलट रोजगाराच्या बाबतीत हे परिणाम केवळ आपाती (आनुषंगिक) स्वरूपाचे होऊ लागले आहेत. देशाचे व्यापक हित दृष्टिसमोर ठेवावयाचे तर सद्य:स्थितीत आर्थिक आणि सामाजिक परिणामांच्या बाबतीत समतोल कसा साधता येईल, हे पाहाणे गरजेचे ठरते. खरे तर आर्थिक परिणाम आणि सामाजिक परिणाम दोन्ही सारखेच महत्त्वाचे आहेत. प्रत्यक्षात मात्र आपण या आदर्शापासून दूर जात असल्याचे जाणवते.

गेल्या दहा वर्षांच्या काळात एकूण उत्पादनाचा वृद्धिदर वेधक राहिला असला तरी त्याचबरोबर ग्रामीण आणि शहरी भागातील बेरोजगारीतील वाढीचे दर स्त्रियांच्या आणि पुरूषांच्या बाबतीत वाढले, हे लक्षात घ्यावयास हवे. मागे म्हटल्याप्रमाणे सन 1993-94 ते 2004 या काळात (चालू दैनिक स्थितीनुसार) ग्रामीण भागात बेरोजगारदर पुरूषांच्या बाबतीत 5.6% वरून 9% पर्यंत आणि स्त्रियांच्या बाबतीत 5.6% वरून 9.3% पर्यंत वाढला; तर शहरी भागात पुरूषांच्या बाबतीत 6.7% वरून 8.1% पर्यंत आणि स्त्रियांच्या बाबतीत 10.5% वरून 11.7% पर्यंत वाढला. खुल्या बेरोजगाराचा हा अभूतपूर्व दर नियोजन आयोगाने चालू योजना काळात अवलंबिलेल्या ठिबक दृष्टिकोणाच्या ध्वन्यर्थाशी विसंगत आहे.

उपलब्ध पुराव्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की आर्थिक वृद्धि आणि विकासाबाबतच्या 'वरून खाली' विरूद्ध 'खालून वर' या वादात अनुस्यूत असलेल्या दोन्ही बाजुंचे युक्तिवाद लक्षात घेता आपण या निष्कर्षाप्रत पोहोचतो की लाभ वरून खाली झिरपत जाणे योग्य नव्हे. तसेच विकासप्रक्रिया तळागाळात सुरू होऊन ती अधिकाधिक वरच्या थरा पर्यंत लाभ पसरविणारी असावी हे ही रास्त ठरत नाही. खरे तर लाभ खालच्या पातळीवर निर्माण होऊन तो वरच्या स्तरातील लोकांपर्यंत पोहोचविला जावा, हे इष्ट नव्हे. तसेच विकास उच्च पातळीवर घडून येऊन त्या विकासाचा लाभ खालच्या पातळीपर्यंत झिरपत जावा, हेही नको. प्रत्यक्षात, विकासप्रक्रियेत सर्व लोकांचा सक्रिय सहभाग

असावा आणि त्यातून उद्भवणारे लाभ सर्व लोकांना त्यांचा न्याय्य अधिकार, हक्क म्हणून मिळावयास हवा.

उत्पादनातील वाढीबरोबर मोठ्या प्रमाणा वर रोजगार निर्मिती होत राहील आणि अशा रीतीने वाढत्या श्रमदलाला आवश्यक तो रोजगार उपलब्ध होईल, ही अपेक्षा पूर्ण झालेली नाही. अपेक्षाभंग करणाऱ्या या अनुभवातून बरेच शिकण्यासारखे आहे. ज्या आर्थिक वृद्धीमुळे रोजगारात फारशी वाढ होत नाही, ती वृद्धी इष्ट मानता येत नाही. तसेच आर्थिक वृद्धीकडे लक्ष न देता केवळ रोजगाराच्या संधी महत्त्वाच्या मानून वृद्धिरहित रोजगार देखील उद्दिष्ट असता कामा नये. दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम अर्थसाहाय्यातील वाढीवर आधारित असता कामा नये; कारण अशा प्रकारच्या धोरणामुळे रोजगार वाढेल पण त्यातून उत्पादनवाढ मात्र होत नसते. वस्तुत: रोजगार आणि वृद्धि यांच्यातील व्यस्त आणि काहीसा विपर्यस्त (विकृत) संबंध बदलता येणे शक्य आहे. पण त्यासाठी आवश्यक गोष्ट म्हणजे देशातील विपुल श्रमशक्ति जास्तीतजास्त प्रमाणात वापरात आणली जाण्यासाठी, प्रभावी प्रेरणा, प्रोत्साहन उपलब्ध करून देणारी यंत्रणा असायला हवी.

रोजगारवृद्धीसाठी अन्य गोष्टींबरोबर देशातील कामगार-कायद्यांची पूर्ण चिकित्सा करून त्यात अनेक बाबतीत दुरुस्त्या करणे निकडीचे आहे. कामगारकायदे शिथिल करून श्रमिकांची गतिक्षमता वाढू शकेल. यात अभिप्रेत असलेली शिथिलता समजूतदारपणे लक्षात घेतली तर त्यातून बरेच काही साध्य होईल. इंग्लंड, अमेरिका यासारख्या देशांत कामगार विषयक बाबींमध्ये लवचिकता हे वैशिष्ट्य ठळकपणे दिसून येते. अशा लवचिकतेमुळे त्या देशातील बेरोजगाराचा दर युरोपातील अनेक देशातील बेरोजगारदराच्या मानाने कमी आहे. याचे एक मुख्य कारण असे की युरोपात कायदेविषयक आणि संस्थात्मक संरचना अशा प्रकारच्या आहेत की त्यामुळे समायोजन घडून येणे अत्यंत अडचणीचे ठरते आणि परिणामत: युरोपातील अनेक देश जागतिक क्षेत्रात स्पर्धाशीलतेच्या बाबतीत कमी पडतात. त्या अर्थव्यवस्थांचे स्पर्धासामर्थ्य अशारीतीने कमी असल्याने त्या देशात बेरोजगाराचे प्रमाण सापेक्षतेने अधिक आढळते.

सन 1991 पूर्वी भारतातील उद्योगाना अनेक प्रकारे संरक्षण लाभले होते. ती गोष्ट आता इतिहासजमा झाली आहे. जागतिक स्तरावरील स्पर्धा आणि तंत्रविज्ञानाच्या क्षेत्रात अचानकपणे घडून येणारे बदल किंवा तंत्रवैज्ञानिक अनिश्चितता या वैशिष्ट्यांमुळे भारतातील उद्योगाना जगातील नव्या, बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे या देशातील व्यावसायिकाना, संयोजकाना सतर्क आणि सजग राहून आपली कार्यदक्षता स्पर्धाक्षम कशी राहील हे पाहावे लागते. वस्तुबाजार, वित्तबाजार इत्यादीतील अचानक बदलाना आणि खर्च, किमती, व्याजदर इत्यादीतील परिणामरूप चढउताराना तत्काळ प्रतिसाद देणे त्याना भाग पडते. चलनांचे विनिमयदर अनेकविध कारणांमुळे बदलू शकतात. ते बदल विचारात घेऊन संयोजकाना आपल्या धोरणात अनुरूप बदल करावे लागतात. आकस्मिकपणे उद्भवणाऱ्या परिस्थितीला खंबीरपणे तोंड देऊन कंपन्याना त्यातून खुबीने मार्ग काढावा लागतो. त्यासाठी गरज असते ती उत्साही तत्परता, समायोजनाची सिद्धता आणि धोरणात्मक लवचिकता वगैरेंची, कामगार कायद्यात आवश्यक त्या सुधारणा, दुरूस्त्या करून यासंदर्भात लवचिकता सुनिश्चित केली गेल्यास देशातील निगम क्षेत्राला प्राप्त परिस्थितीत जागतिक बाजारात आपले स्थान टिकवून ठेवता येणे शक्य होईल.

खाउजा धोरणामुळे संरचनात्मक आणि तंत्रवैज्ञानिकबदल घडून येत आहेत, येत राहतील. परिणामत: देशातील उद्योगांचा जुना ढाचा बदलला असून नवा आकृतिबंध साकारत आहे. अशा निर्माणक नाशनात (सर्जनशील संहारात) जुन्या रोजगार संधी नाहीशा होऊन नवनिर्मितीत नव्या संधी उपलब्ध होत असतात. अशा परिस्थितीत जुने मार्ग सोडून देऊन, रोजगाराच्या जुन्या क्षेत्रातून बाहेर पडून नव्या रोजगार संधींचे स्वागत करणे क्रमप्राप्त ठरते. लोकाना असे बदल आत्मसात करावे लागतात. अर्थात नव्या स्वरूपाच्या रोजंदारीसाठी श्रमिकांनी प्रशिक्षण घेणे जरूरीचे असते. त्यानी नवी कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. कामगारवर्गात अशी लवचिकता, परिवर्तनक्षमता असेल तर बेरोजगाराचे गांभीर्य कमी होऊ शकते. म्हणून नव्या परिस्थितीच्या संदर्भात कामगारक्षेत्र विषयक सुधारणाना अग्रक्रम देणे गरजेचे ठरते. कालबाह्य झालेले कामगार कायदे बदलणे गरजेचे असल्याने उद्योजक आग्रहपूर्वक सांगत आले आहेत. खुद्द पंतप्रधानानी आणि अन्य श्रेष्ठानी देखील याचा वारंवार उच्चार केला आहे. असे असताना कामगार कायद्यांचे शिथिलीकरण करण्याच्या प्रयत्नात राजकीय सबबी पुढे करून खीळ घातली जाऊ नये.

### 3. कामगार सुधारणा

एक उदाहरण म्हणून येथे सुती कापड उद्योगाचा उल्लेख करता येईल. कामगार सुधारणांची दिशा कशी असावी, याबाबत पहिले पाऊल कसे टाकावे याविषयी मार्गदर्शन सुती कापड उद्योगाकडून होऊ शकते. कामगार सुधारणा करताना रोजगार कसा टिकून राहील हे पाहावे लागते. तसेच वेळ पडल्यास कंत्राटी-कामगार पद्धतीचा अवलंब करूनही उद्योगासाठी आवश्यक असलेली मनुष्यबळ लवचिकता कशी प्राप्त करून घेता येईल याकडे देखील लक्ष ठेवावे लागते.

जागतिक कोटा पद्धती रद्द केली गेल्यामुळे सुती कापड उद्योगाला जागतिक स्पर्धाक्षमता आणणे आवश्यक झाले आहे. हे आव्हान पेलण्याचे सामर्थ्य प्रस्तुत उद्योगाचे ठायी निर्माण होणे गरजेचे ठरते. जरूर ते कामगार कायदे करून सुती कापड उद्योगातील उत्पादनसंस्थाना (गिरण्याना) आवश्यक ती लवचिकता प्राप्त होऊ शकली तर, जगाच्या सुदूर ठिकाणांहून येणाऱ्या मागणीतील चढउतार सहन करून त्याही परिस्थितीत टिकून राहाणे, प्रस्तुत उद्योगाला शक्य आहे. चीन हा भारताचा जबरदस्त स्पर्धक . चीनने त्यांच्या कामगार कायद्यात सुधारणा केल्या, त्यायोगे कामगारांची गतिक्षमता वाढली. एका जागेवरून काढून दुसऱ्या ठिकाणी कामावर रूजू करून घेतल्या गेलेल्या श्रमिकांना अधिक मजुरी मिळणे शक्य झाले आणि त्याशिवाय त्याना स्वयंरोजगाराची संधी देखील मिळवून देण्यात आली.

व्यक्तीचे सेवायोजन केले जाणे (व्यक्तीला नोकरीसाठी घेतले जाणे) म्हणजे मालक आणि कर्मचारी यांच्यातील एक करार होय. कंत्राटी कामगार पद्धती सुरू केल्यास मालकाने कामगारांवर प्रत्यक्ष देखरेख आणि नियंत्रण ठेवण्याची गरज राहात नाही. या अर्थाने त्या पद्धतीमुळे मालकावरील भार अंशत: कमी होतो. अशा रीतीने मालकाचे काम कमी झाल्याने त्याला त्याचे लक्ष त्याच्या मुख्य कामावर केंद्रित करता येते आणखी असे की, कंत्राटी कामगार पद्धती अवलंबिल्यास औद्योगिक संबंधाविषयक समस्या कमी होतात. एकंदरीत पूर्वनिश्चित अटींप्रमाणे काम पूर्ण केले जाण्यास मदत होते. ग्राहकाने दिलेल्या खुलासेवार सूचनांप्रमाणे कोणते काम कसे करावयाचे याबद्दलच्या स्पष्ट आदेशांबरहुकूम कामाची पूर्तता होते. नेहमीच्या कारखानदारी कामांपैकी काही कामे आणि अन्य प्रकारची कामे देखील गुणवत्तेच्या

(दर्जाच्या) मुद्याबाबत कोणतीही तडजोड न स्वीकारता कंत्राटी कामगारांकडे सोपविता येणे शक्य असते. चीनशी यशस्वीरीतीने स्पर्धा करणे हे भारताचे उद्दिष्ट असेल तर कंत्राटी कामगार पद्धती देखील अवलंबून उत्पादनखर्च (परिव्यय) बऱ्याच प्रमाणात कमी करणे भारताला गरजेचे आहे. विशेषत: विस्तारी तृतीयक्षेत्रात (सेवाक्षेत्रात) कंत्राटी कामगारांचे सेवायोजन करण्यास खूपच वाव आहे.

हे सर्व लक्षात घेता कंत्राटी कामगार पद्धतीची शिफारस ओघानेच येते. ही शिफारस तत्परेतेने केली जात असताना एक इशारा येथे द्यावयास हवा तो असा की कंत्राटी कामगार पद्धती याचा अर्थ, लवचिकतेच्या (परिवर्तनीयतेच्या) नावाखाली कामगारांचे उघड उघड शोषण करण्याची व्यवस्था असा केला जाऊ नये. लवचिकतेचा विपरित अर्थ लावला गेला तर अत्यल्प कुशल कामगारांच्या वास्तव मजुरीवर अत्यंत प्रतिकूल परिणाम घडून येऊ शकतात आणि त्यामुळे मजुरी दरातील विषमतेची दरी रूंदावणे, विषमता अधिक तीव्र होणे संभवते. लवचिकता आणणे म्हणजे शोषणाचा परवाना असे म्हणणे चुकीचे ठरते. लवचिकतेच्या सबबीवर अल्पकुशल कामगारांच्या वास्तव मजुरीत कपात होता कामा नये. कोणत्याही परिस्थितीत मजुरीतील विषमतेची व्याप्ती आणि तीव्रता निदान वाढता काम नये.

कंत्राटी कामगार म्हणजे वेठबिगार (बंधपत्रित कामगार) असे मानता कामा नये. कंत्राटी कामगार पद्धती म्हणजे कामगारांच्या बिनदिक्कत शोषणाची पद्धती असा अर्थ होऊच शकत नाही. वस्तुत: सन 1970 च्या कंत्राटी कामगार कायद्यान्वये श्रमिकांच्या शोषणाला आधीच प्रतिबंध करण्यात आला हे ठीक. इच्छेला येईल तसे कामाला लावणे आणि कामावरून दूर करणे येथे अभिप्रेत नाही. कामगार क्षेत्राच्या दृष्टीने सुधारणांचा एक भाग म्हणून लवचिकतेची शिफारस म्हणजे अर्थाचा अनर्थ करून पाशवी वृत्तीचे साम्राज्य आणण्याचा प्रयत्न नव्हेच नव्हे.

अलिकडे सेवा क्षेत्राचा विकास जलद गतीने होत आहे; यापुढेही होत राहील. बांधकाम, वाहतूक, रस्तेबांधणी, स्वच्छता आणि आरोग्य, देखभाल सेवा इत्यादी अनेकविध सेवा व्यवसाय क्षेत्रांची रोजगार-निर्मितीक्षमता भरपूर आहे. अशा प्रकारच्या अनेक सेवा कंत्राटी पद्धतीद्वारा ग्राहकाना अधिक कार्यक्षमतेने देता येणे शक्य आहे. तसेच शासकीय क्षेत्रातील काही कामांचे व्यवस्थापन कंत्राटी पद्धतीने केले जाणे शक्य आहे. त्यायोगे शासनावरील कामाचा ताण बऱ्याच अंशी कमी होऊ शकेल. खाजगी क्षेत्रात कारखानदारी व्यवसायात देखील काही कामे प्रक्रिया अशा असतात की ज्यांचा कारखान्यांच्या मुख्य कामाशी तसा थेट संबंध नसतो. अशा कामांचे, सेवांचे स्वरूप लक्षात घेता ती कामे कंत्राटी पद्धतीने करवून घेतली जावीत.

श्रमिकां (कर्मकारां) च्या बाबतीत असे आढळते की त्यांचे काम नियमित स्वरूपाचे असते; त्यांची नोकरी वयाच्या साठाव्या वर्षापर्यंत असते; त्यांच्या त्या नोकरीत वाढत्या वयाबरोबर वाढते वेतन (समयश्रेणीवेतन) असते. पण त्या हमीमुळे प्रत्यक्षात अकार्यक्षमता वाढीस लागते. अशा प्रकारच्या नोकऱ्यांच्या बाबतीत एकूण रोजगारात परिणामरूप वाढ दिसत नाही. संघटित क्षेत्रातील नोकरीच्या अटी किंवा नोकरी विषयक तरतुदी नवी पदे निर्माण करण्याच्या बाबतीत किंवा असा रोजगार वाढण्याच्या बाबतील अडचणीच्या ठरतात. वस्तुत: अशा ताठरतेमुळे गेल्या दशकात त्या क्षेत्रातील रोजगारनिर्मितीचा दर वाढू शकला नाही. अशा परिस्थितीशी तुलना करता कंत्राटी कामगारांच्या संख्येत बरीच वाढ घडून आलेली दिसते. एकंदरीत

विचार करता लवचिक स्वरूपाची कामगार-पद्धती कामगारांच्या वाढत्या गतिक्षमतेला अनुकूल ठरते आणि ही पर्यायी पद्धती अधिक लाभदायक असल्याने संरक्षित, पण घटती रोजंदारी सूचित करणाऱ्या उपरोक्त पद्धतीपेक्षा अधिक सरस ठरत असल्याने अधिक पसंत केली जाणे जादा रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने खचितच स्वागतार्ह ठरते.

**4. मनाची मूस**

उपरोक्त प्रश्नाची उकल करण्यासाठी लोकांचे मन बदलणे गरजेचे ठरते. सुती कापड उद्योग आणि तयार कपड्यांच्या उद्योगाच्या बाबतीत आढळते त्याप्रमाणे उदारीकरण आणि खुल्या व्यापाराच्या धोरणाचा लाभ उठवावयाचा असेल तर या देशातील लोकानी आपल्या मनाची चौकट बदलायला हवी. निर्बंधात्मक नियम आणि विनियमनाच्या संकुचित कल्पनाविषयींचा तीव्रमनोगंड बदलणे आवश्यक आहे. उदारीकरणाच्या धोरणाची अंमलबजावणी सुरू असताना हित संबंधांच्याबाबतीत काही तेढ संभवत असेल तर प्रत्यक्ष भेटीच्या, चर्चेच्या मार्गाने संभाव्य संघर्षाचे रूपांतर सलोख्याच्या संबंधांमध्ये करता येणे शक्य आहे.

उदारीकरणाचा अवलंब केला असताना त्याचा परिणाम म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत काही बदल घडून येणे अनिवार्य ठरते. सन 1991 मध्ये जे धोरणात्मक बदल केले गेले त्याचे लाभ या अर्थव्यवस्थेला मिळत आहेत; पण जगात काहीही फुकट मिळत नसते. लाभांबरोबर काही खर्च-बदलांबरोबर येणाऱ्या काही गैरसायी, बदललेल्या व्यवस्थेत काही बाबतीत करावा लागणारा त्याग असतोच. हे लक्षात घेऊन या देशातील कामगारांची मन:स्थिती काहीशी बदलणे जरूरीचे ठरते. नेमकेपणाने सांगावयाचे तर, कामगार कायद्यात काही बदल केल्यास जे एकूण लाभ मिळतील ते लाभ तोट्यांपेक्षा निश्चितच अधिक असतील; असे बदल तर लाभदायक असतीलच, एवढेच नव्हे तर बदलणारी परिस्थिती आपल्या मूळ उद्दिष्टांच्या दृष्टीने हितावह ठरेल, ईप्सित व्यवस्थेला पुष्टी देणारी ठरेल, हे कामगारांना पटवून दिले पाहिजे त्यांची खात्री पटविली पाहिजे.

भारतातील अपरिवर्तनीय (ताठर) स्वरूपाच्या श्रमबाजाराला उदारमतवादी झळाळी देण्याचे काम कामगार सुधारणा करीत आहेत. बाजारात उदारमवादी चैतन्य निर्माण करणाऱ्या सुधारणांशी जुळणारे मतैक्य कसे निर्माण करता येईल, ही सध्याची चिंता होय. आर्थिक सुधारणांच्या बाबतीत या देशाचा, गेल्या सुमारे पंधरा वर्षांचा अनुभव साऱ्या जगाला असे सांगतो की, बदलत्या जगाशी समायोजन घडवून आणण्याची क्षमता या देशातील लोकांच्या अंगी आहे. एक गोष्ट अगदी उघड आहे की (कार्यकारी) आयुष्यभर टिकणारी एखादी नोकरी मिळण्याची कल्पना कोणाही कर्मचाऱ्याला उराशी बाळगण्याजोगी वाटणे स्वाभाविक आहे. महत्त्वाकांक्षेचा अभाव असल्याने कायम नोकरीची कल्पना स्वागतार्ह वाटते. तथापि, काही क्षेत्रे अपवाद म्हणून वगळता सध्याची रोजगार विषयक परिस्थिती चिंताजनक आहे, ती या अर्थाने की सामान्य लोकाना काम उपलब्ध असलेच तर तो रोजगार केवळ अल्पकालीन स्वरूपाचा आहे; अन्यथा उपलब्ध पर्याय म्हणजे बेकारी. सरकारी खात्यानी नोकर कपातीचे धोरण अवलंबिले असताना आयुष्यभर कायम स्वरूपाच्या नोकऱ्या (आजीव नोकऱ्या) आता उपलब्ध नाहीत. निगम क्षेत्रात देखील तशी कामे मिळत नाहीत. कंपन्यांमध्ये मिळणाऱ्या नोकऱ्या सर्व साधारणपणे अल्पकाळासाठी असतात.

कामगार क्षेत्रातील सुधारणांमुळे श्रमिकांना

जितका लाभ मिळणे शक्य आहे त्यापेक्षा जास्त नुकसान त्यांना सहन करावे लागेल ही मनात ठाण मांडून बसलेली (काल्पनिक) गोष्ट कामगाराला जितकी दुर्बळ करणारी, मनाचे सामर्थ्य नष्ट करणारी आहे तितकाच घातक भ्रम म्हणजे देशातील श्रमबाजार आहे त्याच स्थितीत राहू दिला तर कायम नोकऱ्या खात्रीने मिळू शकतील हे स्वप्न होय. नेमका धोका कोणता आहे, श्रमिकांचे हितसंबंध जपण्यासाठी काय करणे गरजेचे आहे याबाबत कामगारांचे प्रबोधन करणे अत्यंत निकडीचे आहे. सद्य:स्थितीत कामगार सुधारणा कशा गरजेच्या आहेत, याची श्रमिकाना खात्री पटवून दिली पाहिजे. त्या सुधारणांमुळे कामगारवर्गाची एकंदरीत गैरसोयच होईल, हा विचार मनातून काढून टाकला पाहिजे. कामगार सुधारणा कशा हितावह आहेत हे कामगारवर्गाला समजवून सांगण्याच्या बाबतीत प्रयत्न केले पाहिजेत.

कामगार क्षेत्रातील प्रस्तावित सुधारणांच्या संदर्भात एक गोष्ट पक्की लक्षात ठेवली पाहिजे की टिकावू स्वरूपाचा रोजगार निर्माण करण्याची गरज जितकी महत्त्वाची तितकीच मनुष्यबळ-लवचिकतेची गरज महत्त्वाची ठरते. रोजगाराच्या हमी विषयीचे नियम कडक स्वरूपाचे असले तर ती गोष्ट मालकाच्या दृष्टीने अडचणीची ठरते. परिणामत: बेरोजगाराचा दर वाढतो असे आढळून येते. उदाहरणार्थ, फ्रान्समधील मोठ्या प्रमाणावरील बेरोजगार दर[17] नियंत्रित करणे कठीण असून सार्वत्रिक बेकारीचा हा दर 10% पर्यंत वाढल्याचे आढळून आले आहे. बेरोजगाराचा असा उच्च दर धोकादायक सामाजिक, राजकीय परिस्थितीचे द्योतक होय. भारतातील कारखानदारी क्षेत्राने उत्पादनवाढीचा उल्लेखनीय दर गाठला असला तरी रोजगार-सुरक्षिततेसंबंधीचे कडक नियम या क्षेत्रावर बंधनकारक असून संघटित कारखानदारी क्षेत्रातील अशा कायदेशीर तरतुदींमुळे रोजगारवृद्धीत भर क्वचितच शक्य झाली. अशा परिस्थितीत नोकर भरतीविषयक नियमांच्या बाबतीत लवचिकता ठेवली जाणे संयुक्तिक ठरेल. माहिती-तंत्रशास्त्रीय उद्योग व्यवसाय प्रक्रिया बाह्य स्रोत (बी.पी.ओ.) या क्षेत्रात श्रमबाजारांच्या बाबतीत लवचिकता आढळते. या क्षेत्राने रोजगारनिर्मितीच्या बाबतीत कारखानदारी क्षेत्राला केव्हाच मागे टाकले आहे. कामगार लवचिकता जितकी अधिक तितका रोजगारवृद्धिदर अधिक असणे संभवते. लवचिकता आणि रोजगार निर्मिती यातील सरळ स्वरूपाचा हा सहसंबंध धोरणकर्त्यांना मार्गदर्शन करणारा आणि कामगारवर्गाचे उद्‌बोधन करणारा ठरतो. दोन फ्रान्सच्या[18] अनुभवातून मिळणारा धडा विसरून चालणार नाही. त्यातून मिळणारा धडा असा की कामगार कायद्यांतील नियोजित बदलांच्या संभाव्य लाभांविषयी कामगारदलाचे प्रबोधन न करता किंवा शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य आत्मसात करण्याविषयीचे तंत्र आणि तदनुषंगिक अन्य बाबी कामगाराना उपलब्ध करून दिल्याखेरीज कामगार सुधारणांचे घोडे पुढे दामटता येणार नाही.

कामगार संबंध क्षेत्रात लवचिकता आणली जावी या शिफारशीच्या समर्थनार्थ एक महत्त्वाचा युक्तिवाद असा की त्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमुळे आर्थिक कार्यक्षमता उंचावण्यातील अडचणी कमी होतील. त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की श्रमिकाना संरक्षण आणि सर्वसाधारण सामाजिक सुरक्षा प्राप्त करून दिल्यास आर्थिक सुधारणाना, अन्यथा होणारा विरोध मावळेल आणि नव्या धोरणाद्वारे घडवून आणले जाणारे नावीन्यपूर्ण बदल आणि कार्यवाहीत आणले जाणारे उपक्रम मनापासून स्वीकारले जातील, त्याना

कामगारवर्गाकडून पाठिंबा मिळेल.


### संदर्भ सूची

10.International Labour Office, Geneva (1999): Report of the Director General of the International Labour Organisation on Decent Work, Submitted to the International Labour Conference at its 87th session, June 1999, International Labour Office, Geneva, Chapter 1. United Nations, New York(2006) : Full and Productive Employment and Decent Work Dialogues at the Economic and Social Council, Page 249

11. Government of India (2006): Economic Survey, 2005-06(page 204)

12. Datta, Kanika (2006): Corruption has a deterrent Business Standard, 28-07-2006.

13. Kumar (2006): Black Economy, Underestimation of Unemployment and Budget 2005-06 Economic and Political Weekly, July 29,2006.

14. Kaldor, N. (1956) Indian Tax Reform, Report of a Survey. Ministry of Finance, Department of Economic Affairs, New Delhi.

15. Kumar, A. (1999) : The Black Economy in India, Penguin India, New Delhi.

16. Srinivasa-Raghavan(2006) "Corruption as a Cultural Phenomenon" Business Standard, 30-06-2006.

17. The Economist (2006) : France face : the future. The Economist April 1, 2006 pages 9 and 10.

18. Ibid p. 22 to 24.

**Further Readings**

1. Bhaduri A. and Marglin S.A. (1990) "Unemployment and the Real Wage" Cambridge Journal of Economics, Dec. 1990.

2. Deaton A. and Dreze J. (2002)'Poverty and Inequality in India : A Reexamination' Economic and Political Weekly, Sep. 2002.

3. A Special Issue of the E.P.W.'Aspects of Employment' (Nov. 27 Dec. 3,2004).

4. Statistical Qutline of India, 2004-2005 Tata Services Ltd.

5. Bhaduri A. (2005) : Development with Dignity National Book Trust, India New Delhi 110016.


♦♦♦

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### अर्थसंवादसाठी अनुदान

परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यानी अर्थसंवादच्या अंकांच्या प्रकाशनाच्या खर्चासाठी पंचवीस हजार रूपयांचे अनुदान मंजूर केल्याचे परिषदेला कळविले आहे. सन 2008-2009 या वर्षासाठी मंजूर केलेल्या विशेष अनुदानाबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषद महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची कृतज्ञ आहे.

कार्यवाह-खजिनदार

# सहकारी संस्थांचे आर्थिक-सामाजिक विकास प्रक्रियेतील योगदान- एक टिकात्मक विवेचन

✦ ल.मा. भोळे, मुंबई.
*प्राध्यापक, मानविकी तथा समाजविज्ञान विभाग, आय.आय.टी. मुंबई.*

अनेक देशात योग्य अशा सामाजिक-आर्थिक राजकीय पद्धतीच्या शोधप्रक्रियेत संशोधकांनी सहकारी संस्थांच्या वेगवेगळ्या स्वरूपांची चांगलीच चर्चा केली आहे. भारतात देखील सामाजिक-आर्थिक पुनर्रचनेत सहकारी संस्थांना महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. 'आर्थिक उदारीकरणाच्या' (1991) पार्श्वभूमीवर सहकारी संस्थांची बदलती भूमिका आणि रचना हा या लेखातील चर्चेचा महत्त्वाचा मुद्दा आहे.

अनेक देशात सरकारच्या आणि सहकारी संस्थांच्या प्रयत्नांनंतरही, सहकारी संस्थांचा सामाजिक जीवनावरील परिणाम हा मर्यादित राहिला आहे असे दिसून आले आहे. सहकारी संस्था विषयक संशोधन साहित्यात सहकारी संस्थांच्या ह्या अपयशाची बरीच चर्चा झालेली आहे. जागतिक स्तरावर सहकारी संस्थांच्या स्थापनेस सुमारे दिडशे वर्ष पूर्ण होऊन देखील सहकारी संस्थांना आर्थिक कसोटींवर खरे उतरता आलेले नाही. प्रस्तुत लेखात ह्याच गोष्टींचा उहापोह करण्यात आला आहे.

'सहकार' ह्या संकल्पनेचा शब्दश: अर्थ समूहश: एकत्रितपणे काम करणे. सहकारी संस्थेत एकत्र काम करणे असा आहे. म्हणजेच नफा-तोटा दोन्हीत एकत्रित भागिदारी करणे होय. मात्र सहकार ही संज्ञा आर्थिक क्षेत्रात नंतरच्या काळात उदयास आली. सहकारी संस्थांचा गाभा लहान अथवा छोटी आर्थिक एकके एकत्रितपणे परस्परांच्या सहकार्याने काम करतात यात आहे. सध्याच्या सहकारी संस्थांची मुळे मध्ययुगीन युरोपीय गिल्ड, औद्योगिक क्रांतीच्या पूर्व काळातील इंग्लंडमधील परस्पर मदत गट (self-help-agencies) आणि समाजवादावर आधारित काही प्रयोगांमध्ये आढळतात. सहकारी तत्त्वांचा प्रयोग भांडवलशाही विरूद्ध सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी केला गेला. औद्योगिक क्षेत्रात आर्थिक दृष्टीने दुर्बल गटांच्या

पिळवणूकीच्या प्रश्नाला उत्तर म्हणून सहकारी तत्त्वांचा विचार केला गेला. परिणामत: बऱ्याच देशांत सरकारच्या पुढाकाराने सहकारी संस्थांची स्थापना झाली.

लौकिकार्थाने एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सहकाराची सुरूवात इंग्लंडमध्ये झाली आणि नंतर 60-70 वर्षांमध्ये इतर देशांत सहकारी तत्त्वांचा प्रसार झाला. पहिले सहकारी तत्त्वावर आधारित दुकान व्यापारीवर्गाकडून होणाऱ्या पिळवणुकीविरूद्ध कामगारांनी 1884 साली सुरू केले. दरम्यान 1852 साली जर्मनीत कर्जाच्या क्षेत्रात आणि इटलीत 1866 साली कृषिक्षेत्रात, तसेच जपानमध्ये ग्रामीण कर्ज क्षेत्रात 1890 साली सहकारी संस्थांच्या कार्याची सुरूवात झाली.

भारतात सहकारी संस्थांची मुहूर्तमेढ 1904 साली सरकारच्या पुढाकाराने रोवली गेली. सहकारी संस्था कायदा 1904 आणि सहकारी कायदा II (1912) असे दोन कायदे करून सरकारने सहकारी संस्थांना पाठिंबा दिला.

पहिला कायदा सहकारी पतसंस्थांच्या स्थापने संदर्भात असून दुसऱ्या कायद्यातील तरतुदी पतसंस्थांच्या कामकाजाविषयी आहेत. सध्याच्या काळात सर्व क्षेत्रात जवळजवळ सर्व देशांमध्ये कमी अधिक प्रमाणात सहकारीकरण झालेले दिसून येते. सहकारीकरण हा सामाजिक-आर्थिक व्यवस्थांचा अविभाज्य भाग आहे.

सहकारीकरणाच्या आरंभापासून वैश्विक प्रमाणबद्ध तत्त्वांशिवाय सहकारी संस्था सुमारे 100 वर्षे कार्यरत होत्या व त्या वृद्धिंगत झाल्या. मात्र सहकारीकरणाच्या तत्त्वांबाबत एकमत आढळत नाही. ह्या तत्त्वांच्या व्याख्या काळानुसार बदललेल्या दिसतात. सहकारी तत्त्वांच्याबाबत असलेला एकमताचा अभाव ही सहकारीकरणाच्या चळवळीतील एक प्रमुख समस्या आहे.

1960 साली आंतरराष्ट्रीय सहकारी संघटन (International Co-operative Alliance)च्या प्रयत्नांचा परिपाक म्हणजे सहकारीकरणाची जी तत्त्वे उदयास आली ती तत्त्वे पुढीलप्रमाणे होत.

1) स्वेच्छा संघटना 2) लोकशाही पद्धतीने व्यवस्थापन नियमन 3) परस्पर सहकार्य 4) खुले धोरण, राजकीय, धार्मिक निरपेक्षता 5) एक सभासद एक मत 6) सभासदांना समान वागणूक 7) गुंतवणुकीनुसार मोबदला 8)भांडवलानुसार तसेच सभासदांनुसार मोबदल्याची समसमान वाटणी 8) मर्यादित कर्ज 9) परस्पर सहकार.

अशा या सहकारी संस्थाचे खाली दिलेले अनेक फायदे सांगितले जातात.

विविध मंडळे आणि समित्या ह्यांनी सहकारी संस्थांची गरज आणि उपयुक्तता ह्यांचे महत्त्व जाणले आहे. तसेच गाडगीळ, ह्यॉम, स्मिथ ह्यासारख्या विचारवंतांनी देखील त्यांच्या उपयुक्ततेवर भर दिला आहे. भारतातील शेतीविषयक रॉयल कमिशनच्या मते ग्रामीण समाजाच्या विकासासाठी तसेच भरभराटीसाठी स्थानिक शासन संस्थांनी सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे (व्हिक्टर 1979 मधून) असेच मत इंडियन सेंट्रल बँकिंग कमिटीचे आहे. त्यांच्या मते, काही प्रमाणात अपूर्णता आणि त्रुटी असून देखील सहकारी संस्थांच्या चळवळीला शक्य तितके सहाय्य मिळणे गरजेचे आहे; कारण सहकारी तत्त्वावर आधारित प्रयत्नच, शेतकऱ्यांचा दर्जा वाढविण्यात कारणीभूत ठरू शकतात. केवळ सहकारी तत्त्वे, रचना व सहकारी संस्था ह्यामुळेच ग्रामीण पुनरूज्जीवनाची चळवळ अधिकाधिक वास्तववादी व दृढ होऊ शकेल (व्हिक्टर 1979 मधून). हाच मुद्दा गाडगीळही मांडतात की, जगातील सहकारी तत्त्वांवर आधारित

कार्यप्रणाल्यांशी संबंधित आचार विचार आणि तत्त्वज्ञान हे सामाजिक-आर्थिक कार्यक्रम देण्यास सक्षम आहेत आणि हे कार्यक्रम केवळ तत्कालिक उपाययोजनेसाठीच नव्हे तर भारतातील दीर्घकाळ तग धरणारी तत्त्वप्रणाली म्हणूनही उपयुक्त ठरू शकेल. हा सकारात्मक दृष्टिकोण मर्यादित करत हॉग सांगतो की भारतातील, सहकारी तत्त्वांना अपेक्षित यश मिळालेले दिसत नाही.

सहकार म्हणजे 19व्या शतकातील एक अद्‌भूत आश्चर्यच म्हणावयास हवे. ह्याकडे भांडवलवाद, समाजवाद आणि साम्यवाद या मतप्रणालींना उपलब्ध असलेला एक पर्याय म्हणूनच बघितले जाते. सहकाराच्या तत्त्वाने इतर विचार प्रणाल्यांमधील महत्त्वपूर्ण गोष्टींचा स्वीकार करत त्यांना पराभूत केले. सहकाराचा राज्यवादाशी(Statism) देखील संबंध आहे. सभासदांमधील समानता, एकमताधिकार आणि सभासदांना देण्यात येणारे मालकी हक्क ह्यामुळे जनसमुदाय सहकारी संस्थांकडे आकर्षित झालेला दिसतो.

विविध विचारवंतांनी प्रगतीशील राष्ट्रांच्या दृष्टिकोनातून सहकारी संस्थांचे अनेक फायदे नमूद केले आहेत. सामान्यपणे अशी भावना दिसून येते की सहकारामुळे विकसनशील राष्ट्रांच्या विकासास प्रोत्साहन मिळेल कारण सहकारी तत्त्वांमध्ये मुख्यत्त्वे ग्रामीण जनतेसाठी असलेल्या सामाजिक न्यायाचा अंतर्भाव होतो.

सहकारामुळे समाजातील लहानलहान गटांचे एकत्रीकरण होऊन त्यांना मोठ्या संघटनांप्रमाणे फायदे तसेच तंत्रज्ञान उपलब्ध होऊ शकते.

सहकारी संस्थांची आर्थिक-मनोवैज्ञानिक रचना आणि निरपेक्ष दृष्टिकोन ह्यांमुळे त्या भारतीयांसाठी योग्य आहेत, असे मानले जाते. हॉगच्या मते भारतीय जनता भोगवादाचा स्वीकार करणे शक्य नाही. अहिंसावादाची परंपरा लाभलेल्या भारतीयांच्या मानसिकतेसाठी सहकारी संस्थाच योग्य आहेत.

गाडगीळांच्या मते सहकारी संस्था कोणत्याही विकसनशील राष्ट्राच्या आर्थिक सामाजिक रचनेसाठी योग्य आहेत. भारत हे त्याचेच एक उदाहरण आहे. शेतीक्षेत्र आणि इतर प्राथमिक उत्पादनांचे उपक्रम, लघुउद्योग क्षेत्र, दळणवळण आणि ग्राहकक्षेत्र ह्यांसाठी सहकारी संस्था महत्त्वपूर्ण कामगिरी बजावतात. कारण अनेक दुबळे व सक्षम आर्थिक घटक तसेच शहरी व ग्रामीण क्षेत्र ह्यांचे शांततापूर्ण सहजीवन ह्यांकरिता सहकारी संस्था योगदान देऊ शकतात.

विकसनशील देशांमध्ये विविध विकास योजनांसाठी सहकारी संस्था विविध आर्थिक गटांचे एकत्रिकरण करण्यास सहकार्य करू शकतात. त्यामुळे सहकारी संस्था ह्या विविध विकास योजनांचे महत्त्वपूर्ण माध्यम आहेत, तसेच केंद्रीकरण आणि जनतेचा सहभाग ह्यासारख्या समस्या हाताळण्यास सहकारी संस्था सक्षम आहेत. गाडगीळ आणि डे यांच्या मते सहकारीसंस्था समाज परिवर्तनाचे एक साधन आहेत. तसेच भांडवलवाद, उदार अर्थव्यवस्था, समाजवाद, साम्यवाद मतप्रणाली आणि सर्वोदय ह्यांसाठी असलेली एक उत्तम पर्यायी व्यवस्था म्हणजे सहकारी संस्था होत. सहकारी संस्थांची विस्तृत मांडणी खालील संकल्पनांद्वारे केलेली आढळते. सहकारी राष्ट्र मंडळ (Co-operative commonwealth,) किंवा सहकारी-समाजवादी राष्ट्रमंडळ-(Co-operative Socialist Commonweath) (CSVW), किंवा सहकारी समाजव्यवस्था- (Co-operative Social order), सहकारी अर्थव्यवस्था - (Co-Operative

Economy) किंवा समाजाची सहकार रचना- (Co-Operative Form of society) किंवा सहकार समुदाय (Co-Operative Community.)

आता आपण सहकारी संस्थांच्या काही अवगुणांची चर्चा करू.

1. सहकारी संस्थांची बरिचशी तत्त्वे ही भागिदारीतील कंपन्या आणि संयुक्त भांडवली कंपन्या ह्यांच्या तत्त्वांशी मिळती जुळती आहेत. उदा- जरी खुले सभासदत्व हे सहकारी संस्थांचे तत्त्व असले तरी ते वास्तववादी नाही. कारण असे केल्यास सहकारी संस्थांची सभासदसंख्या अमर्याद होईल. त्याचप्रमाणे समान भागवाटपाचे तत्त्व आदर्शवादी असले तरी ते ''सहाय्याची गरज असलेल्या सर्वांना सक्षमांकडून मदत'' ह्या विचारसरणीचा पूर्णपणे अवलंब करत नाही. शासन आंतरराष्ट्रीय विकास, वित्तीय संस्था ह्यांचा आर्थिक पाठिंबा सहकारी संस्थांना मिळतो. परिणामत: त्यांच्याकडून काही बंधने लादली जातात आणि परस्पर सहकार्याचे तत्त्व मर्यादित स्वरूप प्राप्त करून घेते. स्वयंप्रेरित सहाय्याचे तत्त्व बहुधा प्रत्यक्षात उतरत नाही कारण राज्याच्या विद्यमाने सहकारी संस्था अस्तित्वात येतात. राज्यच त्यांना विविध सवलती व फायदे ह्यांच्या रूपाने प्रोत्साहन देत असते. सहकारी संस्थांना अपेक्षित असा जनसमुदायाचा पाठिंबा मिळत नाही. ग्रामीण पातळीवर होणारे त्यांचे आकलन व मिळणारा पाठिंबा ह्या बाबीदेखील मर्यादित स्वरूपाच्या आहेत. सहकारी संस्थांची रचनाच मुळी पाश्चिमात्य देशातील परिस्थिती, तेथील गरजा ह्यांना अनुसरून केली आहे. भारतातील ग्राहक सहकारी संस्थाची संकल्पना इंग्लंडकडून, उत्पादन सहकारी संस्था फ्रान्सकडून आणि देय सहकारी संस्था जर्मनीकडून घेण्यात आली आहे.

2. अतिशय स्तुत्य आणि उपयुक्त अशा सहकाराच्या तत्त्वाची क्षमता विशिष्ट रचना असलेल्या संस्थांमध्ये कमी कमी होत जाते. प्रशासकीय वातावरणात सहकार त्याच्या पूर्ण क्षमतेनिशी कार्यरत राहू शकत नाही. विविध कायदे व अटी, अधिकारांची उतरंड, समित्यांच्या अटी, कागदपत्रांचे व्यवहार ह्यांमुळे सर्वसामान्य लोकांना सहकारी संस्थांच्या कार्यपद्धती जटिल वाटतात. सहकारी संस्था ह्या नेहमीच सभासद नियमित संस्था किंवा तंत्रज्ञान प्रशासन नियमित संस्था असतात.

संस्था, अधिकार आणि वित्त ह्या एकमेकांशी निगडित गोष्टी आहेत. संस्थारूपी सहकारात वित्त व अधिकार ह्यांच्या महत्त्वाच्या भूमिका असतात. त्यामुळे अधिकारांचा गैरवापर होण्याची शक्यता वाढते. प्रत्यक्षात सहकार औपचारिक रचनेत बांधला गेला आहे. पण अनौपचारिक रचनेतच समानतावाद, सेवाभाव आणि त्यागवृत्ती वृद्धिंगत होतात. लोकांसाठी, लोकांसमवेत केलेले कार्य हे ह्या अनौपचारिक सहकाराचा पाया असतो. औपचारिक सहकारी संस्था ह्या बाजार, राज्य आणि व्यक्ती ह्यांच्या चौकटीत कार्यरत असतात, त्यामुळे त्यांचे स्वतंत्र अस्तित्व उद्दिष्ट आणि उपक्रम ह्यांवर मर्यादा येतात. ह्यांमध्ये मुख्यत्वाने भांडवलवादी तत्त्वांना खतपाणी घातले जाते.

3. विविध प्रकारचे गट, जनसमुदाय, समाजवर्ग व ह्यांसारखे समाजातील इतर घटक ह्यांमध्ये वाद आणि ताणतणाव शाश्वतरूपी आहेत. अशा प्रकारच्या मतप्रणालीचा स्वीकार सहकारी संस्थांनी केला आहे. त्यांनी जनतेच्या एकत्रीकरणासाठी संस्थीय रचनेचा स्वीकार केला. ज्यायोगे जनतेच्या इच्छा-आकांक्षाचे संरक्षण करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे जनतेस प्रोत्साहन देणे शक्य होईल हा दृष्टिकोन सध्याच्या सहकारी

संस्थांमध्ये दिसून येत नाही. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्थांमधील सहकाराचा अभाव अलिकडच्या एका वृत्तात नमूद करण्यात आला आहे. ग्राहक-उत्पादक विवाद, हा सहकारी संस्थासाठी महत्त्वपूर्ण मानला जातो.

4. समाजपरिवर्तनातील सहकारी संस्थांची भूमिका अतिशय नगण्य आहे. कारण या मागची मूळ विचारसरणी आर्थिक आहे, त्याचप्रमाणे त्यांना व्यावसायिक चेहरा लाभला आहे. त्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये मुख्यत: उत्पादकता अतिरिक्त भागवाटप आणि ह्यासारख्या इतर तत्त्वांचा समावेश अधिक होतो.

सहकारी संस्थांमध्ये सामान्यत: व्यापक अशा आर्थिक किंवा सामाजिक आणि राजकीय घटकांचा विचार केला जात नाही. त्यांच्या समस्या खाजगी कंपनीप्रमाणेच असतात. उदाहरणार्थ-नैतिक मूल्यांचे अध:पतन, कार्याचा अभाव, मूल्यांचा अभाव इत्यादि. ह्या संस्था म्हणजे सममतप्रवाही लोकांच्या संघटना असून त्या सामाजिक तत्वांवर आधारित संस्था नसतात. त्यामुळे त्यांच्याकडून सभासदांच्या हिताचाच प्रथम विचार केला जातो व त्यासाठी व्यापक सामाजिक हिताची किंमत मोजण्यासही त्या तयार असतात. एक व्यापारी संस्था म्हणून स्वत:चे कमाल हित हेच सहकारी संस्थांचे मूलतत्त्व असते. 'स्वयंहिता करिता वित्तपुरवठा' हे त्यांचे तत्त्व समाजजीवन किंवा सामुदायिक जीवन ह्यापेक्षा खूपच वेगळे आहे आणि सर्वमान्य अशा सहकारी संस्थांच्या व्याख्यांमध्ये हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. असे म्हटले जाते की, सहकारी संस्था म्हणजे नियोजनातून साधलेले स्वयंसहाय्य होय, किंवा लोकांचे स्वयंहितासाठी स्वयंप्रेरणेने एकत्र येणे म्हणजे सहकारी संस्था, किंवा सहकारी संस्था अशी स्वयंप्रेरित संस्था असते की ज्यामध्ये सर्वांच्या हितासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात सहकारी संस्था अशा स्वरूपाच्या आढळून येत नाहीत.

सहकारी संस्था ह्या खाजगी क्षेत्रातील भांडवलवादाप्रमाणे आहेत. ''सकारात्मक आर्थिक कायदा'' संपादन जमा आणि उत्पादन ह्यांचा सहकारी संस्थांच्या विचारसरणीत अंतर्भाव होतो. सहकारी संस्थांच्या अंतर्गत आणि बाह्य कार्यक्रमांमध्ये उत्पादन, विक्री, उत्पादकता, भागवाटप ह्यांसारख्या संकुचित आर्थिक सूचकांचा वापर केला जातो. सामान्यत: सहकारी संस्था ह्या उत्पादनाची रचना, मालाची विभागणी, जनतेचे आरोग्य, समाजहित नीतीमूल्य, पर्यावरणीय प्रभाव ह्यांसारख्या व्यापक मुद्यांची तड लावण्यास स्थापन केल्या जात नाहीत किंवा कार्यरत असत नाहीत.

5. कोणते, कशाप्रकारे आणि कोणासाठी उत्पादन करावयाचे ह्यांसारख्या समस्यांना योग्य उपाय सुचविण्यात व त्यांचा अवलंब करण्यात सहकारी संस्था अपयशी ठरल्या आहेत. बहुदा त्या मोठ्या प्रमाणावर मागणी असलेल्या, गरीब जनतेच्या प्राथमिक गरजा भागविणाऱ्या वस्तुंचे व सेवांचे उत्पादन करताना आढळून येत नाहीत. त्याऐवजी त्यांचा भर ग्राहक वस्तू आणि विघातक वस्तू ह्यांच्या उत्पादनावरच असतो.

त्याचप्रमाणे स्थानिक तंत्रज्ञान आणि न्यायव्यवस्था ह्यांना प्रोत्साहन देण्यात सहकारी संस्था अपयशी ठरल्या आहेत. खाजगी कंपन्यांप्रमाणेच ह्या देखील उच्चप्रतीचे, बृहत्‌उद्योग आणि भांडवलवाद धार्जिणे कामगार कपातीस कारणीभूत ठरणारे तंत्रज्ञान, वापरताना दिसून येतात व खाजगी कंपन्यांशी स्पर्धा करीत असतात. गरिबी, शोषण आणि असमानता ह्यांना शह देण्यासाठी सहकारी संस्था हे साधन खूपच दुबळे आहे. सहकारी

संस्थांमध्ये फक्त मतदानाचाच हक्क समान आहे. बाकी अतिरिक्त भागांचे वाटप, सभासदांचा सहभाग ह्यांसारख्या बाबी असमानच आहेत.

6. काही राज्य अथवा सरकारी आणि खाजगी कंपन्यांप्रमाणे बऱ्याच सहकारी संस्था ह्या विस्तृत, केंद्रीकरण झालेल्या प्रशासकीय संस्था म्हणून पुढे आल्या आहेत. त्या स्थानिक पातळीवरून पुढे जाऊन राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहेत. मोठ्या प्रमाणावरील आर्थिक फायद्यासाठी सहकारी संस्थांनी विस्तृतता आणि केंद्रीकरण ह्यांवर भर दिला आहे. काही क्षेत्रांमध्ये त्यांची एकाधिकारशाही देखील वाढीस लागली आहे. उदाहरणार्थ, भारतात त्यांनी कापूस, दूध, कांदा आणि ज्वारी ह्यांचे उत्पादन, व्यापार आणि बाजारपेठ ह्यांवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. महाराष्ट्रात महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी, फेडरेशन ऑफ स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक ह्यांसारख्या मोठ्या संघटनांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर मजल मारली आहे. मात्र सहकारी संस्थांमुळे केंद्रीकरणाच्या समस्येचे निराकरण झाल्याचे दिसून येत नाही. सहकारी संघ, लोकशाही तत्त्व आणि परस्पर सहकार्य ह्यांचा वापर कमी प्रमाणात करताना आढळतात आणि ते संस्थेच्या सभासदांच्या संपर्कातही राहत नाहीत. जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रस्तरीय सहकारी संस्था व त्यांचे संघ ह्यामुळे सहकारी संस्थांना 'प्रचंड व जटिल अशा महाकाय रचना' असे स्वरूप प्राप्त झाले आहे आणि ह्यांमध्ये सभासदांमधील माहिती, संबंध आणि संवाद ह्यांचा मोठ्या प्रमाणात अभाव आढळतो.

7. जगातील काही सहकारी संस्थांनी वितरण, किंमत, नियमन, उद्योगांचे स्थान ह्यांच्या राजकारणात प्रवेश केल्याचे दिसून येते. सहकारी तत्त्वावरील शेतीमुळे शेतीक्षेत्राचा विकास होत नाही. तसेच लहान शेतकऱ्यांना फायदा देखील होत नाही. अशा सहकार तत्त्वांवर आधारित शेतीचा दर्जा खाजगी क्षेत्रापेक्षा खूपच निकृष्ट असतो. ह्याची कारणे शेतीविषयक सहकारी संस्थांच्या रचनेतच आढळून येतात. गुजरातमधील वन सहकारी संस्थांच्या अभ्यासात पुढील निष्कर्ष आढळून येतात; ह्या संस्थांमध्ये लोकशाही तत्त्वांचा अभाव दिसून येतो. त्यांचा दर्जा सहकारी सामायिक संपत्तीच्या (Co-operative Commonwealth) जवळपासही नाही.

8. खाजगी व सरकारी उद्योगाप्रमाणेच प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वर्चस्व दिसून येते. त्यांचे नियोजन अशा पगारी कामगारांवर सोपविलेले असते की ज्यांची जनतेशी कोणत्याही प्रकारची सामाजिक बांधिलकी नसते. सहकारी संस्थांच्या अधिकाऱ्यांना मोठ्या प्रमाणात अधिकार असतात. त्यांची नेमणूक बाहेरील लोकांकडून केली जाते व त्यांना सहकारी संस्थांचे सभासद पदच्युत करू शकत नाहीत. सहकारी संस्थांसाठी परस्पर-सहकार्य, सभासदांचे हित, ह्यापेक्षा व्यवस्थापन अधिक महत्त्वाचे झाले आहे. त्यांचा कल बाह्यनेतृत्त्व व औपचारिक कार्यानुभव ह्यांच्या माध्यमातून विस्तृत प्रकल्प हाती घेण्याकडेच असतो. स्थानिक कलाकौशल्यांचा ऱ्हास होण्यास सहकारी संस्था कारणीभूत आहेत. त्यांची स्थापना खरेतर गरीब, गरजू जनतेला संघटित करण्यासाठी झाली, परंतु त्यांनी लोकांची मूलतत्त्वे, कलाकौशल्ये ह्यांवरच प्रहार करण्यास सुरुवात केली.

9. बाजार व्यवस्थेतील समस्यांवर उपाय शोधण्यास सहकारी संस्था सक्षम नाहीत. सहकारी संस्थांमधील उत्पादित वस्तूंच्या किंमती ह्या सरकारी किंवा खाजगी कंपन्यांप्रमाणेच असतात. राज्याची भूमिका सहकारी संस्थांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण ठरली आहे. राज्यव्यवस्थेचा प्रभाव व त्यांचे अधिकार कमी करण्यात सहकारी संस्थांना यश आलेले नाही.

राज्यांकडूनही सहकारी संस्थांना प्राथमिक पातळीवरील स्वयंसहाय्याची स्वायत्त पर्यायी व्यवस्था म्हणून दर्जा मिळत नाही. याउलट ह्या राष्ट्रीय पातळीवरील राज्याच्या शाखा म्हणून कार्यरत असतात.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतही हे नमूद केले आहे की योजनाबद्ध अर्थव्यवस्थेत सहकारी संस्था ह्या आर्थिक जीवनातील मूलभूत गोष्टींचा पाया म्हणून आवश्यक आहेत. बऱ्याचशा सहकारी संस्था ह्या निबंधकाद्वारे (Registrar) किंवा राष्ट्रीय कायद्याद्वारे स्थापन करण्यात आल्या आहेत. भारतातील सहकारी संस्थांची चळवळ ही सहकारी संस्थाच्या निबंधकांची चळवळ म्हणूनही ओळखली जाते. भारतात समाज नियमित सहकारी चळवळीपेक्षा राज्य सहकारी संस्था योजनाच अधिक प्रमाणात दिसून येतात. भारतातील सहकारी संस्था ह्या मुख्यत्त्वे सरकारी क्षेत्रातील सहकारी संस्था आहेत.

10. सहकारी संस्था राष्ट्रमंडळ (CCW)चा दृष्टीकोन जरी व्यापक असला तरी त्याची मांडणी खूपच ढोबळ स्वरूपाची आहे. CCW हे नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेचा एक भाग म्हणून कार्यरत राहिल अशी अपेक्षा असते. यात राज्य केवळ कायद्याची चौकटच उपलब्ध करून देत नाही तर इतरही अनेक कार्ये पार पाडते. आधुनिक लोकशाही, संघराज्य, लोकहिताची कार्ये, विकासयोजना व जनतेची उपयुक्तता ह्यांना विविध भूमिका दिल्या गेल्याने सहकारी संस्था राष्ट्रमंडळ हे मिश्र अर्थव्यवस्था व लोकहितवादी राज्य ह्यांपेक्षा वेगळे ठरत नाही.

## सारांश

गेल्या 150 वर्षांहूनही अधिक काळापासून या जगात सहकारी संस्था कार्यरत आहेत. जगभरातील तसेच भारतातील उदाहरणांवरून असे दिसून येते की, त्यांनी मर्यादित स्वरूपात यश मिळविले आहे. त्यासहकारी संस्था राष्ट्रमंडळ (CCW) ह्यांसारख्या पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यात यशस्वी झाल्या नाहीत. 1950 च्या दशकात असे बोलले जात होते की, ''सहकार अयशस्वी ठरत आहे परंतु तो यशस्वी झालाच पाहिजे.'' मात्र मर्यादित मूलतत्त्वे, चालना व संस्थारूपी सहकाराची उद्दिष्ट्ये ह्यांमुळे जरी सहकारी संस्था यशस्वी झाल्या तरी त्यांचे महत्त्व मर्यादित स्वरूपातच राहिल असे वाटते. भविष्यात देखील सहकारी संस्थांचा पर्यायी समाजव्यवस्था म्हणून विकास होणे अशक्य वाटत आहे.

(हा लेख तयार करण्यासाठी लेखक मिथिला बिनिवाले यांचा आभारी आहे.)

## संदर्भसूची

1) Apthrope, R., Rural Co-operatives and Planned Change in Africa : An Anarytical Overview, UNRSID, Geneva, 1972.

2) Argyle, M., Co-operation: The Basis of Sociability, Roultedge, London, 1991.

3) Altwood, and Baviskar, B.S. (eds), Who Shares ? Co-operatives and Rural Development Oxford University Press, New Delhi, 1988.

3) Baviskar, B.S., The Politics of Development : Sugar Co-operatives in Rural Maharastra, Oxford University Press, New Delhi, 1980.

4) Bhole, L.M., "Is Corporatism an Alternative social Order", Man and Development, September, 1993.

5) Chaudhury, K.M. An Assessment of Co-operative Farming Societies in Gujarat and Rajasthan, Sardar Patel University, Vallabh Vidyanagar, 1972.

6) Chinchankar, P.Y. and Namjoshi M.V (eds), Co-operatives and Dynamics of

change, Somaiya Bombay, 1977.

7) Combs,Allan (ed.), Co-operatives; Beyond the Age of Competition, Bordan and Breach Tokyo, 1992.

8) Curtis, Donald, Beyond Govern-ment; Orgnization for Common Venefit. Macmillon, London, 1991.

9) Dalaya, C.K., and Subnis, R.S. Co-operation in Maharashtra, Centre for the Study of Social Change, Bombay, 1963.

10) Dash, T.R., Co-operatives and Economic Development, Vedam Books, New Delhi, 1998.

11) Deshpande, S.H., Some Prob-lems of Co-operative Farming, Himalaya, Bombay,1977.

12) Dey, S.K. Sahakari Samaj : The Co-oerative Commonwelth, Asia, Bombay, 1967.

13) Digby, M. Co-operative Land Use: A Challenge to Traditional Co-operation, Ba-sil Blackwell, Oxford, 1963.

14) Dogra, Bharat, "Gujarat : Not A Model To Emulate", Economic and Political Weekly,Octobrer 25, 1986.

15) Gandhi, M.K. Co-operative Farm-ing, Navjivan, Ahmedabad, 1959.

16) George, Shanti, Matter of People: Co-operative Dainying in India and Zimba-bwe, Oxford University Press, New Delhi, 1994.

17) Gokhale Institute of Politics and Economics (GIPE), Writtings and Speeches of Prof. D.R. Gadgil on Co-operation", Ori-ent Longman, Bombay 1975.

18) Hariss, Barbara, State and Mar-ket, Concept, New Delhi, 1984.

19) Hougth E.M. The Co-operative Movement in India, Oxford University Press, Calcutta 1966.

20)Inamdar, N.R. Governemtn and Co-operative Sugar Factories, Popular, Bombay, 1965.

21) International Co-operative Alli-ance, The Role of Co-operation in Socal and Economic Development, Asia, Bombay, 1966.

22) Krishnaswami, O.R., Co-opera-tive Democracy in Action, Somaiya, Bombay, 1976.

23) Krishnaswami, Fundamentals of, Co-operation, S. Chand, New Delhi, 1978.

24) Kulkarni K.R., Theory and Prac-tice of Co-operatives in India and Abroad, Co-operators' Book Depot, Bombay, 1958.

25) Laxminarayan, H & Kanungo, K. Glimpses of Co-operative Farming in India, Asia, Bombay, 1967.

26) Mascarenhas, R.C., A Startegy of Rural Development : Dairy Co-operatives in India, SAGE, New Delhi, 1988.

27) Namjoshi, M.V., "Co-operation and Welfare", in Chinchankar, P.Y., and Namjoshi, M.V. (eds) Co-operatives and Dynamics of Change, Somaiya, Bombay, 1977.

28) Plunkett Foundation, The World of Co-operative Enterprise, Plunkett Foundation,Oxford, 1955.

29)Rajgopal, A., Tamil Nadu Co-op-erative Movement in Peril", Economic and Political Weelky, October, 29, 1988.

30)Rajagopalan, S., Co-operation inForeign Countries, V.S.N. Chari & Co., Madras, 1955.

31) Raj Krishna and Others, Co-op-erative Faming : Some Critical Reflections, Indian Co-operative Union, New Delhi, 1956.

32)Rath Nilkanth, "D.R. Gadgil on Co-operative Commonwelth", Economic and Polititcal Weekly, April 6, 2002.

33) Robertson, E.F., People and the State, Cambridge University Press, Cam-bridge, 1984.

34) Roy, Durgadas, Agricultural Co-operatives and Economic Development, Nalanda Publications, Calcutta, 1989.

35) Rudra, Ashok, Indian Agricultural

Economicas, Myths and Realities, allied, New Delhi, 1982.

36) Saxena, K., K., Evolution of Co-operative Thought, somaiya, Bombay.

37) Schillar, Otto, M., Co-operative Farming and Individual Farming on Co-operative Lines, Indian Co-operative Union, New Delhi, 1957.

38) Schillar, Otto, M., Co-operation and Integration of Agricultural Production, Asia, Bombay, 1969.

39) Selvaraju, R. Co-operatives in New Millenium, Vikas, New Delhi, 1999.

40) Shah, D.R. Co-operatives in New Millenium, Vikas, New Delhi, 1999.

41) Shah D.R. Co-operatives: An Instrument of Social Change, Rawat, Jaipur, 1992.

42) Singh, Tarlok, Towards An Integrated Society, Orient Longmans, New Delhi, 1969.

43) Sinha, B.K. Indian Co-operation, Bookhive, New Delhi, 1970.

44) Suresh, K.A., & Joseph, N., Co-operatives and Rural Development in India, Ashish, New Delhi.

45) Thorner, Daniel, Agricultural Co-operatives in India : A Field Report, Asia, Bombay, 1964.

46) Tripathy, S.N. Co-operatives : Its Growth and new Dimensions, Discovery Publishing House, New Delhi, 2000.

47) Tyagi, R.B. Recent Trends in the Co-operative Movement in India, Asia, Bombay, 1968.

48) UN Research Institute for Social Development, Rural Co-operatives as Agents of Social Change : A Resarch Report and a Debate, Geneva, 1975.

49) Victor, M.A. Co-operation, Open Education Corporation, Madras, 1979.

50) Worsely, P., Two Blades of Grass : Rural Co-operatives in Agricultural Modernization, Manchester University Press, Manchester, 1971.

✦✦✦

## व्यवस्थेतील बदल

अर्थसंवादची वार्षिक वर्गणी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्या साताऱ्याच्या पत्त्यावर कृपया फक्त डिमांड ड्राफ्टनेच पाठवावी. मनीऑर्डरने पाठवू नये. अर्थसंवाद संबंधीचा सर्व पत्रव्यवहार कृपया प्रमुख संपादक जगन्नाथ पाटील यांच्याशीच करावा. डी.डी. पाठविताना संपूर्ण पत्ता सुवाच्य अक्षरात नमूद करावा. ड्राफ्ट 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने पाठवावा.

कार्यवाह-खजिनदारांशी संबंधित पत्रव्यवहार अनिल सूर्यवंशी यांच्याशीच करावा. मार्च 2008 पासून कार्यवाह-खजिनदाराचे कार्यालय बार्शी येथे स्थानांतरित झाले आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

कार्यवाह-खजिनदार

# हॉवर्ड गार्डनर यांचा बहुविध बुद्धिमत्तेचा सिद्धांत

✦ रमेश पानसे, पुणे.
*भूतपूर्व सहायक संपादक 'अर्थसंवाद'*

**शा**स्त्रीय संशोधनांवर आधारित आणि प्रचलित शिक्षणप्रणालीत मूलभूत परिवर्तन करण्याची ताकद असलेला असा 'बहुविध बुद्धिमत्ता'चा सिद्धांत, मानसशास्त्रज्ञ हॉवर्ड गार्डनर यांनी 1983 सालच्या आपल्या फ्रेम्स ऑफ माईंड या ग्रंथात मांडला आहे.

हॉवर्ड गार्डनर (जन्म 1943) हे एकाच वेळी तीन वेगवेगळ्या पदांवर काम करीत आहेत. ते दीर्घकाल 'हॉवर्ड ग्रॅज्युएट स्कूल ऑफ एज्युकेशन' मध्ये प्राध्यापक आहेतच, आणि तिथल्या प्रसिद्ध अशा 'प्रॉजेक्ट झिरो'या संशोधन प्रकल्पाच्या सुकाणू समितीचे अध्यक्ष आहेत. तसेच हार्वर्ड विद्यापीठातच ते 'ॲडजंक्ट प्रोफेसर ऑफ न्यूरॉलॉजी' हेही पद सांभाळत आहेत. यापूर्वी याच विद्यापीठात शिकताना विकासक मानसशास्त्र (Development Psychology) व नंतर मज्जा-मानसशास्त्र (Neuro Psychology) हे त्यांचे अभ्यासविषय होते. विद्यापीठात मानसशास्त्रज्ञ एरिक एरिकसन त्यांचे हे गुरू होते, तर जेरोम ब्रुनर यांच्या एका शिक्षणविषयक प्रकल्पावर, त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी काही काळ काम केले होते. याच काळात, विद्यापीठात तत्त्वज्ञ नेल्सन गुडमन यांच्या मार्गदर्शनाखाली 'प्रोजेक्ट झिरो' हा कला शिक्षण विषयक प्रकल्प उभा राहिला होता, त्यात गार्डनर यांना काम करण्याची संधी मिळाली. हार्वड विद्यापीठातच संशोधनात उतरल्यानंतर त्यांना दोन दिशांनी संशोधन करण्याची संधी दीर्घकाळ प्राप्त झाली. एक दिशा होती, सामान्य नि असामान्य मुलांच्या बुद्धिमत्तेबाबत संशोधन करण्याची; आणि दुसरी होती ती ज्यांच्या मेंदूला इजा पोचली आहे अशा प्रौढांच्या बाबतीतील त्यांच्या, विविध प्रतिकांचा वापर करण्याच्या क्षमतांच्या (Symbol using capacities) संदर्भातील

संशोधनाची. ज्या 'बहुविध बुद्धिमत्ते' च्या सिद्धांताचे प्रणेते म्हणून, हॉवर्ड गार्डनर प्रसिद्ध आहेत, त्या सिद्धांताची उभारणी करण्यात या दोन दिशांनी केलेल्या संशोधनांचा नि त्यांच्यातील परस्पर संबंध बांधण्याच्या प्रयत्नांचा फार मोठा वाटा आहे.

हॉवर्ड गार्डनर यांची संशोधक म्हणून असलेली कारकीर्द खूप भरीव अशी आहे. आजवर त्यांची अठरा पुस्तके आणि चारशेवर लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांची ही पुस्तके आत्तापर्यंत एकवीस भाषांतून भाषांतरित झाली आहेत. (मराठीत एकही नाही. इतर भारतीय भाषांतूनही बहुधा नसावे !) त्यांना मानसन्मानही अनेक लाभले आहेत. 1981 सालीच त्यांना मॅकआर्थर प्राईज फेलोशिप प्राप्त झाली होती. इस्रायलच्या तेलअवीव विद्यापीठाने, इस्रायलच्या पन्नासाव्या स्वातंत्र्यदिनानिमित्त झालेल्या समारंभात मानद पदवी त्यांना बहाल केली आहे. लुइविल विद्यापिठाचे 'ग्रेव्हा मेयर ॲवार्ड इन एज्युकेशन' त्यांना 1990 साली मिळाले. हा सन्मान प्राप्त करणारे ते पहिले अमेरिकन आहेत. नुकतीच 2000 साली, त्यांना 'गुगेनहेम फेलोशिप' मिळाली आहे. गार्डनर यांना आजवर अठरा विद्यापिठांनी मानद पदव्या देऊन गौरविले आहे.

गेली तीस-पस्तीस वर्षे, हॉवर्ड गार्डनर व त्यांचे 'प्रोजेक्ट झिरो', 'प्रॉजेक्ट समिट' मधील सहकारी शिक्षण व्यवहारातील काही नेमक्या प्रश्नांवर संशोधन करीत आहेत. उदाहरणार्थ, नीटस आकलनासाठी शिक्षणाचा ढाचा कसा असावा, प्रगतीनुसार मूल्यमापन कसे करावे, इत्यादी. यासाठी त्यांनी नव्याने 'गुड वर्क प्रॉजेक्ट' सुरू केले आहे. दर्जेदार आणि जबाबदार शिक्षणाविषयी जागरूक असण्याचा अर्थ या 'गुडवर्क मधून' प्रतित होतो; असे ते मानतात. ज्या व्यक्ती असे 'चांगले काम' करू इच्छितात ते, आजच्या वेगाने बदलत्या परिस्थितीत, म्हणजे बाजार प्रवाह अधिक प्रभावी ठरत असताना, तंत्रज्ञानविकासामुळे आपली काळ आणि अंतर यांची संकल्पना बदलत असताना, यशस्वी कसे होऊ शकतील, हा या संशोधकांसमोरील कळीचा प्रश्न आहे.

### बहुविध बुद्धिमत्तांचा सिद्धांत

हॉवर्ड गार्डनर एक भाषिक किंवा व्याकरणाचा गुन्हा करतात. ते 'बुद्धिमत्ता' हा शब्द एकवचनी न वापरता 'बहुवचनी' वापरतात आणि हेच त्यांच्या संशोधनाचे सार आहे. त्यांच्यामते, बुद्धिमत्ता ही एक गोष्ट नाही, त्यामुळे तिचे मोजमाप करून, समाजात काही लोकांना तिचे 'प्रमाण' जास्त प्राप्त झाले आहे. बऱ्याच जणांना मध्यम आणि काहींना अगदीच कमी, अशी जी वर्गवारी आजवर आणि नेहमीच केली जात आहे, ती चुकीची आहे. असे गार्डनर यांनी दाखवून दिले आहे. या नव्या विचारामुळे गेले सुमारे शतकभर सर्रास वापरली जात असलेली बुध्यांक ( Intelligence Quotient IQ) मोजण्याची संकल्पना, तिच्या मर्यादा जाणवून, रद्दबातल होत चालली आहे. (फ्रान्समधील शाळेत घातल्यानंतर शिकू शकणारी आणि शिकू न शकणारी मुले कोणती याचा शोध आगावू घेण्यासाठी अल्फ्रेड बिने याने 1905 साली बुद्धीचे मोजमाप करण्याची पद्धत ठरविली, पुढे जर्मन मानसशास्त्रज्ञ विल्यम स्टर्न याने मुलाच्या बुद्धिमत्तेचे संख्यात्मक मापन देण्याचे सूत्र मांडले. आज जगात यापद्धतीनेच बुद्धी मोजून व्यक्तीचा बुद्ध्यांक ठरविला जातो !)

नव्याने मांडण्यात आलेल्या बुद्धिमत्ते बाबतच्या सिद्धांताने आपल्या अनेक रूढ कल्पनांना मोडीत काढले आहे. उदाहरणार्थ, बुद्धिमत्ता ही आनुवंशिक असते ही अशीच एक रूढ समजूत. भारतात तर जातीय व्यवस्थेच्या नि वर्णाश्रमाच्या

जाळ्यात या संकल्पनेने विलक्षण गोंधळ माजवले आहेत. सामाजिक नि आर्थिक शोषणामागेही, इतर अनेक कारणांबरोबर या गैरसमजुतीचा भाग आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. नवे सैद्धांतिक विश्लेषण, अनेक शास्त्रीय पुराव्यांनी असे सिद्ध करते की बुद्धिमत्ता आनुवंशिक नाही तर ती उपजत आहे, नैसर्गिक आहे. ती 'एक' नाही तर 'अनेक' प्रकारच्या बुद्धिमत्ता अस्तित्वात आहेत आणि प्रत्येक व्यक्तीला उपजतच या सर्व बुद्धिमत्तांची ठराविक केंद्रे तिच्या मेंदूमध्ये प्राप्त झाली आहेत. व्यक्तीव्यक्तीत महत्त्वाचा फरक मात्र असा की, प्रत्येकाला कमी-अधिक प्रमाणात प्राप्त झालेल्या या बुद्धिमत्तांचा एक विशिष्ट पट प्राप्त झालेला असतो. प्रत्येकाचा हा पट इतरांच्यापेक्षा वेगळा असतो. जगात, 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असे आपण म्हणतो त्याचा इथे अर्थ असा की, 'व्यक्ती तितके बुद्धिमत्तांचे पट.' प्रत्येकाचा चेहरा जसा वेगळा तद्वतच प्रत्येकाला मिळालेल्या बुद्धिमत्तांच्या मिश्रणाचा पट वेगवेगळा. त्यामुळे आजवर आपण मानत आलो त्याप्रमाणे एकजण बुद्धिमान तर दुसरा कमी बुद्धिमान असे नसून एकजण एखाद-दुसरी बुद्धिमत्ता तीव्रतेने प्राप्त झालेला (आणि दुसऱ्या कुठल्यातरी प्रकारची बुद्धिमत्ता अगदी नगण्य अशी प्राप्त झालेला) तर दुसरा, दुसऱ्याच कुठल्यातरी बुद्धिमत्ता तीव्रतेने प्राप्त झालेला. यामुळे म्हटले तर प्रत्येकजणच कोणत्या ना कोणत्या बाबतीत बुद्धिमान असतो.

या सिद्धान्ताचे शैक्षणिक पर्यवसान असे की, शाळेत नेहमी केली जाणारी हुशार, मध्यम व 'ढ' अशी विद्यार्थ्यांची वर्गवारी त्याज्य ठरते. (शिक्षकांनी 'ढ' म्हणून अवमान करून बाजूला काढल्याने अनेकांची आयुष्ये आजवर उध्वस्त झाली आहेत!) आता कोणकोणत्या बाबतीत उपजत हुशार आहे आणि तोच कोणत्या बाबतीत 'ढ' आहे, ह्याचा शोध घेऊन, ज्याला त्याला त्याच्या त्याच्या बुद्धिमत्तांनुसार शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी लागेल. याचा अर्थ असा की 'सर्वांना एकच शिक्षण-एकच मूल्यमापन' असणारी आजची शिक्षणव्यवस्था मूलतः बदलून विद्यार्थीकेंद्री अशी, व्यक्तिविशिष्ट शिक्षणाच्या संधी देणारी व्यवस्था निर्माण करावी लागेल.

हॉवर्ड गार्डनरने, आपल्या 'फ्रेम्स ऑफ माईंड' या ग्रंथात वेगवेगळ्या सात प्रकारच्या बुद्धिमत्तांचा शोध दिला आहे. या बुद्धिमत्तांना 'बुद्धिमत्ता' का म्हणावे याचे काही निकषांच्या आधारावर विश्लेषणही केले आहे. अशा बुद्धिमत्ता तीव्रतेने असणाऱ्यांची उदाहरणे घेऊन, आणि त्यांनाच इतर विशिष्ट अशा बुद्धिमत्ता नसण्याची माहिती दिली आहे. हा सबंध ग्रंथ या संशोधनाची पार्श्वभूमी, बुद्धिमत्तांचे निकषांनुसार शक्य प्रकार आणि प्रत्येक प्रकारचे पुढे सखोल विश्लेषण करणारा आहे. 1993 साली प्रसिद्ध झालेल्या 'मल्टिपल इंटलिजन्सेस-द थिअरी इन प्रॅक्टिस' या ग्रंथात हा विषय बराच पुढे नेलेला आहे. मुख्यतः 1983 च्या 'फ्रेम्स ऑफमाईंड' च्या प्रकाशानानंतर या विषयावर मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली; अनेक प्रश्न विद्वानांकडून उपस्थित केले गेले त्यांचाही आढावा या नव्या ग्रंथात घेतला आहे. तसेच या ग्रंथाचा मुख्य विषय आहे तो म्हणजे, या बुद्धिमत्तांच्या शिक्षणाविषयीचा. एकदा या नव्या सिद्धांताच्या आधारे शिक्षणाची मांडणी करायची म्हणजे, अभ्यासक्रमापासून ते मूल्यमापनापर्यंत अनेक गोष्टींचा विचार व्यावहारिक पातळीवर करावा लागणार. याचीच दिशा देणारे हे पुस्तक आहे. गार्डनर यांच्या या दोन ग्रंथांतून मुख्यत्वेकरून बहुविध बुद्धिमत्तेच्या सिद्धांताची मांडणी करण्यात आली आहे.

'फ्रेम्स ऑफ माईंड' मध्ये सांगितलेले बुद्धिमत्ताचे मूळ सात प्रकार असे आहेत :

### 1) भाषिक/वाचिक बुद्धिमत्ता

भाषिक व्यवहारांची निर्मिती, भाषे/भाषांवरील प्रभुत्व, भाषेचा लवचिक वापर, काव्य, कथाकथन, कथा-कादंबरी, लेखन,चर्चा, संवाद इत्यादींमध्ये भाषेची बुद्धिमत्ता अभिव्यक्त होते. ज्या लोकांना ही बुद्धिमत्ता तीव्रतेने प्राप्त झालेली असते असे लोक साहित्यिक, वक्ते, विनोदकार किंवा अगदी उत्तम वाचकही असतात. आचार्य अत्रे, पु.ल.देशपांडे आणि अनेक साहित्य क्षेत्रातील दिग्गजांची नावे आपल्याला उदाहरणादाखल घेता येतील.

### 2) तार्किक/गणिती बुद्धिमत्ता

तार्किक विचार करता येणे, शास्त्रांच्या किंवा गणिताच्या क्षेत्रात अवगाहन करणे, अमूर्त गोष्टींत रमणे अशा गोष्टींतून ही बुद्धिमत्ता प्रकट होत असते. ही बुद्धिमत्ता प्राप्त झालेल्या व्यक्ती, प्रामुख्याने, घटनांचे विश्लेषण करणे, गणित-शास्त्रे यांतील प्रश्नांची उकल करणे, अशा बाबींमध्ये चांगले तयार असतात. आईन्स्टीन, रसेल, रामन अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

### 3) सांगितिक बुद्धिमत्ता

गुणगुणणे, ताल, लय यांचे आकलन होणे, त्यांचा वापर करता येणे, आवाजाबाबत संवेदनशील असणे. गाण्यांची धून आठवणे, म्हणता येणे इ. या मधून या बुद्धिमत्तेची अभिव्यक्ती होते. गायक, संगीतकार, वादक, काव्यगायक अशा लोकांचा या प्रकारात समावेश होतो. कुमारगंधर्व, लता मंगेशकर, रवीशंकर अशी अनेक नावे आपण या प्रकारातील बुद्धिमंतांची सांगू शकू.

### 4) अवकाशीय दृष्टीगोचर/बुद्धिमत्ता

पाहिलेल्या रचना, आकार यांचे मनात चित्र तयार करता येणे. भौगोलिक नकाशे करता येणे, समजणे, अंतराचा अंदाज घेता येणे अशा अनेक कृतींतून या बुद्धिमत्तेची अभिव्यक्ती होत असते. चित्रकार, वास्तुरचनाकार,शिल्पकार, अभियंते, शल्यविशारद अशासारख्यांना प्रामुख्याने अशी विशेष दृष्टी असते. कोलंबसाला ही बुद्धिमत्ता होती असे म्हणता येईल.

### 5) शारीरिक स्नायुविषयक बुद्धिमत्ता

आपल्या संपूर्ण शरीराचा किंवा विशिष्ट अवयवांचा वापर करून भावना व्यक्त करता येणे किंवा उत्तम खेळता येणे, उत्तम शारीरिक नियंत्रण, अवयवांचे परस्पर संघटन किंवा हाताने करून पाहून एखादी गोष्ट शिकता येणे अशा प्रकारांतून ही बुद्धिमत्ता व्यक्त होते. नर्तक, खेळाडू, पोहणारे किंवा शल्यविशारद यांना अशा तऱ्हेची बुद्धिमत्ता आवश्यक असते.

### 6) व्यक्ती-अंतर्गत बुद्धिमत्ता

स्वतःच्या मनात डोकावता येणे, स्वतःच्या भावना ओळखता येणे, त्यांवर नियंत्रण ठेवता येणे किंवा आध्यात्मिक अनुभव घेता येणे, या प्रकारच्या बुद्धिमत्तेला व्यक्ती-अंतर्गत बुद्धिमत्ता असे म्हणतात.

संयमीत, ध्यानधारणा करणारे, भावनांचे उद्दिपन होऊ न देणारे असे लोक ही बुद्धिमत्ता प्राप्त झालेले असतात. स्थितप्रज्ञ, संत, आध्यात्मिक गुरू यांचा यात समावेश करता येतो.

### 7) आंतर-व्यक्ती बुद्धिमत्ता

दुसऱ्यांशी संवाद साधता येणे, मिळून मिसळून वागता येणे, दुसऱ्यांच्या भावना ओळखता येणे, दुसऱ्यांबद्दल सहानुभूती असणे अशा क्षमता

असणारे लोक ही बुद्धिमत्ता प्राप्त झालेले असतात. नेते, शिक्षक, विक्रीकरणारे किंवा लोकांमध्ये रमणारे, एकत्रित काम करायला आवडणारे असे हे लोक असतात. दुसऱ्यांच्या भावनांची जपणूक करणे, किंवा दुसऱ्यांवर प्रभाव पाडणे हे यांना चांगले जमते. महात्मा गांधी ,हिटलर किंवा कृष्णमूर्ती, रजनीश अशा मोठ्या लोकांचा समावेश आपण या गटात करू शकतो.

अलीकडे आणखी एका बुद्धिमत्तेचा, गार्डनर यांनी, आपल्या यादीत समावेश केला आहे. ती म्हणजे निसर्गविषयक बुद्धिमत्ता.

**8) सृष्टपदार्थविषयक बुद्धिमत्ता**

निसर्गातील पशु-पक्षी-प्राणी, झाडें, खडक, नद्या-डोंगर अशा गोष्टींविषयी ओढ असणे, त्यांचे-त्यांच्या स्वरूपाचे आकलन असणे,त्याविषयी जवळीक वाटणे, किंवा निसर्गाच्या सान्निध्यात रमणे, हे या बुद्धिमत्तेच्या माणसांचे विशेष आहेत. या लोकांना, रानावनांतून हिंडण्याची, शिकारीची, डोंगर चढण्याची किंवा वनस्पतींचा, प्राण्यांचा अभ्यास करण्याची आवड असते. डार्विनचे ठळक नाव यासंदर्भात सहजच आपल्यासमोर येईल.

**बुद्धिमत्तेचे निकष**

एखाद्या गोष्टीला वेगळी 'बुद्धिमत्ता' म्हणून स्वीकारण्यासाठी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विचार करण्यात आला आहे. जीवशास्त्रे, तार्किक विश्लेषण, विकासक-मानसशास्त्र, प्रयोग-मानसशास्त्र, मापन-मानसशास्त्र व मज्जामानसशास्त्र अशा निरनिराळ्या संशोधनक्षेत्रांतून काही निकष पुढे आले आहेत :

**1) मेंदूमधील कार्यात असलेली अलगता**

मेंदूला इजा पोचलेल्या अपघातग्रस्त रोग्यांच्या बाबतीत, अभ्यासातून असे आढळून आले आहे की त्यांची एखादी बौद्धिक क्षमता (उदा. वाचा) नाहीशी झालेली असली तरी दुसरी एखादी क्षमता चांगली टिकून आहे. याचाही आत शोध लागला आहे की, विशिष्ट बुद्धिमत्तेचे केंद्र, मेंदूत, विशिष्ट ठिकाणी वसलेले आहे. तसे ते असणे हाच निकष, गार्डनर यांनी आपल्या मज्जा-मानसशास्त्रीय अभ्यासातून पुढे आणला आहे.

**2) असामान्य बुद्धिमत्तेचे मूल, एककल्ली खुळा-विद्वान किंवा अपवादात्मक जगावेगळे बुद्धिमान**

मानवी इतिहासात सर्वसामान्यांपेक्षा वेगळे, अपवादात्मक, प्रतिभावान किंवा विद्वान आढळून येतात. मोझार्ट चवथ्या वर्षीच पियानोवर करामत दाखवू लागला होता; तर कुमारगंधर्व वयाच्या नवव्या वर्षीच गायन चमत्कार दाखवू शकले. जेम्स मिल्ल हाही वयाच्या सातव्या वर्षीच विलक्षण बुद्धिमत्तेचे वाचन पचवू शकत असे, तर बाराव्या वर्षी तो ग्रंथलेखनाकडेही वळला होता. आईनस्टिन हा विसाव्या शतकातील सर्वात बुद्धिमान मनुष्य म्हणून ओळखला गेला. एककल्ली इतिहासकार विद्वानांची उदाहरणेही आपल्याकडे आहेत. एखाद्या बुद्धिमत्तेच्या संदर्भात टोकाची प्रतिभा दाखविणाऱ्यांची उदाहरणे असणे, हा एक निकष, गार्डनर यांनी दिला आहे.

**3) कार्यप्रवणतेचे गाभाभूत क्षेत्र**

तार्किक विश्लेषणाच्या अंगाने पाहता बुद्धिमत्तेचे स्वत:चे असे कार्यप्रवणतेचे गाभाभूत क्षेत्र असले पाहिजे. प्रत्येक बुद्धिमत्ता ही सभोवतालच्या वातावरणातच कार्यप्रवण होत असते, हे लक्षात घेतले तर, गार्डनरच्या मते, काही कृती किंवा रीती त्याविशिष्ट बुद्धिमत्तेशीच संलग्न असतात.

उदाहरणार्थ, भाषिक बुद्धिमत्ता म्हटले म्हणजे तिचे स्वत:चे ध्वनी, शब्दार्थ, वाक्यरचना, वाणी असे कार्यप्रवणतेचे गाभाभूत घटक असतात. ही बुद्धिमत्ता या घटकांकरवीच कार्यप्रवण होत असते. सांगितिक बुद्धिमत्ता घेतली तर उच्च-नीच स्वर, लय, ताल, आवाजाची जात, या घटकांद्वारेच ती अभिव्यक्त होत असते.

#### 4) विकासाचा इतिहास व अंतिम अत्युच्च कौशल्य

मानवी विकासाचा जसा इतिहास आहे तसाच मानवी मनाच्या प्रगतीचा इतिहासही मानसशास्त्रज्ञ मांडतात. त्याच्या अंतर्गत विशिष्ट बुद्धिमत्तेचा विकासपथ अगदी त्याच्या अत्युच्च कौशल्याच्या बिंदूपर्यंत मांडता आला पाहिजे. असा एक निकष, विकास-मानसशास्त्राच्या अंगाने गार्डनर यांनी दिला आहे. याचा अर्थ असा की, बुद्धिमत्तेची अभिव्यक्ती जी केली जाते ते सामान्यत: बुद्धिमत्तेच्या प्राथमिक अवस्थेत नव्हे तर तिच्या प्रगल्भ अवस्थेत केली जाते. त्यासाठी अर्थातच बुद्धिमत्ता विकसीत होत जाण्याच्या अवस्थांतून मनुष्य पुढे जातो. चांगला शल्यविशारद होणे किंवा गणिती होणे या गोष्टी विकासमार्गावरून जात जात अंतिमत: प्रगल्भ अवस्थेत जाण्याच्या गोष्टी आहेत.

#### 5) उत्क्रांतीच्या इतिहासातील स्थान

मानवी उत्क्रांतीचा अभ्यास मानववंशशास्त्र करीत असते. या इतिहासात मनुष्य आपली बुद्धिमत्ता अनुभवांच्या आधारे विकसीत करत गेल्याचे भरपूर पुरावे मिळतात. या इतिहासातच विशिष्ट बुद्धिमत्तेच्या विकासाचेही धागेदोरे आढळले पाहिजेत, स्पष्ट झाले पाहिजेत, असा निकष गार्डनर यांनी दिला आहे. विशिष्ट बुद्धिमत्ता ही मानवी विकासात भरच घालत असते. उदाहरणार्थ, सागरी मोहिमांमध्ये, अवकाशीय बुद्धिमत्ता-नकाशे तयार करणारी बुद्धिमत्ता याचे मोठे स्थान आहे.

#### 6) प्रयोग-मानसशास्त्राचा आधार

प्रत्येक बुद्धिमत्तेच्या स्वत:च्या क्षेत्रात तिचे स्वत:चे असे ठराविक काम असते. ते वेगळे दाखविता आले पाहिजे आणि तिचे मोजमापही शक्य झाले पाहिजे. प्रयोग-मानसशास्त्राच्या आधारे असे दाखविता आले पाहिजे की दोन कामे कितपत एकमेकांशी संबंधित आहेत किंवा वेगळाली आहेत. उदाहरणार्थ, एखादा मनुष्य उत्स्फूर्तपणे काही लिहीत असेल तर त्याचवेळी संभाषणाचे काम तो करू शकणार नाही. कारण, या दोन्हींसाठी भाषिक बुद्धिमत्तेची गुंतवणूक लागते. आणि ती एके ठिकाणी केंद्रित केली असता त्याचवेळी दुसरीकडेही वापरणे शक्य होणार नाही. याउलट, चालणे आणि चालता चालता संभाषण करणे सहज शक्य असते. कारण, चालणे ही शारीरिक कौशल्याची बाब आहे संभाषण करणे ही भाषिक कौशल्याची.

#### 7) मापन-मानसशास्त्राचा आधार

पारंपरिकरित्या बुद्धिमत्तेचे (म्हणजे गार्डनरच्या भाषेत गणिती व भाषिक बुद्धिमत्तांचे) मोजमाप बुध्यांकांच्या सहाय्याने केले जाते. गार्डनरचा बहुविध बुद्धिमत्तांचा सिद्धान्त अशाप्रकारे इतरही बुद्धिमत्तांच्या मोजमापाची शक्यता नाकारत नाही.

#### 8) प्रतिकात्मक भाषेत मांडता येणे

माणसाने आपल्या उत्क्रांतीत वेगवेगळ्या अभ्यास क्षेत्रात अनेक प्रकारच्या प्रतिकात्मक व्यवस्था निर्माण केल्या आहेत; आणि त्यांचा हेतू, गार्डनरच्या म्हणण्यानुसार, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची माहिती नेमकेपणाने नि व्यवस्थितरित्या सांगता येणे हा आहे. प्रत्यक्ष लिखित किंवा बोली

भाषा, गणिती संकल्पनांची प्रतिकात्मक भाषा, चित्रांकित भाषा, नकाशे, वेगवेगळे आलेख ही सर्व याची उदाहरणे म्हणून सांगता येतील.

या विविध निकषांवर तपासून गार्डनर यांनी आधी दिलेल्या सात बुद्धिमत्तांबरोबरच अलीकडे निसर्ग विषयक बुद्धिमत्तेचा समावेश या यादीत केला. अध्यात्मिक बुद्धिमत्ता (Spiritual Intelligence) आणि अस्तित्वात्मक बुद्धिमत्ता (Existential Intelligence) असे आणखी दोन उमेदवारही त्यांच्या विचाराधीन आहेत.

गार्डनर यांनी मांडलेल्या बहुविध बुद्धिमत्तेच्या सिद्धांतातील प्रत्येक बुद्धिमत्ता ही इतर बुद्धिमत्तांपेक्षा वेगळी असते, अलग असते. आणि हे तिचे अलगपण मेंदूमधील त्यांच्या त्यांच्या स्थानांवरून स्पष्ट झाले आहे. मात्र प्रत्यक्ष व्यवहारात, एक-दोन किंवा अनेक बुद्धिमत्ता एकत्र येऊन कार्य करीत असतात. अशावेळी त्या एकमेकांना पूरक होऊन काम करीत असतात. प्रत्येक बुद्धिमत्तेचा विकासपथ वेगळा; वेगळ्यादिशेने जाणारा असला तरी सर्वांच्याच विकासाचा पथ काही समान अशा पायऱ्यांनी सजलेला असतो. प्रत्येक बुद्धिमत्तेच्याबाबतीत विकासपथाची सुरूवात होते ती मन:पटलावर 'कच्च्या प्रतिमा' (raw patterning) ची निर्मिती करून आणि अशा निर्मितीची क्षमताही मात्र सार्वत्रिक गोष्ट असते. साधारणत: पहिल्या वर्षात बालक या पद्धतीने आपल्या विकासाची-जगाच्या ओळखीची सुरूवात करीत असते; आवाज, रंग, चेहरे यांच्यातील फरक जाणून घेत असते.

याच्या पुढची पायरी असते ती 'प्रतीक व्यवस्थेत' (symbol system) शिरण्याची. पुढील सहा-सात वर्षे या दिशेने बालक वेगाने प्रगती करीत जाते. शब्दरूपांतून, वाक्यरूपांतून भाषा आत्मसात करणे, बडबडगीते, बालगीते, गाणी, भिन्न भिन्न आवाज याकरवी संगीताशी जवळीक केली जाते. वेगवेगळे अंगविक्षेप करणे, नाचणे, उड्या मारणे यातून शरीर स्नायू विषयक बुद्धिमत्तेची वाढ होत जाते. अशा प्रकारे वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रतीकांचे आकलन करून बालकांची विविध बुद्धिमत्तांची कौशल्ये प्रगट केली जातात. त्यानंतर, प्रत्येक बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात प्राप्त झालेल्या प्रतीकांच्या सहाय्याने विकासाची पुढची पायरी 'चिन्हांकित व्यवस्थे'ची (notional system) गाठली जाते. भाषा, गणित, संगीत, क्रिडा या प्रत्येकच क्षेत्राची स्वत:ची चिन्हांकित व्यवस्था असते आणि या अमूर्त स्तरावरील चिन्हांकित व्यवस्थांची ओळख आपण मुलांना शाळांमधील अभ्यासांतून देत असतो. प्रौढ वयात मात्र कित्येक तांत्रिक व इतर व्यवसायांत लोक आपापल्या विशेष बुद्धिमत्तांना अवसर देत असतात आणि विशिष्ट बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून वावरू लागतात.

''आपल्या वास्तव जीवनात येणारे प्रश्न सोडविण्याची क्षमता, नवे प्रश्न समोर उभे करून ते सोडविण्याची क्षमता आणि आपल्या संस्कृतीच्या चौकटीत जिला काही किंमत आहे, मूल्य आहे अशा एखाद्या वस्तूची किंवा सेवेची निर्मिती करण्याची पात्रता अशी 'बुद्धिमत्ते'ची व्याख्या, गार्डनर यांनी केलेली आहे. त्यांच्या मते बुद्धिमत्ता हे जसे प्रश्न सोडविण्याचे किंवा काही निर्मिती करण्याचे साधन आहे. त्याचप्रमाणे ते, शिकण्याचेही साधन आहे. ज्याप्रमाणे प्रत्येकच बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात निर्मितीक्षमता प्रत्ययाला येते, त्याचप्रमाणे कोणतीही गोष्ट शिकण्याचे, आत्मसात करण्याचे मार्ग प्रत्येक बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात दडलेले आहेत.'' जगातील बहुतेक लोक एखाद-दुसऱ्या बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात आपली निर्मितीक्षमता प्रकट करतात. विसाव्या

शतकातील सर्वात बुद्धिमान म्हणून मानला गेलेला आईन्स्टीनलाही गणिती-तार्किक बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात उत्तुंग असे कर्तृत्त्व व्यक्त करता आले; पण तेवढीच क्षमता त्याला भाषिक अथवा शारीरिक बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात दाखविता आली नाही. कुमार गंधर्वांनी सांगितिक बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात महान कर्तृत्व दाखविले पण भाषिक, शारीरिक वा सृष्टपदार्थविषयक बुद्धिमत्तेच्या क्षेत्राशी त्यांची फारशी जवळीक नव्हती. याचा अर्थ असा की प्रत्येकाला विविध बुद्धिमत्तांचा जो काही पट प्राप्त झालेला असतो, त्यामध्ये एखाद-दुसरी बुद्धिमत्ता अधिक तीव्रतेने प्रत्ययाला येते नि ती बुद्धिमत्ता हे त्या व्यक्तीचे कर्तृत्वाचे क्षेत्र असते; इतर क्षेत्रांमध्ये मर्दुमकी जागवणे त्याला महाकर्मकठीण ठरते.

हॉवर्ड गार्डनर यांचे वैशिष्ट्य असे की मानवी बुद्धिच्या चलनवलनाचे आकलन करवून घेणे एवढ्यापुरतेच त्यांचे कार्य मर्यादित नाही. जगाची, या मानवी जीवनाची आणि माणसाच्या बौद्धिक वर्तनाची केवळ ओळख करून घेणे पुरेसे नाही, तर त्यात बदल घडवून आणण्याची त्यांची ईर्षा आहे. आणि हा बदल घडवून आणणे हे शिक्षणाचे काम आहे अशी त्यांची भावना आहे. 'इंटलिजिन्स रिफ्रेम्ड : मल्टिपल इंटलिजन्सेस फॉर टवेंटीफर्स्ट सेंच्युरी' या आपल्या 1999 सालच्या पुस्तकात त्यांनी या भावनेला असे शब्दरूप दिले आहे : 'मला, मुलांनी जगाचे आकलन करून घ्यायला हवे आहे, पण ते केवळ जग आकर्षक आहे आणि मानवी मन उत्सुकतेने भरले आहे म्हणून नव्हे, तर जग अधिक चांगले बनविण्याची पात्रता त्यांच्यामध्ये यावी म्हणून त्यांनी ते समजावून घेतले पाहिजे. ज्ञान आणि नैतिकता एक नाहीत. पण, आपल्याला पूर्वीच्या चुका वगळून अधिक उत्पादक दिशेने जायचे असेल तर त्या दोन्हींची आवश्यकता आहे. जगाच्या आकलनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे आपण कोण आहोत आणि आपण काय करू शकतो हे समजावून घेणे. अखेरीस आपण आपल्या ज्ञानाचे सार आपल्यासाठीच काढले पाहिजे. आपल्या या आकलनाच्या आधारेच, या अपूर्ण जगात ज्ञानाचा उपयोग बरे किंवा वाईट घडविण्यासाठी आपल्याकडून केला जाणार आहे.'

जगात चांगल्या दिशेने म्हणजेच सत्य,शिव, सौंदर्याच्या दिशेने जाण्यासाठी व्यवहारात शिक्षणाला आता वेगळ्या दिशेने नेण्याची गरज हॉवर्ड गार्डनर, आपल्या अलीकडच्या लेखनात प्रतिपादन करतात. आपली आजची धोरणे आता आपल्याला भाविकालासाठी उपयुक्त ठरणारी नाहीत; तर मानवी मनाच्या, मानवी बुद्धीच्या नव्या आकलनाच्या आधारे आपल्याला शिक्षणविषयक धोरणे व व्यवहार अंगिकारावा लागणार आहे. याची जाणीव, गार्डनर यांनी, आपल्या 'द डिसप्लिंड माईंड' (1999) या ग्रंथात करून दिली आहे. या ग्रंथाच्या 2000 साली प्रसिद्ध झालेल्या नव्या आवृत्तीला गार्डनर यांनी एक पुस्ती जोडली आहे. त्याच्या अखेरच्या परिच्छेदात, त्यांनी म्हटले आहे: 'मला असे वाटते की, आपल्या आजच्या परीक्षा पद्धती, कितीही चांगल्या हेतूंनी ठरविलेल्या असोत, त्या मूलत: चुकीच्याच आहेत. ज्या काळात, माहितीचा मोठा डोंगर जवळ असलेल्या माणसाला सुशिक्षित समजले जात होते, अशा यापूर्वीच्या काळाला साजेसे असे शिक्षण देण्याच्या खटपटीत अजून आपण आहोत. आता, उद्याच्या जगासाठी आणि विशेषत: मन, बुद्धी, मेंदू आणि मुले किंवा शिक्षक यांच्या संस्कृती, याविषयी जी काही नवी माहिती आता उपलब्ध झाली आहे ती पाहता, अगदी मूलत: वेगळ्या अशा शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे. या भाविकालाभिमुख अशा शिक्षणात, वेगवेगळ्या ज्ञानशाखांवरील

प्रभुत्वाची गरज तर आहेच, पण त्याचबरोबर, नव्याने भेटणाऱ्या प्रश्नांना सोडविण्याची आणि नवीन विचारधारा निर्माण करण्याची लवचिकता नि क्षमता त्यात आली पाहिजे. शिक्षणशास्त्र हे कधीही पूर्णशास्त्र होणार नाही; पण ते आज, भूतकालाकडे वळणाऱ्या शिक्षणाच्या चुकीच्या मांडणीच्या आणि आज मन, ज्ञाननिर्मितीच्या नि पुनर्निर्मीतीच्या कार्यात कसे वर्तन करते याचे होणारे ज्ञान यांच्या सीमारेषेवर उभे आहे.'

### भारतीय शिक्षणाचा विचार

भारतातील बालकांच्या शिक्षणाचा विचार या बहुविध बुद्धिमत्तांच्या सिद्धांताच्या अंगाने करताना, आपल्याला बाल शाळांतून नि प्राथमिक शाळांतून पहिली कोणती गोष्ट सविस्तरपणे केली पाहिजे तर ती म्हणजे बालकांना, म्हणजेच त्यांच्या बुद्धिमत्तांना वाढीची सुरूवात करून देणारा अवसर देणे नि त्यासाठी घरी-दारी नि शाळांतून शेकड्यांनी संधी पुरविणे. साधारणपणे 'प्रतीक व्यवस्थे' कडून 'चिन्हांकित व्यवस्थे' कडे वळताना मुले आपापल्या विशिष्ट बुद्धिमत्ता अभिव्यक्त करताना दिसतात. आपल्यातील उपजत क्षमता प्रगट करू लागतात. यात त्यांची परीक्षा होत जाते. त्यासाठी लेखी प्रश्नोत्तरांच्या परीक्षा निरूपयोगी असतात. त्यांना द्यायची असतात ती प्रत्येक बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील शोध घेणारी साधने, सराव देणारे साहित्य. त्यांना पुरवायचे असतात ते विविध बुद्धिमत्तांना आव्हान देणारे आणि त्यांच्या निर्मितीक्षमतेला वाव देणारे खाद्य. आपापल्या संस्कृतीच्या, आजूबाजूच्या वातावरणात देता येतील असे जिवंत अनुभव. ज्यातून त्यांचा एका टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यात होणारा विकास प्रवास सहजपणे, पण तरीही नवी नवी आव्हाने पेलत होऊ शकेल.

घरातील प्रौढांना-पालकांना नि शाळेतील शिक्षकांना आपल्या समोरील मुलांकडे आता वेगळ्या नजरेतून पाहता येणार आहे. मुलांमध्ये काय, कसे नाही याकडे घटकाभर दुर्लक्ष करून काय, किती आहे, याचा शोध त्यांना घ्यायचा आहे. त्यासाठी प्रत्येक मुलाकडे, ती एक विशिष्ट, पण इतरांपासून वेगळा असा बुद्धिमत्तांचा पट प्राप्त झालेली, स्वतंत्र व्यक्ती आहे, आणि तिच्या शिकण्याच्या गरजाही वेगळ्या आहेत हे आता ध्यानात घ्यायचे आहे. त्यांच्याशी बोलण्याची भाषाही बदलायची आहे. शिवाय काखान्यांतील समान वस्तूनिर्मितीप्रमाणे समान व्यक्ती निर्मितीकडे शाळांना जाऊन चालणार नाही. हे आता शिक्षकांना, शाळाचालकांना नि धोरणकर्त्यांना शिकावे लागणार आहे. सर्वांना समान वेळात, समान विषयांचे, समान पद्धतीने शिक्षण नि सार्वत्रिक समान लेखी परीक्षांतून समान मूल्यमापन या गोष्टी आता विविध बुद्धिमत्तांच्या शक्यतांच्या अंगांनी तपासून घ्यायला हव्या आहेत आणि बदल करण्याचा धीटपणाही, एक समाज म्हणून आपल्याला दाखवावा लागणार आहे.

आपली सारी शिक्षणव्यवस्था केवळ दोनच म्हणजे भाषिक नि गणिती-तार्किक बुद्धिमत्तांच्या अपेक्षित विकासावर बेतली आहे, आणि बुद्धिमत्तांची इतर बरोबरीची क्षेत्रे त्यांत दुर्लक्षिली गेली आहेत. आपली शालेय शिक्षणव्यवस्था या अर्थाने पाहता, 'सर्वसमावेशक' नाही असे निदान आपल्याला करता येते. परिणामत: असे दिसून येते की, ज्या मुलांच्या नैसर्गिक बुद्धिमत्तांचा पट भाषिक नि गणिती या दोन बुद्धिमत्तां व्यतिरिक्त अन्य बुद्धिमत्तांना अधिक अवसर देते आणि अशी मुले आपल्या प्रौढ जीवनात आपल्या विशिष्ट बुद्धिमत्तांच्या आधारावर यशस्वी होतात, असे व्यवहारात उघडपणे दिसून येत असले, तरी ती मुले

त्यांच्या शाळेने मात्र 'ढ' म्हणून किंवा 'नापास' म्हणून नाकारलेली असतात, कित्येकदा अल्पवयातच शाळेबाहेर फेकलेली असतात.

आपल्या आजुबाजूच्या वस्तू, घटना आणि माणसांच्या जगाचे आकलन करून घेणे म्हणजे ज्ञान मिळविणे. असे ज्ञान मिळविण्याची उपजत प्रेरणा, त्यासाठी लागणारी पंचेंद्रियांसारखी साधने आणि विशिष्ट बुद्धिमत्तांची क्षेत्रे सर्वसामान्यपणे प्रत्येकासच प्राप्त झालेली असतात. लहान वयातील ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया ही बौद्धिक पातळीवर प्रतिके निर्माण करून होणारी प्रक्रिया असते; आणि महत्त्वाची बाब अशी की अशा प्रकारची प्रतीके निर्माण करत करत ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया सातत्याने चालू ठेवण्याची क्षमता बुद्धिमत्तेच्या प्रत्येकच प्रकारात अनुस्युत असते. त्यामुळे शिक्षण व्यवहारात काय नि पुढे व्यवसायातील उमेदवार निवडीच्या संदर्भात काय, केवळ भाषिक नि तार्किक-गणिती बुद्धिमत्तेच्या प्रभावाला झुकते माप देणे हे व्यक्तिगत पातळीवर जेवढे अन्यायाचे आहे तेवढेच ते सामाजिक स्तरावर विषमता नि अकार्यक्षमता निर्माण करणारे आहे. ज्यांना ज्या बुद्धिमत्ता अधिक तीव्रतेने लाभलेल्या असतात; त्यांचा वापर करून जगाचे आकलन करण्याची, ज्ञानप्राप्तीची प्रेरणाही व्यक्तीला उपजतच असते. त्यामुळे शाळेने नाकारलेली माणसे, जर ती घटना फारशी मनाला लावून घेतली नाही तर आपापल्या बुद्धिमत्तांच्या जोरावर आपल्याला मानवणाऱ्या क्षेत्रात बौद्धिक कर्तृत्व दाखवू शकतात. अगदी महान बुद्धिमान म्हणून मान्यता पावलेले अनेक नोबेल पारितोषिक विजेते, त्यांना त्यांच्या शालेय शिक्षणाने फारसे काही दिले नाही असे सांगतात. 'आपण शाळेत गेलोच नाही त्यामुळे आपण गुणवत्तेच्या कृत्रिम वजन मापांपासून बचावलो,' असे रवींद्रनाथ टागोरही स्पष्टपणे सांगतात.

बहुविध बुद्धिमत्तांच्या सिद्धांताचा हा आशय आपण समजून घ्यायचा आहे.

✦✦✦

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## अर्थसंवादसाठी अनुदान

परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), नवी दिल्ली यानी अर्थसंवादच्या अंकांच्या प्रकाशनाच्या खर्चासाठी पन्नास हजार रूपयांचे अनुदान मंजूर केल्याचे परिषदेला कळविले आहे. सन 2008-2009 या वर्षासाठी मंजूर केलेल्या विशेष अनुदानाबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषद भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेची कृतज्ञ आहे.

**कार्यवाह-खजिनदार**

# अर्थसंकल्प 2008 मध्ये दडलंय काय ?

✦ वि.म. गोविलकर, नाशिक.

*सनदी लेखापाल व प्राध्यापक*

**2008** चा अर्थसंकल्प सादर झाला आणि त्यावर 'मतदारांना खूष करणारा अर्थसंकल्प', निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मांडलेला अर्थसंकल्प अशा प्रकारच्या प्रतिक्रिया उमटल्या. 'राजकीय लाभ' हा मुद्दा विशेषत: समाजासमोर आला आहेच मात्र त्याबरोबरच या अर्थसंकल्पाचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम सुद्धा तपासून पाहिला पाहिजे. अर्थसंकल्पाचे विश्लेषण

1. दोन मोठ्या घोषणा, 2. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चांगले प्रस्ताव, 3.करायला हवे पण काहीच केले नाही अशा बाबी, 4.अल्पसंख्यांकांसाठी बरेच काही, 5.काही चिंताजनक आकडेवारी, 6.प्रश्न व शंका निर्माण करणारी निवेदने.

या मुद्यांच्या आधारे करण्याचा हा प्रयत्न होय.

**1. दोन मोठ्या घोषणा**

या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी दोन मोठ्या घोषणा केल्या, त्याने साऱ्या देशवासियांचे लक्ष वेधून घेतले. ऐकतांना वाचतांना ते खूप चांगले वाटले. त्यामागे भलंबुरं सगळच झाकलं गेलं. सुरूवातीला त्या दोन घोषणा त्यांचा तपशील आणि परिणाम पाहू या.

**शेती कर्ज मुक्ती**

भारतातील शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला आहे. शेतीत अपेक्षित उत्पादन होत नाही, पुरेसे उत्पन्न मिळत नाही आणि गांजलेला शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहे. कर्जफेड करणे त्याला शक्य होत नाही. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देणारी कर्जमुक्तीची घोषणा अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात केली. या योजनेच्या प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे.

सर्व प्रकारच्या शेती कर्जासाठी ही योजना लागू राहील (उदा. बियाणे,खते,

फवारणी,जनावरे, शेतीची अवजारे,विहीर, इत्यादी साठीची कर्जे.)

जी कृषी कर्जे 31/3/07 पर्यंत वितरित (disbursed) केली आहेत. आणि 31/12/07 पर्यंत थकीत (overdue) झाली आहेत अशी कर्जे या योजनेस पात्र असतील.

अनुसूचित व्यापारी बँका,क्षेत्रीय ग्रामीण बँका (RRBs) आणि पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था (Co-operative credit institutions) यांनी दिलेल्या शेती कर्जांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

दोन हेक्टर अथवा त्यापेक्षा (म्हणजेच पाच एकर) कमी जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जे माफ करण्याची ही योजना आहे. त्यापेक्षा जास्त जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी एकाच खेपेत ऋणपूर्ति (one time settlement) योजना जाहीर करण्यात आली आहे. अशा शेतकऱ्यांनी कर्जापोटी देय रकमेच्या 75% रक्कम भरली तर त्यांना 25% सूट देण्याची तरतूद त्यात आहे.

ज्या कृषीकर्जांची पुनर्रचना (Restructure) आणि पुनरअनुसूची (Reschedule) करण्यात आली आहेत त्यांनाही कर्जमुक्ती (दोन हेक्टरपेक्षा कमी भूधारक) आणि कर्जमाफी सवलत (दोन हेक्टरपेक्षा जास्त भू धारक) लागू होणार आहे.

कर्जमुक्ती व कर्जमाफी सवलत योजनांची अंमलबजावणी 30/6/2008 पर्यंत पूर्ण करायची असून त्यानंतर असे शेतकरी बँकांच्या सामान्य नियमाप्रमाणे पुन्हा कर्ज घेण्यास पात्र ठरणार आहेत.

अर्थमंत्र्यांनी अंदाज व्यक्त केल्यानुसार या योजनेचा लाभ 3 कोटी अल्पभूधारक व 1 कोटी अन्य शेतकऱ्यांना म्हणजेच 4 कोटी शेतकऱ्यांना मिळेल.

कर्जमुक्ती योजनेखाली रू. 50,000 कोटी तर कर्जमाफी सवलत योजनेखाली रू. 10,000 कोटी असा एकूण रू. 60,000 कोटींचा लाभ शेतकऱ्यांना मिळेल.

कर्जमुक्ती/सवलत योजनेची ठळक वैशिष्ट्ये पाहिल्यावर तिच्या परिणामांचा विचार करता येईल.

ज्या शेतीची कर्जे थकित (overdue)किंवा पुनर्रचीत आणि पुनरअनुसूची (Restructured & Rescheduled) आहेत त्यांनाच या योजनेचा लाभ मिळणार आहे म्हणजेच ज्या शेतकऱ्यांनी आपल्या कर्जावरील व्याज/हप्ता नियमित भरला असेल अशा प्रामाणिक कर्जदारास मुक्ती नाही. सवलत नाही.

स्वातंत्र्यानंतर कर्जमुक्ती/सवलत देणारी ही तिसरी योजना आहे. प्रत्येक वेळी कर्जमुक्ती/सवलतीची रक्कम वाढत आहे. गेल्या वेळी ही रक्कम रू. 10,000 कोटी होती,ती आता रू. 60,000 कोटी झाली. वारंवार अशा घोषणा झाल्या तर कर्ज परतफेड न करण्याची वृत्ती वाढीस लागणार यात शंका नाही.

या कर्जमुक्ती/सवलतीचा बोजा उचलणार कोण ? अर्थमंत्र्यांनी घोषणा केल्याबरोबर शेअर बाजारातील बँकांच्या शेअर्सचे भाव खाली आले. सुरुवातीला वाटले की हा भार बँकांना सहन करावा लागेल त्यामुळे त्यांचा नफा खूपच खाली येईल. अर्थमंत्र्यांनी त्यांच्या मुलाखतीत म्हटले की हा तोटा बँकांना उचलावा लागणार नाही. परंतु रू. 60,000 कोटींची तरतूद अर्थसंकल्पामध्ये कुठेच आढळत नाही. म्हणजेच बँकांनी हा बोजा पेलायचा नाही आणि अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे. अर्थात अर्थमंत्री बँकांना (विशेषत: खाजगी क्षेत्रातील व सहकारी क्षेत्रातील) कर्जमुक्ती/सवलत देण्यासाठी सक्ती करू शकणार

नाहीत, त्यांनी तसे केलेच तर बँकिंग क्षेत्राचे कंबरडे मोडेल आणि कायदेशीर मार्गाने बँका त्यास विरोध करतील. मग ही घोषणा करतांना अर्थमंत्र्यांनी इतक्या मोठ्या रकमेची व्यवस्था कोठून लावली? ती आत्ता तरी लावलेलीच नाही. कदाचित अर्थसंकल्पातील तूट मर्यादित दाखविण्यासाठी ही युक्ती त्यांनी केली असावी. आता कर्जरोखे वगैरे माध्यमातून बँकांना त्यातून मार्ग काढून दिला जाईल.

अखेर शासन रू. 60,000 कोटींचा बोजा उचलणार आहे, तो कर्जमुक्ती आणि सवलत यापेक्षा अन्य मार्गाने उचलला असता तर शेतीक्षेत्रासाठी भरीव असे बरेच काही करता आले असते. रू. 60,000 कोटी ही रक्कम घसघशीत आहे. त्यातून खालीलपैकी काही करायला हवे होते -

अ. शेतीसाठी लागणारी निविष्ट (Inputs) (जशी बियाणे,खते,पाणी,वीज इत्यादी) यांची चांगली व दीर्घकालीन व्यवस्था.

ब. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी योजना

क. शेतमालाची विक्री व्यवस्था

ड. शेतमालास वाजवी किंमत मिळेल अशी व्यवस्था

यापैकी काहीही कारणासाठी रू. 60,000 कोटींचा वापर शासनाने केला असता तर शेतीक्षेत्रास दीर्घकालीन मोठा लाभ होऊ शकला असता तसे न करता सवंग लोकप्रियता मिळविण्यासाठी कर्जमुक्ती व सवलत योजना आणून शासनाने राजकोषावर मोठा भार लादून घेतला.

### 2) आयकरातून मोठी सवलत

आयकरातून भरघोस सवलत देण्याची दुसरी मोठी घोषणा या अर्थसंकल्पात करण्यात आली. आयकरासाठी उत्पन्न मर्यादा वाढेल अशी अपेक्षा ठेवणाऱ्यांनाही ती इतकी वाढेल असे वाटले नसावे. तसेच उत्पन्नाच्या सोपानामध्येही (slabs) लक्षणीय वाढ करण्यात आली. ज्यांचे करपात्र उत्पन्न रू. 15,000 पर्यंत आहे त्यांना कर भरावा लागणार नाही. महिला आयकरदात्यांसाठी ही मर्यादा रू. 180,000 आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी (वय 65 वर्षे) रू. 2,25,000 इतकी ठरविण्यात आली. याशिवाय आयकराचे दर उत्पन्न मर्यादेनुसार खालील प्रमाणे प्रस्तावित केले आहेत.

| उत्पन्न | कराचा दर |
|---|---|
| रू.1,50,000 पेक्षा जास्त व रू. 3,00,000 पर्यंत | 10% |
| रू. 3,00,000 पेक्षा जास्त व रू. 5,00,000 पर्यंत | 20% |
| रू. 5,00,000 पेक्षा जास्त | 30% |

करमाफ उत्पन्नाची वाढीव मर्यादा आणि उत्पन्न मर्यादेनुसार करांचे दर या बदलांमुळे करदात्यांना मोठा दिलासा मिळणार आहे यात शंकाच नाही देयकरात होणारी बचत उदाहरणासाठी खालील तक्त्यात दाखविली आहे.

याशिवाय अर्थमंत्र्यांनी ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देणाऱ्या तीन प्रस्तावांचा समावेश

| उत्पन्न | सध्याचा कर | प्रस्तावित कर | कर रकमेत होणारी बचत |
|---|---|---|---|
| रू. 3,00,000 | 40,170 | 15450 | 24720 |
| रू.5,00,000 | 101,970 | 56,650 | 45320 |
| रू. 15,00,000 | 452,067 | 402,503 | 49,852 |

अर्थसंकल्पात केला आहे.

आरोग्य विम्याच्या हप्त्याची रक्कम आयकर कायदा कलम 80D नुसार रू. 15,000 पर्यंत सध्या वजावाटीस पात्र आहे. परंतु आता आयकर दात्याने आपल्या पालकांचा आरोग्य विमा उतरविला आणि त्याचा हप्ता आपल्या उत्पन्नातून भरला तर अशी रक्कम रू. 15,000 पर्यंत आणखी वजावाटीस पात्र राहील. पालक जर जेष्ठ नागरिक म्हणजे 65 वर्षांपेक्षा मोठे असतील तर वजावाटीची ही वाढीव मर्यादा रू. 25,000 प्रस्तावित करण्यात आली आहे. आपल्याला आयकरातून सूट मिळेल या फायद्याने का होईना पालकांचा आरोग्य विमा उतरविण्यास या तरतुदीने प्रोत्साहन मिळू शकेल.

ज्येष्ठ नागरिकांसाठीची बचत योजना व पोस्टातील मुदत ठेवी यातील गुंतवणूक यापूर्वी आयकर कायदा कलम 80 c नुसार वजावाटीस पात्र नव्हती. अर्थसंकल्प 2008 मध्ये तसा प्रस्ताव करण्यात आला आहे.

प्रतितारण (Reverse mortgage) योजना मागील अर्थसंकल्पात आणून वृद्ध नागरिकांना आपले घर न विकता रोख रक्कम मिळत राहण्याची तरतूद अर्थमंत्र्यांनी केली होती. परंतु त्या मिळणाऱ्या रकमेच्या कर आकारणी विषयी साशंकता होती. ती या अर्थसंकल्पात दूर करून दिलासा दिला आहे. प्रतितारण (Reverse mortgage) करतांना घराचे हस्तांतरण होत नाही व त्यामुळे भांडवली नफा कर लागू होत नाही. तसेच बँकांकडून मिळत राहणारी रक्कम हे उत्पन्न नाही आणि म्हणून ते करपात्र नाही असे दोन खुलासेवजा प्रस्ताव अर्थसंकल्पात समाविष्ट केले आहेत.

**(2) अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चांगले प्रस्ताव**

शासनास संरक्षक राज्य (Police State) या भूमिके बरोबरच विकासक राज्य (Development state) आणि कल्याणकारी राज्य (Welfare state) म्हणून ही काम करावे लागते. या दृष्टीने अर्थसंकल्प 2008 मध्ये निश्चितच काही चांगले प्रस्ताव आहेत ते असे -

1) मंदीवर उपाय

आगामी काळात मंदीची चाहूल लागल्याचा उल्लेख अर्थमंत्र्यांनी केला. सुमारे वीस वर्षांपूर्वी भारतात आलेली मंदी खोलवर रूजली व दूरवर पसरली. सुमारे 6/7 वर्षे मंदीचा तडाखा अर्थव्यवस्थेने सहन केला. या अनुभवावर व अमेरिकेतील मंदीच्या वास्तवाचे भान ठेवून अर्थसंकल्पात काही पावले उचललेली दिसतात.

अर्थव्यवस्थेत येणारी मंदी ही प्रामुख्याने मागणीत घट झाल्याने येते. मागणीत घट होण्याची कारणे म्हणजे ग्राहकांच्या क्रयशक्तीत घट आणि वस्तुंच्या किंमतीत वाढ ! अर्थसंकल्पात क्रयशक्ती वाढविण्याच्या दृष्टीने आयकरात कपात केलेली दिसते. वर नमूद केल्याप्रमाणे ज्यांचे उत्पन्न रू. 3,00,000 प्रतिवर्षी आहे त्यांना 24,720 रूपयांचा तर ज्यांचे उत्पन्न रू. 5,00,000 प्रतिवर्षी आहे त्यांना 45,320 रूपयांचा कमी कर भरावा लागणार आहे. याचा अर्थ त्यांचे विनियोज्य उत्पन्न (Disposable Income) उत्पन्न म्हणजेच क्रयशक्ती दरमहा अनुक्रमे सुमारे 2000 रूपये व 3750 रूपये इतकी वाढली आहे. त्यामुळे मागणीत वाढ होणे स्वाभाविक आहे. शेतीकर्जमुक्ती जाहीर केल्याने शेतकऱ्यांना कर्जावरील व्याज व हप्ता भरण्याची गरज उरणार नाही आणि त्यामुळे खर्च करण्यासाठी त्यांचेकडेही जास्त उत्पन्न शिल्लक राहील. त्यामुळेही बाजारात वस्तू व सेवांची मागणी वाढू शकेल.

दुसऱ्या बाजूने वस्तुंच्या किंमती कमी व्हाव्यात म्हणून उत्पादनशुल्काच्या कमाल दरात कपात करून तो दर 16% वरून 14% पर्यंत घटविण्यात आला. छोट्या गाड्यांचे उत्पादन शुल्क

16% वरून 12%, संकरित(Hybrid) कारचे उत्पादनशुल्क 24% वरून 14% इतके कमी केले. दुचाकी व तीनचाकी वाहनांचे उत्पादनशुल्क ही 12% पर्यंत आणले. या प्रस्तावामुळे वस्तूंच्या उत्पादनावरील कर कमी होईल आणि त्याचा परिणाम म्हणून किंमतीही कमी होतील. किंमत कमी झाली की मागणी वाढेल व मंदीतून मार्ग काढता येईल.

वाहन उद्योगावरील उत्पादन शुल्क कमी केल्याने त्या उद्योगाला चालना मिळेल आणि हा उद्योगच असा आहे की ज्यामुळे अनेक पूरक उद्योग बहरतील. त्यामुळे रोजगार वाढेल व परिणामत: उत्पन्न वाढेल आणि मागणीही वाढेल. सेवाकराची करपात्र मर्यादा रू. 8,00,000 वरून रू. 10,00,000 पर्यंत वाढविल्याने त्या कराचाही बोजा कमी होईल. केंद्रीय विक्रीकराचा दर 3% वरून 2% केल्याने किंमती कमी होण्यास मदत होईल.

आयातशुल्कात कपात करण्यासाठी पुरेसा दबाव असतांनाही या अर्थसंकल्पात तसे केलेले नाही. आयातशुल्काचे दर कमी केले असते तर आयात केलेल्या वस्तूंच्या किंमती कमी झाल्या असत्या आणि स्थानिक उत्पादनांना त्यांच्याशी स्पर्धा करणे अवघड झाले असते. स्थानिक उत्पादनांची मागणी त्यामुळे कमी झाली असती. आयात शुल्क कपात न केल्याने अर्थमंत्र्यांनी हे टाळणे आहे.

मागणी वाढविणे, किंमती कमी करणे आणि आयात मालाची स्पर्धा मर्यादित राखणे या उपायांबरोबरच उद्योगांना सहाय्य करण्याचीही काही पावले उचललेली दिसतात. त्यात हातमाग, पावरलूम व हस्तव्यवसाय यांच्या विकासासाठी सहा ठिकाणी अवाढव्य समूह (Mega Cluster)सुरू करण्याच्या योजनेचा समावेश करायला हवा. अत्यंत छोटे, लघु व मध्यम उद्योगांसाठी 'सिडबी' (SIDBI) च्या माध्यमातून काही सवलती देण्याचा प्रस्ताव अर्थसंकल्पात आहे. हमी शुल्का(Gurantee Fee) मध्ये 0.5% कपात, पाच लाख रूपयांपर्यंतच्या कर्जावरील वार्षिक सेवा खर्चा मध्ये 0.25% कपात. या तरतुदींबरोबरच सिडबी मध्ये जोखीम भांडवल पुरवठा (Risk capital financing) करण्यासाठी आणि पुनर्वित्त क्षमता वाढविण्यासाठी दोन प्रकारचे निधी सुरू करावेत व त्यासाठी प्रत्येकी रू. 2000 कोटींची तरतूद सुचविण्यात आली आहे.

**2) शिक्षण**

आदर्श शाळा उपक्रमाची सुरूवात करून सन 2008-09 मध्ये 6000 शाळा उघडण्याचा निर्धार अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला. उच्च दर्जाच्या ह्या आदर्श शाळांसाठी रू. 640 कोटींची तरतूद अर्थसंकल्पात आहे. ज्या प्रांतात केंद्रीय विद्यापीठे नाहीत तिथे 2008-09 या वर्षात 19 केंद्रीय विद्यापीठे सुरू करण्याचेही प्रस्तावित आहे.

**3) राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना**

असंगठित क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील कामगारांना आरोग्य विम्याचे संरक्षण पुरविण्याच्या हेतूने ही योजना प्रस्तावित केली आहे. सदर कामगार व त्याच्या कुटुंबातील व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. केंद्र शासन व राज्य शासन संयुक्तपणे या विम्याचा हप्ता भरणार आहेत. जीवन विम्यापेक्षा हा आरोग्य विमा निश्चितच अधिक उपयोगी ठरेल असे वाटते. शासनाने या योजनेसाठी रू. 205 कोटींची तरतूद केली आहे. ही रक्कम प्रत्यक्षपणे लाभार्थींना वाटायची नाही हा या योजनेतील सर्वांत चांगला मुद्दा आहे. या रकमेचा विनियोग विमा कंपन्यांना हप्ता भरण्यासाठी वापरायचा आहे आणि आरोग्य विम्याचे रू. 30,000 पर्यंतचे संरक्षण सदर कामगारांना मिळणार आहे. दिल्ली, हरियाणा व राजस्थान या तीन राज्यात ही योजना सुरूवातीला प्रयोग म्हणून राबविली जाणार आहे.

#### 4) जलसिंचन

जलसंपदेच्या क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्याची गरज लक्षात घेऊन सिंचन आणि जलसंसाधन निधि महामंडळ (Irrigation and water Resource finance corporation) स्थापन करण्याचा प्रस्ताव अर्थसंकल्पात मांडण्यात आला आहे. या मंडळाचे सुरूवातीचे भांडवल रू. 100 कोटी असेल व ते केंद्र शासन पुरवेल. राज्य सरकारे व इतर वित्तीय संस्थांना यात सहभागी करून घेण्यात येईल व या मंडळाद्वारे जलसिंचन प्रकल्पांसाठी निधी उभारला जाईल.

#### 5) कौशल्य विकास कार्यक्रम

भारतात सध्या 77.5 कोटी लोकसंख्या कष्टकरी वयोगटातील आहे.(working age) व ही संख्या दिवसेंदिवस वाढतच जात आहे. परंतु या मंडळींना रोजगारयोग्य (employable) करण्याच्या दृष्टीने त्यांच्यातील कौशल्याचा विकास करण्यासाठी ना नफा तत्त्वावर मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव अर्थसंकल्पात आहे. त्यासाठी रू. 1000 कोटींची सुरूवातीचा तरतूद सुचविण्यात आली आहे. शासकीय खाजगी क्षेत्राकडून यासाठी रू. 15,000 कोटी उभारण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे.

#### 6) स्मार्ट कार्ड

सध्या शासन अन्नधान्यावर मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य देते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून कमी दराने अन्नधान्य पुरवठा करून गरजूंना मदत केली जाते. परंतु सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील (रेशन दुकाने) त्रुटी आता सर्वज्ञात आहेत. शासनाचा मोठा निधी या खात्यावर खर्च होतो परंतु त्याचा तितका लाभ लाभार्थींपर्यंत पोहोचत नाही ही वस्तुस्थिती आहे. सबब हे अनुदान लाभार्थींपर्यंत 'स्मार्टकार्ड' योजनेद्वारे पोहोचविण्याचे अर्थसंकल्पात नमूद केले आहे. हरियाणा आणि चंदीगड या दोन राज्यात 08-09 पासून ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबविली जाणार आहे. हे अनुदान प्रत्यक्ष लाभार्थींपर्यंत पोहोचण्याची ही योजना निश्चितच अभिनंदनीय आहे.

#### 7) देखरेख व्यवस्था

केंद्र शासन अनेक योजना आखते आणि त्यांची अंमलबजावणी राज्य शासन जिल्हा प्रशासन व इतर अंमलबजावणी अभिकरणाच्या(Agency) माध्यमातून करत असते. सदर योजनांसाठी निधीची तरतूद अर्थसंकल्पात करून त्याचे वितरण केंद्र शासन करते. सामान्यतः केंद्र शासन निधीची तरतूद व त्याचे वितरण याकडे लक्ष देते (outlays) परंतु त्यातून होणाऱ्या फलनिष्पत्तीकडे (outcome) फार लक्ष देऊ शकत नाही. केंद्र शासनाचा भर वित्तीय लक्षाकडे (financial) असतो परंतु भौतिक उद्दिष्टांकडे तितक्या गंभीरपणे पाहिले जाते असे नाही. बऱ्याच वेळा या योजनांतील संख्यात्मक (Quantity) बाबींवर नियंत्रण असते पण दर्जाबाबत (Quality) खात्री देता येत नाही. थोडक्यात वित्तीय ध्येये,खर्च आणि परिमाण (financial targets, outlays & Quantity) यांच्या सोबतच भौतिक उद्दिष्टे, फलनिष्पत्ती व गुणवत्ता यासाठी देखरेख व्यवस्था स्वतंत्रपणे असायला हवी ही अत्यंत महत्त्वाची बाब या अर्थसंकल्पामध्ये अधोरेखित करण्यात आली आहे. अर्थमंत्र्यांनी निवेदन केल्या प्रमाणे सध्या केंद्राच्या योजनेतील व केंद्राने पुरस्कारित केलेल्या सुमारे 1000 योजना राबविल्या जात आहेत व ह्यासाठी निधीही पुरविला जात आहे या योजनांवर देखरेख करण्यासाठी व्यवस्था निर्माण करण्याचा संकल्प अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला व ही व्यवस्था केंद्रीय नियोजन मंडळाच्या अधिपत्याखाली ठेवण्याचा चांगला प्रस्ताव अर्थसंकल्पात मांडला आहे.

### 3. करायला हवे पण काहीच केले नाही

अर्थमंत्र्यांनी आपल्या भारतात तीन मुद्यांचा

उल्लेख केला की ज्यासाठी काही तातडीची कृती अपेक्षित आहे. तीनही मुद्दे अर्थव्यवस्थेच्या I दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे व निकडीचे आहेत याचे भान अर्थमंत्र्यांना आहे पण त्यावर काही कृती मात्र करण्याचे त्यांनी टाळले आहे. कोणत्या आहेत त्या तीन बाबी ?

**1. विदेशी पैशाचा ओघ**

अर्थसंकल्पाच्या भाषणातील परिच्छेद 6 मध्ये अर्थमंत्री म्हणतात, "आमच्या देशाच्या चालू खात्यावरील तुटीपेक्षा किती तरी जास्त प्रमाणात विदेशी भांडवलाचा ओघ देशात येत आहे आणि त्याने मुद्रा व्यवस्थापनापुढे एक मोठे आव्हान उभे केले आहे".

1991 मध्ये अत्यंत तुटपुंजी विदेशी चलन गंगाजळी असलेल्या आपल्या देशात आता सुमारे 288 अब्ज डॉलर्स एवढी प्रचंड गंगाजळी झाली आहे. जगात या पहिल्या पाच देशात त्यामुळे भारताचा क्रमांक लागला आहे. परंतु ही चलन गंगाजळीतील वाढ निर्यात अधिक्यामुळे नाही तर विदेशी गुंतवणुकीचा ओढा वाढल्याने आहे (F II & FD1) त्यामुळे त्याच्या व्यवस्थापनाचे एक आव्हान निश्चितच उभे आहे. याचा केवळ उल्लेख अर्थमंत्र्यांनी केला परंतु त्या आव्हानास तोंड देण्यासाठी कोणत्याही उपाययोजनेचे साधे सूतोवाचही त्यांनी केले नाही. विदेशी गुंतवणुकीवर कर आकारणी अथवा विदेशी चलन साठ्याचा पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वापर अशी काही ठोस पावले त्यांनी उचललेली नाहीत.

**2) अन्नधान्य निर्यात**

अर्थसंकल्पाच्या भाषणातील परिच्छेद 8 मध्ये असे नमूद केले आहे की, 'चालू आर्थिक वर्षात देशातील अन्नधान्य उत्पादन 219.32 दशलक्ष टन्स इतके होईल व तो एक विक्रम असेल'. अत्यंत अभिमानाची ही बाब आहे.

परिच्छेद 5 मध्ये ते म्हणतात, 'जागतिक बाजारपेठेत गव्हाच्याकिंमती 88% ने व तांदुळाच्या किंमती 15% ने वाढल्या.

आता ही दोन वाक्ये एकत्रित वाचल्यास भारतातील अन्य धान्यास जागतिक बाजारपेठेत चढ्या किंमती विकण्याची सुवर्णसंधी आहे असे वाटत नाही का ? भरपूर धान्य उत्पादन व साठा आणि जागतिक किंमतीत भरघोस वाढ असतांना शेतकऱ्यांची दारूण अवस्था दूर करण्यासाठी धान्य निर्यातीला चालना देणारी कोणतीही तरतूद अर्थमंत्र्यानी केलेली नाही याचे आश्चर्यच वाटायला हवे.

**3) निर्यात क्षेत्र**

अर्थमंत्री परिच्छेद 90 मध्ये सांगतात "Government is sensitive to the needs of the export sector & will continue to respond symphathetically as the situation demands" डॉलरच्या तुलनेत रूपया सशक्त होत आहे. 1 डॉलर=चाळीस रूपयांपेक्षा कमी कसा विनिमय दर झाला आहे. याचा परिणाम निर्यात कमी होण्यात स्वाभाविक आहे. आता भारतातून वस्तू खरेदी करतांना बाहेरील देशांच्या ग्राहकांना जास्त डॉलर्स मोजावे लागतात म्हणजेच त्यांना भारतातून आयात करणे महाग झाले आहे. याचा फटका भारतीय निर्यातदरांना बसत असून भारताची निर्यात त्यामुळे कमी होण्याची स्थिती आली आहे. याची जाणीव अर्थमंत्र्यानी वरील वाक्यात व्यक्त केली आहे. आज निर्यात कमी होऊ देणे आपल्याला परवडणारे नाही. अशा स्थितीत निर्यात वाढीची कोणतीही उपाय योजना अर्थसंकल्पात केलेली नाही. परिस्थितीच्या गरजेनुसार शासन प्रतिसाद देत राहील एवढेच आश्वासन या अर्थसंकल्पात आहे.

**4. अल्पसंख्यकांसाठी बरेच काही**

2008 सालच्या अर्थसंकल्पाचे आणखी एक

ठळक वैशिष्ट्य म्हणजे देशातील अल्पसंख्यंकांसाठी दिलेले झुकते माप ! या संबंधीच्या काही प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे -

अल्पसंख्यांक मंत्रालयासाठी गतवर्षी (2007-08) रू. 500 कोटींची तरतूद करण्यात आली होती ती या अर्थसंकल्पात दुप्पट करून रू. 1000 कोटी झाली.

अल्पसंख्यांक बहुल असे 90 जिल्हे भारतात आहेत. त्या 90 जिल्ह्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक बहुक्षेत्रीय विकास योजना (Multi-sectoral development plan) तयार करायची व त्याचा खर्च रू. 3780 कोटींचा असेल. सदर कामासाठी 2008 च्या अर्थसंकल्पात रू. 540 कोटींची तरतूद केली आहे.

माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी (prematric scholarship) शिष्यवृत्ती देण्याचा प्रस्ताव असून त्या साठी रू. 80 कोटींची तरतूद केली आहे. !

मदरशांमधील शिक्षणाच्या आधुनिकीकरणासाठी रू. 45.45 कोटी एवढी तरतूद केली आहे.

अल्पसंख्यांक बहुल जिल्ह्यात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या शाखा मोठ्या प्रमाणात उघडण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे.

केंद्राच्या अर्ध सैनिक दलात अल्पसंख्यांकांची मोठी भरती करण्याची योजना आखण्यात आली आहे.

मौलाना आझाद शिक्षण प्रतिष्ठानाला कॉर्पस फंड वाढविण्यासाठी रू. 60 कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

### 5. काही चिंताजनक आकडेवारी

अर्थसंकल्प ही जरी कायदेशीर व राजकीय बाब असली तरी ती मुळात आर्थिक बाब आहे. जो राजकीय पक्ष सत्तेवर असेल तो आपल्या राजकीय तत्त्वज्ञाना प्रमाणे व निवडणूक जाहीर नाम्यात दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेसाठी पावले उचलत अर्थसंकल्प तयार करतो व त्याचा जास्तीत जास्त राजकीय लाभ घेण्याचा प्रयत्न करतो. ही झाली अर्थसंकल्पाची राजकीय बाजू. पण यापेक्षा वेगळी व महत्त्वाची आर्थिक बाजू आहे. शासनाचे उत्पन्न व खर्च यांचा अंदाज करणे व तो देशापुढे ठेवणे हे अर्थसंकल्पाचे एक उद्दिष्ट आहे. अर्थसंकल्प 2008 मधील या आकडेवारीचा अभ्यास करतांना काही चिंता वाटायला लावणाऱ्या गोष्टी लक्षात येतात त्या पुढील प्रमाणे

#### i) कर्जावरील व्याज (2007-08)

2007 च्या अर्थसंकल्पात देय व्याजाचा आकडा रू. 1,58,995 कोटी होता. 2008 चा अर्थसंकल्प सादर करतांना सुधारित अंदाज रू. 1,71971 कोटींचा दाखविला आहे. म्हणजेच व्याजाच्या रकमेत रू. 13752 कोटींची वाढ 2007-08 च्या सुधारित अंदाजात आहे. आता प्रश्न असा की, व्याजाच्या रकमेचा अंदाज का बदलला? शासनाने जास्त कर्ज घेतले असेल तर व्याजाची रक्कम वाढू शकते. परंतु अर्थमंत्र्यांनी कर्जाचे आकडे जे सादर केले आहेत ते असे -

2007-08 (अंदाजपत्रकानुसार ) रू. 150948 कोटी, 2007-08 (सुधारित अंदाज) रू. 1,43,653 कोटी.

याचा अर्थ 2007-08 सालात शासनाने मूळ अंदाजापेक्षा रू. 6295 कोटींची कमी कर्जे घेतली जातील असे म्हटले. पण देय व्याजाची रक्कम मात्र रू. 13752 कोटींची वाढेल असे दाखविले हे कसे?

व्याजाच्या रकमेत वाढ होण्याचे दुसरे कारण असू शकते व ते म्हणजे कर्जाची परतफेड अपेक्षेपेक्षा कमी होणे व त्यामुळे जास्त रकमेच्या कर्ज शिल्लकेवर व्याज द्यावे लागणे. पण हेही कारण 2007-08 सालासाठी लागू होतांना दिसत नाही. अर्थमंत्र्यांनी 2007-08 च्या अंदाजपत्रकात कर्ज परतफेड रू.

2,62,224 कोटींची दाखविली होती व 2008 चा अर्थसंकल्प सादर करतांना हा 2007-08 साठीचा सुधारित अंदाज (RE) रू. 3,05,108 कोटींचा दाखविला म्हणजेच मूळ अंदाजापेक्षा सन 2007-08 मध्ये शासन रू. 42,884 कोटींची जादा कर्ज परतफेड करणार आहे. मग व्याजाची रक्कम का वाढली असावी ?

थोडक्यात शासनाच्या मूळ अंदाजापेक्षा नवीन कर्जाची रक्कम सुधारित अंदाजानुसार कमी झाली व कर्जफेडीची रक्कम लक्षणीयरित्या वाढली, तरीही शासनाचे देय व्याज सुधारित अंदाजात वाढलेले दिसते. 'व्याज' खर्च इतर खर्चाच्या तुलनेत निश्चित अंदाज करण्यासाठी सोपा आहे. व्याजाचा दर अगोदरच ठरलेला व कर्जाची रक्कम माहीत असलेली अशा स्थितीत बाजारच्या रकमेत एवढी मोठी तफावत येणे कशाचे द्योतक आहे ?

**ii) खर्चाची त्रिमूर्ती**

कर्जावरील व्याज, संरक्षण व अनुदान या तीन खात्यांवर 2008 च्या अर्थसंकल्पात अनुक्रमे रू. 1,90,807 कोटी रू. 1,05,600 कोटी व रू., 71,431 कोटी असे एकूण रू. 3,67,838 कोटींची तरतूद केली आहे. हे तीन खर्च अनिवार्य असले तरी अनुत्पादक आहेत. त्यामुळे हा खर्च जितका कमी होईल तितका अधिक निधी विकासात्मक कामांसाठी शासन उपलब्ध करू शकेल. 2008 च्या अर्थसंकल्पात शासनाची एकूण महसुली जमा रू. 602,935 कोटी अंदाजित आहे. व्याज, संरक्षण व अनुदान या खर्चाचे महसुली जमेशी प्रमाण 61% येते. ही चिंतेची बाब आहे. कारण केवळ 39% इतकी महसुली जमा अन्य बाबींच्या खर्चासाठी शिल्लक राहते. हे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पात नाही.

**iii) विकास कसा होणार ?**

भारताने 'नियोजनाद्वारे विकास' हे सूत्र स्वीकारून स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजना राबविण्यास सुरूवात केली. नियोजन मंडळाने विकासाचा आराखडा तयार करायचा व शासनाने अर्थसंकल्पातून तो आराखडा राबविण्याठी आर्थिक तरतूद करायची अशी व्यवस्था झाली. त्या तरतुदीस योजना खर्च (Plan Expenditure) असे अर्थसंकल्पात म्हटले जाते. सबब विकासाच्या दृष्टीने हा योजना खर्च लक्षणीय रकमेचा असणे व त्याचप्रमाणे वाढत जाणे विकासासाठी चांगले ! सन 2008 च्या अर्थसंकल्पात योजना खर्चाचे एकूण खर्चाशी प्रमाण केवळ 32.4% इतके आहे.

विकासासाठी आवश्यक गोष्ट म्हणजे भांडवली खर्च ! यातून शासन मालमत्ता तयार करते व तिचा उपयोग आगामी काळात होऊन प्रगती होते व शासनाचे उत्पन्नही वाढते. 2008 च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्चाचे एकूण खर्चाशी प्रमाण केवळ 12.4% इतके अल्प आहे. गंमत म्हणजे हे प्रमाण 2007-08 च्या अंदाजानुसार 18% होते. भांडवली खर्चाचे हे प्रमाण 18% वरून 12.4% पर्यंत खाली येणे ही निश्चितच चांगली गोष्ट नाही. यात आणखी गंभीर बाब म्हणजे 2008 च्या अंदाजपत्रकातील एकूण भांडवली खर्चातून (रू. 92765 कोटी) संरक्षणावरील भांडवली खर्च (रू.48007 कोटी) वजा केला तर इतर खऱ्या

| | | |
|---|---|---|
| भांडवलीखर्च - | 2007 अंदाजपत्रकानुसार (BE) | रू. 1,22,621 कोटी |
| | 2007 सुधारित अंदाज (RE) | रू. 1,20,787 कोटी |
| | 2008 अंदाज पत्रकानुसार (BE) | रू. 92,765 कोटी |

उत्पादक भांडवली खर्चाची रक्कम केवळ रू. 44,758 कोटी इतकी अल्प उरते व तिचे एकूण खर्चाशी प्रमाण फक्त 0.6% आहे.

प्रमाणाच्या भाषेत न बोलता प्रत्यक्ष आकडेवारी (Absolute Figures) पाहिली तरी भांडवली खर्चातील घट आणखी चिंता वाढविते.

**iv) कर्जावरील व्याज व परतफेड (Debt-servicing)**

शासनाने घेतलेल्या कर्जावर व्याज देणे व त्या कर्जाची वेळोवेळी परतफेड करणे याला इंग्रजीत Debt servicing म्हणतात. याची तरतूद अर्थसंकल्पात केलेली असते. यासाठी जेवढी रक्कम अधिक तितकी इतर बाबींवर खर्च करण्यासाठी कमी रक्कम उपलब्ध होते. सन 2008 च्या अर्थसंकल्पात ऋण व्यवस्थापना साठी रू. 526038 कोटींची तरतूद केली आहे तर एकूण महसुली जमा रू. 602935 आहे. ऋण व्यवस्थापनाच्या रकमेचे एकूण महसुली जमेशी प्रमाण 87.25% इतके आहे. निश्चितच ही चिंताजनक आकडेवारी आहे.

**v) अर्थसहाय्य**

भारतात अन्नधान्यावर,खतांवर,पेट्रोलजन्य पदार्थावर अनुदान दिली जाते. 2007 च्या अंदाजपत्रकानुसार अनुदानाची रक्कम रू. 54330 कोटी होती ती सुधारित अंदाज म्हणून रू. 69742 कोटी दाखविण्यात आली म्हणजेच प्रस्तावित अनुदानाच्या रकमेत रू. 15412 कोटींची वाढ आहे. याशिवाय 2007-08 मध्ये तेल बंधपत्र (Bonds) रू. 11258 कोटींचे व खतांसाठीचे बंधपत्र रू. 7500 कोटींचे काढण्यात आले. तेही एक प्रकारे अनुदानाच म्हणता येईल. याचा अर्थ असा की 2007-08 या वर्षासाठी अर्थसंकल्पात अनुदानाची तरतूद रू. 54330 कोटींची हाती परंतु प्रत्यक्षात ही रक्कम वर नमूद केल्या प्रमाणे (रू. 69742+11257+7500 कोटी) रू. 88499 कोटींची झाली. म्हणजेच अनुदानाच्या रकमेत अंदाजित रकमेपेक्षा रू. 34269 कोटींची (63%) वाढ झालेली दिसते. अंदाजपत्रकातील तरतुदी पेक्षा इतकी वाढ होणे हा अयोग्य पायंडा आहे.

**6) प्रश्न व शंका निर्माण करणारी निवेदने**

अर्थसंकल्प जरी दर वर्षी संसदेत मांडला जात असला तरी त्याच्या मांडण्याच्या वारंवारितेमुळे त्याचे महत्त्व कमी लेखले जायला नको त्याचे तयार करतांना घ्यायच्या काळजीकडे दुर्लक्ष व्हायला नको. अर्थमंत्र्यांनी व शासनाने त्याकडे पुरेशा गांभीर्यानेच पाहायला हवे. जाहीर होणाऱ्या योजनांचा संपूर्ण तपशील व त्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद अर्थसंकल्पात असायलाच हवी असे सर्व न झाल्यास अर्थसंकल्पाकडे पाहण्याच्या व तो तयार करण्याच्या शासनाच्या दृष्टीकोनाबाबतच प्रश्न व शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. अर्थसंकल्प 2008 मध्ये अशी काही निवेदने आहेत. ती उदाहरणासाठी पाहता येतील.

**i) कर्जमुक्ती**

परिच्छेद 76 मध्ये अर्थमंत्री म्हणतात कर्जमुक्ती योजनांच्या परिणामांचा तौलनिक अभ्यास करून आणि साधनसंपत्तीच्या स्थितीचा लेखाजोखा करून मी संसदेसमोर शेतकऱ्यांची कर्जमुक्ती व कर्जमाफी योजना ठेवत आहे. अर्थमंत्री हे केवळ सांगण्यासाठी म्हणाले की खरोखर त्यांनी स्वाध्याय केला होता ?

अर्थसंकल्पात या योजनेचा फायदा 3 कोटी अल्पभूधारकांना (दोन हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र) व एक कोटी अन्य शेतकऱ्यांना एकूण चार कोटी शेतकऱ्यांना मिळेल तसेच कर्जमुक्तीची रक्कम अनुक्रमे रू. 50,000 कोटी व कर्जमाफीची रू. 10,000 कोटी अथवा एकूण रू. 60,000 कोटी असेल असे म्हटले आहे. हे आकडे कोठून आले ? त्याची सत्यासत्यता कशी तपासता येईल ? यासंबंधी

शंका घेऊन एक जनहित याचिका या आकड्यांसंबधी दाखल झाली आहे.

थोडक्यात दूरगामी परिणाम करणारी व लक्षणीय रकमेची ही कर्जमुक्ती योजना केवळ घोषणा करण्यासाठी अपुऱ्या तयारीनिशी व तरतूदच न करता ऐनवेळी अर्थसंकल्पात आली का ? अशी शंका घेण्यास वाव आहे.

**ii) सहावा वेतन आयोग**

अर्थसंकल्पातील परिच्छेद 110 सांगतो की 31/2/2008 पर्यंत सादर होणाऱ्या सहाव्या वेतन आयोगाच्या अहवालामुळे शासनावर वाढीव पगाराचा बोजा पडणार हे अर्थसंकल्पात गृहित धरलेले दिसते. पण त्यासाठी तरतूद मात्र अर्थसंकल्पात केलेली नाही. अर्थसंकल्पातील प्रस्ताविक खर्चाचे आकडे मग विश्वासार्ह आहेत का ?'

**iii) अंदाजपत्रकातील तूट**

सन 2007 च्या अर्थसंकल्पात महसुली तूट रू. 71478 कोटी (1.5%) इतकी दाखविली होती. सुधारित महसुली तुटीचा आकडा रू.63488 कोटी दाखवून शासन तूट कमी करण्यात यशस्वी झाल्याचा दावा अर्थमंत्र्यांनी केला. वास्तविक ही दिशाभूल नाही का ? तेलकंपन्यांसाठी रू. 11257 कोटींचे बंधपत्रे आणि रू. 7,500 कोटींचे खतांसाठीची बंधपत्रे शासनाने 2007-08 वर्षात दिल्याचे अर्थमंत्री सांगतात व ते आकडे अर्थसंकल्पात नमूद करीत नाहीत. या दोन बंधपत्रांची रक्कम रू. 18,757 कोटींची आहे. तो आज रोखीने खर्च झाला नसला तरी तो खर्चच आहे आणि म्हणून वास्तविक तेवढ्या रकमेने 2007-08 सालची तूट वाढलेली आहे. अशा प्रकारचे ताळेबंद सजावट (window dressing) करून तूट कमी दाखविणे ही चांगली प्रथा निश्चितच नाही.

सन 2008 च्या अर्थसंकल्पात अपेक्षित केलेली महसुली तूट केवळ 1% असल्याचा दावा अर्थमंत्री करतात. तो ही दिशाभूल करणारा ठरेल का ? कर्जमुक्ती योजनेचे रू. 60,000 कोटी, सहाव्या वेतन आयोगानुसार वाढीव पगार, पुन्हा यावर्षी द्यावे लागतील ते तेल रोखे (Oil bonds) यांचा विचार न करताच ही 1% तूट दाखविली आहे.

याशिवाय राजस्व जबाबदारी व अर्थसंकल्प व्यवस्थापन कायदा (Fiscal Responsibility & Budget Management Act) नुसार महसुली तूट मार्च 2008 पर्यंत संपविणे बंधनकारक होते. या शासनाने ही मुदत पूर्वीच एक वर्षासाठी वाढवून घेतली होती व महसुली तूट शून्यावर आणण्यासाठी मार्च 2009 ही मर्यादा स्वीकारली होती. ती जबाबदारी हे शासन कशी निभावणार ? हा ही अनुत्तरीत प्रश्न उरतो.

**iv) सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक**

1991 पासून भारताने उदारीकरणाच्या धोरणाचा जोमाने अंगीकार केला. त्याचा एक भाग म्हणून खाजगीकरण किंवा सार्वजनिक क्षेत्रातील निर्गुंतवणूक सुरू केली. गेली 16/17 वर्षे त्याचा पाठ पुरावा केला आणि एकदम अर्थसंकल्प 2008 मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांत भरघोस गुंतवणूक करण्याची तरतूद केली. रू. 16436 कोटींचे भाग भांडवल व रू. 3003 कोटींची कर्जे असे एकूण 19439 कोटी रूपये सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांसाठी उपलब्ध करून दिले. निर्गुंतवणूक धोरणा विषयी हे घुमजाव नाही का ? आणि ते घुमजाव का करण्यात आले ? याचा खुलासा अर्थमंत्र्यांनी करायला हवा.

**v) बँकिंग रोख व्यवहार कर (BCTT)**

बँकेतून विशिष्ट रकमेच्या वर रोख पैसे काढले तर त्यावर याच अर्थमंत्र्यांनी तीन वर्षापूर्वी कर लादला होता. या करातून नगण्य महसूल शासनास मिळाला पण त्याचा कागदोपत्री त्रास

बँकांना भरपूर झाला. म्हणून हा कर रद्द करण्याची जोरदार मागणी पहिल्या वर्षापासून होत होती. अर्थमंत्र्यांनी तो हट्टाने चालू ठेवला. या अर्थसंकल्पात तो काढून टाकण्याची घोषणा त्यांनी केली पण ते म्हणतात, "I propose to withdraw this tax with effect from 1.4.2009" अर्थसंकल्प 1/4/2008 पासून 31/3/2009 पर्यंतच्या काळासाठी आहे. मग त्या पुढच्या काळासाठी करासंबंधी काही निर्णय आता घेण्याचा अधिकार या अर्थमंत्र्यांनी का वापरावा ? ही पद्धत बरोबर आहे का ? पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पावर हे अतिक्रमण नाही का ?

वरील सर्व विवेचन पाहिल्यावर काय निष्कर्ष निघेल ? अर्थसंकल्प 2008 ने शेतकरी, आयकरदाते, गाडी घेऊ इच्छिणारे, आंगणवाडी कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, अल्पसंख्यांतमक, उद्योजक यांना खूष करण्याचा प्रयत्न केला आहे. कदाचित त्यामुळे मतदार आकृष्ट होतील पण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी, दीर्घकालीन राजकोषीय शिस्त आणण्यासाठी आणि चांगले पायंडे पाडण्यासाठी या अर्थसंकल्पात काहीच सापडत नाही. 2008 च्या 'अर्थसंकल्पा' कडे पाहिल्यास त्यात काही 'संकल्प' दिसत नाही आणि 'अंदाजपत्रक' म्हणून पाहिल्यास पुरेशा काळजीने बांधलेले 'अंदाज' समाविष्ट केल्याचे दिसत नाही.

✦✦✦


## मराठी अर्थशास्त्र परिषद

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रू. 1000/- चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. 1 जानेवारी 2007 ते 31 डिसेंबर 2008 या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथांच्या लेखकांना यंदाच्या स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी इत्यादींसाठी अनिल सूर्यवंशी, कार्यवाह-खजिनदार मराठी अर्थशास्त्र परिषद, हुबळीकर निवास, ब्लॉक नं. 2, शिवाजी नगर, बार्शी, जिल्हा-सोलापूर-413411 यांच्याशी संपर्क साधावा. विहित नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या 4 प्रतिसह, कार्यवाहांकडे 31 ऑगस्ट 2008 पर्यंत मिळावेत.

**कार्यवाह-खजिनदार**

# शेतकरी कर्जमुक्ती प्रश्न-वस्तुस्थिती आणि पर्याय

◆ र.पु.कुरूलकर, औरंगाबाद
*संचालक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था, औरंगाबाद*
*माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*

**1.** प्रास्ताविक

**भा**रतीय कृषि अर्थव्यवस्था सध्या एका नाजूक व संकटग्रस्त अवस्थेतून जात आहे. हे आता सर्वमान्य झाले असून त्यावर उपाय शोधण्याचे काम राज्य व केंद्र सरकारच्या पातळीवर गतीमान झाल्याचे दिसते. सन 2001 ते 2005 या काळातच भारतातील काही राज्यात एकूण 9000 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे प्रसिद्ध झाले आहे. या आत्महत्या प्रामुख्याने महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ व पंजाबसारख्या राज्यात झालेल्या आहेत. प्रचंड कर्जबाजारीपणा हे या आत्महत्या होण्यामागील मुख्य कारण असल्याचे अनेक अभ्यासावरून स्पष्ट झाले आहे. आत्महत्येस इतरही काही कारणे आहेत हे देखील मान्य करावयास हवे. विदर्भातील आत्महत्येचे प्रमाण प्रचंड असून त्याची चर्चा आता आंतरराष्ट्रीय पातळीवर होऊ लागली आहे व ही एक दुर्दैवाची गोष्ट होय. मराठवाड्यातसुद्धा साधारण 850 च्या वर आत्महत्या झाल्या असून, बीड सारख्या मागास जिल्ह्यात ह्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. अलिकडच्या दोन-तीन वर्षात पश्चिम महाराष्ट्रासारख्या प्रगत भागातसुद्धा आत्महत्येचे लोण पसरले असून साधारण 280 च्यावर आत्महत्या झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. यावरून भारतीय कृषि अर्थव्यवस्था अतिशय दुरावस्थेत सापडली आहे यात शंका नाही. सुप्रसिद्ध कृषिशास्त्रज्ञ स्वामीनाथन यांनी, ''भारतीय कृषि व्यवस्थेत काहीतरी भयंकर चूक होते आहे व जर कृषि क्षेत्रात चूक होत असेल तर इतर कोणत्याहि क्षेत्राचे भले होऊ शकणार नाही''. असे सार्थ उद्‌गार काढले आहेत.

या शोधनिबंधात, प्रथम शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणास कारणीभूत ठरलेल्या प्रमुख घटकांची व सरकारी धोरणांची चर्चा केली असून दुसऱ्या भागात शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टिने पर्याय शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

### 2. कृषि अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप

भारतीय पातळीवर राष्ट्रीय उत्पन्नात सन 1950 साली कृषि क्षेत्राचा वाटा साधारण 50 टक्के असे. परंतु नंतरच्या काळात औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे कृषि क्षेत्राचा वाटा आता केवळ 22 टक्के पर्यंत घटला आहे. महाराष्ट्रातसुद्धा राज्य उत्पन्नात कृषि क्षेत्राचा वाटा सन 1960-61 साली 31 टक्के होता. तो सन 2005-06 या वर्षी 14 टक्के पर्यंत घसरला आहे. या संदर्भात सन 2005-06 या वर्षाची तुलनात्मक आकडेवारी तक्ता क्र. 1 मध्ये दिली आहे.

हा बदल अर्थशास्त्रीय सिद्धांतास अनुसरून असून ते आर्थिक प्रगतीचे लक्षण मानले जाते. परंतु कृषि क्षेत्राचा वाटा कमी होत असतांना, कृषि वरील रोजगार व लोकसंख्येचा भार कमी कमी होत जाणे वरील सिद्धांतात अपेक्षित आहे. हे भारतात होऊ शकले नाही. भारतीय पातळीवर कृषिचा वाटा 22 टक्के पर्यंत घटला असून त्यावर 68 टक्के लोकसंख्या उपजिविकेसाठी अवलंबून आहे. महाराष्ट्रात कृषिचा वाटा 14 टक्के असून त्यावर 58 टक्के लोकसंख्या अवलंबून आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्याचे व घटत्या दरडोई उत्पन्नाचे हे व्यस्त प्रमाण एक प्रमुख कारण आहे. यावर फक्त एकच उपाय आहे तो म्हणजे, ग्रामीण भागातील शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण सातत्याने कमी करून अशा अतिरिक्त लोकसंख्येस, बिगरकृषि उद्योगात व सेवा क्षेत्रात सामावून घेणे. हे काम दीर्घकालीन व प्रचंड गुंतवणुकीचे असले तरी कायमस्वरूपी ठरू शकेल.

मराठवाड्यासारख्या मागास भागात तर, काही जिल्ह्यात कृषिवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण 80 टक्के एवढे प्रचंड आहे. (उदा. उस्मानाबाद, जालना, बीड) साहजिकच ग्रामीण दारिद्र्याचे मोठे प्रमाण व मानवी विकास निर्देशांक (HDI)अत्यंत खालच्या पातळीवर असणे ही एक चिंतेची बाब होय.

### 3. भारतीय कृषिच्या दुरवस्थेची कारणमीमांसा

अ) कृषिक्षेत्राचा घटता विकासदर : सन 1991 साली भारत सरकारने नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार करून मागील 15 वर्षात अर्थव्यवस्थेत अनेक प्रकारच्या आर्थिक सुधारणा अंमलात आणल्या. भारतीय अर्थव्यवस्था, जी पूर्वी बंदीस्त होती, ती खुली करण्यात आली. या सुधारणांचा एक चांगला परिणाम म्हणजे भारताचा आर्थिक विकास दर जो पूर्वी 3.5 टक्के असे (हिंदू विकास दर) तो हळूहळू 6 टक्के तर आता 9.4 टक्के पर्यंत वाढला. 11व्या योजनेत तो 8.5 टक्के निश्चित करण्यात आला असून कृषिक्षेत्रासाठी तो 4 टक्के ठरविण्यात आला आहे. हा 4 टक्के दर साध्य करणे कितपत शक्य आहे या बद्दल शंका व्यक्त केली जात आहे. या संदर्भात अलिकडची विकास दराची आकडेवारी तक्ता क्र. 2 मध्ये दिली आहे.

तक्ता क्र. 2 मधील आकडेवारीवरून असे दिसते की, सन 1980-81 ते 1989-90 या काळात राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धीदर 5.52 होता व कृषिचा आणि कृषिसंबंधित क्षेत्राचा 3.12 तर फक्त कृषिचा

**तक्ता क्र. 1.**

**राष्ट्रीय व राज्य उत्पन्नात कृषिक्षेत्राचे घटते प्रमाण (% मध्ये) 2005-06**

| | प्राथमिक | द्वितीयक | तृतीयक | एकूण |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय उत्पन्न | 22 | 22 | 56 | 100 |
| राज्य उत्पन्न | 14 | 25 | 61 | 100 |

**संदर्भ : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2006-07, महाराष्ट्र शासन मुंबई, पृ.34**

**तक्ता क्र. 2**

**आर्थिक सुधारणांपूर्वी व नंतरच्या काळातील कृषि व बिगर कृषिचा विकास दर (टक्के)93-94 च्या किंमतीनुसार**

| काळ | स्थूल घरगुती उत्पादन (GDP) | स्थूल घरगुती कृषि व तत्सम | स्थूल घरगुती कृषि | स्थूल घरगुती मत्स्य व्यवसाय | स्थूल घरगुती उत्पादन बिगर कृषि |
|---|---|---|---|---|---|
| 1980-81 ते 1989-90 | 5.52 | 3.12 | 3.29 | 5.93 | 6.88 |
| 1990-91 ते 1996-97 | 6.01 | 3.64 | 3.69 | 7.41 | 7.04 |
| 1996-97 ते 2004-05 | 5.72 | 1.66 | 1.65 | 4.30 | 7.06 |
| 2000-01 ते 2005-06 | 6.34 | 1.97 | - | - | 7.65 |

**संदर्भ :** : Chand Ramesh , Raju S.S. and Pandey L.M. Growth Crisis in Agriculture Economic and Political Weekly, June 30,2007, p. 2529.

3.29 टक्के होता. परंतु 1996-97 ते 2004-05 या काळात (आर्थिक सुधारणानंतरचा काळ), कृषि क्षेत्राचा दर केवळ 1.66 टक्के पर्यंत घसरला. अनेक राज्यात तर तो उणे झाला. उदा. सन 2000-01 व सन 2004-05 या वर्षी महाराष्ट्र राज्याचा प्राथमिक क्षेत्राचा विकास दर अनुक्रमे (-) 3.6 टक्के व (-4.8 टक्के) होता. या घटत्या विकास दराची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे केली जाते.

### 1) खुल्या अर्थव्यवस्थेचा परिणाम

भारतीय अर्थव्यवस्था सन 1991 च्या धोरणामुळे व सन 1995 च्या जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) स्थापनेनंतर,आंतरराष्ट्रीय व्यापारास खुली झाली. याचा पहिला फटका भारतीय कृषिवर झाला. आंतरराष्ट्रीय बाजारात साखर,कापूस इत्यादी कृषि मालाच्या किंमती घसरल्या व त्याचा परिणाम देशांतर्गत कृषि मालाच्या किंमतीवर झाला. यामुळे सन 1997-1998 नंतरच्या काळात कृषिक्षेत्राच्या व्यापार शर्ती (Terms of Trade) शेतकऱ्यांच्या विरोधात गेल्या. (याचा अर्थ शेतकऱ्यांनी विकत घेतलेल्या निविष्टींच्या किंमती व त्यांना मिळणारे कृषि उत्पन्न याचा निर्देशांक त्यांच्या विरोधात गेला). त्यांच्या नक्त उत्पन्नात सातत्याने घट होत गेली. व्यापार शर्तीची ही घट दर वर्षी साधारण 1.63 टक्के होती. अनेक शेतकऱ्यांना शेतीचा व्यवसाय तोट्याचा झाला. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने घेतलेल्या एका पाहणीनुसार, भारतातील 40 टक्के शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय सोडून कोणतीही सरकारी नोकरी मिळावी असे म्हटले आहे. शेती संदर्भात गमावलेली विश्वासार्हता शेतकऱ्यांना परत मिळवून देणे हे काम प्राथम्याने व्हावयास हवे.

### 2. सिंचन क्षेत्राकडे दुर्लक्ष

सन 1991 ते 1997 या काळात सिंचन सोयींच्या वाढीचा दर वार्षिक 3.62 टक्के होता, परंतु सन 1997-98 नंतरच्या काळात तो केवळ 0.51 टक्के झाला. ही घट प्रामुख्याने सिंचन क्षेत्रावर सार्वजनिक

गुंतवणूक कमी होत गेल्यामुळे झाली.

3) कृषि क्षेत्राला विजेचा घटता पुरवठा हे कृषिचा वृद्धीदर कमी होण्याचे कारण होय. महाराष्ट्रात मागील दोन वर्षापासून ग्रामीण भागातील भार नियमन 10 ते 12 तासापर्यंत रोज वाढले असून त्याचा कृषिच्या वृद्धिदरावर विपरित परिणाम होणे शक्य आहे.

4) कृषि निविष्टींच्या वाढत्या किंमतीमुळे अनेक शेतकऱ्यांना खतांचा पुरेसा वापरहि करणे शक्य होत नाही. त्यामुळे लागवडीखालील जमिनीचे क्षेत्रही घटले आहे.

5) कृषि क्षेत्रातील जोखीम (Risk) व अस्थैर्य (Instability) यामुळे कृषि क्षेत्राला अनेक नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते, उदा. कमी किंवा अति पाऊस, अनियमित पाऊस,दुष्काळी स्थिती, पिकांवरील रोग,नापिकी,गारपीट इत्यादी. तसेच बाजारातील किंमतीचे चढउतार, जादा पीक आल्यास किंमतीची घसरण (उदा. कांदा,टोमॅटो इ.) त्यामुळे कृषि व्यवसायात अस्थिरतेचे प्रमाण वाढले. ही धंद्यातील जोखीम तक्ता क्र. 3 वरून स्पष्ट होते.

## 4. आर्थिक सुधारणा काळात कृषिक्षेत्रातील पत पुरवठा

सन 1954 च्या गोरवाला समितीने,कृषिक्षेत्राला होणारा पुरवठा मुख्यत: सावकाराकडून होतो. हे स्पष्ट केले. या समितीच्या सूचनेनुसार नंतरच्या काळात अनेक चांगले उपाय योजण्यात आले. सहकारी संस्थांद्वारे अल्प व दीर्घ मुदतीचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर वाढविण्यात आला. रिझर्व बँकेच्या नफ्यातून काही भाग अल्प मुदती निधि (short-term) व दीर्घ मुदती निधी (Long Term operation fund) निर्माण करण्यात आला.

सन 1969 मध्ये सरकारने 14 राष्ट्रीयकृत बँकांचे (व नंतर आणखी 6 बँकांचे )राष्ट्रीयीकरण करून, या बँकांचा ग्रामीण भागात फार मोठा विस्तार केला. उदा. सन 1990-91 साली ग्रामीण भागातील बँकांची संख्या 35,134 किंवा एकूण बँक शाखांच्या 56.9 टक्के होती. सरकारने कृषि, लघुउद्योग व निर्यात क्षेत्रांना प्राधान्य क्षेत्र (priority sector) ठरवून या क्षेत्रांना एकूण बँक कर्जाच्या 40 टक्के कर्ज देणे बंधनकारक केले. त्यामुळे या कृषि क्षेत्राला होणारा कर्जपुरवठा मोठ्या प्रमाणावर वाढला. सन 1975 साली सरकारने, अल्प व सीमांत भूधारक शेतकरी, कारागीर व गरीब वर्गासाठी प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना केली. 2005-06 च्या आकडेबारी प्रमाणे सध्या भारतात 14494 ग्रामीण बँकांच्या शाखा कार्यरत आहेत.

परंतु सन 1991 नंतरच्या काळात सरकारने वित्तीय व बँकींग क्षेत्रात अनेक सुधारणा केल्या, ज्याचा परिणाम कृषि क्षेत्राकडील पतपुरवठा कमी होण्यात झाला. राष्ट्रीयकृत बँकांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक होण्यासाठी 'बेसेल मानकांचा' (Besel Norms) अवलंब करण्यात आला. त्यात तीन प्रमुख निकष होते. त्यापैकी पुरेसा भांडवल

**तक्ता क्र. 3**
**कृषि व्यवसायातील अस्थिरतेचे प्रमाण**

| काळ | अस्थैर्याचे प्रमाण (टक्के) |
|---|---|
| 1985-86 ते 1995-96 | 4.16 |
| 1995-96 ते 2004-05 | 6.58 |

**संदर्भ : तक्ता 1 प्रमाणे**

पाया, (capital Adequacy) व बुडीत कर्ज प्रमाण मत्ता (Non-performing Assets) हे निकष महत्त्वाचे होते. अनेक बँकांचे ताळेबंद या नियमामुळे अडचणीत आले. यातून मार्ग काढण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीयीकृत बँकांना रू. 22000 कोटिची आर्थिक मदत केली. तसेच प्रादेशिक ग्रामीण बँकांनाही रू. 2130 कोटीचे अर्थ साहाय्य देण्यात आले. परंतु सहकारी बँकींग क्षेत्र हे राज्य सरकारच्या कक्षेत येत असल्यामुळे राज्य सरकारांनी त्यांची सुधारणा करावी अशी भूमिका घेतली. पण केंद्र सरकारचा सतत पाठपुरवठा केल्यामुळे केंद्र सरकारने सहकारी पत पुरवठ्याचा अभ्यास करण्यासाठी कपूर समितीची नियुक्ती केली. त्यानंतर केंद्र सरकारने वैद्यनाथन समितीची (2005) नियुक्ती केली. या समितीने सहकारी बँकींग क्षेत्रातील अल्प मुदती पत पुरवठ्याचा अभ्यास करून शासनास अहवाल सादर केला. शासनाने हा अहवाल स्वीकारला असून त्यात सहकारी बँकांना 'वित्तीय पॅकेज' दिले असून त्या प्रमाणे बँकांचा संचित तोटा भरून काढणे, किमान भाग भांडवलाची पूर्ती करणे व तसेच कायदे व संस्थात्मक सुधारणांची तरतूद करणे आवश्यक आहे. बेसेल मानकांमुळे सहकारी क्षेत्रातील बँकांची आर्थिक स्थिती किती बिघडली हे तक्ता 4 वरून स्पष्ट होईल.

निरनिराळ्या स्तरावर सहकारी बँकांचा तोटा मोठा असून त्या सर्वांचा एकूण संचित तोटा 15497.73 कोटी रू. एवढा प्रचंड आहे. त्यात प्राथमिक कृषि सहकारी पत संस्थांचा तोटा सर्वाधिक (रू. 6862.43 कोटी) असल्याचे दिसेल.

**रिझर्व्ह बँक व राष्ट्रीय दीर्घ मुदती निधि**

गोरवाला समितीच्या अहवालानुसार रिझर्व्ह

**तक्ता क्र. 4**

**सहकारी पतसंस्थांची आर्थिक स्थिती 2005**

| अ. | संस्थेचे नांव | संख्या | तोट्यातील बँकांची संख्या | एकूण संचित तोटा (कोटी रू.) |
|---|---|---|---|---|
| 1. | राज्य सहकारी बँका | 31 | 6 | 267.91 |
| 2. | जिल्हा केंद्रीय सहकारी बँक | 367 | 79 | 4793.99 |
| 3. | प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था (PACs) | 108779 | 40388 | 6862.43 |
| 4. | राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँक (SCARDBs) | 20 | 9 | 1098.43 |
| 5. | प्राथमिक सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँक | 727 | 472 | 2474.97 |
| 6. | एकूण | | | 15497.73 |

संदर्भ : Satish P. Agricultural credit in the post-reform Era Economic and Political Weekly, June 30,2007, p 2568

बँकेने कृषि क्षेत्राला अल्प व दीर्घ मुदतीचा पतपुरवठा करण्यासाठी, रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक नफ्याचा काही भाग अल्प व दीर्घ मुदती निधित जमा केला जात असे. परंतु आर्थिक सुधारणा अंमलात आणल्या नंतर सन 1992-93 सालापासून रिझर्व्ह बँकेने या निधित योगदान देणे बंद केले असून आता रिझर्व बँकेचा सर्व नफा केंद्र सरकारकडे वर्ग केला जातो. भारतीय कृषि क्षेत्राला हा एक हानिकारक धक्काच म्हणावा लागेल.

परंतु अशाप्रकारे 'राष्ट्रीय दीर्घ मुदती निधिस' योगदान बंद करणे, रिझर्व्ह बँक कायदा 1934 कलम 46 (अ) प्रमाणे, बेकायदेशीर असल्याचे लक्षात आल्यानंतर, यातून मार्ग काढण्यासाठी रिझर्व्ह बँकेने सन 1993-94 पासून वरील निधिस दर वर्षी नाममात्र एक कोटी रू. देण्यास सुरूवात केली.

काही अर्थतज्ज्ञानी 'बेसेल मानकांची' सक्ती व अंमलबजावणी भारतीय कृषिक्षेत्रासाठी हानिकारक ठरल्याचे म्हटले असून ही मानके अमेरिका व युरोपातील बँकांसाठी उत्तम असली तरी भारतीय अर्थव्यवस्थेत कृषि क्षेत्राचे प्रमुख स्थान लक्षात घेता योग्य नाही असे म्हटले आहे.

### अल्प मुदती कर्जाबाबत रिझर्व्ह बँकेचा चलनवादी दृष्टिकोन

रिझर्व्ह बँक, सहकारी बँका व प्रादेशिक ग्रामीण बँकांना अल्प मुदतीचे पुनर्वित्त (Refinance), सर्वसाधारण पत मार्गाने (General Line of Credit) करीत असे. या कर्जाची मर्यादा सन 2000-01 साली रू. 6600 कोटी एवढी होती परंतु नंतरच्या वर्षात ही मर्यादा सातत्याने कमी करून, सन 2005-06 मध्ये रू. 3000 कोटी पर्यंत आणण्यात आली, तर 31 जानेवारी 2007 पासून असा पतपुरवठा पूर्णपणे बंद करण्यात आला. हा कृषि पत पुरवठ्याला दिलेला दुसरा धक्का म्हणावा लागेल.

वरील प्रकारचे अल्पमुदती पुनर्वित्त बंद का करण्यात आले या संबंधीचा रिझर्व्ह बँकेचा युक्तिवाद पटण्यासारखा नाही. असा अल्पमुदती कर्जपुरवठा निर्माणक पैसा (created money) असल्यामुळे तो भाव-वाढीस कारणीभूत ठरतो असे रिझर्व्ह बँकेचे मत आहे. परंतु अशा प्रकारचा युक्तिवाद फारसा टिकण्यासारखा नाही. उदा. 22 डिसेंबर 2006 साली पैशाचा पुरवठा रू. 30,18622 कोटी रू. होता, त्यात रू. 6600 कोटीची वाढ झाली तरी हे वाढीचे प्रमाण केवळ 0.22 टक्के पडते. दुसरे या कर्जाचा वापर सहकारी बँकामार्फत कृषि उत्पादनासाठी होत असल्यामुळे तो भाव-वाढीस कारणीभूत ठरू शकणार नाही. त्यामुळे रिझर्व्ह बँकेचा हा चलनवादी दृष्टिकोन (Monetarist Approach) योग्य वाटत नाही.

### 5. कृषि मालाचा उत्पादन खर्च, किमान आधार किंमती व किफायतशीर भाव :

शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे त्यांना मिळणाऱ्या असमाधानकारक किमान आधार किंमती हा एक महत्त्वाचा घटक म्हटला पाहिजे. तसेच किफायतशीर भाव म्हणजे काय ? याची चर्चा आवश्यक आहे.

मागील 4/5 वर्षात केंद्रसरकारने किमान आधार किमतीत सतत थोडी थोडी वाढ केली हे जरी खरे असले, तरी शेतीतील निविष्टीच्या किंमतीत (खते, बी-बियाणे, किटकनाशके, पाणी पट्टी इ.) त्यापेक्षा जास्त वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नक्त उत्पन्न (Net income) सातत्याने घटत गेले. काही शेतकऱ्यांचा तर उत्पादन खर्चहि भरून निघू शकला नाही. कर्जबाजारीपणाचे हे एक प्रमुख कारण होय.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सरासरी उत्पादन खर्च दर क्विंटलला दर हेक्टरी उत्पादकतेवर अवलंबून असतो. दर हेक्टरी उत्पादकता जमिनीची प्रत, सिंचन

सोयी, हवामान,पर्जन्य, खते व इतर निविष्टींच्या वापरावर अवलंबून असते. उदा. गव्हाचे दर हेक्टरी उत्पादन मराठवाड्यात 1195 किलो; महाराष्ट्रात 1449 किलो तर भारतीय पातळीवर ते 2553 किलो होते, तर पंजाब राज्यात ते सर्वाधिक म्हणजे 4090 किलो होते. साहजिकच दर क्विंटलचा सरासरी उत्पादन खर्च पंजाबमध्ये सर्वात कमी तर मराठवाड्यात तो सर्वाधिक असणार हे उघड आहे. त्यामुळे किमान आधारभूत किंमत ठरवितांना सर्वांना समाधान होईल अशी किंमत ठरविणे अवघड आहे. म्हणूनच राज्य सरकारांनी केंद्राला सुचविलेल्या किमान आधारभूत किंमती व केंद्राने जाहीर केलेल्या आधारभूत किंमती यात फार मोठी तफावत आढळते. फक्त ऊस वगळता इतर सर्व पिकांबाबत केंद्राने घोषित केलेल्या किंमती 55 टक्के ते 61 टक्के फरकाने कमी आहेत. साहजिकच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना या किंमती मुळीच परवडणाऱ्या नाहीत हे स्पष्ट आहे. यावर चर्चा करून मार्ग काढणे आवश्यक आहे. आंध्र सरकारने सुद्धा या किंमतीबाबत तक्रार केली आहे.

किफायतशीर किंमतीबाबतही हीच अडचण आहे. केंद्रीय कृषि व्यय व किंमत आयोग कृषि उत्पादन खर्चाचा विचार करतांना अनेक संकल्पनांचा वापर करते. उदा.A1, B,C1, C2 इत्यादी. या मध्ये शेवटच्या संकल्पनेत कुटुंबातील मजूर स्वतःच्या शेतात काम करीत असतील तर त्यांची मजुरीही

**तक्ता क्र. 5**

**महाराष्ट्र शासनाने सुचविलेल्या किमान आधारभूत किंमती व केंद्र सरकारने घोषित केलेल्या दर क्विंटल आधारभूत किंमती (2003-04)**

| पीक | महाराष्ट्र शासनाने सुचविलेल्या कि.आ. कि.(रू) | केंद्र सरकारने घोषित केलेल्या कि.आ. कि. रू. | 2 व 3 मधील फरक (टक्के) |
|---|---|---|---|
| भात | 901 | 550 | 61 |
| बाजरी | 906 | 505 | 56 |
| भुईमुग | 2017 | 1400 | 69 |
| तूर | 1985 | 1360 | 69 |
| सूर्यफूल | 2261 | 1250 | 55 |
| उडीद | 2363 | 1370 | 58 |
| सोयाबीन | 1402 | 930 | 66 |
| ऊस | 70 | 70 | 0 |
| गहू | 1147 | 630 | 55 |
| हरबरा | 1892 | 1225 | 65 |

संदर्भ : Dandekar Ajay,"Farmers' Suicides and Rural Poverty" Samaj Probodhan Partika, July-December 2005.

खर्चात घेतली जाते. तरी सुद्धा वेगवेगळया उत्पादकतेमुळे लागवडीचा खर्च कमी जास्त होतो. त्यामुळे किफायतशीर भाव म्हणजे कोणत्या शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च हा प्रश्न उद्‌भवतो. यावरहि चर्चा होणे गरजेचे आहे.

### 6. कापूस उत्पादन व आंतरराष्ट्रीय बाजार

कापूस हे विदर्भ व मराठवाड्यातील एक प्रमुख नगदी पीक होय. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या मोठ्या प्रमाणावर कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये झाल्याचेहि आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या विषयाची चर्चा करणे आवश्यक आहे. 'महाराष्ट्राची कापूस एकाधिकार योजना' ही एक महत्त्वपूर्ण योजना समजली जाते. परंतु अलिकडे या योजनेत अनेक बदल करण्यात आले. उदा. महाराष्ट्र शासनाने सन 2004-05 व 2005-06 या वर्षीपासून, कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया (CCI) ज्या भावाने कापूस खरेदी करते तोच भाव शेतकऱ्यांना द्यावयाचे ठरविले आहे. यापूर्वी केंद्र सरकारने घोषित केलेल्या भावापेक्षा महाराष्ट्र शासनाचे भाव थोडे जास्त होते. तसेच आता खाजगी व्यापाऱ्यांना सुद्धा कापूस खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे.

तक्ता 6 वरून हे स्पष्ट होईल की, महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमतीत 57 टक्के ते 69 टक्के एवढी प्रचंड तफावत आहे. सन 2004-05 या वर्षी पासून केंद्र शासनाचेच भाव महाराष्ट्र सरकारने स्विकारल्यामुळे शेतकऱ्यांना कमी भाव मिळत आहेत. उदा. सन 2004-05 या वर्षी केंद्र सरकारचा कापसाचा प्रति क्विंटल भाव रू. 1960 होता तर सन 2004-05 या वर्षी तो रू. 1900 होता. अनेक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च यापेक्षा अधिक होता.

### 7. कापसाची आयात व शेतकरी

भारत हा जागतिक व्यापार संघटनेचा सन 1995 पासूनच एक संस्थापक सदस्य देश होय. त्यामुळे या संघटनेचे अनेक कर व कोटा विषयक नियम सर्वांनाच पाळावे लागतात. भारतीय शेतकऱ्यांना आता फक्त देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर इतर देशांशी स्पर्धा करावी लागते. भारतात कृषि व्यवसाय एक प्रमुख व्यवसाय असून त्यावर 68 टक्के जनता अवलंबून असते. त्यामुळे कृषि क्षेत्राचे संरक्षण करणे ही सरकारची फार मोठी जबाबदारी होय. इतर देशात अशी स्थिती नाही. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जपान इत्यादी देशात फक्त 3 टक्के ते 5 टक्के लोक कृषिवर अवलंबून आहेत. तरी हे देश त्यांच्या शेतकऱ्यांना प्रचंड प्रमाणावर अनुदान (subsidy) देत आहेत.

**तक्ता क्र. 6**

**कापसाच्या किमान आधारभूत किंमती (रू./क्विंटल)**

| वर्ष | महाराष्ट्र शासनाने सुचविलेल्या कि.आ.किं.रू. | केंद्र सरकारने घोषित केलेल्या कि.आ.किं.रू. | 2 व 3 मधील फरक (टक्के) |
|---|---|---|---|
| 2001-02 | 3308 | 1875 | 57 |
| 2002-03 | 2760 | 1875 | 68 |
| 2003-04 | 2775 | 1925 | 69 |
| 2004-05 | - | 1960 | - |
| 2005-06 | - | 1900 | - |

विकसनशील देश या धोरणाचा जागतिक व्यापार संघटनेत विरोध करीत असले तरी त्यांना अजून फारसे यश आलेले नाही. तीन अमेरिकन अर्थशास्त्रांनी कृषि अनुदानावर एक विस्तृत लेख लिहिला असून त्यात म्हटले आहे की, 'मागच्या वर्षी अमेरिकन सरकारने 23 बिलीयन डॉलरची अनुदाने वाटली. ज्यापैकी 3.4 बिलीयन डॉलर्सची अनुदाने फक्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात आली. अमेरिकन शेतकरी कोणत्या पिकापासून फायदा मिळेल, त्यापेक्षा सरकारी अनुदाने कोणत्या पिकाला आहेत त्याप्रमाणे लागवड करतो. अमेरिकन शेतकरी आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाला भाव काय आहे याबद्दल कधीही विचार करीत नाही कारण त्याला आधीच प्रचंड अनुदान मिळते. तसेच अनुदानाचे वाटपसुद्धा योग्य नसते. उदा. जॉर्जिया राज्यात फक्त 4 टक्के उत्पादक सरासरीने 20,0900 डॉलरची अनुदान लाटतात व हे सर्व मोठे शेतकरी होत; तर बाकीच्या 96 टक्के शेतकऱ्यांना सरासरी 8300 डॉलर्सची सबसिडी मिळते. अनेक शेतकऱ्यांना पेरणी न करण्याबद्दलही अनुदान मिळते. या सर्व प्रकारच्या अनुदान इतर देशातील कापसाच्या भावावर मोठा परिणाम झाला असून, दक्षिण आफ्रिका, ब्राझील, माली, भारत या देशातील शेतकरी संकटात सापडले आहेत. भारत सरकारने जागतिक संघटनेच्या परिबद्ध दराचा (Bound Rate) वापर करून भारतीय शेतकऱ्यांचे सातत्याने रक्षण करणे हाच त्यावर उपाय होय.

न्युयॉर्क टाईम्स या सुप्रसिद्ध दैनिकाने 25 जुलै 2007 च्या अग्रलेखात कापसाला मिळणाऱ्या प्रचंड अनुदानामुळे जागतिक बाजारात कापसाची मोठी आवक वाढली असून गरीब देशातील शेतकऱ्यांना त्यांच्याशी स्पर्धा करणे अवघड आहे असे म्हटले आहे. या अनुदानाचा वापर इतर सामाजिक कामासाठी करावा असेहि सुचविले आहे (The Anti-Reform Farm Bill, New York Times, 25 July 2007.)

भारतातील कापूस उत्पादकांवर झालेला गंभीर परिणाम म्हणजे केंद्र सरकारने कापसाच्या आयातीवरील सीमा शुल्कात (Customs duty) केलेली घट होय. कापसावर पूर्वी 35 टक्के आयात कर होता तो 5 टक्के पर्यंत कमी करण्यात आला. याचा परिणाम म्हणजे कापसाची आयात प्रचंड प्रमाणावर वाढली. सन 1991 साली कापसाची आयात फक्त 1 कोटि रू. होती. नंतरच्या काळात ती रू. 1185 कोटी., रू. 1570 कोटी व रू. 1103 कोटी झाली. हे तक्ता 7 मध्ये स्पष्ट केले आहे.

सीमा शुल्क कमी केल्यामुळे ही आयात मोठ्या प्रमाणावर वाढली व देशांतर्गत कापसाच्या किंमती घटल्या. वास्तविक पाहता जागतिक व्यापार संघटनेनेच विकसनशील देशासाठी कृषि मालाच्या संरक्षणासाठी परिबद्ध दर (Bound Rate) खूप जास्त ठेवले आहेत. त्याचा फायदा घेऊन कापसांवरील आयात शुल्क 60 टक्के पर्यंत वाढविणे शक्य होते. ज्यामुळे कापूस उत्पादकांना संरक्षण मिळाले असते.

अर्थशास्त्राचे 2001 सालचे, नोबेल पारितोषिक विजेते जोसेफ स्टीगलीट्झ यांनी मुंबईच्या 24 ऑगस्ट 2006 च्या इकॉनॉमिक्स टाईम्सच्या अंकात एक लेख प्रसिद्ध करून त्यात, 'विकसनशील देशांनी अमेरिका जोपर्यंत त्यांची शेतकऱ्यांची अनुदाने पूर्णपणे बंद करीत नाही तोपर्यंत अमेरिकन कृषि मालाला मुळीच प्रवेश देऊ नये असे म्हटले आहे.

## भाग 2

### 8. कृषि अर्थव्यवस्था सुधारण्याचे उपाय

लेखाच्या पहिल्या भागात कृषिची सद्यस्थिती कशी आहे यासंबंधी चर्चा केली. या भागात, कृषि क्षेत्राला चिरस्थायी स्थैर्य कसे प्राप्त होईल यासंबंधी विचार करू.

### 1. कर्जमाफी द्यावी का ?

सर्वसाधारणपणे अर्थशास्त्राचे अभ्यासक कर्जमाफीच्या विरोधात असतात; याचे प्रमुख कारण म्हणजे त्यामुळे देशाच्या पतचक्रावर (credit cycle) परिणाम होऊन शेवटी त्याचा भार सरकारी तिजोरीवर पडतो. काहींच्या मते अशा कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांची मानसिकता, कर्जफेड न करण्याकडे झुकते. कारण मधून मधून सरकार कर्जमाफी देतच असते असा त्यांचा समज होतो. हे सर्व जरी खरे असले तरी सध्याची परिस्थिती खूपच गंभीर आहे असे आम्हास वाटते. अनेक अभ्यासांवरून कर्जबाजारीपणा हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमुख कारण आहे हे आता स्पष्ट झाले आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधी अभ्यासात असे आढळून आले आहे की 68 टक्के शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणा मुळे आत्महत्या केल्या असून त्यात 64 टक्के शेतकरी सीमांत व अल्पभूधारक होते व त्यांच्यावरील कर्जाचा बोझा साधारणत: एक लक्ष रू.एवढा होता. एवढे मोठे कर्ज त्यांना जन्मभर फेडणे शक्य नाही हे स्पष्ट आहे. तसेच कर्जाचे पुनर्वेळापत्रक तयार करणे (Reschednling) अशक्य आहे. अशा परिस्थितीत,

अ) सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांना (2 हेक्टरपर्यंत) पूर्ण व्याज व कर्जमाफी द्यावी असे आम्ही सूचित केले आहे.

ब) दुष्काळी भागातील 2-4 हेक्टर मधील शेतकऱ्यांनाहि कर्जमाफीचा विचार व्हावा.

क) सर्वच शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे योग्य नाही असे आम्हास वाटते. कर्जमाफी विभागवार असावी. ज्या शेतकऱ्यांची कर्जफेडीची ऐपत आहे, त्यांना कर्जमाफी मुळीच देऊ नये, कारण तेहि कर्जमाफीची वाट पाहात असतात. कर्जमाफीच्या मुद्यावर अधिक चर्चा होऊ शकते.

### 2) अल्प मुदती उपाय

अ) शेतकऱ्यांचा शेतीव्यवसायावरील विश्वास उडत असल्याचे पूर्वी म्हटले आहे व ही एक चिंतेची बाब होय. आमच्या अभ्यासात सुद्धा 51 टक्के (बहुसंख्य छोट्या) शेतकऱ्यांनी कोणतीहि सरकारी व इतर नोकरी मिळाल्यास, शेती सोडण्याची तयारी दाखविली आहे . त्यांचा विश्वास त्यांना परत मिळवून देणे गरजेचे आहे. सामाजिक संघटना, शेतकरी संघटना, कृषि विद्यापीठे यांनी हे काम करणे शक्य आहे.

ब) राज्य सरकारचे रू. 1075 कोटीचे व केंद्र सरकारचे रू. 3,750 कोटीचे (फक्त विदर्भासाठी) सघन शेती कार्यक्रम ही (Package) तात्पुरती मदत होय; पण या पॅकेजची अंमलबजावणी योग्य होणे आवश्यक आहे.

क) शेतकऱ्यांना अल्पमुदती कर्जपुरवठा 6 टक्के दराने व पुरेसा होणे आवश्यक आहे. वैद्यनाथन समितीच्या शिफारशीमुळे हे आता शक्य होईल.

### 3) दीर्घ मुदती उपाय

केंद्र सरकारने येत्या वर्षीच्या अंदाजपत्रकात (2008-09)कृषि क्षेत्रास भरघोस मदत देण्याचे संकेत दिले आहेत. रू. 65000 कोटी रूपयांच्या सघन शेती कार्यक्रमाची घोषणाहि झाली होती. या सर्व निधीचा वापर शेतकरी केंद्रबिंदू समजून व्हावयास हवा. त्यासाठी काही उपाय सुचविता येतील.

अ) देश व महाराष्ट्र राज्य पातळीवर सीमांत व अल्प भूधारकांची संख्या सर्वाधिक व प्रमाण 2/3 एवढे मोठे आहे. कृषिधोरणात त्यांचा विचार प्रथम व्हावयास हवा. दुसरे, कोरडवाहू शेतीचे प्रमाण महाराष्ट्रात 84 टक्के एवढे आहे; कारण सिंचनाचे प्रमाण केवळ 16 टक्के आहे. या दोन प्रकारच्या शेतकऱ्यांना शेतीपासून मिळणारे उत्पन्न त्यांच्या कुटुंबाच्या उपजीविकेस पुरेसे नाही. साहजिकच या

तक्ता क्र. 7

कापसाचे घटते सीमा शुल्क व वाढती आयात

| वर्ष | आयात (लाख क्विंटल) | आयातमुल्य (कोटी रू.) |
|---|---|---|
| 1991 | 0.20 | 1.00 |
| 2001-02 | 221.3 | 1185.00 |
| 2003-04 | 253.0 | 1570.00 |
| 2004-05 | 187.0 | 1103.00 |

स्रोत : Economic Survey, 2005-2006, Government of India.

कुटुंबांना जोड व्यवसायातून उत्पन्न प्राप्त करून देणे अगत्याचे आहे. अशा प्रकारचे जोडधंदे प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळे असू शकतील . काही उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत.

### 1) दुग्ध व्यवसाय

पश्चिम महाराष्ट्राने सहकारी व खाजगी दुग्ध व्यवसायात नेत्रदीपक प्रगती केली आहे. सन 2001-02 या आकडेवारी प्रमाणे, महाराष्ट्रात प्रतिदिन गाईच्या दुधाचे संकलन 43.71 लाख लिटर असते. ज्यापैकी, 83 टक्के दूध संकलन उर्वरित महाराष्ट्र तर केवळ 4 टक्के विदर्भात व 13 टक्के मराठवाड्यात होते. यावरून विदर्भ व मराठवाड्यात दुग्धव्यवसाय एक जोडधंदा म्हणून विकसित करण्यास फार मोठा वाव आहे हे स्पष्ट होते. नगदी उत्पन्न मिळण्याचे ते एक उत्तम साधन होय.

2) कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, शेळी/मेंढीपालन, मत्स्य व्यवसाय हे जोडधंदे शेतकऱ्यांना जादा उत्पन्न मिळवून देणारे व्यवसाय होत. उदा. उस्मानाबाद जिल्ह्यातील शेळीचे मांस, उच्च दर्जाचे असते. तर रेशीम उद्योग सर्वत्र सुरू करता येतो. या संदर्भात प्रशिक्षणाची सोय आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी जोडधंदे हा एक उत्तम उपाय आहे.

### ब) सेंद्रीय शेती (Organic Farming)

शेतमालाच्या पडत्या किंमती व कृषि निविष्टीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकऱ्यांचे नक्त उत्पन्न सातत्याने घटले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी सेंद्रीय शेतीचा उपाय सुचविला जातो. ज्यामुळे लागवडीचा खर्च बराच कमी होईल. सेंद्रीय शेतीत दर हेक्टरी उत्पादकता थोडी कमी असली तरी मानवी आरोग्याच्या दृष्टिने सेंद्रीय उत्पादने पोषक असतात. अमेरिकेत ग्राहक सेंद्रीय उत्पादनांना थोडी जास्त किंमत देण्यास सहज तयार असतात. दुसरा एक फायदा म्हणजे, सेंद्रीय शेतीमुळे जमिनीची पोषकता वाढण्यास मदत होऊन पर्यावरणाचे संरक्षण होते. रासायनिक खतामुळे दीर्घकाळात अनेक दुष्परिणाम संभवतात.

### क. कंत्राटी शेती पद्धती (Contract Farming)

कंत्राटी शेती पद्धती आज अनेक देशात लोकप्रिय होत आहे. भारतात सहकारी शेती पद्धती अयशस्वी ठरल्यानंतर आता कंत्राटी पद्धती मूळ धरीत आहे. या पद्धतीत शेतकऱ्यांचा समूह व खाजगी कंपनी यांच्या मध्ये काही अटींसह कायदेशीर करार केला जातो. ज्यात शेतकऱ्यांच्या जमिनीवरचा मालकी हक्क अबाधित राहतो. सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही पद्धत विशेष लाभदायक आहे. सामान्य कोरडवाहू शेतकऱ्यांनाही

ती उपयुक्त आहे. कारण या प्रकारात विशिष्ट किंमतीला माल विकत घेण्याची व त्यांचे विपणन करण्याची, माल वाहून नेण्याची जबाबदारी कंपनीची असते. अनेक वेळेस या कंपन्या भांडवलही पुरवितात. त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांचा भांडवलाचा प्रश्नहि मिटतो.

अलिकडेच महाराष्ट्र शासनाने कंत्राटी शेतीबाबत व खाजगी कंपन्यांसाठी कृषि उत्पादने पुरवठा करण्याचे नियम केले असून शेतकऱ्यांचा मालकी हक्क अबाधित ठेवला आहे. या नियमाप्रमाणे खाजगी कंपन्यांना जिल्हा सहकारी उप निबंधकांच्या कार्यालयात नोंदणी करावी लागते.

याबाबत बीड जिल्ह्यातील कंत्राटी शेतीचा प्रयोग उद्बोधक आहे. मुंबईच्या जयंत ऑईल्स या खाजगी कंपनीने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांबरोबर तेलबियांचा पुरवठा हमी भावाने केला आहे. या शेतकऱ्यांची एकूण 40 एकर जमीन असून तेलबिया 1200 रू. क्विंटलने विकण्याचा करार केला आहे. बाजार भाव त्यापेक्षा जास्त असल्यास तोहि देण्याची कंपनीने तयारी दाखविली आहे. याशिवाय कंपनीने तांत्रिक सल्ला, व्यवस्थापन सेवा, किड नियंत्रक औषधे पुरविण्याचा करार केला आहे. खाद्य व अखाद्य वापरासाठी तेलबियांना प्रचंड बाजार उपलब्ध असल्यामुळे कंपनीने, आपला कार्यक्रम परभणी, जालना, औरंगाबाद या जिल्ह्यात कंत्राटी पद्धतीवर वाढविण्याचा विचार केला आहे. कंत्राटी पद्धत नवीनच असल्यामुळे तिच्या गुणदोषाची फक्त चर्चा करता येईल.

**ड. पीक विमा योजना**

पीक विमा योजने अंतर्गत शेतकऱ्यांच्या पिकांचे व उत्पन्नाचे संरक्षण करता येते. अतिवृष्टी, दुष्काळ, पीकावरील रोग, पूर इत्यादीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होते व उत्पन्न बुडते व शेवटी तो कर्जबाजारी होतो. दुर्दैवाने फार थोडे शेतकरी पीक विमा योजनेचा फायदा घेतांना दिसतात. अशिक्षितपणा हे सुद्धा त्यास कारण असावे. राष्ट्रीय कृषि पीक विमा योजनेची सुरूवात महाराष्ट्रात सन 1999 साली झाली. या योजनेत बँकेचे कर्जदार व बिगर कर्जदार शेतकरी आता सहभागी होऊ शकतात. पूर्वीची रू. 10,000 ची मर्यादा आता काढून टाकण्यात आली आहे. विम्याच्या हप्त्यात सीमांत शेतकऱ्यांना 10 टक्के सवलत आहे. पुढील पीकासाठी पीक विमा योजना लागू आहे. खरीप भात, बाजरी, ज्वारी, तुर, उडीद, सोयाबीन, कापूस, ऊस, कांदा, मका . आता सर्व शेतकऱ्यांना पीक विम्याचे प्रस्ताव आपल्या बँकेत सादर करावे लागतात.

पीक विमा, शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय करण्यासाठी त्याचे फायदे त्यांना समजावून सांगितले पाहिजेत. त्यासाठी सुरूवातीची काही वर्षे विमा हप्त्यात मोठी सवलतहि द्यावी. उदा.

| | | |
|---|---|---|
| कापूस | सीमांत शेतकरी | 75 टक्के |
| | इतर शेतकरी | 50 टक्के |
| इतर पीके | सीमांत शेतकरी | 50 टक्के |
| | इतर शेतकरी | 25 टक्के |

**कृषि क्षेत्राचे नियोजन**

शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आता कृषिक्षेत्राचे शास्त्रशुद्ध पद्धतीने नियोजन करण्याची गरज आहे. अलिकडेच महाराष्ट्र शासनाने 11व्या पंचवार्षिक योजना काळात, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याचे कृषि नियोजन करण्याचे ठरविले, ही एक अभिनंदनीय बाब मानली पाहिजे. या नियोजनात दोन प्रमुख उद्दिष्टये आहेत. एक म्हणजे 11 व्या योजनेत कृषि व कृषिसंबंधित (पशुसंवर्धन) क्षेत्रात 4 टक्के आर्थिक विकास दर साध्य करणे व कृषि क्षेत्रावरील लोकसंख्या व रोजगाराचा भार कमी करणे.

**1) सिंचन :** कृषि क्षेत्रात 4 टक्के एवढा विकासदर साधण्यासाठी, प्रथम राज्याच्या सिंचन क्षेत्रात शक्य तेवढी वाढ करणे गरजेचे आहे. पंजाबसारख्या राज्यात सिंचन क्षेत्र 90 टक्के आहे तर भारतीय पातळीवर ते 46 टक्के आहे. महाराष्ट्रात मात्र ते केवळ 16 टक्के आहे. आतापर्यंत महाराष्ट्रात 41.22 लक्ष हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे.

ही परिस्थिती सुधारण्यासाठी 1999 राज्य सरकारने नेमलेल्या जल व सिंचन आयोगाने सुचविलेल्या अनेक शिफारशींची अंमलबजावणी करण्याची नितांत गरज आहे. त्यात पाणलोट क्षेत्र विकास, ठिबक व तुषार अशा आधुनिक सिंचन पद्धतींचा वापर, पाणी वापर पद्धतीत सुधारणा, पाण्याची काटकसर, पाण्याचा पुनर्वापर(Recycling) वगैरे उपायांचा अवलंब केल्यास सिंचन क्षमता 126 लक्ष हेक्टरपर्यंत किंवा लागवडीखालील क्षेत्राच्या 56 टक्के पर्यंत वाढू शकते. असे केल्यास पिकांच्या दर हेक्टरी उत्पादकतेत फार मोठी वाढ होऊ शकेल.

सिंचन क्षेत्राच्या वाढीसाठी भूजल साठ्याचा वापर ही महत्त्वाचा होय. यासाठी भूजल साठ्याचे पुनर्भरण सातत्याने होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात एकूण भूजल पुनर्भरण साठा 31214 द.ल.घ.मी. एवढा असून प्रत्यक्ष उपसा 48 टक्के किंवा 15085 द.ल.घ.मी. एवढा आहे. विभागीय पातळीवर हा उपसा कोकण 32 टक्के, विदर्भ 34 टक्के, मराठवाडा 44 टक्के तर प. महाराष्ट्र 63 टक्के आहे. यावरून कोकण, मराठवाडा व विदर्भात भूजलाचा वापर होण्यास बराच वाव आहे असे दिसते.

**2. ग्रामीण रोजगार**

महाराष्ट्रात राज्य उत्पन्नाचा केवळ 14 टक्के वाटा कृषिक्षेत्राचा असून त्यावर 58 टक्के लोकसंख्या अवलंबून आहे हे पूर्वी सांगितले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील हा भार कमी करण्याचे उपाय आता योजावे लागतील. त्यासाठी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर बिगर कृषि रोजगार निर्माण करावे लागतील. ग्रामीण गरजांवर आधारित अनेक रोजगार व स्वयंरोजगार सध्या महिला बचतगटाद्वारे निर्माण केले जात आहेत. ट्रॅक्टर दुरूस्ती, वीज पंप दुरूस्ती, वाहतुक, कृषिसेवा केंद्र, कॉम्प्युटरद्वारे बाजारभावाची माहिति, टि.व्ही.दुरूस्ती इ. अनेक क्षेत्रात नवा रोजगार निर्माण करता येईल. जिल्ह्याप्रमाणे त्यांचे स्वरूप बदलेल.

**विशेष कृषि क्षेत्र**

सध्या देशभर 'विशेष आर्थिक क्षेत्राची '(Special Economic Zone)'चर्चा सुरू आहे. भारताची निर्यात वाढविण्यासाठी मोठ्या उद्योगांना या क्षेत्रात अनेक कर सवलती (उत्पन्न कर, उत्पादन शुल्क) व इतर सवलती (24 तास मुबलक वीज व पाणी पुरवठा) देण्यात येत आहेत. कर सवलतीमुळे सरकारचे एक लाख कोटी रूपये बुडणार आहेत. यात शेतकऱ्यांच्या उत्पादक जमिनी काही प्रमाणात जाणार असल्यामुळे प. बंगाल, महाराष्ट्र इ. राज्यात त्यास विरोध होत आहे. वास्तविक पाहता विशेष आर्थिक क्षेत्र नसतांना सुद्धा भारतीय उद्योगाचा विकास दर 8 टक्के ते 12 टक्के राहिला आहे. भारतीय उद्योग आज समर्थपणे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत यशस्वी ठरत आहेत. त्यामुळे अशा विशेष आर्थिक क्षेत्रांची देशाला खरोखरीच गरज आहे का याचा पुनर्विचार व्हावयास हवा.

या उलट कृषि क्षेत्रांची स्थिती आज चिंतनीय आहे. कृषिचा विकास दर अलिकडे केवळ 1.65 टक्के आहे. याची कारण मीमांसा यापूर्वी केली आहे. या पार्श्वभूमिवर कृषिक्षेत्राच्या जलद विकासासाठी 'विशेष कृषि क्षेत्राची' गरज आहे असे वाटते. मराठवाडा व विदर्भासारख्या कृषि क्षेत्रातील मागास भागात (Agriculturally Backward)अशी विशेष कृषि क्षेत्रे काढावीत.

सुरूवातीला प्रायोगिक तत्त्वावर (pilot projects) अशी विशेष कृषि क्षेत्रे राज्याच्या काही क्षेत्रात सुरू करावीत. शासनाने या क्षेत्रात नियंत्रकाची (Regulator) भूमिका न घेता केवळ प्रोत्साहकाची (Facilitator) भूमिका घ्यावी. विशेष कृषि क्षेत्रातील नियोजनासाठी एका स्वतंत्र व्यवस्थापकीय मंडळाची (Management council) नियुक्ती करावी, ज्यात प्रगतीशील शेतकऱ्यांचे प्रतिनिधि, कृषिशास्त्रज्ञ, पशुवैद्यकिय शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, सिंचन अभियंते, समाजशास्त्रज्ञ, कृषि अभियांत्रिकी तज्ज्ञ, पणन तज्ज्ञ इ. विषयातील तज्ज्ञ असावेत.

या व्यवस्थापन मंडळाने अशा विशेष क्षेत्रातील पीक रचना, सिंचन व्यवस्था, कृषि पत पुरवठा, विपणन व्यवस्था (Marketing) निर्यात वाढ इत्यादी संबंधी निर्णय घ्यावेत. व्यवस्थापन मंडळ व्यावसायिक स्वरूपाचे व व्यावसायिक तत्त्वावर चालविले जावे. सध्या उद्योगांना 'विशेष आर्थिक क्षेत्रात' ज्या करविषयक व इतर सवलती देऊ केल्या आहेत त्याच धर्तीवर 'विशेष कृषि क्षेत्रातील' शेतकऱ्यांनाही त्या द्याव्यात या सवलती सुरूवातीला 5 वर्षासाठी असाव्यात. उदा. पाणीपट्टीची माफी, शेतसारा, उपकर माफी, वीजदरात 50 टक्के सवलत व 24 तास वीज पुरवठा, विशेष कृषि क्षेत्रातील आर्थिक पायाभूत सोयींची गुंतवणूक (उत्तम रस्ते, टेलिफोन, सिंचन सोयी, वखारगृहे, शीतगृहे, बाजाराचे आवार अशा सोयी शासनाने कराव्यात तसेच आधारभूत संरचना (Infra-structure) उपलब्ध करून द्याव्यात. उदा. उत्तम शाळा, वसतिगृहे, उत्तम दवाखाने, युवा मंडळे वगैरे.

विशेष कृषि क्षेत्रात कृषिवर आधारित उद्योग काढता येतील. उदा. कापसावर आधारित जिनिंग, प्रेसिंग, सूत गिरण्या, साखर कारखाने, तेल गिरण्या, दालमिल्स, भात गिरण्या, फळ उत्पादनावर आधारित उद्योग, दुग्ध व्यवसाय, वगैरे. मूल्यवृद्धिमुळे रोजगाराच्या फार मोठ्या संधि निर्माण होतील.

कृषि हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारित येत असल्यामुळे, करसवलतीचा बोझा राज्य सरकारवर पडेल हे उघड आहे. (पाणीपट्टी, वीज व शेतसारा). राज्य सरकारने या नुकसानीची भरपाई केंद्र सरकारकडून घ्यावी हे सुचवावेसे वाटते. हा प्रयोग यशस्वी झाल्यास इतर भागात अशी 'कृषि विशेष क्षेत्रे' स्थापन करावीत.

## संदर्भसूची


1. Economic Survey of Maharashtra, 2006-07, Govt. of Maharashtra, Mumbai.

2. Economic Survey-2005-06, Govt. of India, New Delhi.

3. Chand Rayesh, Rajn S.S., Pandey L.M., Growth Crisis in Agriculture by Economic and Political Weekly, June 30,2007.

4. Satish, P. Agricultural Credit in post reform Era., Economic and Political Weekly, June, 30,2007.

5. Dandekar Ajay, (2005), Farmer's suiciceds & Rural Poverty', Samaj Prabodhan Patrika, Belgaum. July-Dec. 2005

6. Kurulkar R.P. Farmers' Suicides in Marathwada Region of Maharashtra State' Swami Ramanand Teerth Research Institute, Aurangabad.

7. Stiglitz, Joseph. Demise of the Development Round, Economic Times, 24/8/2006, Mumbai.

8. Chapmar Dan, Foskett Ken, and Clarke Megan, How your Tax dollars prop up big growers and sqeeze the little guy The Atlanta Journal Consitution, Oct. 1.2006, USA.


◆◆◆

# शहरीकरण रोखा व शेती वाचवा

◆ दि. मा. मोरे, पुणे.

*भूतपूर्व महासंचालक, मेरी, महाराष्ट्र.*

**2006** हे वर्ष शेतजमिनीवर आघात करणारे ठरले. शेती व्यवसाय, अन्नधान्य इ. अनेक क्षेत्रात गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. पुण्याजवळ मुंबईच्या दिशेने पसरत असलेल्या औद्योगिकीकरणाच्या तडाख्यात सापडलेले माण हे गाव आणि त्या गावातून उभा झालेला शेतकऱ्यांचा लढा हा देशपातळीवर गाजला. ह्या संबंधात अनेक समाजधुरिणांनी, विचारवंतांनी, सत्ताधाऱ्यांनी, शास्त्रज्ञांनी आपली मते व्यक्त केलीत हे एक जागृत समाजाचे लक्षण आहे, असे म्हणावयास हरकत नाही. या देशातील विशाल लोकसंख्या, त्यात वावरणाऱ्या विचारवंतांचे, सज्जनांचे, द्रष्ट्या व्यक्तींचे समूह पण तितक्याच तोलामोलाचे. पण या तुलनेमध्ये शेतजमिनीला आक्रसणाऱ्या धोरणावर सडेतोडपणे बोलणाऱ्यांची संख्या नगण्यच होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. शेती आणि त्याच्याशी निगडित असलेले अर्थकारण हा या देशाचा कणा आहे. शेती जगली तर हा देश जगेल. शेतीला संपविण्याचा प्रयत्न हे एक आत्मघातकी पाऊल ठरेल, असे म्हटल्यास धाडसाचे ठरू नये. काही विचारवंतांनी आपले म्हणणे सडेतोडपणे मांडले . या देशातील विषम व्यवस्थेखाली भरडणाऱ्या लोकांना यामुळे अवसान प्राप्त झाले. ते खंबीरपणे विरोधात उभे राहिले. यासंबंधात अनेक मतप्रवाह पुढे आले. त्यांचा थोडक्यात आढावा या लेखात घेण्यात आला आहे.

2. दुर्दैवाने या देशातील बहुतांशी व्यवस्था आजसुद्धा पारतंत्र्यात निर्माण केलेल्या कायद्यानुसारच चालते. समाजाच्या मूलभूत हक्काशी, न्यायव्यवस्थेशी, अर्थाशी संबंधित असणारे पारतंत्र्यातील अनेक कायदे आजसुद्धा जसेच्या तसेच उपयोगात आणले जात आहेत. याला समाजव्यवस्थेतील कोणतेही क्षेत्र अपवाद ठरू नये. मग तो कायदा विवाहासंबंधीचा असेल, महसूल गोळा करण्यासंबंधीचा असेल, न्याय व्यवस्थेचा असेल, पोलीस व्यवस्थेचा असेल, भू-संपादनाचा असेल, गुन्हेगाराला शिक्षा करण्यासंबंधीचा असेल. अशी अनेक उदाहरणे देता येतील

की,ज्या क्षेत्रामध्ये मूलभूत असे काहीच बदल झाले नाहीत. कायद्याची चौकट ब्रिटिश कालीनच आहे. देश पारतंत्र्यात होता, तो स्वतंत्र झाला हा किती मोठा बदल झाला. इतका मोठा क्रांतिकारी बदल होऊन सुद्धा ज्या कायद्याच्या, व नियमांच्या आधारे देशाचा व्यवहार चालतो, त्यात कालापव्यय न करता एका ठराविक कालावधीत आवश्यक ते बदल का घडवून आणले गेले नाहीत, याचेही उत्तर मिळत नाही. आपला देश, आपले लोक, आपली प्रगती आणि याला अनुरूप असे आपले कायदे ही काळाची गरज का ठरली नाही, याचे उत्तर मिळत नाही. मग हे का घडले नाही ? गेल्या 50-60 वर्षांच्या कालावधित अनेक ज्येष्ठ व्यक्ती शासकीय सेवेतून बाहेर पडल्यानंतर या जून्या चौकटीवर टिकास्र सोडतात. पोटतिडकीने, कळवळीने बोलतात. हातात सत्ता, अधिकार, प्रशासन असतांना पारतंत्र्यातील जुनाट, कालबाह्य व अनेक ठिकाणी घातक ठरणारी कायदेव्यवस्था या मंडळींनी का बदलली नाही, असा प्रश्न अनेक जण विचारतात. सत्तेवर असलेली माणसे इच्छा असल्यास प्रचलित कायद्यात, नियमात बदल घडवून आणण्यात यशस्वी ठरतात, हे ही शंभर टक्के खरे नाही. शासकीय चौकटीत राहून बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करणे, हे काही कमी मोलाचे ठरत नाही. ज्या ठिकाणी ज्या कोणा अधिकारावर असणाऱ्या व्यक्तींनी असे बदल घडवून आणण्याचा त्याच्या परिने प्रयत्न केला आहे. त्यांचा अनुभव या बाबतीत 100% निराशाजनक नाही. पण असे बदल घडवून आणण्याची संधी चालून आली असतांना काहीही न करणे आणि नंतर मात्र आपले हात निर्जीव झाल्यानंतर टिकाटिप्पणी करणे हे समाजाला मान्य होत नाही. त्यांनी असे बोलू पण नये असे कोणी म्हणणार नाही, पण तुम्ही तसा प्रयत्न का केला नाहीत, असे प्रश्न विचारण्यास समाज कचरत नाही. वेळ निघून गेलेली असते. बोलण्यापलीकडे हातात काहीही नसते. वेळीच संधीचा पूरेपूर फायदा घेऊन समाज बांधणीसाठी आवश्यक तो बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्यात एकही क्षण वाया घालवावयास नको. तो क्षण गेला, संधी गेली ती कायमची. सत्तेवर, अधिकारावर असलेल्या सुजाण व क्षमता असणाऱ्या व्यक्तींनी वेळ न दवडता कायदेनियम बदलून मूळ व्यवस्थेमध्ये बदल घडवून आणणे, ही देशाची फार मोठी सेवा ठरावी.

भूसंपादनाच्या कायद्याबद्दल पण हेच झालेले आहे. 1894 चा हा कायदा मूळ चौकटीत बदल न करता जसाच्या तसा आजपण वापरला जातो. परकीयांनी यादेशात आपले पाय मजबूतपणे पसरविण्यासाठी केलेला हा कायदा शंभर वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटून गेल्यावरसुद्धा मूळ चौकटीत काहीही बदल न करता वापरला जातो आहे. खाजगी मालकीचा भूभाग आणि त्या भूभागावर उभी असलेली स्थावर मालमत्ता इमारती, बांध, विहिरी इ. यांचे संपादन प्रचलित शासन एकतर्फी करू शकते. यामध्ये त्या मालमत्तेचे मालकी हक्क असणाऱ्यांना अशा संपादनाची प्रक्रिया काही कालावधीसाठी थांबविण्यापलीकडे आणि मिळणाऱ्या मोबदल्यात शक्य होईल तेव्हा न्यायालयात लढाई करून वाढ करून घेण्यापलीकडे काहीही करता येत नाही. हा कायदा किती एकांगी आहे, हे आकलन शक्तीच्या पलीकडचे आहे. सार्वजनिक हितासाठी, देशाच्या विकासासाठी, समाजाच्या उन्नतीसाठी, अनेकांच्या भल्यासाठी ज्या पायाभूत सोयी निर्माण करावयाच्या असतात, यासाठी अशा एकतर्फी कायद्याचा वापर करून भू-संपादन केले जाते. अनेकांच्या हितासाठी काहींनी जगण्यासाठी आधार ठरणाऱ्या साधनांवर पाणी सोडणे हे यात अभिप्रेत आहे. या पायाभूत सोयींमध्ये जलाशय, कालवे, चाऱ्या, रस्ते, नळ, विमानतळे, रेल्वेलाईन्स, बंदरे, सार्वजनिक इमारती, सार्वजनिक

उद्याने, क्रिडांगणे, बाजारपेठा, शैक्षणिक संस्था, आरोग्यकेंद्रे, ऊर्जागृहे आणि सार्वजनिक उद्योगधंद्यांचा समावेश होतो. ही यादी फारच मोठी होईल. यामध्ये काळाच्या ओघात खाजगी उद्योगक्षेत्राचा आणि सेवाक्षेत्राचा पण समावेश करण्यात आला. जुन्या कायद्यात ही नवीन भर घालण्यात आलेली आहे. देशाची प्रगती शेतीबरोबरच औद्योगिक क्षेत्रातील वाढीशीही निगडित आहे आणि म्हणून उद्योगधंद्यांचा विकास, विस्तार अनिवार्य ठरतो. रोजगार निर्मिती होईल, कारखान्यातून निर्माण झालेल्या उत्पादनासाठी बाजारपेठा निर्माण होतील. जीवनाच्या अनेक क्षेत्रामध्ये लागणाऱ्या वस्तूंचे, यंत्रांचे (टाचणी ते विमान, अणूभट्ट्या, अवकाशयान इ.) उत्पादन करण्यासाठी आपल्या देशाची गरज आपल्याच देशातील उत्पादनातून जास्तीत जास्त प्रमाणात भागवून आयात कमी करून निर्यात वाढविण्याचे ध्येय गाठण्यासाठी आणि एकूणच जीवनमान समृद्ध करून देश वैभवसंपन्न, बलवान आणि स्वावलंबी करण्याच्या दृष्टीने आधुनिक युगात विज्ञानाच्या आश्रयाने चालत असतांना उद्योगधंद्याला दुय्यम स्थान देणे परवडणारे नसते. येणारे जग हे उदारीकरणाचे, मुक्त बाजारपेठेचे, खाजगीकरणाचे, जागतिकीकरणाचे, स्पर्धेचे आहे. या जगात टिकाव धरण्यासाठी दोन गोष्टींना पर्याय नाही. (1) गुणवत्ता (2) किंमत. उत्पादन उत्तम गुणवत्तेचे असावयास पाहिजे व ते माफक किंमतीत उपलब्ध व्हावयास हवे. यासाठी व्यवस्थापन शास्त्राचे पालन होणे आवश्यक आहे.

उद्योगधंद्यासाठी, कारखान्यासाठी, बाजारपेठांसाठी, सेवाक्षेत्रासाठी पायाभूत सोयी लागणारच, रस्ते, विमानतळ, इमारती, वीज, पाणी इ.चे जाळे परसविणे हे ओघाने आलेच. मनुष्य वस्ती वाढणार, नागरीकरण होणार, शाळा, महाविद्यालये, रूग्णालये, बँका इ. पूरक सेवा पण लागणारच. या सर्व व्यवस्थेसाठी जमीन मोठ्या प्रमाणावर लागणार. हे जरी मान्य होण्यासारखे असले तरी खाजगी व्यक्तीला, संस्थेला, नफा मिळवून देणारे व्यवसाय उद्योग हे सार्वजनिक हिताच्या उपक्रमात समाविष्ट करणे हे कितपत न्याय्य आहे.

निसर्गामध्ये जमीन वेगवेगळ्या प्रकारची आहे. उपजावू म्हणजे शेतीलायक आणि नापीक म्हणजे डोंगराळ, दगडा-धोंड्याची, शेती करण्यास लायक नसलेली. भारत हा देश कृषी व कृषी व्यवसायाशी निगडित अर्थव्यवस्थेवर अवलंबून राहणारा देश आहे. 60-70% लोकांना शेती व तिच्याशी निगडित व्यवसाय अंगवळणी पडलेला आहे. रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता असलेले हे क्षेत्र आहे. किमानपक्षी श्रम करून स्वाभिमानाने जगता येऊ शकते इतका आत्मविश्वास या मातील रूजलेला आहे. शेती सोडून दुसऱ्या कोणत्यातरी उद्योगधंद्यात, व्यवसायात शेतकरी सहजासहजी रमत नाही, स्वाभिमानाचे जीणे तो जगू शकत नाही. पोट भरण्यापूरती ही शेती त्याला अनेक वर्षापासून जगण्याचा आधार देत आहे, देत राहणार आहे. शेती ही त्याची संस्कृती आहे, जीवनशैली आहे.

आपल्या देशाने खुली अर्थव्यवस्था स्वीकारलेली आहे. मध्यमवर्गीय व श्रीमंत वर्गामध्ये चैतन्य आलेले आहे. पण गरिबांच्या वस्त्या अजूनही रोडावलेल्या नाहीत. दारिद्र्य रेषेच्या खाली दिवसाकाठी एक डॉलर म्हणजे रूपये 45 पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांची संख्या 30 कोटीच्या आसपास असावी. देशातील लोकसंख्येच्या 30% आणि जगातील एकूण गरीब लोकांपैकी 1/4 गरीब लोक एकट्या भारतात राहतात. हे चित्र बदलवून आगामी 25-30 वर्षात म्हणजेच 2030 पर्यंत देशातील गरिबीचे उच्चाटन करून भारत हा जागतिक पातळीवर

तिसऱ्या क्रमांकाची अर्थसत्ता म्हणून प्रस्थापित करावयाची आहे. यासाठी दमदार प्रयत्न करण्याचा निर्धार शासनकर्त्यांने केलेला आहे. सध्याचा विकासाचा दर 8 वरून 10 वर व पुन्हा 12 पर्यंत घेऊन जावयाचा आहे. शेतीविकासाचा दर पण, जो आता 2% पेक्षा कमी आहे. त्याला 4 %पर्यंत घेऊन जावयाचे आहे. शेती, उद्योग, सेवा या क्षेत्रातील विस्तार वेगाने वाढवायचा आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून साधारणत: 60 वर्षाचा काळ लोटत आहे. तरीही लोकसंख्येचा मोठा भाग 30-40% दारिद्र्यात खितपत पडला आहे. त्यातील बहुतांशी लोक अन्न, वस्त्र, निवारा या जीवनावश्यक गरजांसाठी धडपडत आहेत. दिल्ली, मुंबई, बंगलोर, कलकत्ता, अहमदाबाद, चेन्नई, हैद्राबाद यासारख्या प्रचंड महानगराचे जटील प्रश्न, खेडेगावांतून शहराकडे रोजंदारीसाठी येणाऱ्या गरीब जनतेच्या न थांबणाऱ्या लोंढ्यांमुळे अधिकच तीव्र झाले आहेत. शहरे कमालीची अस्वच्छ झालेली आहेत. लहान लहान शहराची कोल्हापूर, सांगली, लातूर, सोलापूर, औरंगाबाद, नाशिक ई. ची स्थिती पण काही वेगळी नाही. नागरीकरणाला, शहराच्या विस्ताराला कसलीही शिस्त नाही. नियोजन नाही. शहराच्या वाढीच्या योजना नाहीत. शहराला वाढू द्यावयाचं व दर 5-6 वर्षांनी शहरांचा वाढलेला, पण कागदावर, ग्रामपंचायतीत मोडणारा भाग शहरात समाविष्ट करून घ्यावयाचा याचक्रात भारतातील सर्व शहरे सापडलेली आहेत. ग्रामपंचायतीच्या हद्दीत, रस्त्याची रूंदी 10 फुटाइतकी असते. रस्ते एकमेकाला जोडलेले नसतात, किंबहूना जोडायचे नाहीत, यादृष्टीनेच आखलेले असतात. पुणे शहराच्या अगदी मध्यवर्ती भागातील म्हणजे प्रभात रोडची पण हीच स्थिती आहे. अनेक वर्षानंतर पण आपण शिकलो नाही.शिकायचे नव्हतेच, जमिनीच्या तुकड्यानुसार निवासी वसाहतीचे आराखडे केले गेले. नफा जास्त येण्यासाठी रस्ते अरूंद करण्यात आले. उद्याने नाहीत, हिरवा पट्टा नाही. खेळाचे मैदान नाही. अशी ही अवस्था सार्वत्रिक आहे. शहरालगतच्या ग्रामपंचायतीच्या जमिनीची प्रतवारी न पाहता शहराचा विस्तार केला जात आहे. नैसर्गिकरित्या दोन पिके येणाऱ्या जमिनीवर पण नागरीकरण केले जात आहे. अशा सुपीक भारी जमिनीला सिंचनाची जोड मिळाल्यानंतर या जमिनीतून अमाप उत्पादन काढता येते, पण याची काळजी कोणालाही नाही. गुंठ्याचा तत्कालीन जास्तीचा भाव, याच्या मोहात शेतकरी जातो व अतिशय सुपीक अन्नधान्य, फळे, भाजीपाला पिकविणारी जमीन अकृषी व्यवस्थेखाली लोटून देतो स्वत:चे, समाजाचे व देशाचे नुकसान करतो. काही नियोजनकर्ते, शहर रचनाकार, शहराच्या, महानगराच्या आजूबाजूच्या ग्रामीण भागाचे योजनाबद्ध नागरीकरण करावे व अशा क्षेत्रांना लागणाऱ्या सुविधा म्हणजे पाणी, वीज, रस्ते, शाळा, मैदाने, बाजार, बागा, दवाखाने, शॉपींग सेंटर वगैरे पुरविण्याची व्यवस्था करावी, असेही म्हणतात. शहरालगतच्याच जमिनीचा मोह कशासाठी ? याचे उत्तर सापडत नाही. शहरे किती मोठी करावीत, त्यावर काही मर्यादा असावी का हा पण कळीचा मुद्दा आहे. आतापर्यंतचा अनुभव घेऊन शेतकरी फार शहाणे झाले आहेत. शहर वाढणार हे लक्षात घेऊन, सुपीक जमिनीपण पडीक ठेवतात व काळाच्या ओघात या पडीक, नापीक म्हणून अकृषीकरण करून घेऊन, विकून टाकतात.

भारत औद्योगिक क्षेत्रात चीनची बरोबरी करू इच्छितो. विशेष आर्थिक क्षेत्राचे चीनचे प्रतिमान भारत वापरणार आहे, कारण चीनच्या सध्याच्या औद्योगिक प्रगतीचे यश तिथे उभारण्यात आलेल्या वि.आ.क्षे. मध्येच आहे, असे भारतीय राज्यकर्त्यांना व शासनकर्त्यांना मनापासून वाटत

आहे. चीनच्या या उपक्रमाचा अभ्यास, भारतीय अभ्यासकांने केलेला आहे, असेही म्हटले जाते. उत्पादन वाढविण्याच्या आड येणाऱ्या सर्व अडथळ्यांना या वि.आक्षे च्या बाहेर ठेवण्यात येणार आहे. मोठ्या प्रमाणात करसवलती देण्यात येणार आहेत. यामुळे देश विदेशातील उद्योजक मोठ्या प्रमाणात आकर्षित होणार आहेत. या मधून लाखो लोकांना रोजगार मिळणार असल्यामुळे, करसवलती व राज्याचा महसूल बुडणे या गोष्टी गौण ठरविण्यात आल्या आहेत.

वि.आ.क्षे.मुळे नवीन मोठी गावे, शहरी वस्ती, यात वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या गरजा भागविण्यासाठी स्थानिक लोकांसमोर, दुकानदार, रिक्षावाले,दूधवाले इ. पूरक उद्योगाचे जाळे निर्माण होईल. अर्थव्यवस्थेला यामुळे फायदा होईल.

वि.आ.क्षे. हे प्रगतीचे व यशाचे मोठे प्रवेशद्वार आहे. वि.आ.क्षे. मुळे वीज, पाणी उपलब्ध होणार आहे. नोकरीनिमित्त युवकवर्ग मोठ्या प्रमाणात स्थलांतरित झाला आहे.वि.आ.क्षे.मुळे रोजगाराच्या स्थानिक संधी उपलब्ध होणार आहेत ज्याच्या जमिनी घेतल्या आहेत, त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील लोकांना नोकरीत प्राधान्य दिले जाईल. कोणत्याही कुटुंबावर बेरोजगाराची पाळी येणार नाही. एकदा प्रकल्प कार्यान्वित झाला की, त्या ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपात रोजगार उपलब्ध होईल. हॉटेल्स, दुकान,भाजीपाला, इ. व्यवसाय सुरू होतील, अशीही मांडणी होत आहे.

राज्यकर्त्यांकडून असेही बोलले जाते की, ''शेतकऱ्यांचा विआक्षे साठी जमीन देण्यास विरोध नाही. जमिनीला योग्य भाव द्या, एवढेच ते म्हणतात. शेतकऱ्यांनी जी आंदोलने केली, ती जमिनीला योग्य मोबदला मिळविण्यासाठी होती. विआक्षेमध्ये गुंतवणूक करणारे, आता जमिनीला योग्य भाव देत आहेत, म्हणून अलीबाग, पेण, पुण्याजवळील शेतकरी जमीन विक्री करण्यास पुढे येत आहेत. उत्तरेकडील राज्यातील जमिनी सुपीक व पाण्याखालच्या आहेत, अशा जमिनीवर फार मोठी सार्वजनिक गुंतवणूक सिंचनासाठी केलेली आहे. या जमिनीवर विआक्षे रावबू नये. पण नापिक मुरबाड, वर्षातून जिथे एखादेच पिक घेतले जाऊ शकते. अशा जमिनीवर विआक्षे निर्माण करण्याचा विचार आहे.''

कोकणातील भात शेतीच्या जमिनीवर आज एकच भाताचे पिक येते. आज एक पिकाची जमीन उद्या पाणलोट क्षेत्राच्या, जलसंधारणाच्या, कार्यक्रमातून दोन व त्यापेक्षा जास्त पिकांची होणार आहे. मग या जमिनीवर विआक्षे कितपत फायदेशीर राहणार आहे ? निसर्गत: सर्व शेतीलायक जमिनी ह्या एक पिकी जमिनीच असतात. मानवी प्रयत्नातून (सिंचनाची सोय करून) अशा जमिनीचे बहुपिकी जमिनीत रूपांतरण केले जाते. उद्योगासाठी कोणतीही जमीन चालते पण शेतीसाठी सिंचनासाठी जमीन निर्माण करता येत नाही. एकंदरीत, शेतीलायक जमिनीचा तुकडा गेला तर तो कायमचा जातो. तेवढीच सिंचनाखाली नवीन जमीन आणणे कठीण आहे. कारण तो निसर्ग आहे. पुण्यापाशी आंबेगाव जवळ डोंगराळ जमिनीवर विआक्षे निर्माण होत आहेत. सह्याद्रीच्या पूर्वघाटावरील तसेच पश्चिम घाटावरील डोंगाराळ जमीनपण उपजावू आहे. पाऊस अमाप आहे, हवामान चांगले आहे. माती सुपीक आहे- हे विसरता येत नाही.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय अर्थनिती ही केंद्रीय नियोजनावर आधारित असणारी संमिश्र निती होती. 1980 नंतर जगभरात बदलाचे वारे वाहू लागले. 1991-92 नंतर भारतातही आर्थिक सुधारणा अंगिकारल्या जाऊ लागल्या. आर्थिक उद्योगधंद्यांमध्ये सरकारी सहभाग आधिच्या

पद्धतीमध्ये खूपच जास्त होता. विशेषत: बँकीग व विमा उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणानंतर हा सहभाग खूपच वाढला होता. यामध्ये बदल होण्यास 1991 पासून सुरूवात झाली. जगातील आर्थिक क्षेत्रातील तीव्र स्पर्धा लक्षात घेता, आर्थिक सुधारणांनी वेग पकडणे गरजेचे झाले आहे, असेही बोलले जावू लागले. महाराष्ट्र हे वेगाने शहरीकरण होणारे राज्य म्हणून ओळखले जाते. राजकारणावर पण शहरीकरणाची छाप पडणारच. शहरातील घराचे प्रश्न,रस्ते इ. बाबी महत्त्वाच्या वाटू लागल्या. शहरे झपाट्याने वाढत आहेत. शहरातील मूलभूत सोयीसुविधांचे प्रश्न बिकट होत आहेत. घराचा प्रश्न बिगट होत आहे. लोकांना घरे घेणे परवडत नाही. औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकीत महाराष्ट्र अग्रेसर असले तरी मुंबई-पुणे वगळता अनेक ठिकाणची स्थिती चांगली नाही. रोजगाराची समस्या जटील होत आहे. शेती बुडीत खाती जमा होत आहे. अशा परिस्थितीत केवळ आर्थिक गुंतवणूक करून घेण्यापेक्षा ग्रामीण भागात रोजगारावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे.

वि.आ.क्षे. हा विषय फारच वादाचा ठरला आहे. मंत्री, राज्यकर्ते, विचारवंत हे एकमेकांविरूद्ध शेतकऱ्यांविरूद्ध, सरकारविरूद्ध लढत आहेत. विआक्षे हे करमुक्त क्षेत्र अशी संभावना केली जात असून विआक्षे हे गुणवत्तेचे बेट असेही बोलले जाते. मुख्य वाद हा शेतकऱ्याची जमीन संपादन करण्याबद्दलचा आहे. राजकारणी लोकांनी तो उचलून धरला आहे. केंद्र सरकार याबाबतीत हस्तक्षेप करीत आहे. राज्य सरकारे म्हणतात, केंद्राने लुडबुड करू नये, कारण शेतीजमीन हा राज्याचा विषय आहे. शेतीची जमीन संपादन करू नये. शेतकरी व विआक्षे वाल्यांचा हा प्रश्न आहे. यामुळे देशाला मिळणाऱ्या महसूल मधील तोटा जवळ जवळ रू. दोनलक्ष कोटी चा आहे. बागायती जमीन नको, एक पीक येणाऱ्या जमिनीवर विआक्षे ठीक. पण प्रश्न आहे की, एकाच ठिकाणी हजार हेक्टरपर्यंत बागायती जमीन नसणारे क्षेत्र मिळणे कठीण आहे. 400-500 पेक्षा जास्त विआक्षे निर्माण करण्यासाठी दोन लक्ष हेक्टरपेक्षा जास्त जमीन लागणार आहे. महाराष्ट्रात 65 विआक्षे मंजूर झाले आहेत. शेतकऱ्यांना हिस्सा द्या व त्यांना नोकऱ्या द्या. वार्षिक उलाढाल लाखो कोटी रूपयांची, लाखो कोटीचा फायदा आहे. इतक्या जमिनी कशाला ? गोल्फ, क्लब, बंगले, हॉटेल यासाठी जमिनी जास्त लागतात. पंजाब, हरियाणा येथील सुपीक जमीन नाश करण्याचा हा डाव आहे.

आंदोलने केवळ विध्वंसासाठीच, विरोधासाठीच असायला हवीत का ? शेतकऱ्यांच्या आंदोलनाला विधायक दिशा येता येईल व शेतकऱ्यांचे हित साधता येईल आणि आजकालच्या उजाड माळरानातून उत्पादन निर्माण करता येईल. शेतकऱ्यांनी औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्यासाठी स्वत:ची कंपनी निर्माण करावी. जमीन हाच कंपनीतील शेअर असेल. ही जमीन उद्योगास भाड्याने द्यावी. दरवर्षी वाढत जाणाऱ्या दराने दरमहा ठराविक रक्कम शेतकऱ्यांना द्यावी. त्यामुळे सध्या काहीच उत्पन्न न देणारी शेती दरमहा ठराविक उत्पन्न देऊ शकेल. तीस वर्षांनी जमिनी संबंधीत उद्योगाच्या मालकीची असेल, असाही विचार पुढे आला आहे.

वर्षानुवर्षे ज्या जमिनी पडीक आहेत किंवा ज्या जमिनीत फारसे उत्पादन निघु शकत नाही, अशा जमिनीवर औद्योगिक वसाहती उभ्या राहिल्या तर काहीच बिघडणार नाही. यातून ज्ञाननिर्मिती, उत्पादन वाढेल त्यामुळे समाजाची उन्नती होईल. एका एकरावर शेतकरी जितके उत्पादन आणि रोजगार निर्मिती करू शकतो. त्याच्या शंभर पटीने कारखान्यात उत्पादन होते अशीही मांडणी करण्यात येत आहे.

कोणत्याही आर्थिक विकासाचा मुख्य भार शहरावरच पडतो. म्हणूनच आज नागरी क्षेत्रात सुधारणा करून आपण गरिबी हटाओची घोषणा करीत आहोत. भारताची प्रचंड आर्थिक क्षमता खुली करण्याची आणि टिकावू स्वरूपाचा आर्थिक विकास त्वरित घडवून आणण्याची गुरूकिल्ली आज शहरातच आहे. आधुनिक भारत निर्माण करण्यासाठी शहरीकरणाची आवश्यकता आहे. देशांतर्गत उत्पादनात शहरीकरणाचा वाटा 30% वरून 70% वर गेला आहे. शहरीकरणाशिवाय पर्याय नाही, असेही बोलले जात आहे. आपणच प्रश्न निर्माण करत आहोत. उद्योग हे शहराभोवतीच का ? या मूळ प्रश्नाचे उत्तर कोणीही देत नाही.

जगातले निम्मे लोक शहरामध्ये राहतात. दरवर्षी 6 ते 7 कोटी लोक शहराकडे जात आहेत. मुंबईमुळे महाराष्ट्राचा प्रश्न सुटला का ? एका द्रष्ट्या नेत्याने पुण्याचा विस्तार रोखा, असा खणखणीत इशारा दिला. मात्र हे प्रश्न नियंत्रणाबाहेर गेल्यावर त्याच्या यातना सर्वसामान्यांना भोगाव्या लागतात, त्यामुळे पुण्याची वाढ आपणास रोखावयास पाहिजे. त्यासाठी पुढे अकृषीकरणास परवानगी देऊ नका. शेतीवर शेतीमालक व भूमीहीन मजूर जगतो. जमिनीला जमीन द्यावी, पैसा खर्च होऊन जातो. नोकऱ्या दिल्या जात नाहीत. नाशिकजवळील मीगच्या कारखान्यासाठी हजारो एकर जमीन नाशिकजवळच्या शेतकऱ्यांनी दिली. किती स्थानिक लोकांना रोजगार मिळाला, याचा कुणी आढावा घेतला का ? ग्रामीण माणूस अशिक्षित आहे, अकुशल आहे आणि त्यामुळे अशा कारखान्यात नोकऱ्या मिळण्यास त्यांना मर्यादा असते. राजगुरूनगर, चाकण या भागातला शेतकरी जागा झाला आहे. आमच्या जमिनी घेऊ नका, आम्हाला जगू द्या, असे तो ओरडून सांगतो आहे, पण त्याचे कुणी ऐकत नाही.

एखाद्या कारखान्याला किती जमिनी पाहिजे, याला काही नियम आहेत का ? कोणाच्या जमिनीवर कोणाची चैन ? मोबदल्याच्या पैशातून कोणताही शेतकरी नवा उद्योग उभारू शकत नाही वा कुणीही उद्योगपती होऊ शकत नाही. नाहीतर सर्वजण टाटा, बिर्ला, किर्लोस्कर, गरवारे झाले असते. उद्योगपतींनो तुम्ही उद्योग वाढवा पण गरीबाला अति गरीब करू नका. तुम्ही पण या देशाचे नागरिक आहात, तुम्हाला पण सामाजिक बांधिलकी आहे. विषमतेला नियमित करू नका. या देशातल्या गरीब शेतकऱ्यास देशोधडीस लावू नका. हिंजवडी, मगरपट्टा, फूरसुंगी अशा ठिकाणच्या शहरालगतच्या सुपीक व बागायती जमिनी कारखान्यास योग्य आहेत का ? शहरी किती मोठी असावीत, याला काही धरबंद आहे का? 20-25 लाखाच्या पुढे शहराने जाऊ नये, असे विचारवंत सांगतात, त्यांचे कुणी ऐकतो का ? कारखाने खेड्यातील पडीक जमिनीवर जाऊ देणे, परवडणारे नाही का ? कारखान्याला खेड्याकडे नेण्याची गरज आहे. पैशापुढे जमिनीच्या सुपीकतेचा विचार केला जात नाही, ही शोकांतिका आहे.

संरक्षण खात्याकडे बऱ्याचशा जमिनी आहेत. या जमिनीवर विआक्षे का काढू नये, त्याचे उत्पन्न वाढेल. पुणे, नगर औरंगाबाद, नाशिक, दिल्ली, आग्रा इ. ठिकाणी देशभरसंरक्षण खात्याच्या शेकडो एकर जमिनी अनेक वर्षापासून बिनावापर पडून आहेत. त्याच्यापासून किती उत्पन्न मिळते, याचा कोणी विचार करीत नाही. स्वातंत्र्यापूर्व काळात पण महात्मा फुले यांना देशांतर्गत सुरक्षिततेसाठी जो पोलीस दल असतो, त्यांना देखील कामावर लावावे वाटले. त्यांनी ब्रिटिश सरकारला असा इशार दिला होता की, सार्वजनिक पैशावर ही फौज वाढविता, त्यांना कामावर लाऊन या देशातल्या गरीब शेतकऱ्याच्या शेतात सुधारणा करा. पाणथळ, पडीक जमिनीचे रूपांतर शेतीलायक जमिनीत करण्याचा

प्रयोग शिरसोली जळगांव येथे जैन उद्योगसमूहाने करून दाखविलेला आहे. आपण मात्र सुपीक जमिनीवर कारखाने व शहरे वाढवून त्यांना अन्नधान्य पिकविणाऱ्या साधनापासून वंचित करीत आहोत.

विचाराच्या या वावटळी हवेत विरून जाऊ नयेत ही अपेक्षा आहे. सुजाण समाजाची ती तीव्र इच्छा आहे. याला अनुरूप कायद्यात बदल होणे गरजेचे आहे. शेतीलायक जमीन अन्नधान्य उत्पादनासाठीच उपयोगात आणण्याचा निर्धार झाला पाहिजे. तसा कायदा झाला पाहिजे. बिगर शेती उपक्रमासाठी, उद्योगासाठी या देशात अपात्र असणाऱ्या जमिनी आहेत. अशा जमिनीवर नवीन शहरे वसविण्याची, उद्योगधंदे वाढविण्याची नितांत गरज आहे. पर्याय उपलब्ध असताना शेतजमिनीवर आक्रमण होऊ नये ही लोकशाही शासनाकडून किमान अपेक्षा आहे. या दिशेने टाकलेले पाऊल पर्यावरणाची जपणूक करणारे असणार आहे. शहरे ढेपाळणार नाहीत, खेडी उध्वस्त होणार नाहीत, शेती टिकेल व नापिक ओसाड जमिनी उपयोगात येतील. शहरे अमर्याद वाढणार नाहीत या विचाराने प्रेरित होऊन पुढचे पाऊल पडावे हाच ध्यास देश बांधणीसाठी पोषक ठरणार आहे व हाच बहुजनांचा हुंकार आहे.

✦✦✦

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## बत्तिसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे बत्तिसावे वार्षिक अधिवेशन 2008 मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. विनायक भिसे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद हे अध्यक्षस्थान भूषवितील. अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

1) सर्वसमावेशक वृद्धीचे सैद्धांतिक विवेचन

2) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-स्वरूप,उपयुक्तता आणि भवितव्य

3) सन 1990 नंतरचे महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचे बदलते स्वरूप.

या विषयांची रूपरेषा 'अर्थसंवाद' च्या याच अंकात देण्यात आली आहे.

31 ऑगस्ट,2005 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यांनतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध अध्यक्षांच्या पत्त्यावर पाठवावेत.

चौथा विषय तत्कालिन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील. त्या विषयावर निबंध मागविले जात नाही.

**विनायक भिसे**

197, नंदनवन कॉलनी, औरंगाबाद- 431002

दूरध्वनी 0240-2372238

**कार्यवाह-खजिनदार**

# कायदा आणि अर्थशास्त्र

✦ अतुल रा. देशपांडे, तामिळनाडू.
*प्राध्यापक, कौडैकॅनॉल इंटरनॅशनल स्कूल,*
*कौडैकॅनॉल, तामिळनाडू*

*मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या बार्शी येथे झालेल्या 31 व्या अधिवेशनात सादर केलेल्या या शोधनिबंधाला, परिषदेतर्फे दिले जाणारे ग.प्र. पिंपरकर व के. एच. ठाकूर ऋणमुक्ती पारितोषिक प्राप्त झाले आहे.*

**प्रस्तावना**

**का**यदा आणि अर्थशास्त्रातील नेमक्या संबंधाविषयीचा प्रस्तुत शोधनिबंध एकूण चार भागांमध्ये विभागला आहे. कायदा आणि अर्थशास्त्राच्या इतिहासाचे चिकित्सक विश्लेषण आणि ह्या विषयाची अभ्यासपद्धती हे मुद्दे पहिल्या भागामध्ये अंतर्भूत आहेत. कायदा आणि अर्थशास्त्रात सध्या नेमक्या कोणत्या गोष्टींची चर्चा सुरू आहे. (शिकॅगो स्कूल दृष्टिकोन) ह्यासंबंधीचे विस्तारित आणि विश्लेषणात्मक विवेचन दुसऱ्या भागात समाविष्ट केले आहे. तिसऱ्या भागात 'वर्तनासंबंधीचे अर्थशास्त्र आणि कायदा' ह्या विषयासंबंधी चर्चा केलेली आहे. चवथ्या आणि शेवटच्या भागामध्ये 'कायद्याच्या आर्थिक विश्लेषणासंबंधीचे टीकात्मक विवेचन केलेले आहे.

**भाग 1**

**(अ) 'कायदा आणि अर्थशास्त्राचा चिकित्सक इतिहास'**

चिकित्सक इतिहासाकडे वळण्याअगोदर, आपण 'कायदा आणि अर्थशास्त्राची' एक व्याख्या पाहू. 'कायदा आणि कायद्याच्या संस्था ह्यांची उभारणी, रचना, प्रक्रिया आणि परिणाम ह्यांच्या परीक्षणासाठी ज्या आर्थिक सिद्धांतनाचा (economic theory) आणि अर्थमितिय पद्धतींचा (econometric methods) व्यावहारिक उपयोग केला जातो, तो उपयोग म्हणजे कायदा आणि अर्थशास्त्र' (Rowley 1989 b, P.125).

ह्या व्याख्येचा एक अन्वयार्थ असा की, कायद्याच्या आर्थिक विश्लेषण

पद्धतीत कायद्याच्या संस्था ह्या अर्थ व्यवस्थेच्या कक्षे बाहेर आहेत, असा अर्थ काढता येत नाही. याउलट, कायद्याच्या संस्था आर्थिक व्यवस्थेचा एक भाग असून त्यांचा संबंध निवडींशी (choices) आहे, ज्याविषयीचे स्पष्टीकरण द्यावे लागते.

कायदा आणि अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे जे आज स्वरूप दिसते, त्याची सुरूवात अमेरिकेत 1950 च्या अखेरीस झाली. कायद्याशी संबंधित असलेल्या जनसमूहांमध्ये ह्या विषयासंबंधीची जागरूकता 1970 च्या पुढे येऊ लागली. ह्या संदर्भात उल्लेख करावाच लागेल, असे एक उदाहरण म्हणजे 'रिचर्ड अे. पोझनर' ह्यांचे लिखाण होय. 19व्या शतकात युरोपात कायदा आणि अर्थशास्त्राच्या परस्पर उपयोगितेसंबंधीची एक वैचारिक चळवळ कार्यरत होती(Englard, 1990; Pearson,1997). अगदी सुरुवातीच्या काळात ॲडम स्मिथ ह्यांचा 'वेल्थ ऑफ नेशनस्' हा ग्रंथ 'स्कॉटिश एन्लायटनमेंटचा' भाग होता, असे आढळते (रॉबर्टसन, 1987). कायदा आणि अर्थशास्त्राच्या अन्योन्य संबंधाचा पहिला अभ्यासक 'मॅकहीव्हेली' (Macchiavelli) होता, असे आढळते (1961; Pearson 1997, P.19). ॲडम स्मिथ ह्यांच्या काळात डेविड ह्यूम ह्यांनी आपल्या 'ट्रीटायझ्' ह्या ग्रंथात कायद्याचे विवेचन करताना 'दुर्मिळतेच्या जगात'सहकार्याच्या' तत्त्वाची किती गरज आहे, ह्या संबंधीचे विवेचन केलेले आढळते. ह्याच काळात बेकारीया (Beccaria) आणि बेलामी (Bellamy)([1764])1995) हे कायद्याच्या विविध प्रश्नांची चर्चा करताना आढळतात.

मात्र, ह्या सर्वांच्या कामांमधून 'तर्कसंगत निवड प्रतिमानाच्या'(rational choice model) आधारे कायद्याचे तर्कसंगत विश्लेषण झालेले आढळत नाही.

'कायदा आणि अर्थशास्त्राच्या' अभ्यासाची दिशा आणि त्यातील विषयाच्या दृष्टिकोनातून झालेला 'ऐतिहासिक विकास' ह्याबाबतीत कालखंडपरत्वे पाच टप्पे आढळून येतात. (1) 1830 ते 1930 ह्या कालखंडातील चळवळ : ह्या चळवळीचे मूळ जरी 'युरोपियन' असले, तरी 'जुन्या संस्थावादी चळवळीच्या'(old Institutionalist Movement) रूपाने ती अमेरिकेत पोहचली. ज्या अर्थशास्त्रज्ञांच्या आधारे ही चळवळ पुढे गेली, त्यात जर्मन हिस्टॉरिकल स्कूल' आघाडीवर होते. (Pearson, 1997, P.95). ह्या चळवळीच्या समर्थकांनी अभ्यासिलेला विषय म्हणजे 'वेगवेगळ्या समाजात ऐतिहासिक आणि कार्यानुसारी संपत्तीचा अधिकार (property rights) आणि इतर अधिकार कसे निश्चित केले जातात,' हे आणि 'आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीवर 'अधिकारांचे नैमित्तिक' स्वरूप अवलंबून असते,' हे सिद्धांतन अशा महत्त्वाच्या विषयांची चर्चा दिसून येते. कार्ल मार्क्स ह्यांच्या 1859 नंतरच्या लिखाणात ह्या 'स्वीकृत शहाणपणाच्या तत्त्वाचा (Principle of accepted wisdom) आधार सातत्याने दिसून येतो. (2) 'कायदा आणि अर्थशास्त्र' विषयाच्या स्वरूपासंबंधीचा,त्यातील पद्धतिशास्त्रा विषयीचा, वेगवेगळ्या विषयांच्या चर्चेसंबंधीचा विकास अभ्यासताना आढळून येणारे कालखंडपरत्त्वे टप्पे म्हणजे (अ) वेगळ्या रूपालोकाची (Paradigm) सूचना - 1958 ते 1973 (ब) रूपालोकाची स्विकृती -1973-1980 (क) रूपालोकावरचे आक्षेप - 1976-1983(ड) चळवळीचा मंदावणारा वेग - 1983 आणि त्यापुढे. ह्या कालखंडात विषयाचा झालेला विकास 'शिकॅगो स्कूल दृष्टिकोन' आणि 'नव-अभिजातवादी' आर्थिक विश्लेषण पद्धति'

ह्यांच्या आधारे झाला. 1958 ते 1973 ह्या काळात कायद्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये अर्थशास्त्राचा प्रवेश करविण्यात आला. डेमसेझ् (Demsetz) क्रोझ (Coasde), आलचीआन् (Alchain), कॅलब्रेसी (Calabresi) ही मंडळी आणि असे आणखी कितीतरी संशोधक संशोधन करताना दिसतात. ह्याच कालखंडाच्या सुरुवातीला काही वकीलांच्या कामाला सुरुवात झाल्याचे दिसते. ठळकपणे नमूद करता येईल, असं नांव म्हणजे रिचर्ड पोझनर (Posner's Economic Analysis of Law). मात्र, 1976 ते 1983 ह्या कालखंडात 'शिकॅगो स्कूलने' विकसित केलेल्या रूपालोकावर आक्षेप घेण्यात येऊ लागले . हे आक्षेप मुख्यत: 'संस्थावादी अर्थशास्त्रज्ञांकडून' घेण्यात आले.(Goldberg, 1976 a; Liebhafsky 1976; Samuels 1976a; schmid,1976)पोझनर ह्यांनी मांडलेल्या 'कार्यक्षमता सिद्धांतातील उणीवांवर तार्किक चर्चा सुरू झाली(Duxbury, 1995,P.391;Veljanovski, 1980, PP.182-187). 1983 च्या कालखंडाच्या पुढे 'शिकॅगो स्कूल अभ्यासपद्धतीतून' कायदा आणि अर्थशास्त्राचा झालेला विकास आणि संबंधित चळवळ मंद होत गेली का ? ह्या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. ह्या चळवळीला पर्यायी चळवळ उभी राहते आहे का ? ह्या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे. ह्या शोधनिबंधाच्या तिसऱ्या भागात 'पर्यायी चळवळीचा विचार केला आहे. आता आपण ह्या विषयाच्या अभ्यासपद्धतीकडे अगदी धावती नजर टाकू.

### ब. अभ्यासपद्धती (Methodology)

'कायदा आणि अर्थशास्त्राची अभ्यासपद्धती कोणती?' एखादी आर्थिक संकल्पना किंवा आर्थिक सिद्धांतनाच्या आधारे, कायद्याचा अन्वयार्थ शोधताना आणि एक प्रभावी धोरण म्हणून सर्वाधिक चांगली 'सामाजिक कृती'(Social action) काय असू शकते, हे जाणून घेण्यासाठी 'कायदा आणि अर्थशास्त्राच्या' अभ्यासपद्धतींचा विचारही महत्त्वाचा ठरतो.

कायदा आणि अर्थशास्त्राच्या परस्परात्मक संबंधाविषयी जी अभ्यासपद्धती विकसित होत गेली, तिचा आधार (1) 'शिकॅगो लॉ स्कूल आणि इकॉनॉमिक्स्' (2) सार्वजनिक निवड सिद्धांतन (Public Choice Theory)(3) संस्थात्मक (संस्थावादी) कायदा आणि अर्थशास्त्र (Institutional Law and Economics) (4) 'नव-संस्थावादी कायदा आणि अर्थशास्त्र'(Neo-Institutional Law and Economics) ह्या चार निरनिराळ्या मार्गामधून शोधता येतो. (Mercuro and Medamg, 1997) अभ्यासपद्धतिची चर्चा करीत असताना 'डी गीस्ट' ह्यांनी नोंदविलेले मत लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते 'कायद्याच्या प्रति असलेला आर्थिक दृष्टिकोन मर्यादित गृहीतकांवर आधारलेला आहे आणि एवढेच नव्हे, तर एखाद्या गोष्टीसंबंधी अधिक चांगला अभ्यास आणखी काही गृहीतकांच्या आधारे करता येत असेल, तर पहिल्या गृहीतक संचामध्ये तसा बदल करता येणे शक्य असते''(De Geest, 1994).

(अ) तर्कसंगत निवड दृष्टिकोन (rational choice approach) ह्या अभ्यास पद्धतीच्या आधारे ''लोक हे महत्तमीकरणाचा प्रयत्न करतात आणि बाजार पूर्णत्त्वाकडे पोचतो''(Baird,1997). ह्या पद्धतीत 'लोकांची पसंती स्थिर असते' हे गृहीतक आहे. ह्या आर्थिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून 'स्टॉक मार्केट' सारख्या उघड बाजारातच (explicit market) समतोल आढळत नाही, तर 'गुन्हेगारी

व्यवहाराचा' किंवा विवाहाचा बाजार' असो, अशा 'गर्भित बाजारात' (implicit market) देखील समतोल आढळतो.

(ब) वर उल्लेखिलेल्या पद्धतीला पर्यायी पद्धत म्हणून 'नव-संस्थावादी दृष्टिकोन (Neo-institutional approach) पुढे आला. ह्या दृष्टिकोनाच्या मते, आर्थिक व्यवस्थेवर होणारा उत्पादनसंस्था, बाजार आणि कायद्याचा परिणाम 'संस्था आणि संस्थांमधील बदलांमार्फत' होत असतो.

(क) हा दृष्टिकोन 'सामाजिक संकेत किंवा प्रमाणक (Norm) सिद्धांतन स्पष्ट करतो. माणसाच्या वर्तनाचा अर्थ 'सामाजिक प्रमाणकांच्या अस्तित्त्वातून' लावायचा असतो, हे आग्रही मत ह्यातून नोंदविले गेले असे दिसते. हा दृष्टिकोन 'तर्कसंगत निवड दृष्टिकोनाला' पर्याय म्हणून विकसित झाला.

(ड) व्यक्ती निर्णय घेत असताना सामाजिक व्यवहारांच्या चौकटीत राहणे पसंत करतो, ही गोष्ट आर्थिक विश्लेषणपद्धतीत 'द्यूत सिद्धांतीय (Game theoretic)' पद्धतिचा ज्या प्रमाणावर वापर होतो आहे, त्यावरून सहज लक्षात येते. ह्या अभ्यासपद्धतीत किंवा पद्धतीशास्त्रात 'पद्धतिशास्त्रविषयक व्यक्तिवाद दृष्टिकोनाचाही (methodological individualism)' विचार केला गेला आहे. ह्या दृष्टिकोनाच्या आधारे विश्लेषणाचे मूलभूत एकक 'व्यक्ति' हे आहे. असे जरी असले तरी कुटुंबविषयक कायद्याच्या (family law) चौकटीत सर्वसाधारणपणे असे गृहीतक आढळून येते की, पालक त्यांच्या पाल्यांच्या संदर्भात परार्थविषय (altruistic) दृष्टिकोन बाळगून असतात (Backer, 1991) आणि त्याचप्रमाणे 'पद्धतिशास्त्रविषयक' व्यक्तिवादाच्या आधारे देखील आपणांस असे म्हणता येत नाही की, व्यक्ती इतर व्यक्तिंपासून दूर राहून तिचे स्वत:चे निर्णय घेत असते. किमान असे गृहीतक आढळत नाही.

म्हणजेच, मानवी तर्कसंगतता (rationality) ही माहितीचा अभाव असणे आणि माहितीच्या प्रक्रियेविषयी काही मर्यादा असणे ह्या गोष्टींनी बंधपत्रित (bounded) आहे. "तर्कनिष्ठ व्यक्तिच्या माहिती संकलनाला मर्यादा पडतात (Posner,1993 a). पद्धतिशास्त्राच्या ह्या चर्चेत शेवटी नमूद केलेला हा निष्कर्ष आपणांस कायद्याच्या आर्थिक विश्लेषणाकडे नेतो.

## भाग दोन

## 'कायद्याचे आर्थिक विश्लेषण'

कायद्याच्या नियमांचा व्यक्तिच्या वर्तनावर कोणता परिणाम होतो आणि हा परिणाम सामाजिक लाभदायकतेच्या दृष्टिने कितपत प्रभावी असतो, ह्या संबंधीची चर्चा कायद्याच्या आर्थिक विश्लेषणामध्ये केली जाते. ह्या दृष्टिने, विश्लेषणात्मक आधार म्हणून कायद्यातील पाच मूलभूत विषयांची चर्चा आपण ह्या भागात करणार आहोत. कायद्यातील हे पाच मूलभूत विषय म्हणजे संपत्ती (Property), अपकृत्य किंवा नुकसान (Torts), करार (Contracts), दिवाणी खटला (Civil litigation) आणि गुन्हा व कायद्याची अंमलबजावणी (Crime and law enforcement). कायद्यातील ह्या विषयांची विश्लेषणात्मक चौकट विकसित करण्यात कोझ (1960); बाह्य परिणाम (externalities) आणि जबाबदारीचे तत्त्व, बेकर (1968); गुन्हा आणि कायद्याची अंमलबजावणी, कॅलब्रेसी (1970); अपघातविषयीचा कायदा आणि पोझनर (1972); कायद्याचे आर्थिक विश्लेषण ह्या साऱ्यांचे लक्षणीय योगदान आहे. कायद्यातील ह्या प्रत्येक विषयाच्या

महत्त्वाच्या पैलूकडे आता आपण वळूया.

(अ) संपत्तीविषयीचा कायदा : (Property Law)(1) व्यक्तीला संपत्तीविषयक अधिकार देण्याचे कारण काय ? संपत्तीच्या अधिकारातून काम करण्यास प्रेरणा मिळते. हे अधिकार व्यापाराची शक्यता वाढवितात. मात्र ते दिले गेले नाहीत तर एकप्रकारचे अराजक माजेल. संपत्तीच्या अधिकारात मोठ्या प्रमाणावर वाढ तेव्हाच होईल जेव्हा त्यापासून मिळणारे फायदे मोठे असतील.

(2) संपत्तीच्या अधिकारांची विभागणी : ही विभागणी मालकीजन्य (Possessory) अधिकारी आणि हस्तांतरित (transferable) अधिकार अशी आढळते. ही विभागणी मौलिक अशा दृष्टिने आहे की, वेगवेगळ्या व्यक्ति अशा अधिकारांपासून वेगवेगळ्या प्रमाणात फायदा मिळवितात. अशा प्रकारच्या अधिकारांतून काही उणीवा किंवा त्रुटी निर्माण होतात; उदा: बाह्य परिणामांची (externalities) निर्मिती.

(3) सार्वजनिक उपयोगासाठी संपत्ती मिळविणे सरकारला (state) केव्हा हितकारक असते? राज्य संपत्ती खरेदी करू शकते किंवा तशीच घेऊ शकते. जेव्हां संपत्ती तशीच घेतली जाते, तेव्हा ती 'पॉवर ऑफ एमिनंट डोमेनच्या' (Power of Eminent Domain) अधिकारात घेतली जाते. अशा अधिकारात सरकारने संपत्ती घेतल्यास संपत्ती मालकाला नुकसानभरपाई द्यावी लागते. खरेदी आणि नुकसानभरपाई ह्यातील महत्त्वाचा फरक असा की, पहिल्या प्रकारात रक्कम सौदा करून निश्चित होते, तर दुसऱ्या प्रकारात ती एकपक्षीय (Unilaterally) पद्धतीने ठरते. ही चर्चा 'मोबदल्याचे महत्तीकरण' आणि 'सामाजिक कल्याणाच्या दृष्टिने महत्त्वाची आहे.

(4) मालकी नसलेल्या संपत्तीचे संपादन, संपत्तीच्या विक्रीनंतर वस्तुच्या शीर्षकाचे संपादन. प्रतिकूल कब्जा (adverse possession) हे विषय आर्थिक विश्लेषणाच्या दृष्टिने महत्त्वाचे आहेत.

(5) संपत्तीच्या विक्रीबाबत असलेली मर्यादा: बऱ्याच प्रसंगी वस्तुंच्या विक्रीवर कायदेशीर बंधने घातली जातात. अशा प्रकारची बंधने बाह्य परिणामाच्या (externalities) दृष्टीने योग्यच आहेत, असा युक्तिवाद केला जातो. अशा प्रकारच्या बाह्य परिणामांमधून फायदा आणि नुकसान होऊ शकते. दुसरा युक्तिवाद असा की, काही वस्तुंच्या विक्रीवर बंधने आणली पाहिजेत कारण अशा वस्तुंबाबत ग्राहकांना पूर्ण माहिती मिळत नाही. उदाहरणार्थ, एखादे औषध डॉक्टरच्या चिठ्ठीखेरीज (prescription) विकले जाणार नाही.

(6) बाह्य परिणाम (externalities): व्यक्तीकडून संपत्तीचा उपयोग केला जातो, तेव्हा बाह्य परिणामांची निर्मिती होऊ शकते. अशा बाह्य परिणामांमधून काहींचा फायदा होतो, तर काहींना नुकसान सोसावे लागते. इजा पोहचवणाऱ्या बाह्य परिणामांच्या दृष्टिकोनातून असे म्हणता येईल की, व्यक्तींच्या दृष्टिकोनातून स्वत:च्या हितापेक्षा थोडा अधिक इतरांच्या दृष्टिने (त्यांच्या फायद्याचा) विचार केला, तर ते सामाजिक दृष्ट्या अधिक हितकारक ठरते व त्यातून बाह्यपरिणामाचा अधिक हितकारक परिणाम घडवून आणता येऊ शकतो. बाधा आणणाऱ्या बाह्य परिणामांच्या दृष्टिने सामाजिकदृष्ट्या पर्याप्त (optimal) कृतीचा विचार, बाह्य परिणामांमुळे बळी पडणारी व्यक्ती (Victim), आणि हानि पोहचवणारी व्यक्ती (injurers) ह्या दोहोंच्या समावेशातून केला जातो. बळी पडणाऱ्या व्यक्तींकडून बाह्यपरिणामांमुळे होणारे नुकसान कमी करण्याचा प्रयत्न 'अधिक स्वस्तात' होत

असेल(हानी पोहचवणाऱ्या व्यक्तीच्या खर्चापेक्षा) तर बळी पडणाऱ्या व्यक्तीच्या दृष्टिकोनातून तो अधिक 'पर्याप्त' उपाय ठरू शकतो. उदाहरणार्थ प्रदूषण टाळण्यासाठी शेअर फिल्टर्सचा केला गेलेला उपयोग. काही वेळा बाह्यपरिणामांचा अपायकारक परिणाम टाळण्यासाठी बळी पडणारी व्यक्ती तिचे राहण्याचे ठिकाणही बदलू शकते.

(ब) अपघाताचे उत्तरदायित्व/अपकृत्य विषयक कायदा (Tort Law)

(1) अपघातासंबंधीच्या उत्तरदायित्वाची चर्चा अपकृत्य विषयक कायद्याकडून केली जाते. अपघातापासून होणाऱ्या नुकसानीची भरपाई अथवा ह्या प्रकाराने होणारे नुकसान टाळण्यासाठी असलेला प्रभावी उपाय म्हणजे उत्तरदायित्वाच्या तत्त्वाची अंमलबजावणी हा आहे. ह्या संदर्भातील एक महत्त्वाचे निरिक्षण म्हणजे उत्तरदायित्वाच्या व्यवस्थेपेक्षा विम्याची व्यवस्था हा नुकसान भरपाईवरचा कमी खर्चिक उपाय आहे.

उत्तरदायित्वाचे दोन मूलभूत नियम आहेत (1) कठोर उत्तरदायित्वाच्या जबाबदारीतून (Strict liability) अपघातास कारणीभूत झालेल्या व्यक्तीस (injurer) हानि पोचविल्याबद्दल नुकसानभरपाई द्यावीच लागते. (2) दुसरा प्रकार म्हणजे उपेक्षेचा नियम (negligence rule) ह्या प्रकारात हानि पोचविणारी व्यक्ती तेव्हाच नुकसानभरपाईला जबाबदार ठरते, जेव्हा ती व्यक्ती निष्काळजी आहे, हे निश्चित होते. दुसऱ्या अर्थाने असे की, हानि पोहचवणाऱ्या व्यक्तीच्या काळजीची पातळी, ही न्यायालयाकडून निश्चित झालेल्या 'प्रमाणित काळजी पातळीच्या' खाली असते, तेव्हा हानिस कारणीभूत झालेल्या व्यक्तीस नुकसानभरपाई द्यावीच लागते. न्यायालयाकडून निश्चित केल्या गेलेल्या काळजीस ('ड्यू केअर')असे संबोधिले जाते. प्रत्यक्ष व्यवहारात, 'उपेक्षित नियम' हे उत्तरदायित्वाचे प्रभावी स्वरूप आहे, असे आढळते आणि 'कठोर उत्तरदायित्वाचे तत्त्व अधिक घातक व्यवहारांबाबत लागू केले जाते. अपघातांबाबतच्या उत्तरदायित्वाविषयीचे आर्थिक विश्लेषण कॅलब्रेसी (1970)लॅंडस आणि पोझनर (1987 a) आणि शॅव्हेल (1987 a) ह्यांनी अधिक विस्तृतरीत्या केले आहे.

(2) काळजी घेण्यासंबंधीची प्रेरणा (Incentives to take care) : अपघातापासून होणाऱ्या हानिला प्रतिबंध करावयाचा असेल, तर उत्तरदायित्वाचे तत्त्व कोणता परिणाम करते, हे पुढील तार्किक विश्लेषणातून व्यक्त होईल.

प्रतिमान अ

गृहीतके : (1) व्यवहारातील पक्ष जोखीम स्वीकारण्याच्या बाबत तटस्थ आहेत. (2) अपघात हे एकपक्षीय आहेत. (3) हानि पोहचवणारा पक्ष जोखमीवर प्रभाव पाडतो (अपघातात हानि पोहचलेली व्यक्ती नव्हे).

विस्तार : हानि पोहचविणाऱ्या व्यक्तिंची 'काळजी निवड' 'X' मानू. अपघातापासून होणारे नुकसान 'h' आणि अपघाताची शक्यता (Probability) P (X) धरू (P हे X चे घटित फलन आहे.) ह्या विस्तारात असे गृहीत धरू की, एकूण अपेक्षित खर्च X+P(X)h, ह्याचे किमानीकरण (minimization) करणे हे सामाजिक उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे X*हीX ची पर्याप्त पातळी दर्शवितो. कठोर दायित्त्वाच्या दृष्टिकोनातून हानि पोहचवणारी व्यक्ति जेव्हा केव्हा अपघात घडेल तेव्हा 'h' एवढी नुकसान भरपाई देईल. त्याचप्रमाणे ती व्यक्ती स्वाभाविकपणे 'X' एवढा काळजीचा खर्च सहन करील. म्हणजेच

'X+P (X) h', एवढा अपेक्षित खर्च कमीत कमी व्हावा, ह्यादृष्टिने ती व्यक्ती X* ची निवड करील. उपेक्षेचा नियम दृष्टिकोनातून काय घडेल ? समजा 'योग्य काळजी' (due care) पातळी X* निश्चित केली गेली असेल, तर 'X<X*' अशा परिस्थितीत हानि पोहचवणाऱ्या व्यक्तीस 'h' एवढी नुकसान भरपाई द्यावीच लागेल मात्र 'X>X*' अशा प्रतिकूल परिस्थितीत हानि पोहचवणाऱ्या व्यक्तीस कोणतीही नुकसान भरपाई द्यावी लागणार नाही. ह्यावरून असे दर्शविता येईल की, हानि पोहचवणारी व्यक्ती X* ची निवड करील. स्पष्टपणे असे की, ती 'X>X*' अशा परिस्थितीची निवड करणार नाही. त्याचप्रमाणे ती 'X<X*' अशा परिस्थितीची निवड करणार नाही कारण अशा वेळी ती नुकसान भरपाईस जबाबदार ठरते. (ह्या परिस्थितीत कठोर उत्तरदायित्त्वाचे विश्लेषण असे दर्शविते की, व्यक्ती 'X<X*' ह्या परिस्थितीची निवड करणार नाही). वर केलेल्या विश्लेषणातून असे लक्षात येईल की, ह्या दोन्ही प्रकारच्या उत्तरदायित्त्वाच्या दृष्टिकोनातून हानि पोहचवणारी व्यक्ती 'पर्याप्त काळजी' घेते (किंवा ह्या दोन्ही परिस्थिती त्या व्यक्तीस 'पर्याप्त काळजी' घेण्यास भाग पाडतात.)

प्रेरणा आणि उत्तरदायित्त्वाचं विश्लेषण द्विपक्षीय अपघात परिस्थितीच्या संदर्भात देखील केले गेले आहे. अशा परिस्थितीत हानि पोहचलेली व्यक्ती देखील काळजी घेते. कारण उपेक्षेच्या निश्चितिबाबत अनिश्चितता असू शकते. उदाहरणार्थ, 'X'च्या अवलोकनाबाबत असू शकणारी अपूर्णता.

हानि पोहचवणाऱ्या व्यक्तिच्या व्यवहार पातळी संदर्भात (level of activity) देखील आपणांस वर उल्लेखिलेल्या 'तार्किक चौकटीच्या' आधारे चर्चा करता येऊ शकते. एकपक्षीय आणि द्विपक्षीय उत्तरदायित्व (अपघातासंदर्भातील) आणि प्रेरणा ह्याबाबतीत ब्राऊन (Brown, 1973) आणि डायमंड (Diamond,1974) ह्यांनी केलेल्या कामाचा अभ्यास करता येईल.प्रेरणा आणि उत्तरदायित्वाच्या संदर्भात नमूद करण्यासारख्या गोष्टी म्हणजे (1) उपेक्षेच्या नियमाचे व्यवहारीकरण करताना न्यायालयाला 'X'निश्चित करताना पुरेशी माहिती मिळणे आवश्यक असते. (2) उपेक्षेच्या नियमाची अंमलबजावणी करताना 'X' चे अवलोकन महत्त्वाचे असते (3) कठोर उत्तरदायित्वाच्या बाबतीत फक्त 'X' विषयीची माहिती पुरेशी ठरते. (4) 'X'किंवा 'X*' असो, काळजीची पातळी आणि खर्च ह्या सतत बदलणाऱ्या संकल्पना आहेत. (5) बऱ्याच वेळा नुकसान भरपाई न्यायालयाच्या बाहेरही निश्चित होऊ शकते.(6) प्रतिमानाच्या बाहेर राजकीय, सामाजिक असे अनेक घटक आहेत जे 'X' आणि 'X*' वर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रभाव पाडतील, अशी परिस्थिती असू शकते. (7) उत्तरदायित्वा संदर्भातले हे आर्थिक विश्लेषण 'राजकीय अर्थव्यवस्थेच्या' (Political economy) चौकटीत करता येईल का,हाही महत्त्वाचा प्रश्न आहे.

(क) करार (Contracts) वेगवेगळे पक्ष (Parties) वेळोवेळी विशिष्ट परिस्थिती निर्माण व्हावी म्हणून ज्या कृतींची योजना करतात, त्याचा तपशील (specification) म्हणजे करार होय. करार हा 'पूर्णपणे विस्तृत' (Completely-detailed) किंवा 'सर्वसाधारणपणे पूर्ण' (जर कराराकडून स्पष्टपणे सर्व शक्य परिस्थितीचा तपशील दिला गेला) असू शकतो.

(1) अपूर्ण कराराची चर्चा आर्थिक विश्लेषणाच्या दृष्टिने महत्त्वाची ठरते. केवळ वस्तुंच्या किंमतीचा तपशील असणे हे अपूर्ण कराराचे उदाहरण आहे. सहजपणे समावेश करता येऊ

शकल्या असत्या व त्यांच्या समावेशामुळे दोन्ही पक्षांचा अपेक्षित फायदा होऊ शकला असता अशा अटी अपूर्ण करारात असत नाहीत. कराराच्या आर्थिक विश्लेषणात 'अंमलबजावणी' (enforcement) ह्या संज्ञेला खूप अर्थ आहे.

कराराशी संबंधित एक अथवा एकापेक्षा अधिक पक्षाने लवादाकडे(tribunal) जायचा निर्णय घेतला, तर त्यासंदर्भात लवाद जी कृती करते, त्या कृतीस अंमलबजावणी असे संबोधता येईल.

(2) करार तयार करणे (Contract Formation) : निरनिराळ्या बाजूंच्या दृष्टिकोनातून करार तयार करण्याची कृति महत्त्वाची ठरते. त्यामधील एक महत्त्वाची बाब म्हणजे 'शोध प्रयत्न' (Search effort). पक्षांकडून करारासाठी भागीदार शोधण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र, त्यांचा शोध प्रयत्न सर्वसाधारणपणे 'सामाजिकदृष्ट्या पर्याप्त' (Socially optimal) आत नाही (Diamond and Mackin, 1979). बऱ्याच वेळी करारातील पक्षांकडून पुरेसा 'शोध प्रयत्न' होत नाही कारण करारातून होणारा संयुक्त फायदा (Joint-gain)सर्वसाधारणपणे सौदाशक्तीच्या प्रमाणात विभागला जातो. शोध प्रयत्नातून होणारा खाजगी फायदा सामाजिक फायद्यापेक्षा कमी असण्याची शक्यता असते. ह्याउलट असे आढळून येते की, पक्षांकडून सामाजिकदृष्ट्या हितकारक ठरेल त्यापेक्षा थोडा अधिकच 'शोध प्रयत्न' केला जातो. ह्याचे कारण करारासाठी पक्ष शोधताना निर्माण होणारे ऋणात्मक बाह्यपरिणाम (negative externalities) हे होय. जेव्हा एक पक्ष दुसऱ्या पक्षाशी करारबद्ध होतो, तेव्हा तिसऱ्या पक्षाला पहिल्याशी करारबद्ध होता येत नाही.

(3) कराराबाबतीत आढळून येणारे काही महत्त्वाचे विषय म्हणजे कराराला कायदेशीर स्वरूप केव्हा प्राप्त होते, करार तयार होत असताना माहिती उघड करणे सामाजिक लाभकारकतेच्या दृष्टीने महत्त्वाचे का असते? (shavell, 1994) करार अपूर्ण राहण्याची कारणे कोणती ? कराराचा अन्वयार्थ कसा लावता येतो व त्याबाबतीतील 'सामाजिकदृष्ट्या पर्याप्त पद्धती कोणती यासारखे कितीतरी महत्त्वाचे विषय त्यामध्ये येतात.

(4) कराराचा भंग आणि हानिवरचे उपाय (Damage measures for breach of contract): ज्यावेळी एखाद्या पक्षाकडून कराराचा भंग होतो, त्यावेळी त्या पक्षाला होणाऱ्या नुकसानीची भरपाई द्यावी लागते. नुकसानभरपाईचे कोणते सूत्र असावे, हे एकतर लवादाकडून निश्चित केले जाते अथवा द्विपक्षीय पद्धतीने निश्चित होते. करारांच्या भंगामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई दोन प्रकारे करता येते. (1) अपेक्षित उपाय तत्त्व (expectation measure principle) आणि (2) अवलंबित्व उपाय तत्त्व (reliance measure principle) अपेक्षित उपाय तत्त्वाकडून दोन्ही पक्षांच्या संयुक्त फायद्याचे महत्तमीकरण केले जाते, म्हणून सर्वसाधारणपणे पक्षांकडून ह्या उपायाला पसंती दर्शविली जाते (गुंतवणूक प्रेरणा आणि जोखीम पत्करण्या सारख्या व्यवहारांना वगळून) (Shavell, 1990).

नुकसान भरपाईचे उपाय केवळ पक्षांच्या कार्याच्या प्रगतीवरच (Performance) परिणाम करतात असे नाही, तर ते पक्षांच्या घटना-पूर्व (ex-ante) गुंतवणूक प्रेरणेवर परिणाम करतात (Shavell,1980 a). त्याचप्रमाणे नुकसानभरपाईचे उपाय जोखीम पत्करणे आणि प्रेरणा ह्या गोष्टींवरही लक्षणीय परिणाम करतात. (Polinsky, 1983).

(5) कायद्यातील करार ह्या विषयाची व्याप्ती

आणि त्यासंबंधातील आर्थिक विश्लेषण खूप विस्तृत आहे. करारभंगावरचा उपाय म्हणून अंमलात आणलेली विशिष्ट कृती, कराराची पुनर्सौदेबाजी, कराराची कायदेशीर पायमल्ली (legal overriding of contracts) व त्यातून निर्माण होणारे बाह्य परिणाम, करारातून कल्याणात होणारी घट व ह्यासारख्या अन्य काही कारणांमुळे कराराच्या अंमलबजावणीला रोख लावता येतो.

(ड) खटला/दावा (Litigation):

फिर्याद (Suit) खटल्याचे आर्थिक विश्लेषण असे दर्शविते की, फिर्यादी (Plaintiff) फिर्याद करणे पसंत करतो ज्यावेळी फिर्याद करण्याचा खर्च; 'CP' हा फिर्याद केल्यामुळे होणाऱ्या अपेक्षित फायद्यापेक्षा कमी असतो. जर फिर्याद केली गेली तर फिर्यादीकडून व्यक्त झालेला फिर्यादीविषयीचा खर्च 'h' मानू. अशा परिस्थितीत फिर्यादी दावा दाखल करेल. जर फिर्यादीसाठी येणारा खर्च, $Cp$ हा 'h' पेक्षा कमी असेल. ही रक्कम जिंकण्याविषयीची (प्राप्त करण्याविषयीची) शक्यता 'P' असेल. तर 'जोखीम तटस्थ फिर्यादीकडून' फिर्याद दाखल केली जाईल जर $Cp<ph$ अशी परिस्थिती असेल. अशा परिस्थितीत जोखीम टाळणारा फिर्यादी फिर्याद करण्याविषयी विचार करेलच असे नाही.

फिर्याद करण्याविषयी खाजगी प्रेरणा आणि सामाजिकदृष्ट्या पर्याप्त प्रेरणा ह्या दोन गोष्टी एकमेकींच्या बरोबर जातील, असे नाही. ह्यात दोन प्रकारचा परिणाम दिसतो, एक म्हणजे, सामाजिकदृष्ट्या अतिरिक्त ठरेल अशी फिर्याद आणि दुसरी गोष्ट म्हणजे खाजगी फायदा सामाजिक फायद्यापेक्षा जास्त कमी असू शकेल. पुढील उदाहरणाने ह्याचे स्पष्टीकरण होऊ शकते. समजा कठोर उत्तरदायित्वाची परिस्थिती आहे. फिर्यादी फिर्याद दाखल करेल जर $Cp<h$. जर फिर्याद दाखल करावयाची असेल, तर काळजी म्हणून घ्यावयाचा (फिर्यादीने) खर्च 'x' मानू. जर फिर्याद दाखल केली नाही, तर हानिची शक्यता 'q' ने व्यक्त करू आणि फिर्याद दाखल केली तर ती शक्यता 'q'' ने दर्शवू. म्हणजेच 'q''ही 'q' पेक्षा कमी असेल तर फिर्यादीने काळजीवर 'x'एवढी रक्कम खर्च केली. फिर्याद दाखल करणे सामाजिक दृष्ट्या तेव्हाच हितकारक होईल जेव्हा $q^1(Cp+CD+Cs)<(q-q')h-x$ ही परिस्थिती असेल. वर दिलेल्या समीकरणात $C_D$ प्रतिवादीच्या खटल्याचा खर्च दर्शवितो आणि $C_s$ शासनाचा खटला चालविण्यासाठी येणारा खर्च दर्शवितो. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास फिर्याद दाखल करणे सामाजिकदृष्ट्या हितकारक होईल जर खटल्याचा अपेक्षित खर्च हा फिर्यादीला प्रतिबंध केल्याने होणाऱ्या फायद्यापेक्षा (काळजी घेण्याचा खर्च वगळून) कमी असेल. ह्यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, हानि पोहचणाऱ्या व्यक्तीवर खटला दाखल करण्याची अट आणि खटला सामाजिकदृष्ट्या पर्याप्त असण्याची अट ह्या दोहोंपेक्षा भिन्न आहेत. वादी खटला दाखल करेल अथवा नाही, हे $C_D$ आणि $C_s$ ह्या दोन घटकांवर अवलंबून असणार नाही.

खटल्यावर खर्च करण्याची खाजगी आणि सामाजिक प्रेरणा ह्या दोहोंमध्ये अंतर पडू शकते व त्याची कारणे अनेक आहेत. ह्या चर्चेमध्ये इतरही अनेक विषय येतात. उदाहरणार्थ, खटला आणि कायद्याची प्रक्रिया, खटल्यासाठी फिर्यादीची निवड (Priest and klein, 1984) न्यायालयीन निर्णयाची अचूकता (Kaplow 1994, Png, 1986), खटला चालू असताना माहिती पुरवण्याविषयीची अट (Shavell,1989) इ.

(इ) सार्वजनिक कायद्याची अंमलबजावणी

आणि फौजदारी कायदा (Public Law Enforcement and Criminal Law) : हा विषय देखील खूप विस्तृत आणि महत्त्वाचा आहे. हा विषय पहिल्यांदा बेंथॅम (1789) आणि नंतर बेकर (1968) ह्यांनी अधिक विस्तृतरित्या अभ्यासलेला दिसतो (सर्वेक्षणासाठी पाहा.Polinsty आणि Shave 11,2000)

### भाग तीन

### वर्तनवादी कायदा आणि अर्थशास्त्र

(Behavioral Law and Economics)

प्रस्तुत संशोधन निबंधात वर उल्लेखिलेल्या विषयाचा समावेश का करायचा ? 'शिकागो स्कूलने' कायद्याचे आर्थिक विश्लेषण करताना 'तर्कसंगत निवड प्रतिमानाचा' खूप प्रभावी पद्धतीने उपयोग केला. परंतु प्रश्न असा आहे की, सीमांत खर्च आणि सीमांत फायदा ही तर्कनिष्ठ चौकट, कायद्याच्या विश्लेषणासाठी किती व्यवहार्य आहे ? वादी आणि प्रतिवादी, नुकसान पोहचवणारा आणि नुकसान सहन करणारा ह्यांच्या वर्तनाची चौकट काही वेगळी असते का ? ह्या चौकटीतले त्यांचे वर्तन अन्य काही घटकांकडून निश्चित होते का ? वर्तनवादी दृष्टिकोन शिकॅगो स्कूलच्या प्रतिमानाला एक वेगळा पर्याय म्हणून पुढे आल्याचे दिसते. मानसशास्त्राच्या वेगवेगळ्या शाखांमधून विकसित झालेल्या वर्तनवादी दृष्टीचा (insights) कायदा आणि अर्थशास्त्रात समावेश करून वर्तनवादी कायदा आणि अर्थशास्त्राचा विकास होतो आहे. (Allais, 1951)(Ellsberg, 1961). कायद्याच्या नियम रचनेतून व्यक्तिची अपूर्वग्रह दूषितता (debiasing individuals) कशी कमी करता येईल आणि अशा प्रक्रियेतून 'वर्तनवादी कायद्याची चौकट' व्यक्तीचे वर्तन समजून घ्यायला कशी उपयोगी पडेल, हा खरे तर वर्तनवादी कायदा आणि अर्थशास्त्राचा विषय आहे. ह्या ठिकाणी हा विषयाची विस्तृत चर्चा करणे हा उद्देश नाही. काही महत्त्वाच्याच विषयांवर फक्त प्रकाशझोत टाकणे, हा प्रयत्न आहे.

(1) सावधि परिणाम आणि कोझ ह्यांचे सिद्धांतन (Endowment Effect and the Coase Theorem): वर्तनवादी कायदा आणि अर्थशास्त्राचा केंद्रीय बिंदू म्हणून 'सावधि परिणाम' ओळखला जातो. 'स्वत:च्या प्रयत्नांमधून पूर्वी कधीही प्राप्त करून न घेतलेला मालकी हक्क न सोडण्याविषयीची जी प्रवृत्ती असते, तिचे वर्णन'सावधि परिणाम' म्हणून केले जाते (Thaler,1980, PP. 43-47). कोझ ह्याचे सिद्धांतन असे प्रतिपादन करते की, व्यवहार खर्च (transaction cost)खूपच कमी असताना निरनिराळ्या पक्षांना कायदेशीर अधिकार दिले गेले, तर त्यातून उद्भवणाऱ्या फलितावर त्याचा कोणताच परिणाम होत नाही. वर्तनवादी अर्थशास्त्रात देखील कोझ ह्यांचे सिद्धांतन केंद्रीय स्थानी आहे. पंधरा वर्षापूर्वी डॅनिअल कानेमन, जैक नेश आणि रिचर्ड थालर (1991) ह्यांनी 'अनुभवाधिष्ठित (empirical) दृष्टिकोनातून' 'टोकन प्रयोगातून' व पुढे 'कॉर्नेल विद्यापीठ' प्रयोगातून कोझ ह्यांच्या सिद्धांताला छेद जाईल, असे निष्कर्ष काढले.

(2) वर्तनवादी कायदा आणि अर्थशास्त्राचे आधुनिक कार्यक्षेत्र : मानवी वर्तनासंबंधीच्या पारंपरिक आर्थिक गृहीतकांपासून फारकत घेऊन वर्तनवादी कायदा आणि अर्थशास्त्र असे सांगते की, व्यक्तींचे वर्तन तीन गोष्टींवर आधारलेले असते. (1)बंधपात्रित तर्कसंगतता (Bounded rationality) (2) बंधपात्रित इच्छाशक्ति (bounded willpower) आणि (3) बंधपात्रित स्वार्थ (bounded self-interest). ह्या तीन संकल्पनांचा आधार घेऊन कायद्याचे आर्थिक विश्लेषण अगदी वेगळ्या प्रकारे

झाले आहे असे अभ्यासांती दिसते.

व्यक्तिच्या वर्तनात निर्णयप्रक्रियेत 'अंदाजाची चूक (मर्यादा) (Judgement error) असू शकते. अंदाजातील चुकीविषयीचे विश्लेषण हा बंधपात्रित तर्कसंगततेचा विषय आहे. व्यक्तीच्या अंदाजवर्तन प्रक्रियेत चूक होऊ शकते कारण तिचे वर्तन 'पूर्वग्रहदूषित' (वर्तनवादी कायदा आणि अर्थशास्त्र ह्या विषयात पूर्वग्रहदूषिततेची व्याख्या देखील केली आहे) असू शकते. अंदाजातील चुकीला तीन प्रकारची पूर्वग्रहदूषितता कारणीभूत ठरते. (1) आशावादाची पूर्वग्रहदूषितता (optimism bias) (2) स्वत:ची सेवा (केवळ स्वत:बद्दल विचार) करण्याच्या अट्टहासातून येणारी पूर्वग्रहदूषितता (self serving bias) (3) कार्योत्तर (ex-post, घटना घडून गेल्या नंतर) शहाणपणाने येणारी पूर्वग्रहदूषितता (hind-sight bias),घटना घडून गेल्यानंतरचे कायद्याचं विश्लेषण महत्त्वाचे असल्यामुळे ह्या प्रकारच्या पूर्वग्रहदूषिततेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. लोक ज्या योजना करतात त्याची कार्यान्विता अयशस्वी का होते ? ह्या प्रश्नाचे उत्तर 'बंधपात्रित इच्छाशक्तीच्या' आधारे देता येते (Strotz, 1955-56). त्याचप्रमाणे, लोक निरनिराळे पर्याय देऊ करतात आणि निरनिराळे पर्याय स्वीकारण्याची त्यांची तयारी असते. हा विषय 'बंधपात्रित स्वार्थ' ह्या संकल्पनेच्या माध्यमातून अभ्यासता येतो. (Rabin,1993)(Thaler and Dawes, 1992, pp.19-20).

(3) वर्गीकृत कायदा नियम (Distributive Legal Rules) शिकॅगो स्कूलच्या दृष्टिकोनातून आदर्शानुसारी आर्थिक विश्लेषणाद्वारे (Normative Economic analysis) 'संपत्तीचे महत्तमीकरण' (Wealth maximization) हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. ह्या लोकांकडून 'वर्गीकृत कायदा नियमांना' आक्षेप घेतले जातात. त्यांच्या मते वर्गीकृत विषय हे 'कर व्यवस्थेकडून' अधिक चांगल्या प्रकारे हाताळले जाऊ शकतात(Kaplow and Shavell, 1994). वर्गीकृत कायदा नियम दृष्टिकोनातून बिगर-संपत्ती महत्तमीकरणासाठी' अशा कायद्यांची निवड करता येऊ शकते जे वर्गीकृत परिणामांमध्ये बदल घडवून आणू शकतील. उदाहरणार्थ, कामाच्या प्रेरणेवर वर्गीकृत अपकृत्य उत्तरदायित्त्वाचा कमी प्रमाणात ऋण परिणाम होतो, कारण हे तत्त्व 'शक्यतेच्या' (probabilistically) आधारे अधिक काम करणारे आहे, 'निश्चिततेच्या' (deterministically) आधारे नाही.

(4) 'वर्तनासंबंधीचा कायदा आणि अर्थशास्त्र' ह्या विषयात 'खटल्यातील शोध नियम' (Discovery rules in litigation), 'कॉर्पोरेट कायद्यातील व्यावसायिक अंदाज (Business judgement rule in corporate law)' 'कराराची पुनर्उभारणी निश्चित करणारे नियम' (Rules governing contract renegotiation), 'ग्राहक संरक्षण कायद्याचा आशय' (The content of consumer protection law), ह्यासारखे आणखी अनेक विषय येतात. शब्दमर्यादेमुळे विस्तृत चर्चा करता येणे अशक्य आहे. 'वर्तनासंबंधी कायदा आणि अर्थशास्त्र' हा एक चांगला पर्याय आहे. शिकॅगो स्कूलच्या दृष्टिकोनातून केलेले कायद्याचे आर्थिक विश्लेषण वेगवेगळ्या मर्यादांपासून अलिप्त नाही. त्या विशिष्ट चौकटीचे टीकात्मक विवेचन हा ह्या शोधनिबंधाचा चौथा भाग आहे.

## भाग चार

## टीकात्मक विवेचन

(1) वर्तनासंबंधीचे विवेचन - व्यक्ती आणि

उत्पादनसंस्थांचा कायद्याच्या नियमांना दिला जाणारा प्रतिसाद (त्यांचे स्वत:चे हित सांभाळताना) महत्तकासारखा (maximiser) नसतो. उदाहरणार्थ, गुन्हा करण्याविषयीचा निर्णय अर्थशास्त्रज्ञांच्या नेहमीच्या गृहीतकांकडून घेतला जात नाही. त्याचप्रमाणे, कायद्याच्या चौकटीतून व्यक्तिंची पसंती बदलू शकत असेल तर पसंती स्थिर आहे, ह्या युक्तिवादाला अर्थ उरत नाही. तसेच, व्यक्तिंच्या समस्येविषयीच्या आकलनावर कायद्याचा परिणाम होऊ शकतो व त्यातून नुकसान भरपाई देण्याविषयीच्या त्यांच्या शक्याशक्यतेवर वेगळा अभ्यास करावा लागतो.

(2) उत्पन्नाची विभागणी - 'कायद्याचे आर्थिक विश्लेषण चौकट' उत्पन्नाच्या विभागणीचा विषय बाजूला सारून, कार्यक्षमतेवर (efficiency) जरा अधिकच भर देते. ह्यासंदर्भातील आक्षेप असा की, कायद्याचे नियम निवडताना अशा प्रकारे निवडावेत की, ते श्रीमंत आणि गरीब लोकांवर कशा प्रकारे परिणाम घडवून आणतात, हे लक्षात घेतील. कायद्याच्या नियमांकडून संपत्तीच्या पुनर्वाटपाचा प्रश्न सोडवायचा असेल, तर प्रत्येक वेळी अकार्यक्षम कायद्याची निवड करून त्यासंबंधी काय बदल करता येतील, हे ठरविण्याच्या प्रक्रियेमध्ये अधिकाधिक खर्च येईल (Shavell, 1981 Kaplow and shavell, 1994 b).

(3) अन्य समस्या - उत्पन्नाचे 'व्यवस्थित वितरण' कायद्याच्या नियम निवडीतून करता येणार नाही. बऱ्याचशा व्यक्ती दावा दाखल करण्यासाठी राजी असतातच असे नाही आणि ज्या व्यक्ती राजी असतात, आशावादी आणि प्रतिवादी ह्यांच्यामध्ये मुळापासूनच उत्पन्नाची विषमता असू शकते.

(4) रास्ततेचा (fainness) प्रश्न - पारंपरिक आर्थिक विश्लेषण पद्धतीतून बऱ्याच वेळा रास्त, न्याय्य, अधिकार ह्या संज्ञांचा उपयोग केला जातो. मात्र, ह्या संज्ञांचा गर्भित (implicit) संबंध उत्पन्नाचे (संपत्तीचे) वाटप किती न्याय्यपद्धतीने (किंवा योग्यरीतीने) झाले आहे, ह्याच्याशी आहे. दुसरे असे की, ह्या संज्ञातून व्यक्त होणारा आशय व्यवहारात रूपांतरित करावयाचा असेल तर तो ''साधनभूत दृष्टिकोनातून'' (instrumental approach) अभ्यासावा लागेल. ''कायद्याच्या आर्थिक विश्लेषणाची चौकट'' ''आदर्शानुसारी दृष्टिकोनाचा'' (Normative approach) आधार घेते, हे आपणांस माहित आहेच.

(5) चिकित्सक कायद्याचा अभ्यास (Critical Legal Study) समूहाकडून 'काल्डर हिक्स् अटीवरती' काही आक्षेप घेण्यात आले आहेत. काल्डर आणि हिक्स ह्यांची क्षमतेसंबंधीची अट असे प्रतिपादन करते की, न्यायालयाकडून बाजाराला पोषक खासगी कायद्याचे नियम केले गेले पाहिजेत आणि वितरणासंबंधी असलेल्या समस्या कायदेमंडळाने तयार केलेल्या 'कर व्यवस्थेवर आणि 'शासनाच्या हस्तांतरित उत्पन्न' कार्यक्रमावर सोडून दिल्या पाहिजेत. वर्गीकृत कायदा नियम व्यवस्थेतून कर व्यवस्थेला काय मर्यादा पडतात, हे आपण पाहिलेच आहे. काल्डर आणि हिक्स ह्यांची क्षमतेसंबंधीची अट अधिक व्यवहार्य नाही, असे लक्षात येते.

कोझ, पोझनर, बेकर ह्यांचे ह्या विषयावरील काम हा 'कायदा आणि अर्थशास्त्र' ह्या विषयाच्या परस्परसंबंधातला खूपच तर्कसंगत प्रयत्न आहे. 'वर्तनासंबंधीचा कायदा आणि अर्थशास्त्र', 'कायदा आणि सामाजिक-आर्थिक दृष्टिकोन' हे 'शिकॅगो स्कूल चौकटीला' असलेले प्रभावी पर्याय आहेत. ह्या विषयाची व्याप्ती खूपच मोठी आहे.

शब्दमर्यादेमुळे इथेच थांबणे अधिक योग्य आहे.

## संदर्भसूची

(1) Allais, Maurice, 1952. " The foundations of a Positive Theory of Choice Involving Risk and a Criticism of the Postulates and Axioms of the American School," in Expected Utility Hypotheses and the Allais Paradox : Contemporary Discussions of Decisions under uncertainty, 27-145 (Dordrecht, Holland : D. Reidel Publishing,1979)

(2) Ayres, I; and Gertner, R. 1989. Filling gaps in incomplete contracts : an economic theory of default rules. Yale Law Journal 99, 87-130.

(3) Baird, Douslas G., 1997,'The Future of Law and Economics : Looking Forward',64, University of Chicargo Law Review,1129-1165.

(4) Beccaria and Bellamy ([1764]1995), On crimes and Punishments and other writings, Cambridge, Cambridge University Press.

(5) Becker, G.S. 1968. Crime and Punishemnt : an economic approach. Journal of Polititcal Economy 76, 169-217.

(6) Bentham, J. 1789. An Introduction to the Principles of Morals and Legislation, in : The Utilitarians, 1973 ed. Garden City, NY : Anchor Books, 5-398.

(7) Brown, J.P. 1973. Toward an economic theory of liability. Journal of Legal Studies 2,323-349.

(8) Calabresi, G. 1970. The Costs of Accidents : A Legal and Economic Analysis. New Haven : Yale University Press.

(9) Coase, R.H. 1960. The Problem of Social cost. Journal of Law and Economics 3,1-44.

(10) Dee Geest, Gerrit (1994), Economic Analysis of Contract Law and Quasi Contract Law : A Study of the Scientic Value of Law and Economics, Antwerpen, Maklu, 5668 P.

(11) Demsetz, H. 1967. Toward a theory of property rights. American Economic Review : Papers and Proceedings 57, 347-359.

(12) Diamond, P.A. 1974, Single activity accidents. Journal of Legal Studies 3,107-164.

(13) Diamond, P.A. and Maskin, E. 1979. An Equilibrium analysis of search and breach of contract, I: Steacy states. Bell Journal of Economics 10,282-316.

(14) Duxbury, Neil (1995), Patterns of American Jurisprudence, Oxford, Clarendon Press. ch.5

(15) Ellsberg, Daniel 1961. "Risk, Ambiguity and the savage Axioms," Quarterly Journal of Economics, 75:643-69.

(16) Englard, Pearson. H. (1997),'Origins of Law and Economics, The Economists.' New Science of Law, 1830-1930, Cambridge, Cambridge University Press.

(17) Goldberg, Victor P. (1976a), 'Toward an Expanded Theory of Contract', in samuels Warren J. (ed.) The Chiacago School of Polititcal Economy, East Lansing Mich, Association of Evolutionary Economics and Michigan State University, 259-275.

18. Kaplow, Louis and Steven Shavell. 1994."Why the Legal System is Less Efficient than the Income Tax in Redistributing Income", Journal of Legal Studies,23;667-81.

19. Kaplow, Louis and steven Shavell.2002. Fairness versus welfare (Cambridge, Mass:Harvard University Press).

20. Lands, W.M. and Posner, R.A. 1987a. The Economic Structure of Tort Law. Cambridge, MA: Harvard University Press.

21. Machia velli, Nicco'10 (1961)The Prince, Harmondsworth, UK, Penguin Books.

22. Mercuro, Nicholas and Medama,

Steven G. (1997), Economics and the Law : From Ponser to Post-Modernism, Princetion, Princeton University Press.

23. Polinsky, A.M. 1983. Risk Sharing through breach of contract remedies. Journal of Legal Studies 12,427-444.

24. Posner, R.A. (1972; 1987a, 1993a) Economic Analysis of Law. Boston : Little, Brown and Company.

25. Priest, G.L. and B.Klein. 1984. The Selection of disputes for litigation. Journal of Legal Studies 13,1-55.

26. Rabin, Matthew. 1993."Incorporating Fairness into Game Theory and Economics", American Economic Review, 83:1201-1302.

27. Rowley, Charles K. (1988 b), 'Rent Seeking (and) versus Directly Unproductive Profit seeking Activities, in Rowley, Charles K, Tolliston, Robbert D and Tullock, Gordon eds. The Political Economy of Rent seeking, Boston, Kluwer,15-25.

28. Shavell, S.1980a Damage measures for breach of contract. Bell Journal of Economics11,466-490.

29. Shavell, s. 1981. A note on efficiency versus distributional equity in legal relemaking : should distributinal equity matter given optimal income taxation K American Economic Review : Papers and Proceedings 71, 414-418.

30. Shavell, S.1987a Economic Analysis of Accident Law. Cambridge, MA : harvard University Press.

31. Shavell, S. 1991. Specific versus general enforcemnt of law. Journal of Political Economy 99, 1088-1108.

32. Shavell, S. 1994.Acquisition of and disclosure of information prior to sale. RAND Journal of Economics 25,20-36.

33. Thaler, Richard H. 1980. "Toward A Positive Theory of consumer Choice', Journal of Economic Behavior and Organization, 1:39-60.

34. Thaler, Richard H. and Robyn M. Dawes. 1992. "Cooperation," in Richard H. Thaler, The Winner's Course : Paradoxes and Anomalies of Economic Life, 6-20 (New York :The Free Press.)

35. Strotz, Robert H. 1995-56. "Myopia and Inconsistency in Dynamic Utility Maximization, Review of Economic Studies, 23:165-80.

36. Valjanovski, Cento G. (1980), 'The Economic Approach to Law- A Critical Introduction', 7, British Journal of Law ans Society,158-193.

37. Valjanovski, Cento G. (1990), The Economics of Law- An Introductory Text, London, Institute of Economic Affairs,

✦✦✦

टिपण

# स्वयंसहायता बचतगट-ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाची वाटचाल

✦ आर.बी. भांडवलकर, यवतमाळ.
*अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ.*

**भा**रतात एकूण लोकसंख्येपैकी 40 कोटीपेक्षा जास्त लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत असून बहुतेक लोक हे ग्रामीण भागात वास्तव्य करणारे कर्जबाजारी आहेत. भारत हा खेड्यांचा देश आहे. शेती हाच ग्रामीण लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. मोठ्या प्रमाणात कोरडवाहू शेती,2/3 पेक्षा जास्त अल्पभूधारक शेतकरी,नैसर्गिक आपत्ती आणि रोजगारांच्या संधीचा अभाव या ग्रामीण भागातील प्रमुख समस्या असल्यामुळे त्या क्षेत्राचा अपेक्षित असा विकास होऊ शकला नाही. देशात ग्रामीण विकासासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. परंतु जनतेच्या इच्छेशिवाय आणि सहभागाशिवाय ग्रामीण विकासाचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत. भारतामध्ये औपचारिक कर्जवितरण व्यवस्थेचा विकास झाला असला तरी सर्वसामान्य शेतकरी,शेतमजूर,गरजू व्यक्ति आणि कारागिर यांना मात्र योग्य कार्यक्षमतेने कर्जपुरवठा झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या घटकांना खाजगी सावकाराकडून कर्ज घेतल्याशिवाय आपल्या मूलभूत गरजा भागविता येणे शक्य होत नाही. पर्यायाने ग्रामीण भागातील सर्वसामान्य गरीब लोक बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतरही विविध सेवा आणि सवलतीपासून वंचित राहिल्याने यावर प्रभावी उपाय म्हणून स्वयंसहायता बचत गटाची चळवळ महत्त्वाची ठरू लागली आहे. एवढेच नव्हे तर ग्रामीण अर्थव्यवस्था या चळवळीकडे आशेचा किरण म्हणून बघत आहे.

जगामध्ये स्वयंसहायता बचत गटाची चळवळ लघुवित्त, सूक्ष्मवित्त, बचतगट,शेजारगट, स्वयंसहायता समूह या वेगवेगळ्या संकल्पनेतून निर्माण झाल्याचे दिसून येते. सन 1975 च्या दरम्यान बांगलादेशातील अर्थशास्त्राचे प्रपाठक व

जगप्रसिद्ध ग्रामीण बँकेचे प्रणेते आणि नोबेल पारितोषिक विजेते महंमद युनूस यांच्या प्रयत्नामुळे स्वयंसहायता बचत गटाची चळवळ जगभर उदयास आली आहे. मानवी विकासाचे आदर्श प्रतिमान म्हणून समाजातील कमी उत्पन्न गटातील,दारिद्र्य रेषेखालील जनतेला वित्तीय सेवा, उत्पादक कार्यासाठी उपलब्ध होण्याकरीता व त्यांचा सर्वांगीण विकास होण्याचे दृष्टीने कमी व्याजदराचे कर्ज उपलब्ध होणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सन 2005 या आंतरराष्ट्रीय सूक्ष्मवित्त वर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतात स्वयंसहाय्यता बचत गटाने विशेषत: महिलांच्या बचत गटाने मोठ्या प्रमाणावर यश संपादन केले आहे. भारतात 95% स्वयंसहायता गट हे महिलांचे असल्यामुळे कौटुंबिक जीवन सुखकर होण्यास मदत झाली आहे. ग्रामीण भागातील महिलांना आपल्या अडीअडचणी, आचार-विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी बचतगट हे एक व्यासपीठ बनले आहे. महिलांच्या आर्थिक विकासात बचत गटाची भुमिका महत्त्वपूर्ण ठरू लागली आहे.

भारतात सर्वप्रथम रिझर्व्ह बँकेच्या पाठिंब्याने राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या (नाबार्ड) पुढाकाराने म्हैसूर पुनर्निर्माण आणि विकास एजन्सी (MYRADA) या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने सन 1986-87 मध्ये स्वयंसहायता गट प्रकल्प सुरू केला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांची समाजात आर्थिक पत निर्माण करण्यात महिला बचत गटाची चळवळी ही भारतात प्रथमत: कर्नाटक राज्याने सन 1986-1987 मध्ये राबविली त्याही पूर्वी सन 1947 मध्ये महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यात स्वयंसहायता गट वेगळ्या स्वरूपात स्थापन झाल्याचे आढळून आले आहेत. आंध्रप्रदेशात महिला बचत गटाच्या चळवळीने मोठी प्रगती केली असून सुमारे 1500 कोटीपेक्षा जास्त बचत केली आहे. भारतामध्ये क्षेत्रिय व वित्तीय वाटपानुसार भौगोलिकदृष्ट्या स्वयंसहायता बचत गटाची चळवळ गेल्या पाच-सहा वर्षात वेगाने वाढत आहे. आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू,केरळ ही राज्ये या स्वयंसहायता गटाचे संदर्भात आघाडीवर आहेत.

स्वयंसहायता गट विशिष्ट ठिकाणच्या समान व्यवसाय करणाऱ्या व समान आर्थिक गरजा असणाऱ्या व्यक्तींनी स्थापन केलेला गट आहे. यामध्ये स्वत:ची मदत आणि परस्पर सहकार्य या तत्त्वावर 10 ते 12 सभासद असतात ते सभासद आपापल्या अल्पबचती एकत्र करून गरजू सभासदांची आर्थिक गरज भागवितात. प्रामुख्याने आर्थिक साधनांचा एकत्रित वापर केला जातो. त्यामुळे सभासदांना बचतीची सवय लागते त्यांचा आत्मविश्वास वाढतो. अशा सभासदांना आर्थिक आपत्तीच्या वेळी सावकारावर अवलंबून रहावे लागत नाही. थोडक्यात स्वयंसहायता बचत गट हे ग्रामीण भागात आर्थिक केंद्र बनले आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून सामाजिक,आर्थिक आणि शैक्षणिक फायदेही होऊ लागले आहेत. त्याचप्रमाणे या माध्यमातून एकमेकांना मदत करण्याची, सहकाराची आणि एकतेची भावना जोपासली जाते. महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेतील एक विकासाचे पाऊल म्हणून स्वयंसहायता बचत गटाकडे पाहिले जाते. सामाजिक परिवर्तनाचा आणि महिलांच्या प्रतिष्ठेत वाढ हे मोठे बदल या माध्यमातून होत असतांना दिसून येतात. त्याकरिता वित्तीय संस्था, सहकारी बँका,पतसंस्था आणि नाबार्ड यांच्या मार्फत कर्जाची सोय उपलब्ध करून दिली जात आहे. केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने महिला बचत गटांना अनुदान दिले आहे.

स्वयंसहायता बचत गट खेड्यात, वाड्यावस्त्यावर,डोंगराळ भागात,शहरात तसेच

झोपडपट्टीत स्थापन होतात. महिला बचत गटाद्वारे लघु व कुटिर उद्योगामध्ये लोणची,पापड,बेकरीचे पदार्थ,सामूहिक किराणा आणि जनरल स्टोअर्स सुरू करण्यात आल्यामुळे स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. पर्यायाने लोकांच्या कौटूंबिक उत्पन्नात वाढ गरिबीचा स्तर उंचावणे, राहणीमानाचा दर्जा सुधारणे शक्य झाले तसेच विविध जाती-धर्मांचे लोक एकत्र येऊ लागल्यामुळे सामाजिक समता निर्माण होण्यास मदत झाली आहे. तसेच ग्रामीण भागातील अशा गटातील सभासदांची आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली आहे. आर्थिक विषमतेची दरी ही भारतापुढील समस्येपैकी एक महत्त्वाची समस्या आहे. ग्रामीण भागातील निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढू लागल्याने ग्रामस्वच्छता,दारूबंदी इत्यादी सामाजिक उपक्रमही मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात राबविल्या जात आहे. थकित कर्जामुळे कर्जमुक्तीची मागणी करणाऱ्या ग्रामीण शेतकरी-शेतमजूरांच्या प्रश्नामुळे सहकारी आणि वित्तीय संस्था आर्थिक संकटात सापडल्या असतांना स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून दिलेल्या कर्जाची शतप्रतिशत वसुली होऊ लागल्यामुळे बँका आणि वित्तीय संस्था बचत गटाकडे आशेने पाहत आहे नवहेतर त्यांचा संपूर्णपणे दृष्टिकोण बदलला आहे एवढेच नव्हे कर्जाचा उपयोग उत्पादक कारणासाठी होऊ लागल्यामुळे ग्रामीण भागात वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थेचे जाळे निर्माण होण्यास स्वयंसहायता बचतगट हे प्रभावी साधन म्हणून सन 2020 पर्यंत भारतात लोकप्रिय ठरतील याकरिता बचत गटांच्या योजनांमध्ये काही सुधारणा करणे महत्त्वाचे आहे.

1. दारिद्र्यरेषेखाली न येणाऱ्या बचत गटांना राज्य शासनाकडून 50% अनुदान प्राप्त होणे आवश्यक आहे.

2) बचत गटांना राष्ट्रीयीकृत आणि सहकारी बँकांच्या मार्फत 4% ते 6% व्याजदराने कर्जपुरवठा करण्यात यावा.

3) शासकीय स्वस्त धान्य दुकाने आणि रॉकेल वितरण व्यवस्था बचत गटांच्या माध्यमातून राबविण्यात यावी.

4) शाळा,महाविद्यालय,शासकीय व निमशासकीय कार्यालयातील उपहारगृहे तसेच निवासी शाळा व आश्रम शाळातील भोजनालयाची व्यवस्था बचतगटांना देण्यात यावी.

5) बचत गटांनी निर्माण केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय स्तरावरून प्रयत्न व्हावेत तसेच कैद्यांचे आणि शाळेतील मुलामुलींचे गणवेश शिलाईचे काम बचत गटांना देण्यात यावे.

6) ग्रामीण भागातील सार्वजनिक वाचनालये,पोषण आहार योजना,सुदृढ आरोग्यासाठी माहिती प्रसाराचे काम, तसेच विद्युत देयके वाटपाचे काम बचत गटांना देण्यात यावे.

7) सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन,रोपवाटीका विकास योजना बचतगटाच्या माध्यमातून राबविण्यात याव्यात.

8) बचत गटाचे माध्यमातून देण्यात येणाऱ्या कर्जाचा आणि वसुलीचा पारदर्शक व्यवहार होण्याकरिता तसेच गरजू व्यक्तींनाच कर्जपुरवठा होण्याचे दृष्टीने बचतगटाचे नियमित लेखापरीक्षण होणे आवश्यक आहे.

9) बचतगटाच्या माध्यमातून होणारा कर्जपुरवठा हा गरिबी निर्मूलनाच्या दृष्टीने होत असतो. त्यामुळे कर्ज देण्यामधील जोखीम लक्षात घेता बचत गटांना विमा संरक्षण मिळणे आवश्यक

आहे.

10) बचत गटाची वाढणारी संख्या आणि बचतगटाचे कार्य बंद पडण्याचे प्रमाण यांचा विचार करता राजकारण व राजकीय पक्षाचे वाढते प्राबल्य दिसून येते. याकरिता बचतगट योजना राजकारणापासून दूर ठेवण्यात यावी तसेच शासकीयस्तरावरून प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात यावे.

वरील उपाययोजना बचत गटाच्या यशस्वीतेकरिता आवश्यक असल्या तरी ग्रामीण भागातील महिलांमध्ये वाढलेली बचत प्रवृत्ती, पुरूषांचे उत्पन्नात भर घालण्यासाठी आर्थिक सहकार्य, खाजगी सावकारांच्या आर्थिक पिळवणुकीतुन सुटका, घरातील साधनसंपत्तीमध्ये होणारी वाढ, महिलांच्या साक्षरतेमध्ये होणारी वाढ, महिलांची वाढणारी क्रयशक्ती, पुरूषांच्या बरोबरीने आर्थिक व्यवहारात सहभाग, महिलांचे सक्षमीकरण, सामाजिक कार्यात सहभाग, गरीब कुटुंबांना विकासाची संधी प्राप्त होण्यास मदत, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होणे इत्यादी बाबतीत ग्रामीण गरीब व दुर्बल घटकांच्या विकासात स्वयंसहायता गटाचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. स्वयंसहायता गचत गटाचा मुख्य उद्देश केवळ आर्थिक हित नसून लोकसहभागातून सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक प्रगती साध्य करणे हा आहे. याकरिता गटाच्या गावातील सरपंच, अंगणवाडी, कार्यकर्ते आणि वित्तीय संस्थांचे मोलाचे सहकार्य आवश्यक आहे. तसेच ती एक लोकचळवळ म्हणून जनमानसात रूजली पाहिजे तरच ती अधिक गतीमान होऊन राष्ट्र विकासासाठी पोषक ठरेल.

### संदर्भ सूची

1) कुलकर्णी विजय, 'बचतनामा' चैतन्य प्रकाशन, पुणे.

2) मुलाणी एम.यु. 'महिला स्वयंसहाय्यता बचत गट', डायमंड पब्लिकेशन, पुणे

3) 'यशमंथन' (यशदा) मासिक स्वयंसहायता गट विशेषांक, जून 2006.

4) योजना (मराठी) मासिक, एप्रिल 2007.

◆◆◆

## अर्थसंवाद प्रमुख संपादक पदातील बदल

अर्थसंवादचे प्रमुख संपादक **विनायक देशपांडे, नागपूर** यांची संपादक पदाची कारकीर्द 31 मार्च 2008 रोजी पूर्ण झाली. मराठी अर्थशास्त्र परिषदेने त्यांच्या जागी दिनांक 1 एप्रिल 2008 पासून जगन्नाथ शामराव पाटील, सातारा ह्यांची प्रमुख संपादक म्हणून नियुक्ति केली आहे. अर्थसंवादसाठीचे लेखन, जाहिराती आणि त्रैमासिकाशी आनुषंगिक पत्रव्यवहार जगन्नात शामराव पाटील सातारा ह्यांच्या कडेच पुढील पत्त्यावर पाठवावा.

**जगन्नाथ शामराव पाटील**

शांती प्लाझा, बी-9, 880/881, शनिवार पेठ, सातारा- 415002

दूरध्वनी क्रमांक 02162-233152

संवाद

# 'गरिबी निर्मूलन आणि आर्थिक विकास : नव्या युगासाठी नवीन प्रतिमान'

✦ देवदत्त दाभोलकर, सातारा.
*भूतपूर्व कुलगुरु, पुणे विद्यापीठ.*

## प्रास्ताविक

(1) **या** क्षेत्रातील वसंत पेठे यांच्या आस्था अध्ययनाविषयी व काही नवे मार्ग शोधण्याच्या प्रयत्नाविषयी मला नेहमीच कौतुकादर वाटत आलेला आहे.

(2) त्यांनी त्यांच्या निबंधात माझा अभिप्राय उद्‌धृत केला आहे. तो असा आहे. ''पेठे यांचे प्रतिमान नवीन विचारांना चालना देणारे आहे. आंतरशास्त्रीय अध्ययन-संशोधनाला आवाहन करणारे व आव्हान देणारे असे आहे'' हे पेठे यांच्या भारतीय लोकसंख्येच्या प्रश्नाविषयीच्या मूलगामी विवेनचालाही लागू आहे. किंबहुना भारतीय सद्य:स्थितीचा कोणताही व्रतनिष्ठ तत्त्वचिंतक याहून अधिक यशाची अपेक्षा बाळगत नसेल. त्याने बाळगूही नये.

## प्रा. पेठे यांच्या प्रतिमाना विषयी

(1) तळागाळातील माणसापर्यंत जाऊन पोचावयाचे असेल तर आजची प्रचलित प्रतिमाने अपुरी आहेत हे स्पष्ट आहे. प्रश्न आहे तो नवे प्रतिमान शोधून काढण्याच्या बौद्धिक कुवतीचा व ते कणखरपणे आचरणात आणले जाईल अशा प्रभावी सुसंघटित समाज-अधिष्ठित कार्यक्षम कृति-शक्तीचा. (मी केवळ 'राजकीय' म्हटलेले नाही.) या पैकी पहिली शक्ती आपल्याकडे असल्याचे आभास अनेक विचारवंतांना होत असतात. दुसरी शक्ती आपल्याकडे नाही ही भूमिकाही ते सहजपणे घेऊ शकतात. त्या दिशेने यत्किंचीतही प्रयत्न करावयाची मात्र त्यांची सिद्धता नसते. राजकीय शक्ती अंतिमत: जागृत समाजशक्तीवर अवलंबून असते आणि ती तशी करण्यातही आपले प्रत्येकाचे काही उत्तरदायित्व असते. याचे भान आपल्याला रहात नाही. 'The buck ultimately stops with me' हे भान सार्वत्रिक झाले (निदान आपल्याला आले) तर तो शुभारंभ होईल.

एरवी राजकारणी (चांगल्या अर्थाने देखील) म्हणू शकतात - जसे चर्चिल म्हणाला,'I Know that democracy is an imperfect form of government, but it is at present the least imperfect form that is available to us'. ती सवड चर्चिलला आपण दिली पाहिजे. तरीही ब्रिटिश लोकशाही तशी मजबूत होती. दुसऱ्या महायुद्धात केवळ चर्चिलच्या नेतृत्वामुळे विजय मिळवल्यानंतरही लागलीच झालेल्या निवडणुकीत ब्रिटिश जनतेने त्याला पंतप्रधान पदावरून दूर केले. ('What use is the order of the Queen's Gartor to me when the British people have already given me the order of the boot') असे खिलाडूवृत्तीचे विनोदी त्याचे त्याला देऊ केलेल्या अत्युच्च पुरस्कारा विषयीचे उद्‌गार होते.

(2) अवघड विषय सुगम करून मांडण्याची शैली पेठे यांना साधलेली आहे. काही सांस्कृतिक संस्कृतमधील संदर्भ ते देतात तेव्हा माझ्या सारख्याला त्यांच्या अंत:करणातील ओलाव्याचाही स्पर्श होतो. त्यांच्या विचारावर गांधीजींच्या विचारधारेचा काही प्रभाव आहे असे मला वाटते. विशेषत: आसुरी संपत्तीचा देव 'Mammon'याचा ते निर्देश करतात, तेव्हां तर गांधीजींचे 'That man cannot serve both God and Mammon at the same time is the highest economic truth that I Know' हे गांधीजींचे वचन आठवले. गांधी, मार्क्स अशी नावे कानावर पडली की ज्यांचे कान टवकारतात किंवा साफ बंद होतात त्यांच्या दृष्टीने असे एखादे विधान करणे धोक्याचे असते. परंतु ते खरे विचारवंत (विचारशील) नसतात. केवळ आग्रही विचारप्रचारक असतात.

(3) पाश्चात्य प्रतिमानांवर पेठे यानी जी टीका केली आहे तिच्याविषयीही मी काही सांगत नाही. तशा स्वरूपाची टीका अनेकानी (पाश्चात्य नाही) यापूर्वी केली आहे आणि ती सामान्यपणे सर्वमान्य आहे. या टीकेचा मुख्य निष्कर्ष असा की आपण आजवरच्या अनुभवातून शिकून काही नवीन चिन्तन केले पाहिजे या निष्कर्षाशी मी सहमत आहे.

(4) प्रश्न प्रामुख्याने आहे तो कृति-कार्यक्रमाचा या संदर्भात पेठे यांची मांडणी स्वप्नदर्शी आदर्शवादी झाली आहे असे मला वाटते. त्यांच्या मांडणीतील 'सिद्धान्त-2 ए निविष्टि-1' या 'शिक्षण' विषयक निविष्टीचा मी या ठिकाणी केवळ एक उदाहरण म्हणून निर्देश करतो. या क्षेत्रात मी काम केले आहे. या क्षेत्रात केल्या जाणाऱ्या संशोधनाचे (आंतरशास्त्रीस पद्धतीची देखील ) जवळून काही निरीक्षण केले आहे व 1978 साली प्रसिद्ध केलेल्या Education for our People : A development Plan for the next decade या अशाच एका आंतरशास्त्रीय क्लबच्या राष्ट्रीय निवेदनावर माझीही एक स्वाक्षरी आहे. पेठे यानी मांडलेल्या बहुतेक कल्पना व अधिकही काही त्या निवेदनात स्पष्ट आहेत. 2003-2004 मध्ये प्रसिद्ध झालेला 'नवभारत' मासिकाचा अतिथी संपादक म्हणून संपादित केलेला चातुर्मास जोडअंकही 'शिक्षण आणि समाज परिवर्तन' याच विषयाला वाहिलेला आहे.

(5) पेठे यांच्या मांडणीची उणीव म्हणून मी हे सांगत नाही तर या एका क्षेत्रातही भारतात आंतरशास्त्रीय अध्ययन, विश्लेषण,संशोधन विषयक अजून किती मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे याचे निदर्शन म्हणून सांगत आहे. 'आरोग्य' हा पेठे यांच्या प्रत्यक्ष कृतिशील कार्यक्रमाचा भाग राहिलेला आहे. परंतु त्या क्षेत्रातही त्यांची विधाने काटेकोरपणे अधिक तपासली जाण्याची आवश्यकता आहे हे त्यानाही मान्य होईल, असे मला वाटते. त्यांची मांडणी आग्रही वाटली तरी त्यांची संशोधन व प्रतिपादन याविषयी मूलभूत वृत्ती हटाग्रही नाही असा मला विश्वास आहे.

✦✦✦

पीएच. डी. प्रबंधाचा सारांश

# नागरी सहकारी बँकातील नियंत्रण प्रणाली (सांगली जिल्ह्याचा व्यष्टिअभ्यास)

✦ शर्वरी शरद कुलकर्णी, मिरज.
*वाणिज्य विभाग, कन्या महाविद्यालय, मिरज.*

## प्रास्ताविक

**भा**रताने 1991 मध्ये उदार अर्थनीतिचा अवलंब केल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये व भारतीय बँकिंग क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. रिझर्व्ह बँकेचे सर्व बँकांवरील नियंत्रण अधिक कडक करण्यात आले. सहकारी बँकाना या नवीन सरकारी धोरणानुसार जाचक अटी लागू करण्यात आल्या.

सहकारी बँका या समाजातील मध्यम व निम्नस्तरावरील लोकांना अल्पप्रमाणात आर्थिक मदत देण्यासाठी स्थापन झालेल्या बँका होत. या बँका छोट्या व्यापारी, कारागीर व वेतनधारकांना अल्पशा प्रमाणात कर्ज वाटप करून त्यांना सावकारी सापळ्यातून वाचविण्याचे काम करीत असतात. या बँकांसमोरील नवीन आव्हाने म्हणजेच बदलते तंत्रज्ञान, व्यवस्थापनाचे नवीन कौशल्ये, सरकारचे बदलते धोरण, वाढती स्पर्धा, लोकांची वाढती नवीन कर्जाची मागणी इ. अशा अनेक आव्हानाना तोंड देण्यासाठी सहकारी बँकांनी कमी खर्च व उत्तम सेवेचे धोरण स्वीकारलेच पाहिजे. त्यासाठी बँकांमधील अंतर्गत नियंत्रण प्रणाली अधिक सक्षम असणे गरजेचे आहे. सध्या नियंत्रण प्रणालीत देखील आर्थिक व आर्थिकेतर किंवा पारंपरिक व आधुनिक अशी अनेक तंत्रे वापरली जातात. ही सर्वच तंत्रे सहकारी बँकांमध्ये किती प्रमाणात वापरली जात आहेत हे पाहण्यासाठी सदर विषय निवडला असून सांगली जिल्ह्यातील सहकारी बँकांचा अभ्यास करण्यात आला.

सन 2002 पर्यंत सहकारी बँकांची संख्या याभागात 2000 च्या वर होती पण व्यापारी बँकांची संख्या केवळ 200 होती. परंतु 2003 ते 2006 या कालावधीत 200 सहकारी बँका बंद पडल्या किंवा विलिन झाल्या. त्यामागील मुख्य कारणे

नवीन आव्हानांना तोंड देण्यास असणारी असमर्थता हेच होय.

सांगली जिल्ह्यात देखील 2003 पर्यंत 32 सहकारी बँका होत्या, 31 मार्च 2006 पर्यंत 30 बँका उरल्या आहेत. त्यातील 6 बँका आजारी असल्याचे जाहीर करण्यात आले आहे व सध्या त्यांचे विलीनीकरणाचे प्रयत्न चालू आहेत.

### विषयाचा अभ्यास

सहकारी बँकां समोरील नवीन आव्हाने लक्षात घेता या बँकांनी अंतर्गत कार्यक्षमता अधिक सक्षम ठेवणे गरजेचे आहे. ही कार्यक्षमता संस्थेच्या नियोजन व नियंत्रण पद्धतीवर अवलंबून आहे. म्हणून निवडक बँकांमधील नियोजन व नियंत्रण पद्धती जाणून घेण्यासाठी प्रश्नावली तयार करून व्यवस्थापनाच्या दोन स्तरावर प्रश्नावलीच्या माध्यमाने माहिती गोळा करण्यात आली. एकूण 30 बँकांपैकी 12 बँका व त्यांच्या 14 शाखांचा अभ्यास करण्यात आला. नियंत्रणाच्या आर्थिक व आर्थिकेतर पद्धती किती प्रमाणात व कशा वापरल्या जातात यासंबंधी प्रश्न विचारण्यात आले.

### आर्थिक तंत्रे

परिव्यय हिशेब शास्त्र, सम बिंदू विश्लेषण, परिमाण खर्च तंत्र, अंतर्गत तपासणी, जबाबदारीचे लेखांकन, शून्याधारित अंदाज पत्रक, प्रमाण विश्लेषण इ. विविध तंत्राच्या वापराबद्दल माहिती संकलित करण्यात आली .

### आर्थिकेतर तंत्रे

निरीक्षण तंत्र, विशेष नियंत्रण अहवाल, व्यवस्थापनाचे परीक्षण, व्यवस्थापकीय आकडेवारी, प्रकल्प मूल्यमापन आणि पुनरावलोकन तंत्र (Project Evaluation and Review Technique) कालनिर्णयी पथ विश्लेषण (Critical Path method) सामर्थ्य, दुर्बलता, संधी आणि धोका विश्लेषण (Strength, Weakness, opportunity & Threat) इ. विविध तंत्राच्या वापराबद्दल संकलित करण्यात आली. या अभ्यासावरून व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) शाखा व्यवस्थापक किंवा अधिकारी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या .

प्रथमत: 12 बँका एककपुंज नमुना निवड पद्धतीने निवडण्यात आल्या. तक्त्यावरून असे स्पष्ट होते की उच्च व्यवस्थापन पातळीवरील नियोजन व नियंत्रणाचे आर्थिक व पारंपरिक तंत्रे वापरणाऱ्या बँकांची संख्या 12(सर्व निवडक) अर्थात 100% आहेत. परंतु आधुनिक तंत्रे उदा. व्यवस्थापनाचे अंकेक्षण जबाबदारीचे लेखांकन (Responsibility Accounting) इ. तंत्रे वापरणाऱ्या केवळ 2 बँका आहेत, म्हणजेच 16.66% बँका या तंत्रांचा वापर करतात.

आर्थिकेतर तंत्राच्या वापरात देखील हेच प्रमाण आढळते. व्यवस्थापकीय कामकाजाचे अहवाल किंवा माहिती तंत्रज्ञान वापरणाऱ्या 10 बँका (83.33%) आहेत त्या आधुनिक संगणकीय तंत्राचा वापर करतात.

### निष्कर्ष

नागरी सहकारी बँका आजही पारंपरिक पद्धतीने अल्प मुदतीचे नियोजन व नियंत्रण ही तंत्रे वापरतात. मुख्यत: प्रमाण विश्लेषण, अंतर्गत आणि बहिर्गत अंकेक्षण, व्यय लेखे इ तंत्राचा वापर करण्यात येतो.

नियोजन प्रक्रियेमध्ये शाखा अधिकारी हे कनिष्ट व्यवस्थापनाचे प्रतिनिधी म्हणून सहभागी असतात. खर्चावर व अपव्ययावर नियंत्रण ठेवण्याच्या पारंपरिक पद्धती आजच्या आधुनिक युगात कालबाह्य झाल्या आहेत. नागरी सहकारी बँकांनी स्पर्धेला व आधुनिक आव्हानांना तोंड देण्यासाठी संगणक व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे

गरजेचे आहे. या बँकांमधे केवळ दीर्घकालीन गुंतवणूक, मालमत्ता खरेदी, कर्मचारी भरती इ. बाबतीत दीर्घकालीन नियोजन केले जाते. बँकां मध्ये कामकाजाच्या अहवालाचे सामर्थ्य, दुर्बलता, संधी आणि धोका (SWOT) विश्लेषण केले जाते. मात्र व्यवस्थापन कौशल्य अधिक विकसित करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. निष्क्रिय मालमत्तेच्या (N.P.A.) जाचक अटी, भांडवलाचे योग्य प्रमाण (Capital Adequacy Norms) या वाढत्या बंधनाना सामोरे जाण्यासाठी या बँकांनी अधिक सचोटीने नियोजन व नियंत्रण करण्याची गरज आहे. दोन बँका वगळता नवीन आर्थिक व आर्थिकेतर नियंत्रण तंत्राचा वापर अत्यंत अल्प प्रमाणात होत आहे.

अहवालाद्वारे कर्मचाऱ्यांचा कामात उणिवा आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जात नाही. केवळ समज देणे (तोंडी किंवा लेखी) बदली करणे अशा साध्या पद्धतीचा वापर केला जातो असे आढळले. कर्मचाऱ्यांना संगणक व आधुनिक तंत्रे वापरण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. दिलेल्या वेळेत लक्ष्य पूर्ण न झाल्यास जाब विचारला जातो व योग्य ती कारवाई केली जाते असे दिसले.

**उपाय**

1. नागरी सहकारी बँकांमध्ये दीर्घकालीन धोरणात्मक नियोजन व नियंत्रण प्रणाली राबविली पाहिजे. त्यासाठी तज्ज्ञ व्यक्तिंची संचालक मंडळात निवड करणे गरजेचे आहे. तसेच नियोजन व नियंत्रण प्रक्रियेशी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य पद्धतीने व्यावसायिक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून प्रशिक्षण दिले पाहिजे.

2. नागरी सहकारी बँकांनी आपली दीर्घकालीन उद्दिष्ट्ये ठरविताना मध्यम व कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांना व शाखाधिकाऱ्यांना सल्लागार म्हणून सहभागी करून घेणे गरजेचे आहे. त्यांना अंदाजपत्रक तयार करण्यात व त्याचे मूल्यमापन करण्यात सहभागी करून घ्यावे.

3. शुल्क आधारित सेवा उदा. प्रवासी धनादेश, डिमांड ड्राफ्ट, वर नियंत्रण ठेवण्यासाठी अंतर्गत नियंत्रण प्रणाली सक्षम केली पाहिजे. मुख्यत: संगणकीय नियंत्रण यंत्रणा राबवावी.

4. ज्या शाखांजवळ जास्त ठेवी आहेत त्या जादा जमा रक्कम मुख्य कार्यालयाकडे पाठवून दिल्यास तेवढ्या रक्कमेवर हस्तांतरित किंमत (transfer price) आकारावी ही रक्कम ज्या शाखाकडे कर्ज प्रमाण जास्त आहे अशाना देऊन त्यांच्याकडून व्याज स्वरूपात आकारणी करावी.

5. नागरी सहकारी बँकांमध्ये 'विशेष वसुली गट' स्थापन करून त्यांच्या मार्फत वसुलीची स्वतंत्र यंत्रणा राबवावी व त्यासाठी वसुली गटांना वेळेची बांधिलकी व वसुलीचे उद्दिष्ट ठरवून द्यावे.

6. कर्ज वाटपाशी संबंधित 'कार्यक्षमता अंदाज' (performance budgeting) ही पद्धत अधिक प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी 'मासिक मूल्यमापन' करावे. सध्या त्रैमासिक मूल्यमापन पद्धत वापरली जात आहे त्या ऐवजी मासिक मूल्यमापन पद्धत राबवावी. कर्ज मंजूरी संबंधी मंजूरी पूर्वी व मंजूरी नंतर मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमावा.

7. मनुष्यबळ विकास घडवून आणण्यासाठी कर्मचारी, व्यवस्थापक व संचालक मंडळास विविध स्तरावर प्रशिक्षण देण्याची गरज आहे. यासाठी बँकांनी त्यांचे स्वत:चे प्रशिक्षण केंद्र उभारावे.

8. निष्क्रिय मालमत्ता (N.P.A.) व वसुल न झालेली कर्जे यासंबंधी विश्लेषणात्मक अभ्यास करून आजारी शाखांना, सक्षम शाखांनी मार्गदर्शन करावे. एक रकमी तडजोड (One time settlement) व कर्जामध्ये किंवा व्याजामध्ये सूट देऊन वसुली वाढवून अपालन (संपत्ती) कमी करण्याचा

प्रयत्न करावा.

9. नागरी सहकारी बँकांमध्ये 'आधुनिक व्यवस्थापन माहिती प्रणाली' (MIS) राबवल्यास सर्व माहिती संगणकावर अद्ययावत ठेवणे शक्य होईल.

10. कर्मचाऱ्यांची अकार्यक्षमता दूर करण्यासाठी विविध तंत्रांचा (आधुनिक किंवा पारंपरिक) वापर केल्यानंतर जे कर्मचारी अकार्यक्षम ठरतील त्यांच्यावर कठोर कारवाई करून त्यांना सुधारण्याचे प्रयत्न व्हावेत.

11. बँकांनी स्वतःला पूरक अशी संगणक प्रणाली तयार करावी जेणेकरून विविध व्यवहार व त्यांच्याशी संबंधित कागदपत्रे जलद गतीने तयार करता येतील.

12. सर्व नागरी सहकारी बँकांनी नियोजन व नियंत्रण प्रणालीचा वापर करून कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. यंत्र व तंत्राचा वापर करताना मनुष्य स्वभाव व त्याची मानसिकता यांचे योग्य समन्वय साधणे गरजेचे आहे. सर्व कर्मचाऱ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास नियोजन व नियंत्रण पद्धती यशस्वीपणे राबवता येईल. कर्मचाऱ्यांची मानसिकता तयार करण्यासाठी योग्य पद्धतीने प्रशिक्षण व प्रोत्साहनाची साधने वापरणे गरजेचे आहे.

वरील विविध मुद्यांचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, सांगली जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांमध्ये नियोजन व नियंत्रणाची तंत्रे मुख्यत: पारंपरिक स्वरूपाचीच आहेत. तरी बदलत्या काळाप्रमाणे नवीन तंत्रांचा वापर गरजेचा आहे हे त्यांनी ओळखले आहे. काही प्रमाणात संगणकाचा वापर होऊ लागला असला तरी अपेक्षित नवीन तंत्रे लवकरात लवकर वापरण्याची गरज आहे. नव्या तंत्रांच्या प्रशिक्षण व आधुनिकीकरणासाठी येणारा खर्च मोठा असल्याने तो छोट्या बँकांना न परवडणारा आहे. बँकांनी आपला आकार व व्याप लक्षात घेऊन नव्या नियंत्रण तंत्रांचा वापर सुयोग्य पद्धतीने करावा. त्यासाठी प्रथम मानसिकता बदलण्याची गरज आहे. कार्यक्षमता वाढवून स्पर्धेला व नव्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सर्व नागरी सहकारी बँकांनी वरील उपायांचा अवलंब करून नियंत्रण प्रणाली सक्षम करावी.

**तक्ता**

**सांगली जिल्ह्यातील नियंत्रण पद्धतीचा वापर करणाऱ्या बँकांचे प्रमाण**

| अ. क्र. | आर्थिक तंत्रे | | | | आर्थिकेतर तंत्रे | | | | व्यवस्थापन/माहिती प्रणाली | | | | एकूण बँका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पारंपरिक | | आधुनिक | | पारंपरिक | | आधुनिक | | पारंपरिक | | आधुनिक | | |
| | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या |
| 1 | 12 | 100 | 2 | 16.66 | 12 | 100 | 2 | 16.66 | 2 | 16.66 | 10 | 83.33 | 12 |

स्रोत - सर्वेक्षण अभ्यास

(लेखिकेने पी.बी. कुलकर्णी, प्राचार्य बाबासाहेब चितळे महाविद्यालय भिलवडी जि. सांगली यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली आहे. त्या पीएच. डी. प्रबंधाचा हा सारांश)

✦✦✦

*ग्रंथपरीक्षण*

# विदर्भातील मिरची उद्योग

लेखिका : मंजुषा राजेन्द्र ठाकरे, प्रकाशक: विसा बुक्स, नागपूर, प्रथमावृत्ती 2007, पृष्ठे 164, मूल्य रू. 175.

**◆ मृणालिनी फडणवीस, नागपूर.**
*प्राचार्य, महिला महाविद्यालय,नंदनवन, नागपूर.*

एखाद्या विशिष्ट विषयावर सखोल अभ्यास करणे, ही एक कलाच आहे. आचार्य पदवीसाठी केलेल्या संशोधनातून हे पुस्तक लिहिल्या गेले आहे.

या पुस्तकाची विभागणी सात प्रकरणात करण्यात आलेली आहे. मिरचीचे रोजच्या आहारा पासून निर्याती पर्यंतचे लाभ, पुस्तकात वर्णिले आहेत. ग्रंथातील विषयाची मांडणी व्यवस्थित आहे.

मिरचीच्या पाच प्रजाती आहेत. त्यातील दोन म्हणजे कैप्सीकम ॲनुम व कैप्सीकम फ्रुट्ससेन्स ह्या प्रजातीतील द्रवपदार्थांचा उपयोग अधिक होतो. प्रथम प्रकरणात मिरचीचा रोगांवर मात करण्यासाठी कसा उपयोग होऊ शकतो ह्याचे चांगले विश्लेषण करण्यात आले आहे.

विदर्भ व महाराष्ट्र स्तरावरील मिरचीच्या उत्पादन व विपणन विषयक माहिती या पुस्तकात दिलेली आहे. प्रस्तुत अभ्यासात लहान,मध्यम व मोठ्या स्तरावरील शेतकऱ्यांची मिरची लागवडीची सखोल माहिती मिळते. सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे अशा व्यवसायाच्या माध्यमाने दरडोई, उत्पन्नाचा गावनिहाय पद्धतीने अभ्यास करता येतो. प्रस्तुत ग्रंथात मिरची लागवडीचा दरडोई दर एकरी खर्च मोजण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. त्यामुळे पिकापासून मिळणारा फायदा किंवा तोटा तपासून पाहता आला आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील अशा पिकाच्या उत्पादनांचे महत्त्व समजून घेणे सहज शक्य होऊ शकले.

मसाल्याच्या पदार्थांमध्ये हा सर्वात आवडणारा पदार्थ असल्याने तिची लागवड करणाऱ्या प्रदेशातील अर्थव्यवस्थेवर उत्पादनाचा परिणाम सर्व बाजूने तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. मिरची संबंधित आर्थिक प्रक्रियांद्वारा अनेक प्रकारे उत्पन्न प्राप्त होऊ शकते ह्याची खात्री पटते. ह्या पुस्तकावरून मिरची सारख्या रोखपिकाचे कृषीविकासातील महत्त्व कळते. अलिकडील काळात होत असलेले

पीक पद्धतीतील बदल व कृषकांचा रोख पिकांचे उत्पादन घेण्याकडे वाढलेला कल व मिरचीच्या किंमतीतील उच्चावचने यामुळे या विषयावरील अभ्यासाचे महत्त्व वाढले आहे.

अर्थव्यवस्थेमध्ये, अशा सर्वेक्षणावरून कृषितील मूलभूत पण सर्वसाधारण बाबींची माहिती मिळते या क्षेत्रातील रोजगार संधी बाबतचा चौथ्या प्रकरणात सविस्तर आढावा घेतलेला आहे. भिवापूरच्या मिरची उत्पादनाची वैशिष्ट्येही नोंदविली आहे. तसेच मिरचिच्या उत्पादन प्रक्रियांची माहिती सादर केली आहे.

मिरची विक्री प्रक्रिया ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने सक्षम करण्यासाठी ह्या प्रक्रियेचा चिकित्सक अभ्यास करणे गरजेचे आहे. अभ्यासकाने विक्री बाजारात विद्यमान असणाऱ्या अडचणींचे स्पष्टीकरण केले आहे. ह्या अडचणींचे निराकरण करण्याची पद्धत शोधणे आवश्यक आहे. त्यातून बाहेर निघण्यासाठी मार्ग शोधणे महत्त्वाचे ठरेल. मिरची उत्पादकांना प्रत्यक्ष प्राप्त होणारी रक्कम, किंमत व ग्राहकांना द्यावी लागणारी किंमत यात फार मोठी तफावत आढळून येते असे लेखिकेचे मत आहे. ह्यावर प्रभावी मार्ग शोधण्याची आवश्यकता आहे.

मिरचीच्या किंमती व त्यातील बदल हा निसर्गाच्या व मानवी लहरीपणाचा परिणाम आहे. याबाबत काही धोरणात्मक बदल करणे उपयुक्त ठरेल. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जे काही थोडेफार उतारचढाव किंमतीत होत असतात ते शेतकरी गृहित धरतात व त्याचे परिणाम पेलण्याचा ते प्रयत्न करीत असतात . परंतु किंमतीत मोठे बदल झाल्यास त्यांच्या उपजीविकेवर परिणाम होतो. तेव्हा धोरणात्मक बदलही काळाची गरज असेल. किंमत समानता निर्देशांक हा एक महत्त्वाचा भाग पुस्तकात मांडलेला आहे. इतर पिकांसाठी देखील ह्याचा उपयोग करता येईल.

निर्यात प्रक्रियेच्या दृष्टिने आवश्यक सर्व पैलुंचा उल्लेख पुस्तकात केलेला आहे. जागतिक बाजारपेठेतील मसाल्यांच्या पदार्थांची मागणी आपल्याला किती परकीय चलन मिळवून देईल ह्याचा एक आढावा घेता आला असता.

मिरची उत्पादकांच्या भवितव्याची स्थिती कशी राहील हा एक मूलभूत प्रश्न असून त्यावर शेवटल्या प्रकरणात प्रकाश टाकलेला दिसून येतो. प्रथम मिरचीच्या लागवडीसाठी लागणाऱ्या खर्चात कपात कशी करता येईल हे बघणे महत्त्वाचे आहे. ह्या लागवडीच्या आदानाचा खर्च वाढतो आहे म्हणून प्रथम ह्या बाबींकडे लक्ष वेधण्याची गरज जाणवते.

लोकांचा कल संकरित मिरचीच्या उत्पादनाकडे असल्याने ह्या प्रकारच्या मिरचीची उत्पादकता वाढविता येते याचा धोरणात्मक निर्णय घेतांना 'विशेष बाब' म्हणून उल्लेख करण्यात यावा. अशा सुधारणा केल्यास हे पिक अधिक लाभदायक ठरू शकेल. पुस्तकात काही उपाय सुचविले आहेत. जसे संबधित तंत्रज्ञानाचा वापर करणे, फवारणी यंत्रे व कीटकनाशकांचा उपयोग करणे इत्यादि. शेतीची पद्धत सुधारली तर शेतकऱ्यांना फायदा होईल का हेही तपासून पाहिले पाहिजे.

लेखिकेच्या मते ग्रामीण विकासासाठी भिवापूर ह्या भागात संकरित मिरचीच्या लागवडीसाठी विशेष लक्ष दिल्यास शेतकऱ्यांच्या उपजीविकेला चांगला व कायमचा आधार प्रस्थापित होईल व शेती क्षेत्रालाच नवजीवन मिळू शकेल.

एकूणच हे पुस्तक मिरची लागवडी संबंधी मौलिक माहिती उपलब्ध करून देऊन मिरची पिकाचे कृषी अर्थव्यवस्थेतील, रोजगारातील व सामान्य माणसाच्या उपजीविकेतील महत्त्व स्पष्ट करते. या पुस्तकाला संशोधनात्मक मूल्य असल्याने यातील स्थानिक राज्य व राष्ट्रीय पातळीवर निष्कर्षांची चर्चा होणे गरजेचे आहे.

✦✦✦

*अभिनंदन :*

# पद्मश्री भूमिपुत्र भवरलालजी जैन

✦ चारूदत्त गोखले, *कोल्हापूर.*
*कार्यवाह-खजिनदार अर्थसंवाद.*

**या** वर्षी 26 जानेवारी 2008 रोजी भवरलालजी जैन यांना 'पद्मश्री' जाहीर झाल्यावर त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. श्री. भवरलालजींना यापूर्वीच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, कोंकण कृषी विद्यापीठ आणि राजस्थान विद्यापीठा तर्फे डी.लिट् आणि डी.एस.सी. अशा उच्च पदव्या प्रदान करुन सन्मानित करण्यात आला आहे. त्यांना अमेरिकेतील 'इरिगेशन असोसिएशन' तर्फे सिंचनामधील असाधारण कार्यासाठी 'क्रॉफर्ड रीड मेमोरियल' पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे.

भवरलालजींना त्यांना त्यांच्या शास्त्र व अभियांत्रिकी क्षेत्रातील असाधारण योगदानासाठी पद्मश्री देण्यात येत आहे असे शासनाने स्पष्टपणे नमूद केले आहे. श्री. भवरलालजींचे उद्योगधंद्यांमधील योगदान,यश वादातीतच आहे. शून्यापासून सुरूवात करून फक्त 20 वर्षात त्यांनी त्यांचा औद्योगिक पसारा आता रू. 2000 कोटींवर नेला आहे ही बाब निश्चीतच कौतुकास्पद आहे. त्यातल्या त्यात या उलाढालीतला रू. 1000 कोटींचा म्हणजे जवळ जवळ 50 टक्के हिस्सा निर्यातीमधून येतो आहे ही गोष्ट तर त्याहीपेक्षा जास्त कौतुकाची ठरते. हे निखळ सत्य आहे.

शेतीमध्ये नवनवीन तंत्र आणण्याच्या इर्षेनं त्यांनी उती संवर्धन तंत्रज्ञान आणले आणि शेतकऱ्यांच्या पदरात पटींनी पिके टाकली. फळबागायती वाढल्या पण वाढीव पिकांनी भाव कोसळू लागले, म्हणून मग ते सर्वशक्तीनिशी फळे-भाजीपाला प्रक्रिया व्यवसायात उतरले. आज संपूर्ण आशिया खंडात त्यांचे या क्षेत्रात मानाचे पहिले स्थान आहे.

श्री. भवरलालजींनी काळाची पावले जाणून दूरदृष्टीने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी उजाड,वैराण, टाकाऊ, जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी

मृदसंधारण, जल संधारण, बांध बदिस्ती, नाले बंदिस्ती , चर,पाझर, तलाव या व अशा तंत्रांमध्ये लक्ष घालून उदंड यश मिळवले. तसेच बायो गॅस निर्मितीची यशस्वी दिशा दाखवली. सेंद्रिय खत,गांडूळ खत निर्मिती करण्यास सुरूवात केली. सौर उर्जेचा वापर करून त्यावर चालणारी विविध उपकरणे विकसित करून ती जनतेला उपलब्ध करून दिली. शेतकऱ्याला वैभव प्राप्त व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा त्यांचा ध्यास आहे. म्हणूनच सामान्य शेतकऱ्यांना त्याच्या विषयी आदर,प्रेम, आपुलकी वाटते.

वाकोद सारख्या एका लहान खेडेगावात जन्म घेतलेल्या या एका शेतकऱ्याच्या मुलाने जन्मभर शेती,शेतकरी आणि शेती उद्योगांसाठीच आयुष्य समर्पित केले व उद्यमशील व्यक्ति म्हणून नावलौकिक मिळवल.भवरलालजींना शेतकऱ्यांची सद्यस्थिती बघून अत्यंत दु:ख होते. आजही ते शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी सातत्याने प्रयत्नशील असतात. मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे भवरलालजी जैन यांचे हार्दिक अभिनंदन !

✦✦✦

## 2007- 08 या वर्षात झालेले आजीव सभासद

| नांव | सभासद क्र. | नांव | सभासद क्र. |
|---|---|---|---|
| 1) महाजन, श्रीकृष्ण शंकर | 1244 | 20) भदाणे, जयवंत रामदास | 1263 |
| 2) राठोड, सुनिता सतीश | 1245 | 21) इंगळे, बाळासाहेब दिगंबरराव | 1264 |
| 3) देशमुख, लतीश | 1246 | 22) पुजारी, यल्लप्पा धरेप्पा | 1265 |
| 4) बेलुरे, चंद्रशेखर विशाल | 1247 | 23) इंगवले, धनाजी बाबुराव | 1266 |
| 5) कांबळे, तानाजी शंकर | 1248 | 24) गादगे, रामदास कामाजी | 1267 |
| 6) भोसले, मेघना मधुकर | 1249 | 25) काळे, संभाजी भाऊराव | 1268 |
| 7) चिकोडीकर, मकरंद मधुकर | 1250 | 26) टिपरसे, अशोक पुरभाजी | 1269 |
| 8) गायकवाड, जयराम विठ्ठलराव | 1251 | 27) शिंदे, पांडुरंग भानुदास | 1270 |
| 9) भोसले, सिद्धेश्वर चंद्रकांत | 1252 | 28) इंगवले, बाजीराव ज्ञानू | 1271 |
| 10) गावडे, शंकर गुंडा | 1253 | 29) पवार, जीवन विठ्ठलराव | 1272 |
| 11) शिकलगार, आसिफ अकबर | 1254 | 30) वलांडकर, हशीम गुलाब | 1273 |
| 12) महाजन, तुषार भागवत | 1255 | 31) खेमनर, जगन्नाथ किसन | 1274 |
| 13) मेश्राम, सिद्धार्थ सुखदेव | 1256 | 32) कुलकर्णी, अश्विनी श्रीराम | 1275 |
| 14) निकम, सर्जेराव रखमाजी | 1257 | 33) उगले, सुनिल पंढरीनाथ | 1276 |
| 15) पाडवी, कृष्णा राव | 1258 | 34) गिरासे, प्रकाश सरदासिंग | 1277 |
| 16) झोटिंग, शरद वामन | 1259 | 35) चिवटे, नंदा आनंदराव | 1278 |
| 17) चव्हाण, नाना सोमा | 1260 | 36) भोंगाडे, विलास | 1279 |
| 18) होळकर, दिपा कैलास | 1261 | 37 ) श्रीमती मिस्त्री, मलिका | 1280 |
| 19) टिळे, संदीप विठ्ठल | 1262 | | |

ग्रंथपरिचय

# 'साक्षेप' (आत्मचरित्र)

## 'यशस्वी प्राध्यापकाची यशोगाथा'

✦ **दिनकर बोरीकर, औरंगाबाद.**

*सरचिटणीस, श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद.*

'**भौ**तिकात ध्येयनिष्ठेबरोबरच सततोद्योगी व साक्षेपी राहिल्यामुळे मला उच्च पदे व बौद्धिक क्षेत्रात उंच शिखरे गाठता आली' या वाक्याने विठ्ठलराव बापुराव घुगे यांच्या आत्मचरित्रातील वाक्याने माझे लक्ष वेधून घेतले. घुगेंनी कसल्याही प्रकारची आत्मश्लाघा किंवा आत्मप्रौढी जाणीवपूर्वक टाळून हे आत्मचरित्र लिहीलेले आहे. त्यांची भाषा सरळ, सुबोध असून शैली प्रभावी आहे.

वि.बा.घुगे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरू पदाची कारकीर्द यशस्वीरीत्या पूर्ण करून निवृत्त झाले. पारनेरकर महाराज हे त्यांचे प्रेरणास्त्रोत आहेत हे अर्पण पत्रिकेवरून स्पष्ट होते.

घुगे हे अर्थशास्त्राचे नामवंत प्राध्यापक, संशोधक व प्रभावी प्रशासक म्हणून अवघ्या महाराष्ट्रात सुपरिचित आहेत. एका निरक्षर कुटुंबातून ते पुढे आले आणि उच्च विद्या विभूषित होऊन अध्यापनाच्या व प्रशासनाच्या क्षेत्रात उच्च पदांपर्यंत पोचले. त्यांच्या सुविद्य पत्नी मीना घुगे या पारनेरकर महाराजांच्या शिष्या आणि प्रवचनकार आहेत. त्यांचे तिन्ही सुपुत्र हे उच्च शिक्षित आणि आपापल्या क्षेत्रात यशस्वी झालेले आहेत. घुगे यांच्या आत्मचरित्रात कुठेही आकांड तांडव नाही, इतरांवर दोषारोपण नाही, जीवनाकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोण आणि सतत वर्तमानात सम्यक भूमिकेतून जगण्याची त्यांची शैली आत्मचरित्रातून प्रतीत होते. त्यांचा पिंड वैचारिकतेकडे झुकणारा असल्यामुळे आत्मकथनात ते कुठेही भावनाशिल होतांना दिसत नाहीत. त्यांची प्रवृत्ती संशोधकाची असल्यामुळे एकूण आत्मचरित्र सादरीकरणात कुठेही फाफटपसारा नसून वस्तुनिष्ठता हे या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य आहे.

या आत्मचरित्रात वंशावळीद्वारे घुगे वंशाची माहिती दिली आहे

त्यांच्याआयुष्याची वाटचाल सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अभिसरणाच्या प्रक्रियेतून झाली असल्याचे जाणवते. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील केहाळ या खेडेगावच्या घुगे कुटुंबात जन्म घेतलेले घुगे वृत्तीने निर्मोही असून कुटुंबवत्सल आहेत. त्यांनी आपले बालपणही चांगले रंगविले आहे. त्यांना शाळेची आवड लावणाऱ्या सय्यद अन्वरूल्ला बुखारी या मुस्लिम शिक्षकांचा ते कृतज्ञतेने उल्लेख करतात. ती आठवण मोठी हृद्य वाटते. 1955 मध्ये घुगेंनी औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयात प्रवेश घेतला. सुखद योगायोग असा की त्यांच्याच अध्यक्षतेखाली 2005 साली मिलिंद वसतिगृहाच्या सुवर्ण जयंतीचे उद्घाटन झाले. त्यांचा विवाह पी.एल.पवार या वैद्यक सेवा उपसंचालकाच्या कन्येशी, मीनाशी झाला. हे दोघेही एकेकाळी मिलिंद महाविद्यालयाचे विद्यार्थी होते.

'राष्ट्रीय कर्जाचे व्यवस्थापन' या विषयावर त्यांनी पीएच.डी.पदवी साठी संशोधन केले. त्यात त्यांनी अर्थशास्त्रातील अभिजात संप्रदाय, केन्स व केन्सनंतर अस्तित्वात आलेल्या सैद्धांतिक संकल्पनांचे टीकात्मक समालोचन केले. यात त्यांच्या बौद्धिक क्षमतेची झेप दिसून येते. नांदेड, औरंगाबाद येथे अध्यापनाचे कार्य केल्यानंतर त्यांची कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून व पुढे विभाग प्रमुख म्हणून निवड झाली.

कोल्हापूरच्या वास्तव्यात त्यांना शाहू महाराजांच्या कार्याचा विशेष परिचय झाला. त्यानंतर त्यांनी 'शाहू महाराजांचे सामाजिक, आर्थिक विचार व नीति' हे पुस्तक इंग्रजीतून लिहीले.

1984 साली ते मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले. 1991 मध्ये घुगे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू झाले. त्यांनी मोठ्या तन्मयतेने कार्य केले. विद्यापीठाच्या प्रशासनाला कार्यक्षम करण्याचा त्यांनी जीवापाड प्रयत्न केला. या कारकीर्दीत विविध महाविद्यालयांना आवर्जून भेटी देऊन मार्गदर्शन केले. त्यामुळे विद्यापीठ आणि महाविद्यालये यांच्यातील दरी कमी झाली. या काळातील कडू गोड आठवणी त्यांनी चितारल्या आहेत. इंग्लंड येथे झालेल्या राष्ट्रकुल देशांच्या कुलगुरुंच्या परिषदेत त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले व विविध देशातील विद्यापीठांच्या कुलगुरूसोबत उच्चशिक्षणातील प्रश्नांवर चर्चा केली. पत्नीसह त्यांनी केलेल्या अमेरिकेतील प्रवास वर्णनात तेथील समाज जीवनाचेही दर्शन घडविले असून तेथील आर्थिक प्रश्नांची चर्चा केली आहे.

त्यांच्या आत्मचरित्राच्या शेवटच्या प्रकरणातून त्यांच्या पारिवारिक प्रगतीचे, स्वास्थ्याचे व समाधानी वृत्तीचे दर्शन होते. आपल्या आयुष्याकडे समाधानी आणि निकोप दृष्टीने कसे पाहावे याचा वस्तुपाठ या प्रकरणातून मिळतो. जीवन प्रवासात लाभलेल्या पत्नीच्या सहकार्याचा ते कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतात. त्यांची तिन्ही मुले उच्च शिक्षित आहेत याचे मोठे समाधान त्यांना आहे.

सौ. घुगे यांनी, औरंगाबाद येथे सुरू केलेल्या पूर्णवाद अभ्यास केंद्राच्या कार्यात हे दोघे पती पत्नी मनोभावे रमलेले आहेत.

घुगे यांनी या आत्मचरित्राचा समारोप सकारात्मक दृष्टिकोनातून करण्याचा प्रयत्न केला आहे. निवृत्ती नंतरही ते समाज सेवेत व्यस्त आहेत. जीवन साक्षेपाने घालविल्यामुळे जीवन साफल्याचे समाधान आपल्याला लाभले आहे असे ते मानतात.

समृद्ध संपन्न व समाधानी जीवन जगण्यासाठी कोणाही वाचकाला हे आत्मचरित्र पथदर्शक ठरेल असे वाटते.

◆◆◆

चर्चासत्राचा अहवाल

# कायदा आणि अर्थशास्त्र

✦ बबनराव खामकर, कणकवली.
*अधिव्याख्याता, (वृत्तसंकलक)कणकवली महाविद्यालय.*

'कायदा व अर्थशास्त्र' या विषयावरील चर्चासत्रासाठी एकूण 11 शोधनिबंध आले. यापैकी 7 निबंध लेखकांनी आपले शोधनिबंध सादर केले. या चर्चासत्रांचे सूत्रसंचालन ज.फा. पाटील यांनी केले.

पहिला शोधनिबंध कायदा,बहिस्थता आणि विकास या विषयावर शिवाजी विद्यापीठातील संशोधन विद्यार्थी एस.जी. गावडे यांनी सादर केला. त्यांच्या मते विकसनशील देशांमध्ये कायदे प्रणालीत बदल करून आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करता येते. कायदा हा विकासप्रक्रियेचा आधार आहे. कायद्याद्वारे सरकारला आर्थिक कार्यावर नियंत्रण ठेवता येते. तसेच आर्थिक विकासासाठी आवश्यक ते बदल घडवून आणता येतात. त्यांच्या मते बहिस्थतांमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी त्यांच्यावर कायद्याद्वारे नियंत्रण ठेवले पाहिजे व त्यांचे मोजमाप केले पाहिजे. बहिस्थता हे उत्पादन तसेच उपभोगामुळे निर्माण होणारे असे परिणाम आहेत ज्यांचे मोजमाप केले जात नाही. उदा. जमीन, हवा,पाणी यांचे प्रदूषण. त्यांच्यामते विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक खर्चात वाढ होऊन नकारात्मक बहिस्थता निर्माण होतात. या प्रामुख्याने जमीन, हवा,पाणी आणि वनसंपदा या सार्वजनिक वस्तुंच्या बाबतीत निर्माण होतात. बहिस्थता कमी करण्यासाठी कायदे करून त्यांच्या खाजगी हक्कात वाढ करण्याची गरज आहे आणि वापराबद्दल पैसे आकारण्याची गरज आहे.

दुसरा शोधनिबंध 'ग्राहक संरक्षण कायद्याची व्यवहार्यता-सातारा जिल्ह्याचा विशेष अभ्यास' या विषयावर लालासाहेब घाटगे आणि अनिल वावरे यांनी सादर केला. सातारा जिल्ह्यातील ग्राहकमंचाच्या कामगिरीचा आढावा घेताना ग्राहक

संरक्षण कायदा 1986 अंतर्गत ग्राहकाला झालेल्या फसवणुकीबद्दल न्यायालयात दाद मागता येते व त्याचा निकाल 180 दिवसांच्या आत प्राप्त होतो. ग्राहकाचे शोषण थांबवणे हा कायद्याचा हेतू आहे. त्यांच्यामते ग्राहक न्यायालयाचा निर्णय ग्राहकांच्या हिताचा असला तरी निर्णयास विलंब लागतो. त्याचप्रमाणे दावा केलेल्या रकमेपेक्षा कमी रक्कम प्राप्त होते. ग्राहकांच्या हितासाठी ग्राहकमंचाची कार्यकक्षा व अधिकार वाढविण्याची आवश्यकता आहे. लाभ वेळेत मिळण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची गरज आहे. प्रतिवादीकडून निकालाविरूद्ध आवाहन (Appeal) दाखल केल्याने कायदेशीर लढाई सुरू होते. जिल्हा ग्राहक न्यायालयाकडून वेळेत न्याय देण्याचे काम केले जाते. सहकारी संस्थांच्या बाबतीत निकालानंतर न्यायालयीन क्लिष्टता वाढत जाते. काही तक्रारी रास्त असल्या तरी त्या अधिकारकक्षेच्या बाहेर राहतात. साधारणत: 20 टक्के तक्रारी पुरेसे पुरावे नसल्यामुळे फेटाळल्या जातात. दाखल दाव्यांपैकी 64 टक्के दावे दरवर्षी निकाली निघतात. तर 15 टक्के खटल्यांमध्ये तांत्रिक बाबी पूर्ण करण्यात ग्राहक अपयशी ठरतो असे दिसून आले आहे. त्यांच्यामते या कायद्यासंबंधीची जाणीव समाजात निर्माण करणे आवश्यक आहे.

यानंतर तिसरा शोधनिबंध 'ग्राहक संरक्षण कायदे व अर्थशास्त्र' या विषयावर जळगाव येथील एच्.व्ही. चव्हाण यानी सादर केला. त्यांच्यामते उत्पादन, व्यापार, मागणी, पुरवठा, वितरण या प्रक्रियेतील उत्पादक, विक्रेता आणि ग्राहक या घटकांची कायदेशीर सुरक्षितता महत्त्वाची आहे. त्यांनी बाजारव्यवस्थेतील ग्राहक या प्रमुख घटकाच्या संरक्षणार्थ असणाऱ्या कायद्यांचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. यामध्ये त्यांनी सन 1872 भारतीय प्रसंविधा कायदा, 1930 वस्तुविक्रेय कायदा, 1940 औषधे व प्रसाधने कायदा, 1952 भारतीय मानक संस्था कायदा, 1954 अन्नभेसळ प्रतिबंधक कायदा, 1955 आवश्यक वस्तू अधिनियम, 1958 प्रमाणित वजनमापे कायदा, 1975 वस्तुसंवेष्टन कायदा, 1970 मक्तेदारी गैरव्यापार प्रतिबंधक कायदा, 1973 विदेशी विनिमय नियंत्रण कायदा आणि सन 1986 चा ग्राहक संरक्षण कायदा यांचा थोडक्यात आढावा घेतला. या कायद्यांमुळे ग्राहकाला कसे संरक्षण प्राप्त होते याची माहिती दिली.

यानंतर जगन्नाथ पाटील (सातारा) यांनी 'भारतातील बँकांच्या राष्ट्रीयीकरण कायद्याची (1970) फलद्रुपता' या विषयावर निबंध सादर केला. यामध्ये त्यांनी 1913 कंपनीज अ‍ॅक्ट, 1949 बँकींग कंपनीज अ‍ॅक्ट, 1968 सामाजिक नियंत्रण कायदा या कायद्यांचा आढावा घेतला. त्यांनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणामागील उद्दीष्टे स्पष्ट केली. तसेच राष्ट्रीयीकरणानंतर बँकांच्या प्रवृत्तीतील बदल, शाखाविस्तार, ठेवीमध्ये व पतनिर्मितीमध्ये झालेली वाढ, अग्रक्रम क्षेत्राला झालेल्या पतपुरवठ्यातील वाढ, दारिद्र्यनिर्मूलन इ.चा आढावा घेतलेला आहे. त्यांच्या मते नवीन आर्थिक बदलाच्या प्रक्रियेत बँकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्पर्धात्मकता वाढविणे आवश्यक आहे.

कन्या महाविद्यालय मिरज येथील शर्वरी शरद कुलकर्णी यांनी 'बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट 1949 व नागरी सहकारी बँकांची वाटचाल' या विषयावर शोधनिबंध सादर केला. त्यांच्यामते भारतात 2004 नागरी सहकारी बँका आहेत. त्यापैकी 639 बँका महाराष्ट्रात आहेत. सर्वप्रकारच्या बँकांच्या कार्यप्रणालीत समानता असावी. व्यवसायनीती व शिस्त यांचे सुयोग्य पालन व्हावे या हेतूने या कायद्याच्या अंमलबजावणीचे अधिकार रिझर्व्ह बँकेला देण्यात आले आहेत. मार्च 1966 पासून हा

कायदा देशातील सर्व सहकारी बँकांना लागू करण्यात आला आहे. जागतिकीकरणाच्या युगात रिझर्व्ह बँकेने या कायद्यात केलेल्या सुधारणांमुळे नागरी सहकारी बँका अडचणीत आल्या आहेत. यातून बाहेर येण्यासाठी मार्च 2005 मध्ये नागरी सहकारी बँकांकरिता रिझर्व्ह बँकेने भावी योजना दर्शविणारा दस्तावेज तयार केला. त्यानुसार दुर्बल बँकांना त्यांची स्थिती सुधारण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी दिला जातो. जर रिझर्व्ह बँकेने दिलेल्या सूचनांचे त्यांनी पालन केले नाही तर त्यांना परवाना रद्द किंवा विलीनीकरणास सामोरे जावे लागते. या दस्तावेजानुसार 2005 पासून बारा राज्यांनी रिझर्व्ह बँकेशी सामंजस्य करारावर सह्या केल्या आहेत. त्यामुळे कमकुवत बँका सक्षम होत आहेत. पन्नासहून अधिक बँकांचे विलीनीकरण करण्यात आले आहे. हा कायदा ठेवीदारांच्या हिताचे रक्षण व नागरी बँकांची गुणात्मकता वाढविण्याच्या दृष्टीने हिताचा ठरला आहे.

'कायदा व विशेष आर्थिक क्षेत्र' या विषयावर रमेश कटके यांनी निबंध सादर केला. त्यांच्यामते आतापर्यंत मंजूर केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रासाठी 1 लाख 34 हजार हेक्टर जमीन संपादण्यासाठी शासन व कंपन्या प्रयत्नशील आहेत. त्यानुसार जमीन कोणत्या भावाने घ्यावी ही जबाबदारी उद्योजक व जमिनमालक यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. त्यांच्यामते त्यामुळे निर्माण होणारा विस्थापितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न, रोजगार यांचा अगोदर विचार झाला पाहिजे. यासंदर्भात निर्माण झालेल्या नंदिग्राम आणि रायगड संघर्षाचा विस्थापनामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा त्यांनी आढावा घेतला आहे.

शिवाजी विद्यापीठातील एम्.ए. चे विद्यार्थी धनाजी पोवार यांनी 'कायदा व अर्थशास्त्र-एक विवेचन' या विषयावर निबंध सादर केला. यामध्ये त्यांनी औद्योगिक कलह कायदा 1947 सामाजिक सुरक्षा कायदा, 1923, किमान वेतन कायदा 1948, मुंबई गृहनिर्माण कायदा 1948, बोनस कायदा 1965, बँकिंग कंपनीला ॲक्ट 1949, परदेशी चलन नियंत्रण कायदा 1974, एम्.आर.टी.पी. ॲक्ट 1970, या कायद्यांचा आढावा घेतला आहे.

याशिवाय कोडैकॅनॉल येथील अतुल देशपांडे, यांच्या 'कायदा व अर्थशास्त्र' या निबंधांचा आढावा जे.एफ. पाटील यांनी घेतला. हा शोधनिबंध एकूण चार भागांमध्ये विभागलेला आहे. पहिल्या भागात कायदा आणि अर्थशास्त्राचा चिकित्सक इतिहास देण्यात आलेला आहे. दुसऱ्या भागात कायद्याचे आर्थिक विश्लेषण करण्यात आलेले आहे. यामध्ये संपत्तीविषयीचा कायदा, संपत्तीच्या अधिकाराची विभागणी, सार्वजनिक उपयोगासाठी संपत्ती मिळविणे, मालकी नसलेल्या संपत्तीचे संपादन, संपत्तीच्या विक्रीबाबत असलेल्या मर्यादा, बाह्य परिणाम, अपघाताचे उत्तरदायित्व, अपकृत्यविषयक कायदा याबाबत अत्यंत चिकित्सक आढावा घेण्यात आला आहे. या शोधनिबंधाच्या तिसऱ्या भागात वर्तनवादी कायदा आणि अर्थशास्त्र याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. निबंधाच्या चौथ्या भागात टीकात्मक विवेचन करण्यात आलेले आहे. कायदा आणि अर्थशास्त्र यांच्यातील परस्परसंबंध खूपच तर्कसंगत आहेत असे मत त्यांनी मांडले.

याशिवाय परिषदेकडे प्राप्त निबंधापैकी 'कायदा व अर्थशास्त्र परस्पर संबंधाचे सैद्धांतिक व व्यावहारिक विश्लेषण' या विषयावर मंजुषा मुसमाडे, वाडिया कॉलेज, पुणे यांनी शोधनिबंध पाठविला

होता. त्यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये कायदा व अर्थशास्त्रातील शाखेच्या विकासाचा आढावा घेतला आहे. तसेच कायदा व अर्थशास्त्र यांच्यातील परस्पर संबंधाचे सैद्धांतिक विवेचन केलेले आहे. यामध्ये पाश्चात्य विचारवंतांच्या विचारांचा त्याचबरोबर त्यांनी कायदा आणि अर्थशास्त्र यांच्यातील काही व्यावहारिक उदाहरणांचा आढावा घेतला आहे, त्यांच्यामते भारताला आर्थिक महासत्ता होण्यासाठी योगय आर्थिक धोरणाची जितकी गरज आहे तितकीच कार्यक्षम कायदे व त्यांची कार्यक्षम अंमलबजावणी करून कायद्याचे राज्य निर्माण करण्याची देखील गरजेचे आहे.

याशिवाय गोवा विद्यापीठाचे माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख अ.रा. पडोसी यांनी आपले विचार मांडताना असे म्हटले की, आर्थिक वृत्ती ही माणसाची जन्मजात प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्ती बंधन शिवाय मोकाट सुटली तर समाजावर त्याचे दुष्परिणाम होतात. संपत्ती निर्माण करताना पथ्ये टाळण्याकडे लोकांची प्रवृत्ती असते. या प्रवृत्तीचे नियमन करण्यासाठी कायदा आवश्यक असतो. अन्यथा समाजामध्ये बजबजपुरी निर्माण होते.

यानंतर नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजच्या स्नेहा देशपांडे यांनी विचार मांडले, त्यांच्या मते पुंजीवाद खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देतो. त्यांच्या नियमनासाठी कायदा आवश्यक असतो. कायदा हा नैसर्गिक न्यायावर आधारित असतो. यासाठी त्यांनी भूमिसुधारणा कायदा, संविदा अधिनियम यांची माहिती दिली. अमरावतीच्या मुक्ता जहागिरदार यांच्या मते धोरणाभिमुख अर्थशास्त्राच्या यशासाठी शासकीय भूमिका व संविधानात्मक चौकट महत्त्वाची आहे. कायद्याचे यश अंमलबजावणीवर अवलंबून असते. दि. व्य. जहागिरदार यांनी यासंदर्भात अभिजात अर्थतज्ज्ञ, संस्थात्मक अर्थतज्ज्ञ आणि आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचा आढावा घेतला.नागपूर विद्यापीठातील विनायक देशपांडे यांनी कायदा आणि अर्थशास्त्र या विषयाच्या सैद्धांतिक विवेचनाबरोबरच त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीची आवश्यकता आणि अंमलबजावणीतील व्यावहारिक मर्यादा यांचा अत्यंत चिकित्सक आढावा घेतला. या चर्चा सूत्राचे सूत्रसंचालन आणि समारोप परिषदेचे कार्याध्यक्ष ज. फा.पाटील यांनी केले.

✦✦✦

---

अधिवेशनात या चर्चासत्राव्यतिरिक्त

1. भारताच्या कृषी क्षेत्रावरील अरिष्टे आणि

2. महाराष्ट्रातील नागरीकरण-कारणे, स्वरूप आणि परिणाम

या विषयांवर देखील चर्चासत्रे संपन्न झालीत. परंतु या चर्चासत्रांचे अहवाल संबंधित व्यक्तिंकडून वेळेवर प्राप्त न झाल्याने या अंकात त्याबाबतची माहिती नाईलाजाने प्रकाशित करता आली नाही. या बद्दल आम्ही दिलगीर आहोत.

**प्रमुख संपादक**

---

# 'अर्थसंवाद' वार्षिक अहवाल :2006-07

(खंड 29, अंक 1 ते 4)

✦ विनायक श्रीधर देशपांडे, नागपूर.

*प्रमुख संपादक 'अर्थसंवाद' आणि प्रपाठक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,*
*राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.*

'अर्थसंवाद' चा 2005-06 या वर्षाचा अहवाल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व सदस्यांसमोर सादर करण्यात मला आनंद होत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतील हा चौथा अहवाल आहे. या वार्षिक अहवालाच्या माध्यमाने आपण आपले हे विद्यानिष्ठ नियतकालिक कशा पद्धतीने प्रकाशित करीत आहोत याची जाणीव सर्व सदस्यांना करून देण्याची संधी मला लाभते.

सन 2005-06 हे 'अर्थसंवाद' चे एकोणतिसावे वर्ष आहे. या वर्षात आपण कायकाय साध्य करू शकलो या बाबतची माहिती आता पाहू या. प्रथमत: प्रकाशित साहित्य. एकंदर 17 स्वतंत्र लेख, 3 ग्रंथ परीक्षणे, 2 अर्थ शब्दांची वाट पाहे, 2 भाषणे, 1 पारितोषिक प्राप्त लेख, 5 अधिवेशन वृत्तांत, 3 विषयांची रूपरेषा, 3 संकीर्ण आणि 3 संपादकीय एवढे साहित्य आपण प्रकाशित केले. त्यासाठी एकंदर 33 लेखकांचा सहभाग लाभला. नेहमीच्या लेखकांबरोबरच काही नवीन लेखक यावेळी पुढे आले आहेत. त्यांना ही बाब उत्साहवर्धक वाटून भविष्यकाळात अधिक लिखाण करण्यास ते प्रोत्साहीत होतील. संभाव्य लेखकांनी सैद्धांतिक विषयावरील लिखाण अधिकाधिक करण्याचा प्रयत्न करावा. अर्थमिती, पर्यावरणाचे अर्थशास्त्र कल्याणाचे अर्थशास्त्र, पैसा, भांडवल बाजार या संबंधिच्या विषयांना हवा तेवढा न्याय अर्थसंवादमधील लिखानाच्या माध्यमाने प्राप्त झाला नाही. या विषयांवरील साहित्य प्राप्त झाल्यास अर्थसंवाद मधील लेखन अधिक समावेशक होऊन नियतकालिकाची उपयुक्तता वाढेल.

या वर्षातील अर्थसंवादचे वैशिष्ट्य म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत या विषयावरील प्रकाशित करण्यात आलेले चार लेख. अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना आपल्या

या नियतकालिकाच्या माध्यमाने या एकाच विषयावर मोठ्या प्रमाणात लेखन सामग्री प्राप्त होऊ शकली. या व्यतिरिक्त व्यवसाय प्रक्रिया बाह्यस्रोतासारख्या नवीन विषयावर देखील पुरेशी माहिती अर्थसंवाद मधुन प्राप्त होऊ शकली. या वर्षीच्या चार अंकात आंतरराष्ट्रीय व्यापार, जागतिकीकरण, अर्थसंकल्प दारिद्र्य निर्मूलन, ग्रामीण विकास, प्रादेशिक आर्थिक प्रश्न , पाणी व्यवस्थापन, मूल्यवर्धित कर हे विषय प्रामुख्याने समाविष्ट करण्यात आले. स्त्री केंद्री दृष्टिकोनातून केंद्रीय अर्थसंकल्पाचे विश्लेषण (Gender Budgeting) अशा विषयाचा देखील अंतर्भाव यंदाच्या अंकात करण्यात आला. वर्षभरात विविधांगी प्रकाशित झालेल्या लेखांचे, अर्थसंवादच्या वाचकांनी उस्फुर्तपणे स्वागत केले. छापलेल्या मजकुरात बरीच विविधता राखण्याचे श्रेय अर्थसंवादच्या लेखकांना जाते.

वाचकांना अर्थसंवादचा अंक दीर्घ प्रतिक्षे नंतर प्राप्त होतो याची मला खंत वाटते. वितरणात येणाऱ्या अडचणी, खंडीत विद्युत प्रवाह, कागदाच्या उपलब्धतेतील अडचणी, छापखान्यांचे वेळापत्रक, जाहिरातींसाठी करावी लागणारी प्रतिक्षा या व्यतिरिक्त अपेक्षित लेख ठरल्या वेळी हाती न येणे हा देखील एक महत्त्वपूर्ण घटक दिरंगाई होण्यास कारणीभूत आहे. दर्जेदार लेख हाती आल्यानंतरच छपाईचे काम गोगलगाईच्या गतीने पुढे सरकत राहते. संभाव्य लेखकांनी आपल्या लेखनासाठी विशिष्ट क्षेत्र निवडून लेख वेळेवर पाठविल्यास अंकाचे वेळापत्रक पाळणे शक्य होईल. अर्थात काही लेखक याला अपवाद आहेत आणि त्यांचे लेख वेळेच्या आत प्राप्त होतात हे देखील नमूद करणे आवश्यक आहे.

वार्षिक वर्गणी बरेचदा मनीआर्डरने पाठविण्यात येते. विशेषत: शैक्षणिक संस्थांची वर्गणी मनीऑर्डने प्राप्त झाल्यास नेमकी कोणत्या संस्थेने वर्गणी पाठविली याचा अंदाज येत नाही. पाठविणाऱ्याचे नाव व पत्ता नमूद न केल्याने अंक संबंधित संस्थांना पाठविता येणे शक्य होत नाही त्यामुळे वर्गणी फक्त डिमांड ड्राफ्टनेच पाठवावी असे सुचवावेसे वाटते.

अर्थसंवादचे वार्षिक वर्गणीदार वर्गणीचे नूतनीकरण वेळेवर करत नाहीत. बरेचदा कोणाला कोणकोणते अंक पाठवावे यांच्या नोंदी करणे देखील जिकरीचे काम होते. अंकांच्या नेमक्या किती प्रती छापाव्या याचा अंदाज बांधणे यामुळे शक्य होत नाही. वार्षिक वर्गणीचे नुतनीकरण दरवर्षी मे महिन्याच्या अखेरपर्यंत झाल्यास अंकाच्या वितरणाबाबतचे नियोजन करणे सोयीचे होईल.

आता 'अर्थसंवाद' संबंधीचा काही महत्त्वाचा तपशील आपणापुढे ठेवतो. ह्या आधारे अर्थसंवादच्या वाटचाली बाबत एका दृष्टिक्षेपात कल्पना येऊ शकेल.

**अर्थसंवाद - सर्वसाधारण तपशील**

तक्त्याच्या आधारे खालील प्रमुख निष्कर्ष प्राप्त होऊ शकतील.

**1.**अंकांच्या एकूण खर्चात लक्षणीय वाढ झाल्याचे सत्कृतदर्शनी आढळून येते. हा खर्च गत वर्षाच्या तुलनेत रू. 11884 ने वाढला. अंकांच्या एकूण प्रतींची संख्या देखील जवळपास 422 ने वाढली. नव्याने सदस्य संख्येतील वाढ ही एक स्वागतार्ह बाब आहे. असे असले तरी ही बाब आत्मसंतुष्टपणाची मानून चालणार नाही. अनेक नव्या आणि जुन्या महाविद्यालयांच्या आणि काही विद्यापीठाच्या ग्रंथालयापर्यंत अर्थसंवाद अजून पोच शकलेला नाही, ही गोष्ट चिंतनीय मानावी लागेल. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे व कृषी महाविद्यालये आपल्यापासून दूर आहेत. राज्यातील कला, वाणिज्य शाखांच्या सर्व महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अर्थसंवाद घेतला जाईल यासाठी विशेष

प्रयत्न करण्याची आवश्यकता वाटते. अर्थशास्त्रावरील आवश्यक नियतकालिकांच्या यादीत 'अर्थसंवाद' चा समावेश बहुसंख्य महाविद्यालयांमध्ये व्हावा.

2.चारही अंकांच्या एकूण खर्चात छपाईच्या खर्चाचे प्रमाण 81 टक्क्यांपर्यंत झाले आहे. छपाईच्या खर्चाखालोखाल 15 टक्के खर्च टपालावर येतो. इतर बाबींवर होणारा खर्च 4 टक्क्याच्या आसपास आहे.

3.अहवाल वर्षातील चार अंक मागील वर्षाप्रमाणेच वेगवेगळ्या आकर्षक रंगसंगतीत छापण्याचा प्रयत्न केला. अर्थसंवादच्या अंतर्बाह्य स्वरूपाची गुणवत्ता कायम राखुन देखील प्रती अंक सरासरी खर्च तसेच प्रती पानाचा सरासरी खर्च पूर्वी प्रमाणेच कायम ठेवण्यात यश मिळाले आहे (0.26 अंक प्रती पान). अंकांच्या प्रति वाढल्यामुळे मिळणाऱ्या वाढत्या अनुमाप प्रत्यायाने इतर कारणानी होणाऱ्या परिव्यय वाढीला इथे प्रभावशुन्य बनविले आहे असे म्हणता येईल. म्हणजे सदस्य नोंदणी वाढवून प्रतींची संख्या वाढविली तर आपण इतर भाववाढीला समर्थपणे तोंड देऊ शकतो असे वाटते.

4.आपल्याला येणाऱ्या खर्चाची भरपाई करण्यासाठी आपण मर्यादित प्रमाणावर जाहिराती छापतो. अहवाल वर्षात जाहिरातीपासूनचे उत्पन्न रू. 46,200 प्राप्त झाले. गत अनेक वर्षांच्या तुलनेने ते वाढले असून अपेक्षेएवढे आहे. एकूण 12 पानांपैकी 10 पानांवर आपण जाहिराती छापू शकलो. परिषदेचे कार्यवाह-खजिनदार चारूदत्त गोखले यांनी अत्यंत महत्वपूर्ण भूमिका या बाबतीत वठवली. जाहिराती मिळविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करीत असतात. त्यांचा विशेष उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजतो. प्रा. गोखले व्यतिरिक्त परिषदेचे माजी अध्यक्ष व्यं.सु. पाटणकर, कार्याध्यक्ष ज.फा. पाटील तसेच अर्थसंवाद सल्लागार मंडळ सदस्य

**तक्ता**

**अर्थसंवादची महत्त्वपूर्ण तौलनिक माहिती**

| तपशील | 2003-04 | 2004-05 | 2005-06 |
|---|---|---|---|
| 1. चारही अंकांच्या एकूण प्रती | 5,380, | 5,843 | 6,265 |
| 2. चारही अंकांची एकूण पृष्ठ | 418 | 412 | 413 |
| 3. चारही अंकांचा एकूण खर्च (रु.) | 1,56,699 | 1,58,142 | 1,70,026 |
| 4. दर नगाचा सरासरी खर्च (रु.) | 29.13 | 27.06 | 27.14 |
| 5. दर पृष्ठाचा सरासरी खर्च (रु.) | 0.28 | 0.26 | 0.26 |
| 6. जाहिराती पासून उत्पन्न (रु.) | 27,000 | 30,000 | 46,200 |

रामकृष्ण सोळुंके यांचे देखील योगदान जाहिराती मिळविण्याच्या बाबतीत महत्त्वपूर्ण ठरले. प्रा. चारूदत्त गोखले, डॉ. व्यं. सु. पाटणकर, डॉ. ज.फा. पाटील आणि डॉ. रामकृष्ण सोळुंके यांचे मन:पूर्वक आभार. ज्या जाहिरातदारांनी आमच्या आवाहनाला सक्रिय प्रतिसाद दिला त्यांचे आम्ही ऋणी आहोत. अहवाल वर्षात अर्थसंवादची दोन पाने जाहिरातीविना कोरी राहीलीत यामुळे आपण सात ते आठ हजाराच्या उत्पन्नाला मुकलो ही बाब देखील वाढलेल्या जाहिराती पासूनच्या उत्पन्नासोबतच ध्यानात घेणे आवश्यक वाटते.

अंकाच्या आर्थिक जबाबदारीचे ओझे हलके करण्यात पूर्वीप्रमाणेच यावर्षीही 'भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली' तसेच 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई' यांच्याकडून वार्षिक अनुदान रूपाने मदत मिळाली. या दोन्ही संस्थांनी अर्थसंवाद बद्दल नेहमीच उदार दृष्टिकोन ठेवला आहे. परिषदेच्या वतीने या दोन्हीही संस्थाचे मी आभार मानतो.

'अर्थसंवाद' ची वर्षभरातील जबाबदारी सांभाळण्यात मला मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव ठोंबरे, कार्याध्यक्ष डॉ. ज.फा. पाटील, कार्यवाह प्रा. चारूदत्त गोखले, सहायक संपादक प्रा. रवींद्र जोशी, 'अर्थसंवाद' च्या सल्लागार मंडळाचे सदस्य आणि परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य यांचे सहकार्य लाभले. मुद्रणशोधन च्या कार्यात मला माझे मित्र डॉ. किशोर महाबळ (प्रपाठक, राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ) यांची साथ लाभली. या सर्वांचा मी ऋणी आहे.

अंकाची छपाई सुबक आणि काळजीपूर्वक करून देण्यात टेक्नो एंटरप्रायझेसचे मनिषा आणि मदन पालोरकर, स्पार्क असोसिएट्सचे शैलेष देशपांडे यांनी विशेष परिश्रम घेतले. अंक वितरणाच्या कामात निलेश धोटे यांनी मोलाची मदत केली. अर्थसंवादच्या अनेक सदस्यांनी, वाचकांनी, लेखकांनी समक्ष भेटीत आणि पत्राने अर्थसंवाद दर्जेदार होण्याच्या दृष्टिने अनेक मौलिक सूचना केल्या. अर्थसंवादचा दर्जा वाढविण्याचे दृष्टिने या सूचनांचा नक्कीच उपयोग होतो. अर्थसंवादचे वाचक जागरूक आहेत हे याचे द्योतक मानले पाहिले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

✦✦✦

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## अंक परत आल्यास

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांचा पत्ता बदललेला असेल त्या सदस्यांनी आपला बदललेला पत्ता कार्यवाहांना लेखी कळवावा. म्हणजे कार्यालयातील दप्तरात आवश्यक तो बदल करून घेऊन त्या पत्त्यावर अर्थसंवाद चे अंक पाठविले जातील. पत्ता बदलल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणाने अर्थसंवाद चा अंक परत आल्यास त्यापुढील अंक पाठविण्याचे बंद केले जाते. सर्व आजीव सदस्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.

**कार्यवाह - खजिनदार**

# एकतिसावे वार्षिक अधिवेशन – कार्यवाहांचा अहवाल

✦ चारूदत्त गोखले, जळगाव.
*कार्यवाह-खजिनदार, अर्थसंवाद*

**म**राठी अर्थशास्त्र परिषदेचे 31 वे राष्ट्रीय अधिवेशन 2 ते 4 नोव्हेंबर 2007 या कालावधीत श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी, जिल्हा-सोलापूर येथे संपन्न झाले. प्राचार्य पी.बी. कुलकर्णी, बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी, ता. पलूस, जिल्हा सांगली हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

**उद्‌घाटन**

उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाची सुरूवात कर्मवीर मामासाहेब जगदाळे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. महाविद्यालयाच्या संगीत विभागाने स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य मधुकर फरताडे यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय पंढरीनाथ पायघन व अनिल सूर्यवंशी यांनी करून दिला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा.ना. लक्ष्मणरावजी ढोबळे यांच्या हस्ते झाले तर प्रमुख पाहुणे म्हणून थोर विचारवंत व समाजसुधारक पन्नालालजी सुराणा उपस्थित होते. व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष प्रकाश कुलकर्णी, ज.फा. पाटील, कार्यवाह व खजिनदार चारूदत्त गोखले, अर्थसंवादचे प्रमुख संपादक विनायक देशपांडे, परिषदेचे गत वर्षातील अध्यक्ष- दिलीप कदम, अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष -बी.वाय. यादव, महाविद्यालयाचे प्राचार्य -मधुकर फरताडे, स्थानिक कार्यवाह - लक्ष्मीकांत तायडे इ. उपस्थित होते.

या प्रसंगी खादी व ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष व माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात महाराष्ट्र आर्थिकदृष्ट्या कोणत्या वळणावर आहे याची चर्चा परिषदेत व्हावी असे सुचविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नीतीचे अनुकरण पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून केले असते तर एवढ्या मोठ्या प्रमाणात दारिद्र्य रेषेखालील नागरिकांची संख्या वाढली नसती.

पैसा साठविण्यापेक्षा तो पेरला पाहिजे. मागील 20 वर्षात फळबागा विकासाला आधार मिळाला पण उद्योगासाठी पाठपुरावा झाला नाही असे प्रतिपादन त्यांनी उद्घाटनपर भाषणात केले.

अध्यक्षस्थानावरून बोलतांना पन्नालालजी सुराणा यांनी लष्करी सामर्थ्य वाढविण्याचा व धनिक देशांचे अनुकरण करण्याचा सोस बाळगण्याऐवजी देशातील नागरिकांच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी पुरेसे उत्पन्न मिळवता येईल अशी अर्थव्यवस्था चालविणे इष्ट आहे. आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांच्या आदेशाचे पालन करणे हे स्वत:ला सार्वभौम म्हणणाऱ्या राष्ट्रांनी आपले कर्तव्य मानू नये असे मत श्री. सुराणा यांनी व्यक्त केले परिषदेचे अध्यक्ष प्रकाश कुलकर्णी यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय विशेष आर्थिक क्षेत्र हा होता. त्यांनी, योग्य त्या सुधारणा अंमलात आणून सेझची उपयुक्तता वाढविल्यास समाजहित साधणे शक्य होईल असा विश्वास व्यक्त केला. या उद्घाटन सोहळ्यात परिषदेचे भूतपूर्व अध्यक्ष दिलीप कदम, संस्थेचे अध्यक्ष बी.वाय. यादव, कार्याध्यक्ष - ज.फा पाटील, कार्यवाह खजिनदार चारूदत्त गोखले यांनीही आपली मनोगते व्यक्त केलीत. राष्ट्रगीतानंतर उद्घाटनाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

**चर्चासत्रे**

अधिवेशनाच्या कालावधीत एकूण 4 चर्चासत्रे पार पडली. 2 नोव्हेंबर 2007 रोजी कायदा आणि अर्थशास्त्र या विषयावर पहिले चर्चासत्र झाले. चर्चासत्राचे सूत्रसंचालन परिषदेचे कार्याध्यक्ष व माजी अध्यक्ष ज.फा. पाटील यांनी केले. निबंधलेखकांना आपला विषय मांडण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध व्हावा व सविस्तर चर्चाही व्हावी म्हणून यंदापासून समांतर चर्चासत्रे आयोजित करण्याचा प्रयोग करण्यात आला. त्यानुसार 3 नोव्हेंबर 2007 रोजी 'भारताच्या कृषी क्षेत्रावरील अरिष्टे' आणि 'महाराष्ट्रातील नागरीकरण-कारणे,स्वरूप आणि परिणाम, अशी दोन्ही चर्चासत्रे एकाचवेळी आयोजित करण्यात आली होती व त्यांना चांगला प्रतिसादही मिळाला. या दोन्ही चर्चासत्रांचे सूत्रसंचालन अनुक्रमे अ.रा.पडोशी, गोवा व संतोष दास्ताने, पुणे यांनी केले. 4 नोव्हेंबर 2007 रोजी कोरडवाहू शेती व जैवतंत्रविज्ञान या आयत्या वेळच्या विषयावर चर्चासत्र पार पाडले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन रमेश दांडगे, प्राध्यापक व विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी केले.

**सर्वसाधारण सभा**

3 नोव्हेंबर 2007 रोजी झालेल्या परिषदेच्या सर्वसाधारण सभेत प्राचार्य प्रकाश कुलकर्णी अध्यक्ष स्थानी होते. सभेच्या सुरूवातीला दिवंगत आजीव सभासद व मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेतील काही महत्त्वपूर्ण निर्णय पुढीलप्रमाणे -

ऑक्टोबर/नोव्हेंबर 2008 मध्ये होणाऱ्या परिषदेच्या 32 व्या अधिवेशनासाठी - अ) डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली ब) लोकनेते हणमंतराव पाटील कला व वाणिज्य महाविद्यालय, विटा जि. सांगली या दोन महाविद्यालयांकडून निमंत्रणे प्राप्त झाली होती. त्यापैकी लोकनेते हणमंतराव पाटील कला व वाणिज्य महाविद्यालय, विटा, जि. सांगली यांचे निमंत्रण कार्यकारी मंडळाच्या शिफारशीनुसार सर्वसाधारण सभेने एकमताने स्वीकारले. याशिवाय माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांनी त्यांच्या संस्थेतही अधिवेशन आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली.

32व्या अधिवेशनासाठी पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले - 1) सर्वसमावेशक वृद्धीचे सैद्धांतिक विवेचन 2) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-स्वरूप,उपयुक्तता आणि भवितव्य 3) सन 1990 नंतरचे महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचे बदलते

स्वरूप.

ऑक्टोबर/नोव्हेंबर 2008 मध्ये विटा जि. सांगली येथे होणाऱ्या 32 व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी विनायक भिसे,अर्थशास्त्र विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांची बहुमताने निवड झाली.

2008 ते 2011 या तीन वर्षांसाठी व्यं.सु. पाटणकर,पुणे यांची विश्वस्त म्हणून एकमताने निवड झाली.

2008 ते 2011 या तीन वर्षांसाठी कार्यवाह-खजिनदार म्हणून अनिल सूर्यवंशी ,बार्शी यांची बहुमताने निवड झाली.

2008 ते 2011 या तीन वर्षांसाठी कार्यकारी मंडळावर 1) हिरालाल चव्हाण जळगाव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ 2) प्रशांत काटोले, अमरावती संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ 3) अविनाश निकम,शहादा, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ या तिघांची निवड झाली. यापैकी हिरालाल चव्हाण व प्रशांत काटोले यांची निवड बिनविरोध झाली.

विश्वस्त पदाच्या नियुक्ती संदर्भात एस. डब्ल्यू. मिसाळ,भोर यांनी पुढील ठराव मांडला व त्याला सर्वोत्तम कुलकर्णी, नाशिक यांनी अनुमोदन दिले. ठराव पुढीलप्रमाणे-सर्वसाधारण सभेस उपस्थित असणाऱ्या व सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने परिषदेचे 3 विश्वस्त तीन वर्षांच्या कालावधीसाठी पुढीलप्रमाणे नियुक्त केले जावेत.

परिषदेच्या माजी अध्यक्षांमधून -1

परिषदेच्या माजी कार्याध्यक्षांमधून -1

परिषदेच्या माजी कार्यवाह-खजिनदारांमधून -1

एकदा नियुक्त केलेल्या सभासदाची पुनर्नियुक्ती होऊ शकणार नाही. मिसाळ यांच्या सूचनेला सभागृहाने मान्यता दिली.

2008 ते 2011 या कालावधीसाठी अर्थसंवादच्या प्रमुख संपादकपदी जगन्नाथ शामराव पाटील, सातारा यांची नियुक्ती कार्यकारी मंडळाने एकमताने केली असल्याची माहिती सभागृहाला देण्यात आली.

कार्यवाह-खजिनदार चारूदत्त गोखले व अर्थसंवादचे प्रमुख संपादक विनायक देशपांडे या दोघांचा कार्यकाल 31 मार्च 2008 ला संपणार असल्यामुळे सभागृहाने उभे राहून टाळ्यांच्या गजरात दोघांना निरोप दिला.

**समारोप**

तीन दिवस चाललेल्या अधिवेशनाचा समारोप 4 नोव्हेंबर 2007 रोजी आयत्या वेळच्या विषयावरचे चर्चासत्र संपल्यावर आयोजित करण्यात आला होता. समारोप कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सहकार मंत्री मा.ना. पतंगराव कदम यांची विशेष उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्याची आर्थिक दृष्ट्या प्रगती होत असली तरी वाढणारी गरीबी, बेकारी, वाढणाऱ्या झोपडपट्ट्या आणि तोट्याची जिरायती शेती ही चिंतेची बाब आहे. या प्रश्नासंदर्भात अर्थतज्ज्ञांनी मार्गदर्शन करावे असे आवाहन याप्रसंगी मंत्रीमहोदयांनी केले. परिषदेचे कार्याध्यक्ष ज.फा. पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष पी.बी. कुलकर्णी, कार्याध्यक्ष ज.फा. पाटील, विद्यापीठ अनुदान आयोगाचे पुणे विभागीय सचिव श्रीनिवासन,शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य मधुकर फरताडे,नगराध्यक्ष हेमंत सोनवणे,संस्थेचे अध्यक्ष बी.वाय यादव, प्राचार्य व.न.इंगळे, अर्थसंवादचे प्रमुख संपादक विनायक देशपांडे,कार्यवाह-खजिनदार चारूदत्त गोखले,स्थानिक कार्यवाह लक्ष्मीकांत तायडे, मावळते अध्यक्ष दिलीप कदम, मोहन चौधरी आदी उपस्थित होते.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे पुणे विभागीय सचिव श्रीनिवासन यांनीही याप्रसंगी मार्गदर्शन केले. जगामध्ये वित्तीय व तंत्रज्ञानामध्ये नवीन बदल होत

असून अर्थकारणाशिवाय कोणाचाही विकास होऊ शकत नाही. अर्थकारणाला नवी दिशा देण्याचे काम मराठी अर्थशास्त्र परिषद करत आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी त्यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वाटचालीला शुभेच्छा दिल्या. प्राचार्य पी.बी. कुलकर्णी, ज.फा.पाटील, चारूदत्त गोखले यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष व्ही.बी. भिसे, नवनिर्वाचित कार्यवाह-खजिनदार अनिल सुर्यवंशी,स्थानिक कार्यवाह - लक्ष्मीकांत तायडे यांनीही आपल्या भावना याप्रसंगी व्यक्त केल्या. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा व सर्व उपस्थित माजी अध्यक्षांचा स्मृतिचिन्ह देऊन यथोचित सत्कारही याप्रसंगी करण्यात आला.

परिषदेचे ज्येष्ठ सदस्य व्ही.व्ही. धाणेकर, पुणे यांनी लिहिलेल्या आपत्ती व्यवस्थापन या पुस्तकाचे प्रकाशन श्रीनिवासन यांच्या हस्ते करण्यात आले. अहवाल वर्षात ज्या सभासदांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली व ज्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कार मिळाले अशा सभासदांचाही गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यंदापासून परिषदेने सत्काराचा हा नवीन उपक्रम सुरू केला व त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. परिषदेतर्फे वर्षभरात दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरणही या समारंभात करण्यात आले.

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक- रू. 501/-, ज.फा. पाटील, कोल्हापूर यांच्या 'अर्थकारण' या ग्रंथाला देण्यात आले.

2) डॉ. मो.स. भावे पारितोषिक, अर्थसंवादमधील उत्कृष्ट लेखाबद्दल रू. 251/-, वसंतराव जुगळे, कोल्हापूर यांच्या ऊसाचे दर युद्ध -काल्पनिकता आणि वास्तविकता (खंड 30,अंक 3 व 4) या लेखाला देण्यात आले.

3) कै.ग.प्र. पिंपरकर व कांतीभाई ठक्कर णमुक्ती प्रतिष्ठानचे अमर्त्य सेन पारितोषिक वार्षिक अधिवेशनात सादर झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधाबद्दल आर.एस. सोळुंके व जी.बी. गावंडे यांनी लिहिलेल्या महाराष्ट्रातील नागरीकरण,प्रवृत्ती कारणे, परिणाम आणि आव्हाने या निबंधाला व अतुल देशपांडे, कोडाईकॅनाल, तामिळनाडू यांनी लिहिलेल्या 'कायदा आणि अर्थशास्त्र' या निबंधांना विभागून देण्यात आले.

5) पद्मजा गंधे पारितोषिक, रू. 1001/, वार्षिक अधिवेशनात महिला सभासदाने सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधासाठी, मुक्ता जहागीरदार, अमरावती यांच्या जागतिक व्यापार व्यवस्थेची उद्दिष्ट्ये व वास्तवातील विसंगती-भारतीय कृषी क्षेत्रावरील आरिष्टे' व शकुंतला पाटील, इचलकरंजी यांच्या 'महाराष्ट्रातील नागरीकरणाचे पर्यावरणीय परिणाम' या निबंधांना विभागून देण्यात आले.

6) भाऊसाहेब गेणूजी दरेकर पाटील स्मृती पारितोषिक रू. 251/- , पुणे विद्यापीठात एम.ए. अर्थशास्त्र परीक्षेत गुणानुक्रमे, चौहान अर्चना सुदर्शनकुमार, फर्ग्युसन महाविद्यालय पुणे या विद्यार्थिनीस देण्यात आले. ज.फा. पाटील, आर.एस.सोळुंके, जी.बी. गावंडे, मुक्ता जहागीरदार व शकुंतला पाटील यांनी त्यांना मिळालेली पारितोषिकाची रक्कम परिषदेच्या इमारत निधीसाठी देणगी म्हणून दिली.

समारोपाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मधुकर फरताडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय पी.एस. पायघन यांनी सूत्रसंचालन राजेंद्र दास यांनी तर आभार प्रदर्शन लक्ष्मीकांत तायडे यांनी केले. त्यानंतर अधिवेशनाची यशस्वीरित्या सांगता झाली.

◆◆◆

निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रुपरेषा

# 1. सर्वसमावेशक वृद्धिचे सैद्धांतिक विवेचन

◆ रमेश दांडगे, कोल्हापूर.
*प्राध्यापक व विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

सर्वसमावेशक वृद्धित सर्वांना सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीचे लाभ मिळावे ही अपेक्षा असते, त्यामुळे समाजाच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळू शकते. या धोरणातून देशाचा सर्वांगिण विकास होतो. यामुळे आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहात सर्वांचाच समावेश असतो. कोणीही लाभापासून वंचित राहात नाही. कोणत्याही प्रकारचा भेदाभेद केला जात नाही. सर्वसमावेशक धोरण राबविले गेले नाही तर देशात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात विषमता वाढते. मात्र कधी कधी काही व्यक्तींना, समाजाला, प्रदेशाला जास्त लाभ मिळतांना दिसतात तर काहींना विकासाच्या लाभापासून वंचित राहावे लागते. सर्वसमावेशक वृद्धिचे सैद्धांतिक विवेचन खाली मुद्दे लक्षात घेऊन शोधनिबंध लेखकांना करता येऊ शकेल.

**1) भारताच्या आर्थिक विकासात विविध प्रदेशाचा समावेश - सिद्धांत आणि व्यवहार**

(1) प्रादेशिक विषमता : त्याची कारणमिमांसा - प्रादेशिक मागासलेपणा

(2) प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी समावेशक धोरणाचे स्वरूप

(3) आर्थिक विकासामध्ये दलित समाज/आदिवासी समाज/इतर वंचित समाजाचा सहभाग, त्याचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम

**2) भारताचा क्षेत्रनिहाय आर्थिक विकास - सिद्धांत आणि व्यवहार**

(1) शेती क्षेत्राचा विकास आणि विषमता/शेतीचा मागासलेपणा, औद्योगिक श्रमाच्या समस्या

(2) औद्योगिक क्षेत्राचा विकास आणि विषमता

(3) सेवा क्षेत्राचा विकास आणि विषमता

(4) क्षेत्र निहाय लाभाचे वाटप

(5) क्षेत्रनिहाय विषमतेचे स्वरूप : प्रमाण आणि त्याची कारणमिमांसा

**3) सामाजिक क्षेत्राचा विकास - सिद्धांत आणि व्यवहार**

(1) प्राथमिक शिक्षणाचा विकास - त्याचे लाभ,लाभाचे वितरण

(2) घरांची उपलब्धता

(3) आरोग्याची समस्या

**4) सामाजिक क्षेत्राचा विकास,त्यातील प्रादेशिक विषमता - - सिद्धांत आणि व्यवहार**

**5) दारिद्र्य - बेरोजगारी,सामाजिक वंचितता आणि सामाजिक विषमता**

✦✦✦

## 2007-08 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| अ.क्र | नांव | रक्कम रू. |
|---|---|---|
| 1) | प्राचार्य शिवाजी महाविद्यालय, बार्शी | 11900 |
| 2) | पी.बी. कुलकर्णी | 4000 |
| 3) | सूर्यकांत जगदाळे | 4000 |
| 4) | पी.जी. अभ्यंकर | 1100 |
| 5) | श्रीनिवास तुकाराम नाईक | 1000 |
| 6) | सुधीर गणेश मुंज | 1000 |
| 7) | सुरेश ज्योती पाटील | 1000 |
| 8) | अरूण राजाराम कुंभार | 1000 |
| 9) | राजश्री बाळकृष्ण पोरे | 1000 |
| 10) | बाळासो रामकृष्ण पाटील | 1000 |
| 11) | मधुकर बिबवे | 1000 |
| 12) | तानाजी शंकर कांबळे | 1000 |
| 13) | मेघना मधुकर भोसले | 1000 |
| 14) | व्ही.बी. भिसे | 1000 |
| 15) | अनिल बी. सूर्यवंशी | 1000 |
| 16) | व्यंकटेश कटके | 1000 |
| 17) | मुक्ता जहागीरदार | 1000 |
| 18) | शकुंतला पाटील | 501 |
| 19) | अतुल रा. देशपांडे | 500 |
| 20) | शकुंतला पाटील | 500 |
| 21) | आर.एस. सोळुंके | 251 |
| 22) | जी.बी. गावंडे | – |

# 2. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना–स्वरूप उपयुक्तता आणि भवितव्य

✦ विनायक श्रीधर देशपांडे, नागपूर.
*प्रपाठक अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ आणि प्रमुख संपादक 'अर्थसंवाद'*

महाराष्ट्राच्या गाजलेल्या रोजगार हमी योजनेकडून प्रेरणा घेऊन राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा तयार करण्यात आला. पुरोगामी लोकशाही आघाडीची 'आम आदमी' विषयीची बांधिलकी, केंद्र सरकारचा किमान समान कार्यक्रम आणि राष्ट्रीय सल्लागार समितीचा दबाव या सर्व घटकांमुळे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा 2005 साली संमत करण्यात आला. 2 फेब्रुवारी 2006 साली सुरूवातीस ही योजना देशातील 200 जिल्ह्यात सुरू करण्यात आली. गत वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात 130 जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला, तर यंदाच्या अर्थसंकल्पात 2008-09 पासून देशातील सर्वच जिल्हे समाविष्ट करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रामीण कुटूंबातील एका व्यक्तीस वर्षातून किमान 100 दिवस अकुशल स्वरूपाचा रोजगार देण्याची हमी आहे. एखाद्या व्यक्तीस अर्ज दिल्यापासून 15 दिवसाच्या आत रोजगार प्राप्त न झाल्यास राज्य शासनाला त्या व्यक्तीला बेकारी भत्ता देणे अनिवार्य राहील. मजुरीचा दर 60 रू. प्रती दिवस असून या खर्चाची जवाबदारी राज्य शासनाची राहील. तसेच रोजगार हा गावातच किंवा गावाच्या 5 कि.मी. परिसरातच दिला जाईल. या कायद्यामुळे गरिबांचा रोजगाराचा हक्क कायदेशीर झाला आहे. गरिबांना काम देणे, रोजगार पुरविणे हे सरकारसाठी आता कायद्याने बंधनकारक ठरले आहे. गरिबी आणि कर्जाचा विळखा यातून सुटका करून घेण्याचा कायदेशीर मार्ग या कायद्याने गरिबांना उपलब्ध करून दिला आहे.

या कायद्याची अंमलबजावणी पारदर्शकपणे व्हावी, हा लोकांचा कार्यक्रम ठरावा. केंद्र आणि राज्य सरकारे आणि पंचायतराज संस्था यांनी परस्परांच्या

सहकार्याने या कायद्याचे रूपांतर दारिद्र्य निर्मूलन करण्यात व्हावे अशी रास्त अपेक्षा या कायद्याच्या संदर्भात असणे स्वाभाविक आहे.

निबंध लेखक उपलब्ध माहितीच्या आधारे राष्ट्रीय ग्रामीण योजनेचा आढावा घेऊ शकतील. तीस वर्षापेक्षा अधिक काळ होऊन देखील महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना कालबाह्य झालेली नाही. उलट रोहयोचे प्रतिमान समोर ठेवूनच राष्ट्रीय ग्रामीण रोहयो ची निर्मिती झाली आहे. या निमित्ताने आपल्या राज्यातील रोहयो चिकित्सा आणि राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची राज्याच्या रोहयोशी तुलना करणे संयुक्तिक ठरेल. निधीची उपलब्धता, अंमलबजावणीचे व्यवस्थापन, बेरोजगार भत्ता या मुद्यावर निबंध लेखक प्रकाश टाकू शकतील. कामे शक्यतो माणसांकरवी केली जावीत असे राष्ट्रीय रोहयोत नमूद केले आहे. शक्यतो या शब्दामुळे यंत्रांकरवी कामे करून घेता येऊ शकतात की काय? अशी शंका उपस्थित होणे साहजिकच आहे. महाराष्ट्र राज्याच्या रोहयो मध्ये मात्र यंत्रांना मनाई आहे. यासंदर्भात स्थानिक पातळीवरील अनुभव विशद करण्यास निबंध लेखकांना वाव आहे. गरिबांना उपजीविकेची साधने मिळवून देण्याचा हेतू कितपत सफल झाला याची देखील पडताळणी निबंध लेखक करू शकतील. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये रोहयोच्या प्राप्त निधिचा वापर पूर्णपणे करण्यात येत नाही या संदर्भात देखील योजनेची पडताळणी करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमुळे लाभधारकांना स्थायी उत्पन्न प्राप्त होण्याच्या दृष्टिने कौशल्य प्राप्त करता आले का? दारिद्र्य निर्मूलन करण्यास रोहयो कितपत सहायक ठरू शकली ? महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमधील अनुभव लक्षात घेऊन राष्ट्रीय स्तरावरील योजना अधिक परिणामकारक करण्यासाठी निबंध लेखक काही उपाययोजना सुचवू शकतील.

महाराष्ट्रात रोहयोकरिता व्यवसायकरातून 1500 कोटी रूपये सालाना गोळा होतात; तेवढाच निधी सरकारने त्यात जमा करावा, अशी कायद्यात तरतूद आहे, या तरतुदीचे काटेकोरपणे पालन झाल्यास एकूण रक्कम 3000 कोटीपर्यंत जाईल. हा एवढा राखीव निधी आता लागतच नाही, केवळ सातशे-साडे सातशे कोटी रूपये लागतात. शिवाय केंद्र सरकारच्या राष्ट्रीय रोजगार योजनेचा निधी महाराष्ट्राला प्राप्त होत असल्याने रोहयोकरिता राखीव निधीची आवश्यकता नाही, असाही युक्तिवाद करण्यात येतो. राज्य शासनाने आता व्यवसायकराद्वारे पैसे कापणे बंद करावे का? किंवा गरजेपुरतेच पैसे संकलीत करून छोट्या पगारदारांना सूट देता येईल का? याचा देखील उहापोह निबंध लेखकांना करता येईल.

राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमध्ये विविध प्रकारची विकासात्मक कामे पूर्ण करण्यास संधी आहे. दुष्काळाशी सामना करण्याजोगी साधने, जलसंवर्धन, वनसंवर्धन, गावाच्या विकासात भर टाकणारी कामे वगैरे. मात्र ही सर्व कामे ग्रामसभेत, ग्रामपंचायतीत मान्यता मिळाल्यावर काढली जातील. गावाने प्रकल्प तयार करावा, त्या संबंधी अंदाजपत्रक तयार करावे आणि ते तालुका-जिल्हा प्रशासनाकडे पाठवावे अशी रचना या कायद्याने दर्शविली आहे. गरिबांना, गावकऱ्यांना, लोकांना महत्त्व देणारी आणि निर्णय खालून वर आणणारी ही पद्धत वाखाणण्याजोगी आहे. परंतु प्रकल्प तयार करण्यासारखी कामे करण्याचे कौशल्य गावात आहे का ? या बाबतची पडताळणी निबंध लेखकांना स्थानिक पातळीवर करता येउ शकेल. शहरी क्षेत्र रोजगार हमीच्या कृतिकक्षातून वगळण्यात आले

आहे. हे कितपत समर्थनीय आहे ? याचा देखील अभ्यास निबंधलेखक करु शकतील. राष्ट्रीय ग्रामीण योजनेचा अनिष्ट परिणाम भारताची राजकोषिय तूट नियंत्रणाबाहेर जाण्यावर होउ शकतो. अशी देखील शंका उपस्थित करण्यात येते यासंदर्भात देखील संभाव्य निबंध लेखक भाष्य करू शकतील. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या कायद्यात सामाजिक सुरक्षितता बळकट करण्याचे सामर्थ्य आहे. स्थानिक शासन व्यवस्था समाजाच्या गरजा ओळखून त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करू शकल्यास या कायद्याची उपयुक्तता अधिक वाढू शकेल यात शंका नाही. मानवी विकास घडवून आणण्याचे दृष्टिने देखील रोजगार हमी योजना महत्त्वपूर्ण भूमिका वठवू शकेल. रोजगार हमी योजनेची भावी दिशा दर्शवितांना खालील मूलभूत बाबींचा विचार करता येऊ शकेल.

- रोजगार हमी हा निवारक कार्यक्रम (Relief Programme) म्हणून तसाच पुढे राबविण्यात यावा की दारिद्र्यावर मात करणारा एक प्रभावी कार्यक्रम होण्याच्या दृष्टिने त्याची पुनर्रचना करावी? त्याचे स्वरूप कसे असावे ?

-रोहयो मार्फत कोणत्या स्वरूपाचा रोजगार निर्माण व्हावा? शारीरिक/अकुशल कामे या योजनेच्या माध्यमाने किती काळ उपलब्ध करावीत?

- रोहयोने कुठल्या प्रकारची मालमत्ता/संपत्ती निर्माण करावी ? उत्पादक मालमत्ता म्हणजे नेमके काय ? उत्पादक कोणासाठी ? गावासाठी की लाभधारकांसाठी ?

- रोहयो अंतर्गत निर्माण झालेल्या संपत्तीचा मालकी हक्क कोणाकडे सुपूर्द करावा ?

- या कार्यक्रमात स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी कोणते बदल आवश्यक वाटतात ?

निबंध लेखकांना या विषयावरील माहिती इकॉनॉमिक अँड पोलीटिकल विकली च्या विविध अकांतून प्राप्त होउ शकेल. विशेषत: (1) ऑगस्ट 13-19,2005 (2) ऑक्टोबर 15-21,2005 (3 फेब्रुवारी 12-18,2005(4) ऑगस्ट 25-31,2007 (5) नोव्हेंबर 10-16/17-23 2007 (6) डिसेंबर 29,2007 जानेवारी 4,2008 हे इ.पी. डब्ल्यू चे अंक बघावे. या व्यतिरिक्त अर्थसंवाद-एप्रिल जून 2007 अंकातील र.पु.कुरूलकर यांचा लेख संदर्भासाठी उपयुक्त ठरू शकेल.

◆◆◆

## कार्यवाह-खजिनदार पदातील बदल

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह-खजिनदार चारूदत्त गोखले जळगाव, यांच्या पदाचा कार्यकाल दि. 31 मार्च 2008 रोजी पूर्ण झाला. यानंतर दिनांक 1 एप्रिल 2008 पासून हा पदभार अनिल सूर्यवंशी, बार्शी ह्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. सर्व आजीव सदस्य, वार्षिक वर्गणीदार, जाहीरातदार आदी सर्वांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेशी संबंधीत सर्व पत्रव्यवहार अनिल सूर्यवंशी यांच्याशीच पुढील पत्त्यावर करावा.

**अनिल बाबूराव सूर्यवंशी**

हुबळीकर निवास, ब्लॉक नं. 2, शिवाजीनगर, बार्शी, जि. सोलापूर-413 411.
दूरध्वनी क्रमांक 02184-224294

# 3. सन 1990 नंतरचे महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पाचे बदलते स्वरूप

◆ एम.एन शिंदे, इस्लामपूर.
*प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर.*

राजसत्तेचा अर्थसंकल्प हा सरकारच्या आर्थिक धोरणाचा एक भाग असतो. अर्थसंकल्पात सरकारने आकारलेले कर,खर्च, कर्जे व अर्थसंकल्पविषयक धोरणे प्रतिबिंबीत झालेली असतात. अर्थसंकल्प हा विशिष्ट कालावधीसाठी साधारणत: एक वर्षापुरता मर्यादित असतो. सरकारचे आर्थिक धोरण कसे असावे,याबाबत भारतीय राज्यघटनेतील कलमे 38,39,41,45,46 व 47 मार्गदर्शन करतात. कलम 202 नुसार प्रत्येक घटक राज्याने आपले वित्तीयपत्रक राज्यविधान मंडळात सादर करण्यासंबंधी निर्देश करते. सरकारच्या उत्पन्न व खर्चाचा ताळेबंद म्हणजे सरकारचे अंदाजपत्रक होय. अंदाजपत्रकात मागील वर्षात सर्व मार्गांनी सरकारला मिळालेले उत्पन्न व आगामी वर्षात विविध बाबींवर करावयाचा खर्च याचा ताळेबंद मांडलेला असतो. भारतीय राज्यघटनेतील विविध कलमांनुसार सर्वांना समान हक्क, भौतिक साधन सामग्रीचे सुयोग्य वाटप, राष्ट्रीय संपत्तीचे समान वाटप तसेच सर्वांना काम करण्यांचा हक्क, शिक्षणाचा हक्क , बेरोजगारी कमी करणे, वृद्धत्व, आजारपण, अपंगत्व असल्यास मदत , समाजातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा विकास , लोकांच्या राहणीमानात वाढ , आहार, आरोग्य वगैरे घटकांत सुधारणा , समाजाला हानिकारक वस्तुंचा उपभोग कमी करणे या उद्दिष्टांनुसार सरकारचे धोरण असावे.

विसाव्या शतकात कल्याणकारी राज्याची संकल्पना जगभर मान्यता पावली होती. त्यानुसार समाजाच्या आर्थिक कल्याणात वाढ घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी सर्वे कार्ये राजसत्तेने करावीत असे प्रतिपादन करण्यात आले. परिणामी राजसत्तेच्या कार्याची व्याप्ती वाढली. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेने

विकसित व अविकसित राष्ट्रांच्या आर्थिक धोरणाला दिशा दिली, त्याचा प्रभाव राज्यांच्या आर्थिक धोरणावर पडला.

सन 1929 च्या जागतिक आर्थिक महामंदीने सरकारच्या राज्यवित्तीय धोरणावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पाडला. आर्थिक मंदीचे उच्चाटन करून जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ जे.एम.केन्सने हस्तक्षेप धोरणाचा पुरस्कार केला व सनातनवाद्यांच्या निर्हस्तक्षेप धोरणावर टीका करून उत्पादन व रोजगार वाढ घडवून आणण्यासाठी सरकारने जास्तीत जास्त कार्ये करावीत असे सूचविले. आर्थिक मंदीच्या उच्चाटनासाठी केन्सने तुटीच्या अंदाजपत्रकाचा पुरस्कार केला. सरकारने आपल्या उत्पनापेक्षा जास्त खर्च करावा व समाजाला जास्तीत जास्त सोयी व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात म्हणजे शासनसंस्था कार्यक्षम व लोकांच्या कल्याणात वाढ घडवून आणणारी होईल असे केन्सचे मत होते. सरकारने आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करण्यासाठी सरकारने तुटीचा अर्थभरणा, सार्वजनिक कर्जाची उभारणी करावी असे केन्सने प्रतिपादन केले. केन्सच्या आर्थिक नितीचा पुरस्कार सन 1991 पर्यंत जगातील सर्व राष्ट्रांनी केला होता.

सन 1991 मध्ये खुल्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार केला गेला त्यानंतरच्या काळात सरकारने अर्थव्यवस्थेतील हस्तक्षेप कमी करून बाजारयंत्रणेवर आधारित आर्थिक नितीचा स्वीकार केला. आजचे आर्थिक धोरण पुन्हा निर्हस्तक्षेप धोरणावर आधारलेले आहे. सरकारच्या आर्थिक नितीतील बदलांची दखल घेऊन महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातील बदलत्या प्रवाहांचा आढावा निबंध लेखकांना घेता येईल.

सरकारच्या आर्थिक धोरणामध्ये सरकारचे करविषयक धोरण, सार्वजनिक खर्च, सार्वजनिक कर्ज व अंदाजपत्रकीय धोरणांचा समावेश होतो. सरकारचे अंदाजपत्रक म्हणजे सार्वजनिक सत्तेचे उत्पन्न व खर्च यांचा ताळेबंद दर्शविणारे पत्रक होय. हे अंदाजपत्रक तीन प्रकारचे असते.

1) समतोल अंदाजपत्रक : यामध्ये सरकारचे उत्पन्न व खर्च दोन्ही समान असतात.

2) शिलकी अंदाजपत्रक : यामध्ये सरकारचे उत्पन्न जास्त व खर्च कमी असतो.

3) तुटीचे अंदाजपत्रक : यामध्ये सरकारचे उत्पन्न कमी व खर्च जास्त असतो.

केन्स, लर्नर यांनी तुटीच्या अंदाजपत्रकाचा पुरस्कार केला. आजच्या काळात प्रामुख्याने केंद्र व राज्य शासनांची अंदाजपत्रके तुटीची सादर केली जातात.

शासनाचे अंदाजपत्रक प्रमुख दोन भागामध्ये विभागलेले असते.

1) महसुली अंदाजपत्रक : या भागात विविध करांद्वारे व करेतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न व त्याचा खर्च दर्शविलेला असतो. महसुली उत्पन्नात करापासून मिळणारे उत्पन्न, केंद्रीय कर महसुलातील राज्यांना मिळणारा वाटा, प्रशासकीय सेवांबद्दल मिळणारे शुल्क, व्याज, लाभांश, केंद्र सरकारकडून मिळणारी अनुदाने वगैरे घटक समाविष्ट असतात.

2) भांडवली अंदाजपत्रक : यामध्ये राज्य सरकारांनी घेतलेली कर्जे (अंतर्गत व बाह्य कर्जे) इतर बचती इत्यादी घटक समाविष्ट असतात. राज्य सरकारला सरकार चालविण्यासाठी विकासात्मक व बिगर विकासात्मक बाबींवर खर्च करावा लागतो. विकासात्मक बाबींमध्ये सामाजिक सेवा, आर्थिक सेवा वगैरेंचा समावेश होतो. यामध्ये देखील महसुली खर्च व भांडवली खर्च यांचा समावेश होतो. महसुली

खर्चात प्रशासकीय खर्च, प्रामुख्याने वेतनावरील खर्च, घेतलेल्या कर्जावरील व्याज, अनुदाने, अंशदाने या घटकांचा समावेश होतो. भांडवली खर्च हा नवीन उत्पादन क्षमता निर्माण करण्यासाठी केला जातो. राज्याच्या उत्पन्न व खर्च विषयक बाबींचे परस्परांशी असणारे प्रमाण व त्यामध्ये होणारे बदल हे राज्याच्या आर्थिक स्थितीत होणाऱ्या बदलांचे निर्देशक असतात. सर्व साधारणपणे महसूली उत्पन्नातून महसूली खर्च वजा करून, शिल्लक भांडवली खर्चासाठी वापरता येत असेल तर राज्याची आर्थिक स्थिती उत्तम व सुदृढ असल्याचे मानले जाते. या उलट महसुली तूट ही राज्याची आर्थिक स्थिती कमकूवत असल्याचे समजले जाते. ही महसुली तूट भांडवली उत्पन्नातून व कर्जे काढून भागविणे हे आर्थिक संकटाचे चिन्ह मानले जाते. शोध निबंध लेखकांना महाराष्ट्र राज्याच्या अंदाजपत्रकातील महसुली जमा, महसुली खर्च, भांडवली जमा, भांडवली खर्च, महसुली तूट, भांडवली तूट वगैरे घटकांचा अभ्यास करून महाराष्ट्रराज्याच्या उत्पन्न व खर्चाबाबत सन 1990 नंतर च्या अंदाजपत्रकातील बदलते प्रवाह व कल यांचा अभ्यास करता येईल.

शोध निबंध लेखकांना अंदाजपत्रकाच्या सैद्धांतिक अभ्यासासाठी डाल्टन, मसग्रेव, उर्सुला हिक्स, लर्नर, अँडले, सुंदरम्, आर.के. वगैरे लेखकांचे संदर्भ ग्रंथ वापरता येतील. तसेच दत्त-सुंदरम्, मिश्रा-पुरी, अग्रवाल ए.एन. या लेखकांचे ग्रंथ उपयुक्त ठरतील.

रिझर्व्ह बँके मार्फत प्रकाशित झालेल्या राज्यांच्या अर्थसंकल्पाचा विशेषांक, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, पब्लिक फायनान्स, नियतकालिक उपयुक्त ठरतील.

'सन 1990 नंतरचे महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पाचे बदलते स्वरूप' या विषयावर शोध निबंध लेखकांना खालील मुद्दे उपयुक्त ठरतील.

1. सन 1990 नंतरच्या महाराष्ट्र शासनाच्या अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्चातील बदलत्या प्रवृत्ती.

2. महाराष्ट्र शासनाच्या अंदाजपत्रकातील महसुली उत्पन्न व महसुली खर्चातील बदलते प्रवाह.

3. महाराष्ट्र सरकारच्या अंदाजपत्रकातील भांडवली उत्पन्न व भांडवली खर्चातील बदलांचा कल.

4. महाराष्ट्र सरकारच्या अंदाजपत्रकातील विकासात्मक व विकासेतर खर्चातील बदलांच्या प्रवृत्ती.

5. महाराष्ट्र सरकारच्या अंदाजपत्रकातील महसुली तूट, भांडवली तूट व सर्वसाधारण तुटीतील बदलते प्रवाह.

6. महाराष्ट्र सरकारच्या महसुलातील कर व करेतर उत्पन्नातील वाढीचे कल.

7. महाराष्ट्र सरकारला मिळणारा केंद्रीय करातील वाटा, अनुदाने यांच्या प्रवृत्तींचा कल.

8. सन 1990 नंतरच्या महाराष्ट्र शासनाच्या कर्जाच्या वाढीचा कल.

9. महाराष्ट्र शासनाच्या एकूण महसुलातील विविध करांच्या वाट्याचा तुलनात्मक अभ्यास.

10. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातील विविध सेवांवर झालेल्या खर्चाचा तुलनात्मक अभ्यास.

✦✦✦

संवाद

# अर्थसंवाद जुलै-सप्टेंबर २००७ यातील 'राजकीय अर्थशास्त्रावरील अ.रा. पडोशी यांच्या अभिप्रायावरील प्रतिसाद'

(1) ''गंडांतर'' हा शब्द मी 'Crisis in Economic Theory' (Ed. Daniel Bell and Irving Kristol) या पुस्तकावरून घेतला. ही इष्ट (हवी असलेली) आपत्ती नव्हे. नको असलेली डोळ्यात अंजन घालणारी.

(2) ''भारतात उद्योजकतेचा अभाव का ?'' या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा मी प्रयत्न केला. (जागतिक अर्थकारणाचे नवे संदर्भ (2004) यात तो आहे.)

हिंदू धर्माने निवृत्तीचा पुरस्कार केला. मानवाच्या सहज प्रवृत्तीच्या मनोवृत्तीला विकृत रूप दिले. (आजही चंगळवाद नावाने ती घृणास्पद ठरविली आहे). जातींनी हिंदू धर्म खिळखिळा केला आहे. याची चिंता सर्वांनी करायला हवी. अशा धर्माचे जोखड उधळून टाकायला हवे. सातव्या शतकापर्यंत आपण प्रवृत्तीला धरून होतो. त्यानंतरच्या बाराशे वर्षात व पश्चिमेच्या खिडकीतून सुधारणांचे वारे वाहीपर्यंत सगळे उलटेपालटे झाले. 'सांगे वडिलांची किर्ती तो एक मूर्ख', असे रामदासस्वामींनी म्हटले आहे.

(3) अभिजात म्हणजे Classical, अभिमत संप्रदाय म्हणजे Classical School, अर्थशास्त्र परिभाषा कोशातली ही परिभाषा आहे. तीच इथे वापरलेली आहे. सनातन याचा अर्थ ''अनादिकालापासून चालत आलेला, (उ. सनातन धर्म), शाश्वत, चिरकाल. तो Classical याचा अर्थ नाही.

(4) सगळे आर्थिक व्यवहार, अनिर्बंधपणे, खाजगी क्षेत्रात, खुल्या बाजाराने ठरावेत असा सध्या घोष चालू आहे. पण खुला बाजार नियमाने चालावा यासाठी त्यावर देखरेख करण्यासाठी सरकारला पुढे यावेच लागते. हस्तक्षेप नव्हे, नियमन.

(5) विकसनशील देशांनी विकासाचे अर्थशास्त्र शिकले पाहिजे. पाश्चिमात्य नव्हे; केन्सचे नव्हे शुम्पेटरचे. प्रत्येक देशाचा आर्थिक इतिहास वेगळा असल्याने त्याची पार्श्वभूमी व त्याचे विश्लेषण अभ्यासकाला माहित हवे.

(6) जागतिकीकरण (तत्त्व म्हणून) हवे. नव्हे, माहिती तंत्रज्ञानाने ते आणलेलेच आहे. पण ते (व्यवहारात) विषम असता कामा नये. पाश्चिमात्यांची आर्थिक वसाहत करणारे नको.

(7) स्वदेशीचा भारतातला अर्थ खादी व ग्रामोद्योग असा केला जातो. त्यात यंत्रालाही विरोध आहे. पाश्चात्य स्वदेशी व भारतीय (विकसनशील) स्वदेशी यांच्यातील झगडा जागतिक व्यापारी संघटनेत तीव्र बनत चालला आहे.

(8) संयुक्त राष्ट्र संघातील मताधिकाराबद्दल मी 'विकिपेडिया' या ज्ञानकोशावरून पुनः एकदा खात्री करून घेतली. तो 'एक राष्ट्र एक मत' असाच आहे. इथे कुणा व्यक्तीला 'वाटण्याचा ' प्रश्न नाही. व्यापारी कंपनीप्रमाणे मतविभागणी आहे ती आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक येथे.

(9). अ.रा.पडोशी यानी सविस्तर अभिप्राय लिहिल्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

**◆ सी.पं.खेर, पुणे**

# जमनालाल बजाज, वार्षिक उपक्रम, 2008

मराठी अर्थशास्त्र परिषद व नेविल वाडिया व्यवस्थापन संस्था पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 1 मार्च 2008 रोजी जमनालाल बजाज वार्षिक उपक्रमांतर्गत एक दिवसीय चर्चासत्र घेण्यात आले. चर्चासत्राचा विषय **'महाराष्ट्रातील कृषी विकास'** हा होता.प्रमुख पाहुणे **रत्नाकर महाजन** (कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळ) यांनी चर्चासत्राचे बीजभाषण केले. महाराष्ट्रातील कृषी विकासाचा सविस्तर आढावा घेऊन, राज्याच्या शेती क्षेत्रासमोरील आव्हाने, नवे तंत्रज्ञान आणि लाभप्रदता या विषयावर त्यांनी आपले विचार व्यक्त केले. उद्घाटनानंतरच्या प्रथम सत्रात **प्रदीप आपटे** (प्राध्यापक फर्ग्युसन कॉलेज) यांनी, महाराष्ट्राच्या कृषीविषयक समस्यांची सांगोपांग माहिती दिली. राज्यात घेतली जाणारी नवनवीन पिके, फळबागा, फुलशेती, या क्षेत्रांमध्ये घेतले जाणारे उत्पादन व त्यांची विक्री या संबंधीच्या समस्या, सांख्यिकी माहितीबद्दलच्या अडचणी, शेतमजुरांच्या समस्या या मुद्यांचे सविस्तर विवेचन केले. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विद्यमान अध्यक्ष **प्रकाश कुलकर्णी** यांनी या सत्राचा समारोप केला.

द्वितीय सत्रात **राजस परचुरे** (प्राध्यापक, नॅशनल इन्शुरन्स ॲकेडमी, पुणे व सहसंचालक, गोखले अर्थशास्त्र संस्था) यांनी पीकविम्यावर मौलिक माहिती दिली. **सर्वोत्तम कुलकर्णी** (नाशिक) यांनीही कृषिवित्तपुरवठ्यावर आपला निबंध सादर केला. अध्यक्षीय समारोप, **निर्मल भालेराव** (उपप्राचार्य व अर्थशास्त्र विभागप्रमुख फर्ग्युसन कॉलेज) यांनी केला. शेवटच्या चर्चासत्रात शेतीतज्ज्ञ **मुकुंद गायकवाड** यांनी कृषी क्षेत्रातील व्यावहारिक अनुभव मांडले.या सत्राचे सूत्रसंचालन **संहिता आठवले** अर्थशास्त्र विभागप्रमुख टी.जे. महाविद्यालय खडकी, यांनी केले.

निमंत्रित वक्त्यांचे व उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक नेविल वाडिया व्यवस्थापन संस्थेचे संचालक **संतोष दास्ताने** यांनी केले.

चर्चासत्राला पुणे शहरातील अनेक मान्यवर अर्थतज्ज्ञ, विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी वर्ग मराठी अर्थशास्त्र परिषदेचे नूतन अध्यक्ष **विनायक भिसे**, अर्थसंवादचे नवनियुक्त संपादक **जे.एस.पाटील**, परिषदेच्या कार्यकारणीचे सभासद व इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. चर्चासत्रात उपस्थितांमध्ये खुली चर्चा झाली व हे चर्चासत्र यशस्वीपणे पार पडले.

**संतोष दास्ताने**
संचालक,
नेविल वाडिया व्यवस्थापन संस्था, पुणे.

# अर्थसंवाद

## (खंड 31, 2007-08)

## (अ) लेखसूची

### स्वतंत्र लेख


1. अर्थसंकल्प 2008 मध्ये दडलय काय ? 347-58

2. आर्थिक सुधारणा आणि बँकिंग क्षेत्राची कामगिरी 137-47

3. आशियायी नाणे निधी : स्वप्नपूर्ती की आव्हान पूर्वार्ध आणि उत्तरार्ध 97- 119, 195-213

4. जागतिकीकरणाचा भारताच्या कृषी मालाच्या व्यापारावरील परिणाम 148-56

5. नंदूरबार जिल्ह्यातील कुपोषण समस्या आणि उपाय 157-69

6. नव उजव्या उदारमतवादी विचारसरणीचा प्रवक्ता : एफ. ए. हायेक 130-36

7. रोजगार(भाग 1 आणि भाग 2) 214-41, 312-28

8. विशेष आर्थिक क्षेत्र - धोरण आणि कायदा : विचार आणि विश्लेषण 16-25

9. विशेष आर्थिक क्षेत्र : समस्या व उपाय 36-53

10. विशेष आर्थिक क्षेत्र : स्वरूप व आव्हाने 54-64

11. विशेष आर्थिक क्षेत्र : विकासाची संधी व समस्या 65-69

12. शहरीकरण रोखा व शेती वाचवा 373-80

13. शिक्षणातील परिवर्तनाच्या दिशा 255-70

14. शेतकरी कर्जमुक्ती प्रश्न-वस्तुस्थिती आणि पर्याय 359-72

15. शेती आणि विशेष आर्थिक क्षेत्र 26-35

16. सहकारी संस्थांचे आर्थिक-सामाजिक विकास प्रक्रियेतील योगदान 328-36

17. सेझ आणि आजच्या विकसनशील देशातील औद्योगिकरणाचे प्रश्न 3-15

18. हॉवर्ड गार्डनर यांचा बहुविध बुद्धिमत्तेचा सिद्धांत 337-46


### भाषणे


1 जागतिकीकरण आणि ग्रामीण विकास भारताच्या विशेष संदर्भात 242-54

2. राजकोषीय तूट आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार शेषाच्या चालू खात्यावरील

तूट : जुळ्या तुटींची समस्या 120-29

3. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, दारिद्र्य निर्मूलन व विषमता 74-91

4. विशेष आर्थिक परिक्षेत्र 216-310

## पारितोषिक प्राप्त लेख

1 कायदा आणि अर्थशास्त्र 373 -86

## ग्रंथ परीक्षण

1. अर्थशास्त्र : उपयोगांचे व दुरूपयोगांचे 277-91

2. कातकरी : विकास की विस्थापना 92-93

3. विदर्भातील मिरची उद्योग : एक आर्थिक विश्लेषण 397-98

4. भारताचा अर्थसंकल्प : अर्थ आणि अन्वयार्थ 181- 83

## पीएच.डी. प्रबंधाचा सारांश

1. नागरी सहकारी बँकातील नियंत्रण प्रणाली 393 - 96

2. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची आर्थिक धोरणे आणि कार्यक्रम 184- 94

## अधिवेशन वृत्तांत

1 अर्थसंवाद वार्षिक अहवाल 2006-07 407-10

2. कार्यवाहांचा अहवाल 411-14

3. कायदा व अर्थशास्त्र 403-06

## विषयांची रूपरेषा

1 सन 1990 नंतरचे महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पाचे बदलते स्वरूप 420-22

2. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना 417-19

3 सर्वसमावेशक वृद्धीचे सैद्धांतिक विवेचन 415-16

## टिपण

1 रूपया वधारला 271-76

2. स्वयं सहायता बचत गट- ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाची वाटचाल 287-90

## संकीर्ण

1. आत्मचरित्र (साक्षेप) 401-02

2. विशेष आर्थिक क्षेत्र नेमके कुणासाठी ? 70-73

3. स्वयं सहायता बचतगट : एक अनुवधिष्ठित अभ्यास 170-76

5. श्रद्धांजली : अरविंद रायखेलकर 69
सुशिलाताई जोशी 194

5. संपादकीय 1-3,293-95

6. सांख्यिकीय पुरवणी 136, 147

7. हार्दिक अभिनंदन : मुक्ता जहागिरदार, 183
भवरलालजी जैन 399-400

## चर्चा

1. अ.रा. पडोशी यांच्या अभिप्रायावरी प्रतिसाद 423

2. गरिबी निर्मूलन आणि आर्थिक विकास 391-92

## *(आ) लेखक सूची*

## स्वतंत्र लेख

1. एरंडे, व्ही.एल. 130-36

2. कुरुलकर, र.पु. 359-72

3. खांदेवाले, श्रीनिवास 3-15

4. गोविलकर, विनायक 16-25,347-58

5. जोशी, शरद शंकर 214-41,312-28

6. नारायण, बाबा सोमेश्वर 148-56

7. निंबाळकर,कैलास 54-64

8. निंबाळकर,रत्ना 54-64

9. पाटील,सुभाष आर. 137-47

10. भोळे,ल. मा. 328-36

11. पानसे, रमेश 255-70,337-46

12. भानुशाली,सु.गो. 97-119,195-213

14. भामरे,दिपक 36-53

15. भालेराव,आर.एन. 157-69

16. मोरे,दि.मा. 26-35,373-80

17. शिंदे,आर.के. 157-69

18. सुकाळे, विकास 65-69

## भाषणे

1. कुरूलकर, र.पु. 74-91

2. कुळकर्णी, प्रकाश 216-310

3. खांदेवाले,श्रीनिवास 242-54

4. नाडकर्णी,अवधूत 120-29

## पारितोषिक प्राप्त लेख

1. देशपांडे, अतुल 373-86

## ग्रंथ परीक्षण

1 कुळकर्णी, सर्वोत्तम न. 181-83

2. घटे,ऋचा 92-93

3. पडोशी, अ.रा. 177-80

4. फडणवीस, मृणालिनी 397-98

## पीएच. डी. प्रबंधाचा सारांश

1. कुळकर्णी, शर्वरी शरद 393-96

2. म्होपरे, राहूल श. 181-83

## अधिवेशन वृत्तांत

1 खामकर, बबनराव 403-06

2. गोखले, चारूदत्त 411-14

3. देशपांडे, विनायक 407-10

## चर्चा

1 खेर, सी.पं. 423

2. दाभोलकर, देवदत्त 391-92

## विषयांची रूपरेषा

1. दांडगे,रमेश 415-16

2. देशपांडे, विनायक 417-19

3. शिंदे, मधुकर 420-22

## टिपण

1. घट, डी.जी. 271-76

2. भांडवलकर, आर. पी. 387-90

## संकीर्ण

1. गोखले, चारूदत्त 1-3,147,183,194

2. देशपांडे, विनायक 1-3,147,183,194, 293-95

3. देवधर, रेखा 170-76

4. बोरीकर दिनकर 401-02

5. शेंद्रे,अवनिश 70-73

## इ. अंकांचा तपशील

| अंक | तिमाही | पृष्ठे |
|---|---|---|
| 1 | एप्रिल-जून 2007 | 98 |
| 2 | जुलै-सप्टेंबर 2007 | 100 |
| 3 | ऑक्टोबर-डिसेंबर 2007 | 99 |
| 4 | जानेवारी-मार्च 2008 | 145 |


हे त्रैमासिक चारूदत्त गोखले यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता श्रीनिवास मुद्रणालय, धंतोली, नागपूर -440012. येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, 'अक्षय', प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी, जिल्हा उद्योग केन्द्राच्या मागे, जळगाव, 425001 येथे प्रसिद्ध केले.

✦✦✦

## अर्थसंवाद या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन (फार्म 4, नियम 8 नुसार)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/चारूदत्त गोखले 'अक्षय', प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी, जिल्हा उद्योग केन्द्राच्या मागे, जळगाव. 425001 |
| 2. | नियतकाल | : | त्रैमासिक |
| 3. | मुद्रकाचे नाव | : | चारूदत्त गोखले |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'अक्षय', प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी, जिल्हा उद्योग केन्द्राच्या मागे, जळगाव. 425001. |
| 4. | मुद्रण स्थळ | : | श्रीनिवास मुद्रणालय, धंतोली नागपूर - 440012. |
| 5. | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. 3 प्रमाणे |
| 6. | संपादकाचे नाव | : | डॉ. विनायक श्रीधर देशपांडे |
| 7. | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'श्रीकमल', 48 विद्या-विहार, प्रताप नगर, नागपूर -440022. |
| 8. | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कॅंपस, फ्लॅट 6, ब्लाक 'एफ', कार्डिनल ग्रेशियस शाळेजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व), मुंबई 400 051. |

मी चारूदत्त गोखले, असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**चारूदत्त गोखले**
मुद्रक व प्रकाशक

# सूक्ष्म अर्थशास्त्राची मूलतत्त्वे

**संपादक**

डॉ. दि.व्यं.जहागिरदार, डॉ. विनायक श्रीधर देशपांडे

**लेखक**

डॉ. सुलोचना मानकर, डॉ.प्राची देशपांडे, डॉ. विवेक चौधरी,
डॉ. जे.एस.पाटील, प्रा.रा.ना. बिन्हाडे

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या UGC अभ्यासक्रमानुसार विसा बुक्स व मराठी अर्थशास्त्र परिषदेचा एक संयुक्त प्रकल्प. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या सूक्ष्म अर्थशास्त्र या विषयासाठी शहरी तसेच ग्रामीण विद्यार्थ्यांच्या गरजा नजरेसमोर ठेवून निर्माण झालेले पुस्तक म्हणजे सूक्ष्म अर्थशात्राची मूलतत्वे. सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. दि.व्य. जहागिरदार व डॉ. विनायक श्री. देशपांडे या अनुभवी अर्थशास्त्रज्ञानंच्या संपादकत्वाखाली ग्रंथ निर्मितीची योजना मराठी अर्थशास्त्र परिषदेने आखून महाराष्ट्रातील सर्वस्तरीय विद्यार्थ्यांची फार मोठी सोय केली आहे. सोपी भाषा शैली, विद्यार्थ्यांना समजेल या पद्धतीने विषय मांडणी, सुबक आकृत्या, स्वच्छ छपाई इ. वैशिष्ट्यामुळे प्रस्तुत पुस्तक विद्यार्थी व प्राध्यापकांना उपयुक्त.

ISBN-978-81-903849-5-7 **पृष्ठसंख्या २८२ (डेमी आकार) मूल्य १९५**

---

# विदर्भातील मिर्ची उद्योग : एक आर्थिक विश्लेषण

**डॉ. मंजुषा ठाकरे**

आपल्या रोजच्या आहारातील मिरची हा एक महत्वाचा घटक आहे. तसेच मिरची हे एक उत्तम व्यापारी पीक आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात मिरचीचे उत्पादन त्यांचे विपनन व बाजारपेठेतील स्थान या संपूर्ण प्रक्रियेच्या सखोल अभ्यास प्रस्तुत ग्रंथात सादर करण्यात आला आहे. डॉ. मंजुषा ठाकरे यांनी केलेल्या संशोधनाच्या माध्यमातून विदर्भातील मिर्ची उद्योगातील प्रमुख केंद्र भिवापूरी मिर्ची चे उत्पादन, विपणन, व अन्य आर्थिक घटकांचा सविस्तर अभ्यास अर्थशास्त्राचे व कृषि क्षेत्रातील विद्यार्थी, प्राध्यापक, कृषिसंस्था, संशोधन केंद्र, अशा विविध घटकांना उपयोगी ठरणारा महत्त्वाचा दस्तावेज ठरणार आहे..


**पृष्ठसंख्या १७० (डेमी आकार) मूल्य १७५**

---

# विसा बुक्स

'स्वागत', ५५, डागा लेआऊट, नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर - ४४००३३.
फोन : ०७१२-२२३४८२१ मोबा. ९८२३२८७२७३

Registration No. 31918/77




Design By SPARK Advertising